# क्रांतीवीर

## सुधाकर जाधवर सरांचे आत्मचरीत्र



प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर सर



आजोबा कै.श्री. तुळशीराम दाजीबा जाधवर, वडील कै.श्री. उध्दवराव तुळशीराम जाधवर,
मोठे बंधु श्री. दिनकर जाधवर, मधले बंधु कै. मधुकर जाधवर, प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर आणि धाकटे बंधु श्री. माधवराव जाधवर

# क्रांतिवीर

## सुधाकर जाधवर सरांचे
## आत्मचरीत्र

**क्रांतिवीर**
**सुधाकर जाधवर सर यांची**
**आत्मकथा**


प्रकाशक : कल्याणी कॉर्पोरेशन
'मंगेशश्री' अपार्टमेंट, रेणुका स्वरूप स्कूल लेन,
एस.पी. बिर्याणी च्या मागे, सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०
मो. ९८२२१९२२१०



© सर्व अधिकार प्रिन्सीपाल डॉ. सुधाकर जाधवर यांच्याकडे राखीव
मो. ९८२२०१८९२१



मराठी लिखाण : प्रिन्सीपाल डॉ. सुधाकर जाधवर

हिंदी ट्रान्सलेशन : प्रो. स्मिता एस. जैन (मो. ७३९११९०३२९४)

डिझाइन ॲण्ड लेआऊट: सतिष चावरे (मो. ८८०५५५२८१८)

प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २०२३

छपाई : कल्याणी कॉर्पोरेशन, पुणे

प्रती : १०००

मूल्य : रु. २००

# मनोगत

हे पुस्तक आपल्या हाती देताना मला आनंदही होत आहे व दुःखही होत आहे. आनंद याचा होत आहे की गेल्या आठ – दहा वर्षांपासून हे पुस्तक म्हणजेच आत्मचरित्र लिहावयाचे होते. परंतु कामाच्या व्यवस्तेमुळे ते शक्य झाले नाही. आता कोरोना महामारीमुळे लॉकडाऊनच्या पाच आठवड्यात रोज सातत्याने हे पुस्तक मी लिहून पूर्ण करू शकलो. याचा आनंद झाला आहे व दुःख यासाठी की या पुस्तकात मी सर्वच घटना सत्य लिहिल्या आहेत. त्यामुळे काही लोकाना वाईट वाटेल याचे मला दुःख वाटत आहे. वास्तविक मला अनेक लोकांनी फसविले असले, माझा गैरफायदा घेतला असला तरी मी त्यांच्यावर अजिबात नाराज नाही किंवा कोणत्याही बदल्याची भावना माझ्या मनात त्याच्याविषयी नाही. कारण त्यातून मला प्रचंड अनुभव मिळाले. मी नाराज यासाठी नाही की मी त्याचा नकारात्मक अर्थ कधीच घेतला नाही. त्याचा मी सकारात्मक अर्थ घेतला. त्यातून धडा घेतला व त्या अनुभवाच्या जोरावर आज मी जो उभा आहे ते त्याचे फलीत आहे. त्यामुळे मला काहींच्या बाबतीत एवढे परखड लिहायचे नव्हते पण त्यांच्या तशा वागण्यामुळेच मी माझी प्रगती करू शकलो. ते जर माझ्याशी चांगले वागले असते तर कदाचित शिक्षण संस्था सुद्धा सुरु झाली नसती व मी एक साधा नोकरी करणारा प्राध्यापक म्हणूनच राहिलो असतो. त्यामुळे माझ्याशी वाईट वागणाराचे मी प्रचंड उपकार मानतो. यांचे ऋण माझ्या हातून कधी फिटणार नाहीत म्हणून मी सदैव त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. त्यांच्या नावानिशी मी उल्लेख केल्यामुळे त्यांना वाईट वाटेल. कदाचित त्यांच्या जागेवर ते बरोबरही असतील पण मी माझ्या दृष्टिकोनातून हे पुस्तक लिहिल्यामुळे मी शपथपूर्वक सांगतो की मला जे वाटते व माझ्या बाबतीत जे घडले ते मी जशाच्या तशे सत्य स्वरूपात मांडले आहे. त्यामुळे कुणाच्या भावना दुखावल्या असतील, त्याच्या स्वाभीमानाला ठेच पोहोचली असेल तर मला ते मोठ्या मनाने माफ करतील व मी त्यासाठी त्यांची माफी मागतो. कारण मी अशा सर्वांनाच माझा गुरु मानून त्याचा अनुभव शिरोधार्य मानला आहे.

हे पुस्तक लिहिताना मला जे आठवले ते ते मी जशास तसे लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या पन्नास वर्षांचा कालावधी रेखाटताना काही महत्त्वाचे लोक व अनुभव विसरलेही असतील असे सर्व लोक मला माफ करतील. पण एवढे नक्की की मी परमेश्वराला स्मरुन जास्तीत जास्त गोष्टी आठवतील तेवढ्या सत्य स्वरूपात मांडल्या आहेत. हे केवळ आत्मचरित्र नसून पन्नास वर्षे सातत्याने आहोरात्र कष्ट करणाऱ्या एका प्रामाणिक माणसाची सत्य कथा आहे, एवढेच मी सांगेन. या पुस्तकातील अनेक प्रसंग हे वाचकास प्रेरणा देतील व पुढील पिढीस साध्या गावातून आलेली एक व्यक्ती पुण्यात एवढे मोठे साम्राज्य निर्माण करू शकते यासाठी सातत्याने प्रेरणा देत राहील एवढीच माझी माफक अपेक्षा आहे.

धन्यवाद !

# प्रस्तावना ...

**'न ही ज्ञानेन सदृशं पवित्र विद्यते'**

या गीतोक्तीप्रमाणे सर्वात पवित्र असणार्या ज्ञानदानाच्या क्षेत्रात कार्यरत असणारे प्राध्यापक डॉक्टर सुधाकर जाधवर सरांचे 'क्रांतिवीर' हे आत्मचरित्र विविध क्षेत्रात कार्य करण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आपले संपूर्ण आयुष्य आपल्या मुलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी आणि एकूणच पुढील पिढीसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन असणे यातच आपल्या जीवनाची सार्थकता असते. या न्यायाने लेखक प्राध्यापक जाधवर सर पूर्णतः यशस्वी झाले आहेत. सत्य कथन करण्यासाठी खूप धाडस लागते, आत्मविश्वास लागतो, प्रामाणिकपणा लागतो हे गुण सरांच्या अंगी असल्यामुळेच ते हे आत्मचरित्र जथ्थे लिहू शकले. महात्मा गांधींचे 'सत्याचे प्रयोग' किंवा कृष्णाबाई सुर्वे यांचे 'मास्तरांची सावली' या आत्मचरित्रांशी मिळते-जुळते लेखण सरांच्या हातून घडले आहे. कवी बा. ग. बोरकरांच्या 'देखणे ते चेहरे प्रांजळाचे आरसे' या काव्यपंक्ती प्रमाणे हे आत्मचरित्र जाधवर सरांच्या प्रांजळपणाचा आरसा आहे

जीवनाची कठोर परीक्षा पाहणारा हा कोरोनाच्या लॉकडाऊनचा काळ सर्वांसाठीच त्रासदायक होता. सतत क्रियाशील असणार्या रजोगुणी माणसांसाठी तर ती भयंकर शिक्षा होती. अशा कसोटीच्या क्षणी मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून आपल्या जीवनातील आठवणींना उजाळा देऊन आत्मचरित्र लिहिण्याची सद्बुद्धी होणं हे मुळात खूप प्रेरक आहे. कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती सम्राट ज्ञानेश्वर माऊलीच्या उक्तीनुसार,

''जैसी दीप कलिका धाकुटी। परी बहु तेजाते प्रकटी।
तेसी सद्बुद्धी थेकुटी। म्हणो नये।''

लॉकडाऊनचा इतका चांगला उपयोग कोणी करून घेतला असेल तर तो जाधवर सरांनी. सर्वांनाच अंतर्मुख करायला लावणारा तो काळ होता. हे आत्मचरित्र वाचतांना एक गोष्ट जाणवते की जरी हे आत्मचरित्र असले तरी ते केवळ आत्मकेंद्री एक केंद्री नाही तर या

आत्मचरित्रात सरांनी आपले प्रेरणास्त्रोत आजोबा, कर्तव्यकठोर पण प्रेमळ आजी, सुख दुःखात साथ देणारी पत्नी, प्रतिकूल परिस्थितीतही न जाता पुन्हा पुन्हा नव्याने सुरुवात करण्यासाठी हात देणारे सन्मित्र, पाय खेचणारे, कटू अनुभव देणारे नातेवाईक, आपला वारसा समर्थपणे पुढे दोन पावले टाकणारा मुलगा अशा सर्व वास्तववादी पात्रांना स्थान दिले असल्याने हे आत्मचरित्र बहुकेंद्री बनले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्याला वाईट अनुभव देणार्‍याविषयी मनात राग न ठेवता त्यांनाच आपल्या प्रगतीचे कारण मानने ही खूप मोठी गोष्ट आहे. ही साधुत्वाची निशाणी आहे.

खडतर जीवन प्रवास ...

आठवणीत असतानाच मातृछत्र हरपूनही मिळालेल्या अल्प सहवासात आईविषयी हळवे असणारे मन वारंवार या आत्मचरित्रात डोकावते. 'बालपणीचा काळ सुखाचा' हे वैश्विक सत्य लेखकासाठी दुर्मिळ ठरला. ज्या वयात आई-वडिलांच्या प्रेमाच्या छायेखाली बागडायचं, खेळायचं, शिकायचं असतं; त्याच वयात जबाबदारीचे पडलेले ओझे लेखकाला अगदी कणखर बनवून जातं. पुढील कार्यासाठी नीती माणसाला घडवत असते, पैलू पाडत असते. मनुष्य जेव्हा ऐरण बसतो तेव्हा त्याला घाव सोसायचे असतात आणि जेव्हा हातोडा किंवा घन असतो तेव्हा घाव घालून पून्हा परिस्थिती बदलायची असते. आत्मचरित्रात ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते.

''सारे जीवन नदीचे घेतो पोटात सागर
तरी तिला आठवतो जन्म दिलेला डोंगर''

या काव्यपंक्तीप्रमाणे प्राध्यापक डॉ. जाधवर सर आपल्या मराठवाड्यातील आपल्या 'वडजी' या जन्मभूमीला विसरले नाही.

''चंद्र आणि सूर्य आले जरी हाती
पायाखालची सोडू नये माती''

डॉक्टर विठ्ठल वाघ यांच्या कवितेच्या ओळी सरांनी आचरणात आणल्या आहेत. ही मुळातूनच चाचणी आहे की आज पंतप्रधान योजनेतून गावाच्या विकासासाठी ज्या काही

योजना राबविल्या जातात त्या आजपासून चाळीस वर्षापूर्वीच आपल्या गावात राबवणारे डॉ. जाधवर सर दृष्टे वाटतात.

'कुछ भी असंभव नही हैं जग में' या प्रेरक विचारांनी भारावून जाऊन कामे करणारे जाधवर सर आज विविध क्षेत्रात वावरतात. यशस्वी बांधकाम व्यावसायिक, शिक्षण संस्थाचालक, व्याख्याते, प्रवचनकार, लेखक, शेतकरी, समाजकारणी अशा अनेक भूमिका ते समर्थपणे पेलतात आणि आपले अष्टपैलूत्व सिद्ध करतात. मराठवाड्यातील ज्या गावात साधी एसटीही न पोहोचलेली नव्हती अशा गावातील व्यक्ती शिक्षण आणि आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर फक्त भारत भ्रमणच करतो असे नाही तर अनेक देशांत भ्रमण करून तेथील माहिती घेऊन आपल्या ज्ञानात आणि कार्यात भर टाकतो. आपल्या शैक्षणिक संस्थेत आध्यात्मिक, सामाजिक, प्रेरणादायी असे उपक्रम राबवतो. हे सारेच अचंबित करणारे आहे, वाचकांना पानोपानी प्रेरणा देणारे हे आत्मचरित्र निश्चितच उपयुक्त आहे. शेवटी त्यांनी आपल्या मुलाला पत्ररूपाने केलेला उद्देश हा अब्राहम लिंकनने मुख्याध्यापकास लिहिलेल्या पत्रासारखा सार्वजनिक उपदेश वाटतो. व्यक्ती स्तरावरून ती समष्टी स्तरावर जाते आणि म्हणूनच अधिकाधिक व्यापक होत जाते.

सरांची शैली अतिशय सुबोध, सहज आणि आवळणारी, जागोजागी विविध सुविचारांनी प्रेरित करणारी आहे. ठिकठिकाणी आलेली प्रवासवर्णने वाचकांना देखील त्या ठिकाणची सफर घडवून आणतात

अशाप्रकारे सर्व अंगाने प्रेरक ठरणारे प्राध्यापक डॉ. जाधवर सरांचे हे आत्मचरित्र वाचकांनाही लिहिते करील अशी खात्री आहे. सरांचा हा लेखनप्रवास असाच पुढे आणखी प्रवाहित हो हीच माऊली चरणी प्रार्थना !

**डॉ. विजय भटकर**

# अर्पण पत्रिका

*हे आत्मचरित्र मी माझी आई सौ. सुंदराबाई व वडिल कै. उद्धवराव जाधवर तसेच ज्याच्यापासून मी अखंड प्रेरणा घेतली व झेप घेण्यासाठी नेहमी ज्यांनी एका वैचारीक प्रेरणा प्रोत्साहन दिले ते माझे आजोबा कै. तुळशीराम जाधवर यांना भावपूर्ण अर्पण करीत आहे.*

*ज्यांनी मला नेहमी प्रेरणा दिली व संदेश दिला की,*

*कुछ भी असंभव नही हैं जग में*

*सब संभव हो सकता है ।*

*कार्य हेतु अगर कमर बांधले*

*सब संभव हो सकता है ।*

*त्या आजोबास भावपूर्ण श्रद्धांजली वाहून हे पुस्तक त्यांच्या चरणी समर्पित करतो.*

# अनुक्रमनिका


| | | |
|---|---|---|
| १ | वडजी | १ |
| २ | आजोबा | ४ |
| ३ | दादा – आई (आबई) | ११ |
| ४ | बालपण | १६ |
| ५ | शिक्षण | १९ |
| ६ | नाटक | २७ |
| ७ | क्रांतिवीर | ३० |
| ८ | मंदिर व मित्र | ३६ |
| ९ | पुण्यात प्रवेश | ४० |
| १० | टॅक्स प्रॅक्टीस | ४५ |
| ११ | बांधकाम व्यवसाय | ५१ |
| १२ | शिक्षण संस्थेची सुरुवात | ५५ |
| १३ | परदेश गमन | ७१ |
| १४ | भारत भ्रमण | ९६ |
| १५ | वडजीचा बंगला | १०० |
| १६ | गावाकडील स्वप्न | १०४ |
| १७ | भाऊजी | १०६ |
| १८ | एम. आय. टी. परिवार | १०९ |
| १९ | संघटना | ११२ |
| २० | विद्यापीठ | ११६ |
| २१ | मित्र | १२१ |

| | | |
|---|---|---|
| २२ | सोनेरी आमदार स्व. रमेशभाऊ वांजळे | १२४ |
| २३ | व्याख्याने व प्रवचने | १२८ |
| २४ | वडजी ग्रामपंचयात | १३० |
| २५ | कर भला तो हो बुरा असा अनुभव | १३२ |
| २६ | वाईट अनुभव | १३५ |
| २७ | एक वाईट अनुभव | १४२ |
| २८ | अक्षय तृतियेचा मुहूर्त | १४६ |
| २९ | संस्थेतील विविध उपक्रम | १५२ |
| ३० | मनातील खंत | १५८ |
| ३१ | माझे घर | १६१ |
| ३२ | चि. शार्दुल | १६२ |
| ३३ | सौ. सुरेखा | १६५ |
| ३४ | मुलास पत्र | १६७ |
| ३५ | शैक्षणिक विचार | १७१ |

# १. वडजी

वडजी हे माझे गाव. जे मराठवाड्याच्या एका कोपऱ्यात वसलेले. मराठवाड्याच्याच नाही तर उस्मानाबाद जिल्ह्याचा कोपरा. जुना कळंब तालुका, नवीन वाशी तालुक्याच्या कोपऱ्यात वसलेले हे छोटेसे २००० लोकवस्ती असलेले गाव. गावाच्या बाजूला वेगवेगळे तालुके व जिल्ह्याच्या शीवाला वसलेले हे गाव. गावाचा भौगोलिक भाग अत्यंत गंमतीचा. गावाच्या पश्चिमेला डोंगराळ भाग तर गावाच्या पूर्वेला एकदम सकस व काळी जमीन. या जमिनीचे वैशिष्ट्य असे की एकदा पाऊस पडला आणि ज्वारीची पेरणी झाली, की पुन्हा पिक काढण्यासाठीच शेतात जावयाचे. इतकी जमीन उत्तम दर्जाची. या गावाला ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. कारण हे गाव निजाम स्टेट मधील शेवटचे गाव. करोडगीरी नाका या गावात. त्याचबरोबर हे गाव दंडकारण्यात वसलेले. त्याच्या एका बाजूला होते जोतीबा मंदिर तर दुसऱ्या बाजूला येमाई माता मंदिर. पुढे तुकाई माता मंदिर व पुढे येडेश्वरी यालाही रामायनातील संदर्भ आहेत. असे हे ऐतिहासिक क्षेत्रामधले गाव.

तसेच नाटकाची परंपरा या गावाला लाभलेली ती ही जवळपास १०० वर्षापेक्षा जास्त. त्या काळात माझे आजोबाही नाटकात काम करायचे, ''संगीत भुवन सुंदरी'' यांसारखी संगीत नाटके या गावात झालेली. माझ्या आजोबांनी एक गोष्ट सांगितली होती की या नाटकात जो काम करत असे त्या प्रत्येकाला नाटकांसाठी पट्टी (वर्गणी) गोळा करावी लागत होती. एका कलाकाराला जी पट्टी आली त्या पैशासाठी त्याने दुसऱ्याच्या घरी सालाने नोकरी केली. त्याला मिळालेले पात्र प्रत्यक्ष रंगमंचावर न येता. पडद्यामागूनच बोलायचे होते व तेही मालक बाहेरून विचारणार ''कोण आहे रे तिकडे'', तर तो म्हणणार ''जी मालक, मी हाय मानाजी''. तेवढ्यासाठी त्याने वर्षभर चाकरी केली. याला म्हणतात नाद किंवा आवड असे आमचे गाव.

गावामध्ये एका बाजूला डोंगर असल्यामुळे जवळ जवळ सहा महिने जनावराचा चारा फुकट मिळणार व राहिलेल्या सहा महिन्यात शेतामधील चारा. त्यामुळे दुधाचे उत्पादन या गावात मोठ्या प्रमाणावर होते व ते एक जोड धद्याचे अत्यंत चांगले साधन गावात आहे. आमच्या गावाचे पिण्याचे पाणी अत्यंत चांगले आहे. असं म्हणत की त्या आडाचे पाणी पापड बनवण्यासाठी एक नंबर व त्या पाण्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या आडाच पाणी सर्व गाव पित असल्यामुळे इतर गावाच्या तुलनेत जन्मणारी मुलं ही आंधळी, लंगडी, खुळी अशी न जन्मत सर्व मुले कडक प्रवृत्तीची, दिसायला चांगली. कोणतेही व्यंग नसलेली अशी जन्मत होती.

गावामध्ये जुन्या काळापासून शाळा शिकण्याची परंपरा, गावात सातवीपर्यंत शाळा होती. आमच्या गावातल्या मुली सुद्धा इतर गावाच्या प्रमाणात जास्त शिकलेल्या. याचे कारण म्हणजे 'शंकर महाराज' या महाराजांचा मठ पंढरपुर या ठिकाणी होता. आमच्या गावची जुन्या काळातील मुलं किर्तनाला साथ देण्यासाठी बाबांबरोबर जायची. सहा सहा महिने त्यांच्याबरोबर टाळ, मृदंग, पेटी वाजवण्याची. भजन म्हणण्यासाठी त्यांच्याबरोबर जायची. किर्तनात शंकर बाबा सांगायचे ''बाबानो वावर इका पण पोरं शिकवा'' हा संदेश सर्वांना देत. शंकर महाराज हे गाडगेबाबांचे शिष्य होते. त्यांच्या सानिध्यात राहिलेले होते. त्यामुळे त्यांचे राहणीमानही गाडगेबाबांच्या सारखा ठिगळाचा शर्ट व तब्येत एकदम पहिलवाणी. तर त्यांची भाषा एकदम गावरान. त्यामुळे बाबांचा संदेश सगळ्यांना भावत होता.

गावांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत चांगले होते. गावामध्ये पूर्वी अनेक चांगल्या परंपरा होत्या. गावामध्ये रामायण ग्रंथ लावला जायचा, दरवर्षी कोणती ना कोणती पोथी (ग्रंथ) गावात चावडीत लावलेली असायची. पावसाळ्यात पाऊस आला की आम्हाला बाहेर खेळता यायचे नाही व आम्ही नाईलाजाने चावडीत जाऊन बसत व हमखास आमच्या वाड्याचा 'राम विजय' नावाचा ग्रंथ चालू असे व वडीलधारी माणसंही बळजबरीने ग्रंथ ऐकायला लावत होती. पोथी वाचणे व त्याचा अर्थ सांगणे हे, ऐकत ऐकत मला अनेक धार्मिक ग्रंथाची आवड निर्माण झाली व पुढे विविध विषयावर भाषणे करताना त्याचा खूपच मोठा फायदा झाला.

या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे जास्तीत जास्त लोकांची आर्थिक परिस्थिती हालाकीची होती. चटणी-भाकरी खाऊन सुद्धा इतके खुष लोक मी कोठेही पाहिले नाहीत. सर्व लोक कधीही गरीबीची चर्चा करत नव्हते किंवा वाईट वाटून घेत नव्हते. उलट आनंदाने गप्पा मारुन सुखाने जगत होते.

हे गाव तसे निजामशाहीतल शेवटच गाव आहे. त्या काळात निजामाची दहशत होती असे माझे आजोबा नेहमी वेगवेगळ्या अनुभवातून सांगायचे. निजामाच्या काळात आमची राजधानी ही हैद्राबाद होती. निजाम स्टेट हे स्वतंत्र होते. कारण निजाम हा राजा इंग्रजांचा मांडलिक होता. त्यामुळे एकादा जरी पोलीस गावात येताना दिसला की सर्व गाव लेकरांना घेऊन गावाच्या विरुद्ध दिशेने डोंगरात पळून जायचे व निजामाचे पोलीस कोंबड्या – बकऱ्या उचलून घेऊन जायचे. एवढी दहशत निजामाची त्या काळात होती. गावाच्या पाच किलो मीटरवर इंग्रजांचे राज्य होते. त्यामुळे बॉर्डरवरील हे गाव अत्यंत महत्त्वाचे होते.

▸▸ ▸▸

# २. आजोबा

दाजीबाचा वाडा हा त्या गावाच्या पंचक्रोशीतील सुप्रसिद्ध वाडा. दाजीबा हे माझे पणजोबा. पांढरे शुभ्र धोतर, कुर्ता, त्यावर घातलेला कोट व घोड्यावर स्वारी, अत्यंत रुबाबदार व करारी व्यक्तिमत्त्व. त्या काळात ब्राम्हण लोक आपल्या पंक्तीला ब्राम्हण सोडून इतरांना कोणालाही बसवत नसत. परंतु आमच्या पणजोबाला ताटाला ताट लावून जेवायला पंक्तीत बसवत. अनेक ब्राम्हण लोक विरोध करीत परंतु इंदापूरच्या जहागीरदार, कुलकर्णी यांनी कधीही हे मानले नाही. एकदा आजोबांनी त्यांचा एक किस्सा  मला सांगितला. ते म्हणाले की, ज्या वेळी हे कुलकर्णी माझ्या पणजोबाचे मित्र आजारी होते त्या वेळी त्यांची वाचा बंद झाली व मरणाच्या अगोदर त्यांना काहीच बोलता येत नव्हते. त्यांच्या आणि आमच्या गावात साधारण अंतर १० किलोमीटर असेल. ते नेहमी आमच्या गावाकडे हात करत. त्या वेळी त्यांची मुले त्यांना म्हणत की आम्ही तुमच्या मित्राला कधीही विसरणार नाही. काही काळजी करू नका. तसे म्हटल्यावरही ते डोक्यावर हात मारून घेत. कारण त्यांना काय म्हणायचे आहे हे त्यांच्या कुटुंबियांना कळत नव्हते व शेवटी ते कुलकर्णी जहागीरदार मृत पावले. माती (अंत्यविधी) झाली, सावडून झाले, दिवस झाला, वर्षश्राद्ध झाल्यावार माझे पणजोबा त्या कुलकर्ण्यांच्या घरी गेले. त्यांचा मुलगा जो कारभारी होता त्याला घेतले आणि आमच्या गावी आले व त्यांच्यापुढे ज्वारीच्या कणगीमधील पैशाने भरलेला मोठा हंडा काढला आणि त्यांना सांगितले, त्याचे सील तपासून घ्या. त्याच्यात चिठ्ठी आहे. त्याच्यात होते ४०,००० चांदीचे सुरती रुपये. ज्याची आजची किंमत कोट्यावधी रुपये आहे; परंतु प्रामाणिकपणे त्यांना ते त्यांचे पैसे वापस दिले व सांगितले की तुमच्या घरावर दरोडा पडला होता. त्या वेळी दुसऱ्या वाड्यात असलेले पैसे दुसऱ्या दिवशी तुमच्या वडिलांनी बैलगाडीत

पाठवले व मी माझ्या ज्वारीच्या कणगीत ठेवले होते. तुमची अमानत परत घ्या. एवढे हे प्रामाणिक लोक होते व त्यांच्या खानदानात माझा जन्म झाला. त्याचा मला सार्थ अभिमान व गर्व आहे.

या दाजीबाला चार मुले होती. त्यामध्ये तीन नंबरला माझे आजोबा, तुळशीराम दाजीबा जाधवर. अत्यंत करारी, रामदास महाराजांसारखी तब्येत, मिश्यांचे आकडे व एक नंबर व्यक्तिमत्त्व. वयाच्या साठाव्या वर्षांपर्यंत पहिलवानकी व कुस्ती करत होते. त्यांचा स्वभाव अत्यंत जिद्दी व रागट होता. एकदा शेजारच्या कोरेगावात कुस्त्यांचा फड होता. आजोबांना भाऊ म्हणत. आजोबांनी कुस्ती खेळायची बंद केली होती; परंतु त्याचे छोटे बंधू हरीबा हे कुस्ती खेळत होते. त्यांच्या भावाची तब्येत अत्यंत चांगली होती. उंचापुरा व रामदास महाराजासारखा तब्येतीचा गडी पण त्यांच्यापेक्षा कच्च्या पहिलवानाने त्यांना पटकन पाडला. कुस्त्यांच्या फडात एकच हसा झाला, अपमान झाला. दाजीबाच्या वाड्याची अब्रू घालवली म्हणून माझे आजोबा पिसाळले. डोक्यावरचं पागोटं काढून टाकले. उभ्या फडात जाऊन दंड थोपटला व त्याला सांगितले; तुझ्याबरोबर तर मी कुस्ती खेळणारच आहे. पण तुझा वस्ताद उठव. त्याच्याबरोबर आधी खेळतो व मग तुझ्या बरोबर आणि दोन दोन मिनिटात दोघाही पहिलवानाला चीतपट केले व अब्रू वाचविली. असा त्यांचा स्वभाव. वडिलांनी किंवा वडील भावानी कोणतेही काम सांगितले की ते त्यांना वेळेच्या आत पूर्ण करून त्यांना सांगणार. जिद्द एवढी की आमचे व आमच्या भावकीचे शेत चार कोस लांब होते. त्याची नांगरणी भावकीने यांच्या आधी सुरू केली. आजोबांनी पाहिले आणि दोन नांगर लावून बैलांना तीन किलोमीटर वरून पाणी आणून पाजून त्यांच्या आधी आमचे १२ एकर शेत बैलांनी नांगरून काढले. पीक सुद्धा कोणाचे आहे असे म्हणावे. असे ते शेती करीत होते.

धुळवडीनंतर कर खेळायला जाणे अशी आमच्या गावाकडे प्रथा होती. आजोबा त्यांचे इतर भाऊ, चुलत भाऊ कर खेळायला डोंगरात गेले. त्याच्या वडील बंधूंना ते अण्णा म्हणत. अण्णा म्हणजे राणाप्रतापसारखे मजबूत देहयष्टी असलेले. हातात बंदूक व घोड्यावर बसूनच फिरणारे. त्यांनी वाघ पाहिला व त्याला गोळी घातली. चुकून वाघाच्या पायाला गोळी लागली व वाघ लंगडत पळू लागला. आजोबा एकदम तरुण होते. ते व त्यांचे चुलत भाऊ वाघाला

पकडायला सगळ्यात पुढे धावले. वाघ शेजारच्या गावाच्या हद्दीत घुसला. त्या गावचे लोकही त्या वाघाला पकडायला त्यांच्या मागे पळू लागले. एकाने त्या गर्दीतून त्या वाघाच्या दिशेने भाला जोरात फेकला. वाघाला लागण्याच्या ऐवजी तो एका त्यांच्याच माणसाच्या मांडीत घुसला. एकच गोंधळ उडाला. आजोबांना पकडण्यासाठी सर्व विरोधी गावकरी धावले व चार लोकांनी सर्वांत पुढे असलेल्या आमच्या आजोबाला पकडले. दोन माणसं पुढे ओढत होती. दोन्ही हात त्यांनी धरलेले होते व मागून दोन माणसं ढकलत होती. आजोबांनी एका दगडाच्या चिपीला पाय लावला व उभे राहिले व गावाकडची माणसं मागून येईपर्यंत एक इंचही हालले नाहीत. चार माणसं त्यांना ढकलीत व ओढीत होती. एवढी अजब ताकद होती.

एकदा आमच्याच ऊसामध्ये पाणी देताना वाघ ऊसात बसलेला आहे हे गड्यांनी सांगितले. अण्णा बंदूक घेऊन तिथे आले. त्यांनी वाघाला घेरले व एक गोळी झाडली. वाघ पळत असल्यामुळे ती गोळी त्याच्या पायाला लागली. वाघ जोरात पळाला. आजोबा व त्यांचे भाऊ अप्पा हे तेथे त्याच्यामागे त्याला मारायला पळाले. आप्पाकडे फरशी कुऱ्हाड होती तर आजोबांकडे भाला होता. आप्पा एवढे चपळ होते की त्यांनी वाघाला गाठले व त्याच्या मागच्या पायाच्या वर खुब्यावर कुऱ्हाडीचा घाव केला. तसा तो चवताळून त्याने आप्पाच्या अंगावर उलटी उडी घेतली व त्यांच्यावर हल्ला करणार तेवढ्यात आजोबांनी वरच्या वर भाला त्याच्या पोटात घुसवला व भावाचा जीव वाचवला.

आजोबा म्हणजे ज्यांना आम्ही भाऊ म्हणत होतो. इतके ताकदवान होते की एकदा गावाच्या ओट्यावर अनेक पैलवान मुले बसलेली होती. बाजूला एक बैलगाडी होती व ती मोकळी पडलेली होती. त्यातला एक पैलवान म्हणाला, ''ही गाडी मी उचलतो.' त्यांनी पाठ लावली व गाडीची चाके हात हात भर उचलली. त्यांची होड लागली. दुसरा पैलवान म्हणाला, 'मी दोन मुले गाडीत बसवून उचलतो. त्याने ती बैलगाडी उचलली. मग तिसरा, चौथा. शेवटी माझे आजोबा म्हणाले की तुम्ही दहाजण गाडीत बसा आणि मी ती उचलतो. त्यांनी बैलगाडी दहा माणसे बसवून हात हात चाके उचलली. त्यावेळी त्याची पाठ चमकली व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या काखेत गाठ आल्यावर त्यांनी जसे तापलेली सळई त्या गाठीवर धरली व त्यामुळे आपण त्यांना लोह पुरुष म्हणतो. त्यांच्याप्रमाणेच आजोबाच्या

पाठीला सुद्धा लाल सळयानी चार डाग दिले होते. अशा प्रकारे ते ही लोह पुरुषासारखे वागले.

महाराष्ट्रात पंचायत राज आल्यानंतर गावात ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. त्यामध्ये पहिल्यांदा आजोबा सरपंच झाले व दुसऱ्यांदाही ते सरपंच झाले. सलग १० वर्षे ते सरपंच राहिले. त्यावेळी ग्रुप ग्रामपंचायत होती. वडजी व म्हसोबाची वाडी अशा दोन गावाचे ते दोनदा सरपंच झाले. अत्यंत चांगल्या प्रकारे ते हे गावगाडा चालवत होते. आता जी गावात जुनी शाळा व ग्रामपंचायत आहे ती त्यांच्या काळातच बांधली होती. त्या काळात सरपंचाकडेच रेशनचा कोटा होता व साखरेच्या पोत्यात हात घालून मुठ्ठीच्या-मुठ्ठी साखर खात असे. हे मला पूर्णपणे आठवत आहे. त्या वेळी आख्या दहा गावात आमच्याच घरी रेडिओ होता व सार्वजनिक ठिकाणी सर्व लोक ठरावीक कार्यक्रम ऐकत असायचे. त्यावेळी अमेरिकेचे स्कायलॅब भारतावर पडणार व आपण माणसे नष्ट होणार  या भीतीने सर्वजन चांगले चांगले पक्वान, अन्न तयार करून खात होती. कोण मरेल व कोण वाचेल असे सांगता येत नव्हते. ज्या दिवशी स्कायलॅब पडणार त्या दिवशी सर्व लोक गावभर जागे होते. गावात वेशीमध्ये रेडिओ घेऊन आमचे आजोबा बसले होते व रेडिओवरून सर्व माहिती सांगितली जात होती. रात्री अकरा ते बारा या वेळेत ते स्कायलॅब भारतावरून जाणार होते किंवा भारतात कोसळणार होते. सर्व लोक जीव मुठीत घेऊन हे ऐकत होते. एकदाचे रात्री साडेअकराच्या सुमारास ते स्कायलॅब समुद्रात पडले अशी बातमी आली व सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

आजोबांचा सरपंचाचा कार्य काळ संपल्यावर एक ऑडिटर ग्रामपंचायतीचे ऑडिट करण्यासाठी आला. त्यांनी तो रेडिओ पाहिला व त्या रेडिओची मागणी केली. आख्ख्या गावात एक रेडिओ असल्यामुळे व माझ्या वडिलांना तो रेडिओ खूप आवडत असल्यामुळे आजोबांनी तो देण्यास नकार दिला. तो ऑडिटर चिडला व त्याने सांगितले की मी आता याचा बदला घेणार व त्या काळी रेशन असल्यामुळे तुम्ही पोत्याचा हिशोब दिला नाही असे सांगून आजोबांवर १८०० रुपये काढले व रेडिओ दिला तर काहीच काढणार नाही म्हणून पुन्हा रेडिओ मागू लागला. त्यास नकार दिला म्हणून ते ऑडिट कायम केले. त्या काळात १८०० रुपये म्हणजे फार होते. खेड्यात एवढे पैसे कुठून आणायचे व कसे भरायचे. अत्यंत

वाईट दिवस उजाडला. आत्तापर्यंत कुठल्याही सावकाराचे घर न पाहिलेले आजोबा केदारी सावकार म्हणून एक सावकार होते त्यांच्याकडे गेले व त्याने साल सवई ने १८०० रुपये दिले व ते पैसे विनाकारण काढलेल्या ऑडिटला भरावे लागले व आमचे कुटुंब सावकाराच्या विळख्यात सापडले.

केदारी सावकार चांगला होता. आमच्या आजोबाचे व त्याचे संबंध चांगले होते. अनेक दिवस खळ्यावरून गहू, ज्वारी त्याच्या व्याजात तो नेत होता. पुढे दुष्काळ पडला. १९७२ साली वर्षभर पावसाचा एकही थेंब पडला नाही. दुष्काळ जाहीर झाला. त्या काळात इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. श्रीमती इंदिरा गांधी आमच्या तालुक्याच्या ठिकाणी दुष्काळी दौऱ्यावर येणार होत्या. मी सहावीत होतो. पैसे नव्हते. त्याच्या अगोदरच्या दिवशी मी रुसलो होतो, त्यामुळे जेवलो नव्हतो. मला बाजारासाठी १० रुपये दिले होते. मी ७ रु. तच सगळा बाजार बसवला व कोणाकडे तरी घरी पाठवून दिला व मी कळंब या ठिकाणी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पाहण्यासाठी गेलो. तिकीट एक रुपया, जाणे-येणे २ रुपये व उरला १ रुपया. त्यातलेही बारा आणे सुर्यभान मोराळे यांनी माझ्याकडून घेतले व जवळ चार आणेच राहिले. जेवण कसे करणार, दोन दिवस कसे भागवायचे. मी दादाहरी गुरुजीच्या घरी गेलो. पण मी त्यांना सांगितले की मी जेवलो आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी पहाटे ४ वाजता ग्राऊंडकडे गेलो. दुपारी पंतप्रधान येणार होते. मी भुकेने व्याकूळ झालो होतो. काही सुचत नव्हते. हेलिकॉप्टर्स आल्यावर तेवढ्यापुरते बरे वाटले. उपवासाचा दुसरा दिवस होता. बाहेर आल्यावर १० पैशाची बोरं घेतली. ती ही गिळत नव्हती. बसने तेरखेड्याला आलो. तिथून शेतात जाऊन ऊस मोडून पट पट खाल्ला. मला बरे वाटले. इंदिरा गांधींनी दुष्काळी कामामध्ये रस्ते करणे व खडी फोडणे ही कामे सुरू केली. त्या काळी मी इयत्ता सहावीत शिक्षण घेत होतो. लहान होतो. पण घरातले सगळे लोक खडी फोडायला जायचे व माझा मोठा भाऊ दिनकर हा गाडीने ती खडी वाहण्यासाठी जायचा. हे मी स्वतः पाहिले. त्यावेळी सातू आले. सातूची रोटी, एका उद्योगपतीने सगळ्यांना कामाच्या प्रमाणात सुकडी वाटप सुरू केले. अमेरिकेहून कॅटल फुड आणले. इलो निलो, लाल ज्वारी हा महाभयंकर दुष्काळ व त्या काळात लोकांचे होणारे हाल व जगण्यासाठीची धडपड मी स्वतः बघितली आहे. त्या काळापासून केदारी

सावकाराचे व्याज देणे बंद झाले. आजोबांचे वयही जास्त होते. त्यांचा प्रामाणिकपणा फार मोठा होता. केदारी सावकाराला पक्की खात्री होती की पैसे बुडणार नाहीत. माझे आजोबा मला जवळ घेत आणि म्हणत, सुधा बाळा माझ्या डोक्यावर एकच कर्ज आहे ते म्हणजे केदारी सावकाराचे. त्यांचे एकदा पैसे दिले की मी मरायला मोकळा झालो. त्यांचे पैसे देईपर्यंत मी मरणार नाही. मला कुणाच्या ऋणामध्ये राहायचे नाही. आजोबाच्या देखत मी बार्शी या ठिकाणी प्राध्यापक झालो. १९८५ साली व पुण्यात शिवाजी मराठा संस्थेत मला २० जून १९८६ साली कॉमर्स प्राध्यापकाची नोकरी लागली. मी ठरवले की आता केदारी सावकाराचे पैसे द्यायचे. आजोबांनी मला सांगितले की दोन हजार रुपये द्या. मी दोन हजार रुपये केदारी सावकाराला दिले व त्यानंतर काही दिवसात कावीळ होऊन साध्या आजाराने केदारी सावकाराचा अंत झाला व त्यांच्या ऋणातून मी आजोबांची सुटका करू शकलो.

आजोबा खूपच करारी व जिद्दी होते. त्यांच्या विचाराने मी फारच प्रेरित होतो. त्यांचे सगळे गुण आपल्या अंगात उतरावे व आपणही त्यांच्या सारखेच व्हावे असे मला नेहमी वाटायचे. दुष्काळ, सावकार व सावत्र आईच्या भांडणामुळे आमची परिस्थिती अत्यंत गरिबीकडे ढकलली जात होती. त्यात आमच्या चारी बैलांना कुणीतरी विष घातलं व आमची पूर्ण शेती पडीक पडली आणि आतातर आम्हांला गरिबीने विळखा घातला होता. यामध्येच भावकीच्या काही लोकांना आमची आर्थिक परिस्थिती खराब व्हावी व आम्ही आमची जमीन त्यांना विकावी असे वाटे. त्यामुळे एखाद्या दारुड्याला पटवून आमच्या भिजनाच्या बारी दिवशी मोटारचे फ्युज काढावयास लावायचे व सगळा ऊस वाळवून टाकला व गहूही वाळवला. ऊस मी स्वतः तोडून जनावरांना चारला. कशी परिस्थिती सुधारणार. पण मी कधीही भाऊकीला त्याबद्दल नावे ठेवली नाही. कारण परिस्थिती खराब असते त्या वेळी सगळेच तसे वागतात. एवढे मोठे घर श्रीमंत पण परिस्थिती आणि काळाने त्याला गरिबीकडे ढकलले. आता अशी परिस्थिती निर्माण झाली की पंधरा पंधरा दिवस बाजाराला जायला एकही पैसा नसायचा. १० रुपये बाजाराला नसायचे. भाजीच काय चटणी सुद्धा मिळणे अवघड होऊ लागले. भावजय व बहिणीच्या डोक्याला महिना – महिना तेल मिळत नव्हते. इतकी वाईट परिस्थिती घराची झाली. माझे मोठे दोन्ही भाऊ आजोबांना वाटत होते तेवढं

काम करत नव्हते. त्यामुळे आजोबा चिडायचे. मुलगा एकुलता एक तळ हाताच्या फोडासारखा सांभाळलेला. त्याची मुलं काम करत नाहीत. आजोबांनी मला एकदा जवळ घेतलं आणि म्हणाले, बाळा सुधा – ज्या ठिकाणी फुलं वेचली त्या ठिकाणी गोवऱ्या वेचायची वेळ या घरच्या लोकांनी आणली. काय रुबाब होता आणि म्हातारपणी ही वेळ आणली आणि रडू लागले. त्यांना सहन होत नव्हतं. मला अतिशय वाईट वाटले व त्यांच्या त्या रडण्याचा व विचारांचा माझ्या मनावर खूप खोलवर परिणाम झाला व त्या दिवसापासून वय लहान होतं. शाळेत जात होतो; परंतु शेती बघायची ठरवलं आणि एक मजूर घेऊन अख्खा एक एक्कर ऊस तुडुंब गवताने गच्च भरलेला आठ दिवसात खुरपून काढला. त्या दिवसापासून आजपर्यंत त्यांचा आवाज माझ्या कानात घुमतोय आणि मी वेड्यासारखा खाण्यापिण्याचा विचार न करता रात्रंदिवस काम करतोय. ही सगळी प्रेरणा माझ्या आजोबांची.

आजोबा नेहमी म्हणायचे, घराचे कल्याण सुधाच करेल. मला त्यांच्या देखत नोकरी लागली व त्यांना अत्यंत आनंद झाला. मी १९८४–८५ ला गावामध्ये किराणा दुकान टाकले. त्यांना अत्यंत आनंद झाला. नंतर आमच्या चुलत भावाबरोबर ६१६१ नंबरची जीप घेतली आणि त्यांना सर्व शिवारात जीपमधून फिरवल. त्यांना अत्यंत आनंद झाला. त्या इच्छाशक्तीवर ते कमीत कमी १० वर्षे जास्त जगले. महिलांचे कायदे आले. त्यामुळे आमच्या वडिलाच्या पहिल्या बायकोने केस दाखल केली व ती केस तिच्यासारखी झाली. तेव्हापासून काय सत्य आहे; तीच नांदायला आली नाही. तरी तिच्यासारखा निकाल लागला हे योग्य झाले नाही म्हणून कमीत कमी १५–२० वर्षे ते वेशीत येत नव्हते. एवढा करारी स्वभाव. त्यांनी सर्व ग्रंथ वाचले होते व माझी पहिली ते दहावीपर्यंतची सर्व पुस्तके ते वाचत.

चष्मा नाही, काही नाही, एकही आजार नाही आणि वय १०७ वर्षे आणि एक दिवस त्यांची प्राणज्योत मावळली. असे हे माझे आजोबा माझे प्रेरणास्थान व उत्प्रेरक. पण त्यांना एकही दिवस मी विसरलो नाही व त्यांचे रूप माझ्या डोळ्यासमोरून जात नाही व त्यांच्या प्रेरणेने मी आजही काम करत आहे.

▸▸ ▸▸

# ३. दादा-आई (आबई)

माझे वडील उद्धवराव जाधवर अत्यंत गरीब स्वभावाचे, मन मिळाऊ. त्यांच्या ८० वर्षांच्या वयापर्यंत कोणालाही कधी वाईट बोलल्याच कोणालाही आठवत नाही. तगडी शरीर यष्टी व जबरदस्त व्यायाम. गावात तालमीत एक दगड होता. तो सतत मागे पुढे फेकायचा व्यायाम ते करत. एका बोटाने दगड उचलत. आजोबांचा स्वभाव एकदम रागीट होता. त्यांना हा एकुलता एक मुलगा व दोन बहिणी होत्या. पहिली बहिण वारली म्हणून दुसरी धाकटीही त्याच घरात दिली. पण मेव्हण्याचा स्वभाव अत्यंत कडक व किरकीरा. नेहमी दारुच्या नशेत. अशामध्ये त्यांच्या बहिणीने पूर्ण जीवन काढले. आम्ही लहानपणी सुट्टीमध्ये आत्याच्या गावाला जात होतो. त्यावेळी तिच्या नवऱ्याची खूप भीती वाटत होती. सतत शिव्या व कडकपणा कशाबद्दलही खवळणार पण आम्हाला कधी काहीच म्हणायचे नाहीत. आजोबा कडक असल्यामुळे माझे वडील त्याच्या पूर्णपणे ताब्यात होते. एकुलता एक मुलगा असल्यामुळे आजोबा वडिलांना खूप जपत होते. प्रत्येक काम स्वतः करायचे पण वडिलाला कोठे जाऊ द्यायचे नाहीत. त्यामुळे वडील गरीब राहिले. त्यांना कधीच आजोबांनी भितीपोटी काहीच करू दिले नाही. माझे वडील सुद्धा गावच्या ग्रामपंचायतचे दोन वेळा सदस्य झाले. नंतर मोठा भाऊ चार वेळा सदस्य व १० वर्षे उपसरपंच राहिला. आता छोटा भाऊ गेली १५ वर्षे सदस्य आहे. ही ग्रामपंचायतची परंपरा ग्रामपंचायत निर्माण झाल्यापासून आजतागायत आमच्या घरातील माणूस ग्रामपंचायतमध्ये आहे.

वडिल ज्यावेळी माझ्याकडे पुण्याला आले. खरंतर त्यांना पुण्यात राहणे आवडत नव्हते. ते म्हणत आरे इथं तर कुणी कोणाला बोलतही नाही. प्रत्येकजण आपआपल्या कामात आहे. हा तुझा सोन्याचा पिंजरा आहे. दहा पंधरा दिवसाच्या पुढे कधीच करमत नव्हते. आठ दिवस झाले की, मला गावाला पाठव म्हणून आग्रह धरायला सुरुवात करायचे. पुण्यात आम्ही

कशातरी त्या वेळी एक एक गुंठा घरासाठी जागा घेतल्या. ते ऐकून त्यांना अत्यंत आनंद झाला. माझे मित्र प्राचार्य भोईटे यांनी त्यावेळी माझ्या बरोबरच असताना स्वतःचा बंगला बांधला. माझे वडिल मला सतत म्हणत असत, तू आता कसं बांधकाम करणार, पैसे कुठून आणणार, तुझं कसं होणार. पण त्याच्या जिवंतपणी मी बंगला बांधला. पुण्यात घर झालं म्हणून त्यांना अत्यंत आनंद झाला. माझी छोटी बहिण मला लहानपणीच आई वारल्यामुळे तिचे फारच हाल झाले. माझा छोटा भाऊ तर सहा महिन्याचाच होता. त्यावेळी आमची आई वारली. त्याला आजीने सांभाळले.

आई वारली तेव्हा मी आठवीत होतो. माझा मोठा भाऊ मधू याची दहावीची परीक्षा होती. आईला माती देऊन त्याला दहावीच्या परीक्षेला जावे लागले. आमची दुसरी आजी खूपच कडक होती. आमच्या आईला खुपच त्रास द्यायची. पण आई कधी वर मान करत नव्हती. आई जरा आजारीच असायची. तिला मी बाजाराला गेल्यावर काही तरी चार आण्याचा खाऊ आणायचो व रविवारी आम्ही दुपारी शेतात जाऊन आईला तो खाऊ मी गुपचुप चारायचो. आजीला जर माहित झाले तर काय ? एवढ्या दहशतीत माझी आई जगत होती. पण आम्हाला सोडून ती देवाघरी गेली. आईला माझ्या छोट्या भावाच्या बाळंतपणात काही तरी आजार झाला व ती अर्ध्यात सोडून निघुन गेली. तिला औषधपाणी नीट मिळाले नाही म्हणुन ती वारली. आईचे प्रेम किती असते बघा. माझ्या वडिलाची आई मुलीकडे काही दिवसासाठी राहायला गेली होती. ती सतत त्या काळात आजारी असायची. एकुलता एक मुलगा त्याच्यावर ती खुप प्रेम करायची. आजी खुप प्रेमळ होतो. कुणीही गरीब दारात आला तर त्याला जेवायला घातल्याशिवाय जाऊ देत नसायची. तिला मुलाची आठवण आली. दोन्ही गावात २५-३० किलोमीटरचं अंतर. पण ती राहायला तयार नव्हती. पावसाळ्याचे दिवस होते. मांजरा नदीला पुर आला होता. तरी तिने सांगीतले. घाला पुरात गाडी काही होणार नाही. बैलगाडी पुरात घातली. पुर होता तरी तिच्या पुण्याईने गाडी सुखरुप बाहेर आली. दिवस मावळायच्या वेळेला बैलगाडी गावात पोहोचली. घरी गेल्या गेल्या मुलगा कुठे आहे ? उद्धव कुठे आहे ? असे विचारले. मुलाला बोलवायला पाठवले. मुलगा आला आणि त्याला कडकडून भेटली.

दिवस मावळायची वेळ होती म्हणून दिवा लावायला सांगितले. मुलाच्या मांडीवर डोकं ठेवले व दिव्याकडे हात दाखवला व प्राण सोडून दिले. मुलावरच्या प्रेमाखातर घरी येऊन मुलाला भेटून लगेच प्राण सोडले. केवळ मुलाला भेटण्यासाठीच जीव धरून ठेवला होता की काय असे वाटते. हे मातेचे प्रेम आहे. माझ्या जीवनामध्ये नेहमीच एक खंत आहे ती म्हणजे मी आईची सेवा करू शकलो नाही. माझ्या चौदाव्या वर्षीच आई मला सोडून गेली. वडिल नोकरी लागेपर्यंत होते; परंतु मी सतत शिकण्यासाठी व नोकरी निमित्त बाहेर गावी असल्यामुळे मला वडिलाची ही सेवा करता आली नाही. कधी वेळेमुळे तर कधी परिस्थितीमुळे मी हतबल राहिलो व वडिलाची सेवा करू शकलो नाही. याची माझ्या मनात मरेपर्यंत खंत राहील.

माझ्या आईचा मृत्यू (आबईचा) औषधावाचून झाल्यामुळे नेहमी माझ्या मनात अनेक प्रश्न उभे राहायचे की गरीबाला कुणी वालीच नाही का ? त्याच्यासाठी आपणही काहीतरी केले पाहिजे व मी कॉलेजला असताना ठरवले की, ४० गावामध्ये दवाखाने सुरु करावयाचे. त्या वेळेला मी बार्शी या ठिकाणी शिक्षण घेत होतो व नर्गीस दत्त कॅन्सर हॉस्पीटलची स्थापना नवीनच बार्शी या ठिकाणी झाली होती. डॉ. कश्यपी यांच्याशी माझे संबंध चांगले होते. त्यांनी कॅन्सर हॉस्पीटलची बस ज्यामध्ये पूर्ण दवाखान्याच्या सोई होत्या. ती फक्त एक रुपया पंचवीस पैसे कि. मी. ने ती गाडी आमच्या गावात व वेगवेगळ्या ठिकाणी दर रविवारी देण्यास सुरुवात झाली. डॉ. वैद्य हे कॅन्सर हॉस्पीटलचे सर्जन होते. त्यांची आई सुद्धा औषधावाचून वारली होती. ते अत्यंत चांगले सर्जन होते. ते दर रविवारी पेशंट तपासणीसाठी कॅन्सरची गाडी मिळो वा ना मिळो ते येत होते. पाच सहा किलोमीटर सायकलवर व बाकी एस. टी. ने प्रवास करून मोफत रुग्णाची सेवा करत असत. असा उपक्रम जवळजवळ दोन वर्षे चालला. मला पुण्याला नोकरी लागली व डॉक्टरांना त्याच्या चांगल्या कामामुळे सर्व पेशंट त्यांच्याकडेच जायचे. राजकारण सुरु झालं व डॉ. वैद्याना खोटे आरोप ठेऊन कॅन्सर हॉस्पिटलमधून काढून टाकले ही दवाखाना काढण्याची व गरीबाच्या सेवा करण्याची माझी इच्छा अपूर्ण आहे. ती अजून मला पूर्ण करावयाची आहे. त्या वेळी एवढचं झालं की, अनेक

स्त्रियांच्या ब्रीस्ट व युट्रज कॅन्सर दूर करण्यात आम्ही यशस्वी झालो.

मला एकदा गावाकडून फोन आला की दादा म्हणजे माझे वडील खूपच आजारी आहेत. खरं तर त्यांना मी सोलापूरला पाठवले होते. पण मधुकर म्हणजे माझा मोठा भाऊ याने त्यांना सोलापूरवरून गावाकडे नेण्याऐवजी त्याने त्यांना पुण्याला आणायला पाहिजे होते पण तसे न करता त्याने वडिलांना गावी घेऊन गेला. दुपारी सगळे शेतात गेल्यावर त्यांना घरात टाकून बाहेरून कडी घालून सगळे शेतात निघुन जायचे मला हे समजल्यावर अतिशय वाईट वाटले. मी सकाळी सहा वाजता घरातून निघालो. ड्रायव्हर नव्हता माझ्याकडे ११८ पद्मिनी प्रिमीअर गाडी होती. मी माझ्या चुलत भावाला एच. आर. ला बरोबर घेतले व तात्काळ गावाला गेलो. खरंच घरी कोणीही नव्हतं. वडिलांना घरात ठेऊन बाहेरून कडी घालून सर्व लोक शेतात गेलेले होते. मी कडी उघडली. बारीक आवाजात वडील म्हणाले कोण आहे ? मी म्हणालो, दादा मी आलोय सुधा पुण्याहून. तुम्हाला घेऊन जायला. हे ऐकताच त्यांनी हंबरडा फोडला. माझ्याही अश्रुचे बांध फुटले आणि त्यांना गाडीत घातले आणि तात्काळ पुण्याला आणले. २७० कि. मी. जाणे व २७० कि. मी. येणे. मला अतिशय वाईट वाटले या पद्धतीने मोठ्या भावाने वडिलांना वागणूक दिली. मी त्यांना रुबी हॉलमध्ये ॲडमीट केले. माझ्या बरोबर माझ्या सासुबाई आल्या होत्या. त्यांना दवाखान्यात बसवून मी रात्री ११ वाजता घरी आलो. दादांना बोन मेरो झाला होता. त्यांना कितीही रक्त दिले तरी ते आटून जायचे. कदाचित त्यांच्या पत्नीचे म्हणजेच माझ्या आईचे लवकर निधन झाल्यामुळे त्याच्या खाण्यापिण्याची खुशालीची अडचण झाली असावी. पण कधीही एकही शब्द त्यांनी तोंडातून कुणाविषयी काढला नाही किंवा कोणाची तक्रार केली नाही. त्याचे रक्त तपासायला सुद्धा निघत नव्हते. आठ दहा दिवस झाले असतील दररोज तब्बेत ठासळत होती. एके दिवशी मी रात्रीचा डबा घेऊन गेलो. रात्री १० वाजले असतील. माझा मोठा व लहान भाऊ दोघेही तिथच होते. दादाची वाचा दोन दिवस झाले बसली होती. एकही शब्द ते बोलत नव्हते.

आज काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करत होते. मला संकेत मिळाले की त्यांची अंतिम घडी जवळ येत आहे. मी डबा देऊन परत येणार होतो; परंतु परत आलो नाही. त्यांच्या

जवळच थांबलो. वारंवार एकच वाक्य त्यांच्या तोंडात होते. ते बोलण्याचा प्रयत्न करीत होते. सुधा ... माधवराव ... सुधा ... माधवराव मध्ये त्यांना काहीतरी बोलायचे होते पण त्यांना ते बोलता येत नव्हते. सातत्याने प्रयत्न करीत होते. तेवढ्यात एक डॉक्टर आले आणि सोबत डोके तपासण्याची मशीन घेऊन आले. अंदाजे रात्री बाराची वेळ असेल. मी डॉक्टरला म्हणालो, अहो त्यांची जायची वेळ आली आहे. तसा त्यांचा प्रयत्न दिसत आहे. त्यांच्या डोक्याला काहीच झालेले नाही आणि तुम्ही कोणत्या कारणासाठी डोकं तपासायला निघालात. मी जरा रागावलो. मग डॉक्टर तेथून निघुन गेले. त्यानंतर एका तासातच त्यांनी प्राण सोडला असेल असे हे दवाखाने. दादा जे वाक्य पूर्ण करू इच्छित होते ते वाक्य माधवरावासाठी म्हणजे माझा छोटा भाऊ यासाठी होते. तो सहा महिन्याचा असतानाच आई वारली. तो अजून शिकत आहे. तोवरच मी म्हणजे वडील चालले व त्याच काय होणार ? कसा जगणार ? कसा राहणार ? कुठे राहणार ? असे अनेक प्रश्न त्याचा जीव रोखून धरत होते व त्यामुळे वारंवार प्रयत्न करून बोलत होते. शेवटी एकच वाक्य पूर्ण करण्यासाठी दोन दिवस प्रयत्न करत असलेले दादा वाक्य जोडण्यात यशस्वी झाले व त्यांना म्हणायचे होते की माधवराव तू सुधाच ऐकत जा. एवढा प्रयत्न त्यांचा यशस्वी झाला आणि मी दादांना वचन दिले की दादा मी माधवरावाला माझ्या मुलाप्रमाणे सांभाळेन आणि त्याच क्षणी ऐकताच त्यांनी जीव सोडला. त्या वेळी मला पित्याचं हृदय कळले आणि प्रेम सुद्धा. दादा कमी बोलत होते. पण सर्व मुलांची काळजी ते करत होते. धन्य ते माता-पिता ज्यांनी आम्हाला जन्म दिला व ही पृथ्वी दाखविली.

# ४. बालपण

आमचे वडील एकुलते एक होते. पण त्यांना आम्ही चार मुलं व एक मुलगी होतो. आम्हांला दोन सावत्र बहिणी होत्या. पण आमची सावत्र आई आहे हे मला माझी आई वारली त्या वेळी आठवीत असताना समजले. त्यामुळे त्यांचा आमचा जास्त कधी संबंध आला नाही. आमचं चांगलं एक कुटुंब होतं भरलेलं. आमच्या आजीने आम्हांला आईची कमी कधी भासू दिली नाही. थोरला मुलगा दिनकर, मधुकर, मी सुधाकर, चौथा माधवराव व बहीण वनमाला जोपर्यंत आई जिवंत होती तो पर्यंत आमची परिस्थिती बरी होती. पण ती गेल्यावर जणू लक्ष्मीच गेली आणि आमची आर्थिक परिस्थितीत दिवसेंदिवस बिघडत चालली व बिघडतच गेली. दादांना सावत्र आईच्या पोटगीचे पैसे भरायला नाही म्हणून दिवाळीच्या आदल्या दिवशी १९०० रुपयांसाठी १ महिन्याची साध्या कारावासाची शिक्षा झाली. ज्या वेळी मी त्यांना जेलमध्ये भेटायला गेलो त्या वेळी ते रडू लागले व मला येथून बाहेर घेऊन जा म्हणू लागले.

मला आठवतंय मी अकरावीला बार्शी या ठिकाणी ॲडमिशन घेतली. पोटगी भरली नाही म्हणून वारंवार वॉरंट यायचे म्हणून दादा माझ्या बरोबर बार्शी या ठिकाणी राहण्यास माझ्या खोलीवर आले. मी पहिल्यांदाच गावाबाहेर पडल्याने मला स्वयंपाक करता येत नव्हता. मी हायब्रीड काळ याची भाकरी करायला शिकत होतो. भाकरी तयार करताना तिचे तुकडे पडत व ते बळंच तव्यावर जोडायचे व भाकरी करपलेली कशी बशी बनवावयाची व बिना भाजीची चटणी सोबत आम्ही खाऊन राहात होतो.

तालुक्याला दादाच्या विरोधात पोटगीचा निकाल लागला होता. दादाचं लग्न स्वातंत्र्य पूर्व काळात झालेले होते. महिलाचे कोणतेच नीट कायदे अस्तित्वात नव्हते. पण नवीन

कायद्यानुसार चाळीस वर्षानंतर सावत्र आईने केस लावली होती. गावातील राजकारणामुळे विरोधी पार्टीतील पुढाऱ्यांनी मुद्दाम केस लावली होती. पण महिला कायद्यामुळे ती केस दादा हरले होते. त्यात एक महिन्याची जेलची सजा सुद्धा झाली होती. अपील करण्यासाठी पैसे नव्हते. शेतात अंबाडी काढायला आली होती. भागामाय आमच्या शेतातली कामे करी. मी तिला घेऊन आबांडी काढायला घेतली. अंबाडी अतिशय खतरनाक झाड असत. त्याला छोटे छोटे अतिशय लहान काटे असतात. आंबाड्या काढताना काही वाटले नाही; पण जेव्हा आम्ही त्या बडवल्या त्या वेळी ज्या वेदना झाल्या त्याने काट्याची किंमत कळली. त्या आंबड्या मी विकल्या. ६० रुपये आले. ते घेऊन मी कळंबला गेलो. तालुक्याचं ठिकाण. वकील आमच्या भावकीतलाच होता. पण त्याने पन्नास रुपये मागितले. त्या शिवाय फाईल देत नाही म्हणाला. आत्तापर्यंत कधीही पैशाची मागणी त्यांनी केली नव्हती. त्याची ही चूक नव्हती. मी त्याला चाळीस रुपये दिले. जाणे – येणे गाव ते तालुका व तालुका ते जिल्हा व परत गाव १० रुपये त्याला जाणे येणे लागत होते. पन्नास रुपये खर्च झाला. उरलेले फक्त १० रुपये केस अपील दाखल करण्यासाठी. तिकिटे, टायपिंगलाच ४० ते ५० रुपये लागत होते. मला काय करावे सुचत नव्हते. आमच्या गावातील माणसाच्या ओळखीचा एक वकील होता. त्यांच्याकडे गेलो. त्याने सांगितले की केस दाखल करायची असेल तर कमीत कमी चाळीस – पन्नास रुपये लागतील. मी रडू लागलो. माझ्याकडे तर फक्त १० रुपयेच आहेत आणि वेळेत अपील केली नाही तर दादांना त्रास होईल. मी त्या काळी अकरावीला म्हणजे काहीही कोर्टाचे कळायचे नाही. शेवटी त्या वकिलाला कळवळा आला व त्याने अपील दाखल करतो असे सांगितले. माझ्या जवळचे १० रुपये देवून अपील दाखल केली. त्या वेळी आंबाड्या बडवून काटे अंगात घेऊन त्या ६० रुपयाचे मोल कळले.

मी ठरवले सावत्र आईला व मालाला भेटायचे आणि वाद संपुष्टात आणायचा. त्या वेळी ३००० रुपये तिला द्यायचे व भांडण मिटवायचे ठरवले. आमच्या आजोबाच्या राजकारणातले शत्रू जागे झाले. त्यांनी सावत्र आईला अगोदरच भांडायला भाग पाडले होते. त्यांनी ३ हजार, ४ हजार, ४.५ हजार, ५ व नंतर शेवटी ६००० रुपये निघेपर्यंत व महिन्याला

५० रुपये कोर्टात गेल्यावर वाढवले. तरी मी त्यांना हो म्हणत होतो. शेवटी मिटलं; पण पैसे कुठून द्यायचे. माझी बहीण माला ही लग्नाला आली होती. माझ्यावर फार मोठ्या प्रमाणावर दबाव येऊ लागला. बहिणीचेही लग्न ठरवले. हुंडा ४००० रुपये ठरला. लग्न त्यांच्याकडे. शेवटी मी ठरवले की जो १०,००० रुपये लग्नात मला मदत करील. त्यांची मुलगी करायची व ६००० रुपये सावत्र आईला दिले. भांडण मिटवलं व वऱ्हाडाच्या ट्रकसाठी त्यांनी एक हजार रुपये कापून घेतले. आता बहिणीच्या लग्नाला ४००० रु. लागणार होते. पण ३००० त्यांना दिले आणि बाकीचे एक हजार रुपये हळदीचे पिक आल्यावर देऊ असे सांगून तडजोड झाली. बहिणीच्या लग्नाला गेल्यावर भावजी बाहुल्यावर येईनात. त्यांना कोणी तरी भरवले होते की, ''आडवले की १००० रुपये राहिलेले मिळतील''. मला ही बातमी समजली. मी त्यांच्याकडे गेलो. त्यांना हे पैसे लगेच देता येणार नाही हे मी आठवण करून दिली पण ते गप्प बसले. माझा पारा चढला. मी बहिणीला सांगितले अजून काही लग्न झालेले नाही. हळद पुसून टाक, लग्न कॅन्सल करू. मग काही लोक मध्ये आले व लग्न लावले. अशा अनेक गोष्टी माझ्या अनुभवास आल्या.

▸▸ ▸▸

# ५. शिक्षण

माझे शिक्षण गावातल्या जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेतून झाले. शाळा अत्यंत चांगली होती. आमच्या काळात शिक्षकांना खूपच आदर दिला जात होता. सर्व शिक्षक मनापासून चांगलं शिकवायचे. एक शिक्षक तिसरीला आम्हाला होते. त्यांच नाव कात्रे ते खूपच मारायचे. सरळ हातावर कधी छडी मारायचे नाहीत, तर उलट्या हातावर छड्या मारायचे व आम्हालाच छड्या आणायला लावायचे. पण एक मात्र खरे आहे की त्यांच्या वर्गातल्या सर्व कविता आज देखील पाठ आहेत. गणितासाठी सातवीला करडे गुरुजी होते. गावातून ते चालले तर सर्व विद्यार्थी पळून जात व लपून बसत. पण अभ्यासू विद्यार्थ्यांवर त्यांचे असणारे प्रेम हे सगळं खूपच होत. आता काळ बदलला. शासनाचे आरटीई सारखे कायदे आले. विद्यार्थ्याला मारायच नाही, बोलायचे नाही, अपमान करायचा नाही, नापास करायचे नाही आणि घडवायचे हे अजब काम शिक्षकांना दिले आहे व त्याचे फळ म्हणजे सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांचे नाव देखील लिहिता येत नाही.

आम्हाला सहावी व सातवीला शिक्षकाचा तुटवडा होता. शिक्षकच नसायचे त्यामुळे आम्ही मुलेच विषय वाटून घेवून आम्हीच ते शिकवीत होतो. मला सातवीचा वर्ग अजुनही आठवतो. सातवीत आम्ही ७ च विद्यार्थी होतो. त्यात आम्ही ३ चुलत भाऊ व ३ चुलत बहिणी व सातवा एक जण शेजारच्या गावावरून यायचा. कधी आला तर आला नाही तर आठ आठ दिवस यायचाच नाही. आम्ही सहा जन विषय वाटून ज्याला जो विषय आवडतो तो विषय शिकवायला घ्यायचा. अभ्यास करायचा व शिकवायचा असे आमचे प्राथमिक शिक्षण सातवीपर्यंत गावातच झाले.

आम्ही सातवीत असताना एकदा नाजर साहेब आले व तपासणी करताना त्यांनी पाहिलं की सातच विद्यार्थी आहेत व ते म्हणाले अरे वा सातवीला सातच विद्यार्थी. सहाही नाही व आठही नाहीत.

आमच्या गावात आठवीचा वर्ग नव्हता. हायस्कुल शेजारच्या गावात होते. गावापासून हायस्कूल शेजारी तेरखेडा या गावात होते. त्यामध्ये अंतर साधारण ५ ते ६ कि. मी. होते. रोज उन, वारा, पाऊस यामध्ये चालत जावं लागायचं. गणेश विद्यालय, तेरखेडा ही शाळा खूप चांगली होती. जिल्ह्यातील नामवंत शाळा. त्या ठिकाणचा शिक्षक स्टाफ खूपच चांगला व कडक होता. प्रत्येक शिक्षक त्यांच्या त्यांच्या विषयात पारंगत होते व मुख्याध्यापक त्रिपाठी सर हे तर अत्यंत कडक व कठोर शिस्त पाळणारे होते. ही एक आदर्श शाळा होती. इयत्ता दहावी पर्यंत शाळा ही गणेश विद्यालयात केली व पुढील शिक्षण बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी घेतले.

बार्शी ही भगवंताची. बार्शी ही महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. या शहरात जवळ जवळ महादेवाची आठ मोठी मंदिरे आहेत. शिक्षण, व्यापार व दवाखाना यासाठी हे शहर प्रसिद्ध आहे. मी अकरावीला झाडबुर्के महाविद्यालयत प्रवेश घेतला. मी सायन्सला ॲडमिशन घेतली. वडील शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा हे सांगणारे कुणीच नव्हते. त्यामुळे मला प्रत्येक जण वेगळचं सांगून भांबावून टाकत होते. माझा चुलतभाऊ एच. आर. आर्टस् मध्ये होता. तो मला सांगायचा आर्टमध्ये ॲडमिशन घे व तुला गणित विषय आवडतो. तर एम. ए. गणितात कर व तसं करता येतं व मला एका प्राध्यापकाचा तो बोर्ड दाखवायचा एम. ए. (एम. फील.) गणित. त्यावेळेला ॲडमिशनचा प्रॉब्लेम नव्हता. केव्हाही पहिल्या तीन महिन्यात आर्टस्, सायन्त किंवा कॉमर्स या शाखांमध्ये प्रवेश घेऊ देत होते. मी आर्टस् मध्ये बसायला सुरुवात झाली. आमचा दुसरा चुलत भाऊ राजु बी. कॉम. करीत होता. त्यामुळे एखदा तो आमच्या खोलीवर आला व काय करतोस असे विचारले. मी त्याला सांगितले की मी आर्टस्मध्ये बसायला सुरुवात केलेली आहे. त्याने सांगितले की कमीत कमी कॉमर्सला तरी जा व मी ठरवले की कॉमर्सला जाऊन बसायचे. दोन महिने झाले.

कॉलेज चालू होते. मी कॉमर्समध्ये बसलो. अकाऊंटचा तास होता. प्रा. मनसुळे तासावर होते. त्यांनी माझ्याकडे पाहिले आणि नवीन चेहरा ओळखला. मला उभे केले व आता बराच अभ्यासक्रम झालेला आहे. तुला आता कॉमर्सला बसता येणार नाही असे सांगितले व वर्गातून मला हाकलून लावले. मला अतिशय वाईट वाटले व मी ठरवलं की आता कॉमर्सलाच शिकायच व दुसरे आमच्या गावाच्या जवळचे प्राध्यापक होते त्यांना भेटलो व माझी अडचण सांगितली. त्यांनी सांगितले मधल्या सुटीत स्टाफरुममध्ये ये म्हणजे मी त्यांना सांगतो. त्यांनी त्याच्या भाषेत त्या कॉमर्सच्या प्राध्यापकाला सांगितले व मला बसऱ्याची परवानगी मिळाली. प्रा. मनसुळे मला म्हणाले होते की, तु अकाऊंटमध्ये पास होणार नाही. मी रात्र दिवस अभ्यास करायचो. अकाऊंट विषय सुद्धा पाठ करायचो. इयत्ता बारावीला मला त्या काळात १०० पैकी ८० मार्कस् पडले व मी मार्कसीट घेऊन त्यांना भेटायला गेलो.

झाडबुले कॉलेजमध्ये बी. कॉम. नव्हते म्हणून बी. पी. सुलाखे कॉलेज हे कर्मवीर भाऊराव पाटलाचे शिष्य कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांची शिवाजी शिक्षण संस्था चालू केली होती. त्यात ॲडमिशन घेतली. सर्व माझ्या बरोबरची मुलं सुभाष नगरमध्ये कॉलेज जवळ असल्यामुळे आम्ही तिथे राहात होतो. पण मी एकटाच असल्यामुळे पुन्हा पाच किलोमीटर अंतर राहणे व कॉलेज यात होतं व पुन्हा मी चालत महाविद्यालत सकाळी ७.३० वाजता उपाशी न खाता-पिता जाऊ लागलो. परत आल्यावर हाताने स्वयंपाक करायचा व मग दुपारी जेवायचे. संध्याकाळी व्यायाम करायचा व रोज भगवंत दर्शनासाठी जायचे. संध्याकाळी येऊन पुन्हा भाकरी स्वतः बनवायच्या व खायच्या असे जीवन सुरू झाले. मला एकच वडवनी टेरीकॉटचा ड्रेस होता. रविवारी तो धुवायचा व तांब्यात कोळसा टाकून त्याने इस्त्री करायची असे पूर्ण शिक्षण होईपर्यंत चालले होते.

त्याच्या अगोदर एक गोष्ट घडली, मी नववी - दहावीत असताना मुलं गोळा करायचो. नाटकात भाग घ्याचो. एके दिवशी मी घरी दुपारी जेवायला गेलो. वडिल घरीच होते. अत्यंत गरीब स्वभाव. कधी कोणाला दुखवायचे नाही. मला हसत हसत म्हणाले, आरे गावातला तो शिवा पुढारी तर म्हणतोय की, तुमचा मुलगा शिकणार नाही. पोरं गोळा करतोय, गाव

झाडतोय, त्याचं काही खरं नाही. एक तर तो पुढारी होईल, नाही तर गावगुंड. वडिलांची चिंता माझ्या लक्षात आली. त्यांना माझ्या भविष्याची चिंता होती. मी गुपचूप ताटात होतं तेवढं खाल्लं आणि डायरेक्ट वेशीत गेलो. तिथे तो पुढारी बसलेला होता व त्यांना मी म्हणालो, ''तुमच्या घरात तुमची व तुमच्या भावाची जेवढी मुलं आहेत तेवढा मी एकटा शिकणार'' आणि त्या दिवसापासून वयाच्या पन्नासाव्या वर्षापर्यंत मी रात्रंदिवस एका वाक्यासाठी शिक्षण घेत होतो. त्याच्या घरातला एक मुलगा बी. कॉम., एल. एल. बी. होता. मी. एम. कॉम., एल. एल. एम. केलं. एक मुलगा बी. ए. होता. मी. एम. ए. केलं. एक बी.एड. होता. मी पीएच.डी. केली व रात्रंदिवस एकाच ध्यासाने एम. कॉम., एम. ए., एल. एल. एम., एम. पी. एम., डी. टी. एल., डी. एल. एल. व एल. डब्ल्यु, जी. डी. सी. अँड ए व पीएच.डी. हे शिक्षण सतत सेमिस्टर पद्धतीमध्ये सातत्याने वयाच्या ५० वर्षापर्यंत घेत होतो. या जिद्दी स्वभावाचा मला भविष्यातही खूपच फायदा झाला.

मी इयत्ता अकरावीत असतानाच एका येडशीच्या महाराजांची व माझी भेट झाली. स्वामी अग्नीवेश हे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आल्यावर त्यांच्या ज्ञानामुळे व विचारामुळे त्यांचे भाषण ऐकून आठ दहा मुले घरदार सोडून त्याच्या बरोबर हिमालयातल्या त्याच्या आश्रमात निघुन गेली व अभ्यास करून हे महाराज परत आले. रामलिंगच्या डोंगरात येडशी या ठिकाणी त्यांचा गुरुकुल आश्रम होता. दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत मी महिना महिना त्या आश्रमात राहत होतो. गुरुकुल पद्धतीनुसार तो आश्रम चालत होता. पहाटे चार वाजता उठायचे. योगा, स्नान सध्या करायची. सुर्योदयाला गाईचे दूध काढायचे, ते प्यायचे. थंड पाण्याने अंघोळ करायची व दिवसभर ठरलेल्या पद्धतीप्रमाणे अभ्यास व कामे करायची अशी दिनचर्या चालायची. आश्रमात मीठ वर्ज्य होते. महाराज अनेक गोष्टी सांगायचे. बलाची उपासना करा. बुद्धीची उपासना करा व सद्‌विचाराने वागा ही त्यांची शिकवण होती. अकरावी पासूनच त्यांच्या शिकवणूकीने मी प्रेरीत झालो. १९८० साली मी इयत्ता बारावीत होतो. दिवाळीच्या सुट्टीत महाराजांना मी वडजी या माझ्या गावी बोलावले. वेगवेगळ्या विषयावर अनेक चर्चा चालत होत्या. त्यातून एक विषय पुढे आला की तो म्हणजे मांसाहार हा माणसाचा



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) शिवसेनेच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, माजी मंत्री एकनाथराव खडसे, महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य कै.आ. विनायकराव मेटे



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) माजी मंत्री यशोमती ठाकूर (आदर्श आमदार), डॉ. कुमार सप्तर्षी, आ. लक्ष्मणराव पवार (आदर्श आमदार)



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) आ. संग्राम थोपटे (आदर्श आमदार), डॉ. कुमार सप्तर्षी, माजी आरोग्य मंत्री विजयकुमार गावित, खा. डॉ. हिना गावित (आदर्श युवा खासदार),



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) मेजर जनरल दिलावर सिंग, माजी मंत्री सदाभाऊ खोत, मराठा मोर्चाचे अध्यक्ष सुरेशदादा पाटील



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) आ.बच्चू कडू (आदर्श आमदार), ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, ज्येष्ठ पत्रकार रविंद्र आंबेकर



मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत



मा. ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्यासमवेत.



सांस्कृतिक महोत्सवादरम्यान ज्येष्ठ रंगकर्मी सुनील गोडबोले



सांस्कृतिक महोत्सवादरम्यान ज्येष्ठ रंगकर्मी माधव अभ्यंकर



पद्मविभूषण श्री. रघुनाथ माशेलकर यांच्या समवेत



पद्मभूषण श्री. विजय भटकर यांच्यासमवेत



आदर्श माता पुरस्कार प्रदान प्रसंगी (डावीकडून) रत्नाताई रामचंद्र खोत (आदर्श माता) व माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील, आ. संगीताताई ठोंबरे, मा. सौ. उर्मिला विश्वनाथ कराड (आदर्श माता)



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) माजी मंत्री महादेवराव जानकर (आदर्श मंत्री), अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) आ. संग्राम थोपटे (आदर्श आमदार), डॉ. कुमार सप्तर्षी, माजी आरोग्य मंत्री विजयकुमार गावित, खा. डॉ. हिना गावित (आदर्श युवा खासदार),



युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) माजी आमदार कपिल पाटील (आदर्श आमदार), गोव्याचे मुख्यमंत्री मा. प्रमोद सावंत, माजी मंत्री सदाभाऊ खोत



चौथ्या युवा संसद कार्यक्रमादरम्यान (डावीकडून) आ. संग्राम थोपटे (आदर्श आमदार), डॉ. कुमार सप्तर्षी, माजी आरोग्य मंत्री विजयकुमार गावित, खा. डॉ. हिना गावित (आदर्श युवा खासदार)



सोलापूर डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट फौंडेशनतर्फे देण्यात येणारा आदर्श युवा पुरस्कार ॲड. शार्दुल जाधवर यांना देण्यात आला.



**स्वच्छता मोहिमेअंतर्गत (डावीकडून) मंत्री विजय शिवतारे (आदर्श मंत्री), माजी मंत्री एकनाथराव खडसे, महाराष्ट्र विधाननपरिषदेचे सदस्य कै. आ. विनायकराव मेटे.**




**३१ डिसेंबरच्या रात्री 'दारु सोडा, दूध प्या' या उपक्रमांतर्गत अतिरिक्त पोलिस आयुक्त पुणे शहर श्री. अशोक मोराळे यांच्या हस्ते युवकांना दूधवाटप करताना.**



२२व्या वर्धापनदिन सोहळ्यात (डावीकडून) एन.सी. जोशी, माजी मंत्री एकनाथराव खडसे,
जेडीयुचे प्रवक्ते के. सी. त्यागी, सुदर्शन टीव्हीचे सुरेश चव्हाणके, आ. भीमरावअण्णा तापकीर,



आदर्श माता पुरस्कार प्रदान प्रसंगी (डावीकडून) माजी राज्यपाल व खासदार श्रीनिवास पाटील यांच्यासमवेत.



पहिल्या रोजगार मेळाव्यात प्रथम नोकरी प्राप्त विद्यार्थ्याचा सत्कार करताना

आहार आहे का ? चर्चा होत होत दोन तास झाले. महाराज म्हणत होते की, मांसाहार हा माणसाचा आहार नाही. मी, माझ्या बरोबरीचे सर्व युवक व गावकरी म्हणत होते की माणसाचा आहार हा मांसाहार आहे. शेवटी असे ठरले की, महाराज एकटे एका बाजूला व संपूर्ण गाव एका बाजूला. गाव हरले तर आम्ही जे ४० युवक होतो त्यांनी मांसाहार सोडून शाखाहारी व्हायचे व महाराज हरले तर त्यांनी वेशीमध्ये बसून भगव्या कपड्यानिशी मांसाहार करायचा. तीन दिवस या विषयावर चर्चा चालू होती. महाराजांनी वेदापासून ते आताच्या जर्मन, अमेरिका तज्ज्ञांचे व डॉक्टरांचे पुरावे दिले. त्यातली काही उदाहरणे मी आपल्याला देतो. त्यांनी सांगितले, बाह्य दर्शनानुसार मनुष्य हा शाकाहारी बनावटीचा आहे व त्यांनी उदाहरणे दिली की गाय कशी पाणी पिते, कुत्रा कसा पाणी पितो व माणुस कसा पाणी पितो. शाकाहारी प्राणी ओढून पाणी पितात. हिंस्त्र प्राणी चाटून जिभेने पाणी पितात. वाघाची आतडी आखूड असतात. गाईची आतडी लांब असतात. माणसाची आतडी सुद्धा लांब असतात. मांसाहारी प्राण्याचे दात व शाकाहारी प्राण्याचे दात यात फरक आहे. त्यामुळे शाकाहारी प्राण्याप्रमाणे माणसाची रचना आहे. असे अनेक उदाहरणे महाराजांनी दिली व तीन दिवसांनी महाराजांचा विजय झाला.

आता आम्हा ४० युवकांना मांसाहार त्याग करावयाचा होता. आम्ही गावात मोठा यज्ञ केला व ४० मुलांनी शाखाहाराची शपथ घेतली. पण गावातले लोक मुद्दाम त्या मुलांना फुकट मटन, मासे व अंडी खायला बोलावित होते. हळूहळू त्यातल्या ३९ मुलांनी ६ महिन्यात पुन्हा मांसाहार करण्यास सुरुवात केली व ४० मध्ये मी एकटाच शाकाहारी राहिलो ते आजपर्यंत. गेली ४० वर्षे मी शाखाहारी आहे.

महाराजांचा मी शिष्य झालो होतो. उन्हाळ्यामध्ये परीक्षा झाल्या की महाराजाबरोबर हिमालयात जायचे मी ठरवले. याची माहिती फक्त माझा चुलत भाऊ एच. आर. (डॉ. हणुमंत रामभाऊ जाधवर) यालाच होती. माझी सर्व तयारी झाली. दोन दिवसांनी मी हिमालयात महाराजांबरोबर जाणार व कायमचा संन्यास घेणार हे पूर्णपणे ठरले. पण कदाचित नियतीला हे मान्य नव्हते. परमेश्वराला माझ्या हातून शिक्षण क्षेत्रात बरेच काम करायचे होते. त्यामुळे

मध्येच एक घटना घडली. माझे चुलत आजोबा व एच.आर. चे आजोबा हरीबा जाधवर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ही वार्ता आम्हाला कळली. आम्ही दोन सायकली भाड्याने घेतल्या व गावाकडे आलो. उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडला. गावाकडचा दंडाकडून चार किलोमीटर रस्ता कच्चा होता. चिखलात सायकली चालत नव्हत्या. आम्ही त्या उचलून खांद्यावर घेतल्या व गावी आलो. सावडण्यासाठी आम्ही गावीच थांबलो. ठरल्याप्रमाणे महाराज हिमालयात जाण्यासाठी व मला त्यांच्याबरोबर घेऊन जाण्यासाठी आले. पण आमच्या खोलीला कुलूप पाहिले, चार तास वाट बघितली व पळपुट्या आहे अशी समजूत करून संध्याकाळच्या रेल्वेने निघून गेले. हा सर्व दैवाचा खेळ.

माझे महाविद्यालयातील जीवन अतिशय खडतर गेले. मी बार्शीला चाललो तर आपली चादर व सतरंजी मला द्यावी लागेल म्हणून वहिनींनी मी निघायच्या वेळेला पाणी आणायला निघुन जायच्या व त्या मी जाईपर्यंत परत यायच्या नाहीत. त्यांचही चुकत नव्हतं. त्यांना व त्यांच्या नवऱ्याला मिळून एकच चादर व एकच सतरंजी होती मग त्यांचे काय. पण मला एक वहिनी होती. अण्णाच्या पहिल्या बायकोनी मात्र मला चादर दिली व ती धोतर पांघरायची. घरची परिस्थिती हालाकीची त्यामुळे असे घडत होते. नंतर ती अकाली वारली. तिच्या ऋणातून मला मुक्त होता आले नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट आम्ही बार्शीच्या सुभाष नगरमध्ये मा. प्रा. गणाचार्य सर यांच्याकडे भाड्याने राहात होतो. दिवाळी व उन्हाळा या सुट्टीच्या काळातील खोली भाडे आम्ही त्यांना कधीच दिले नाही. त्यांच्या पत्नी कडक होत्या; पण सर मृदू व प्रेमळ. सर पाऊस नाही, पिके नाहीत, सुट्टीत भाडे आम्ही कसे देणार म्हटले की सर गप्प बसायचे. आम्ही किमान ७ वर्षे सरांच्या तिथे राहिलो. पण त्यांची ही मदत आम्हाला अनमोल होती. याचा उल्लेख करणे हे माझे परम कर्तव्य आहे.

माझी बार्शीला महाविद्यालयीन शिक्षण घेताना अत्यंत हालाकीची परिस्थिती होती. महाविद्यालयीन जीवनात मी तीन वर्षे भाजी किंवा गोडे तेल काहीच खाल्ले नाही. एकही रुपया कुठून येत नव्हता. घरची परिस्थिती अत्यंत वाईट झाली होती. सावत्र आईच्या भांडणाने

व गावातील पार्टीशनमुळे आर्थिक परिस्थिती हालाकीची होती. ४० पैसे बसचे वाचवण्यासाठी मला आठवत मी १२ कि.मी. किर्र डोंगरातून पायी चालत दोन पायल्या ज्वारी डोक्यावर व हातात काचणारी कोंडा असलेली पेटी घेऊन कोरेगावला ऐवजी मधून कारेगावला चालत अनेक वेळा गेलो. आजही दुपारच्या वेळी देवदरा आहे तेथून जायची कुणाचीच हिम्मत होत नाही. पण मी परिस्थितीमुळे त्या काळातून गेलो. माझा एक काळे नावाचा वंजारवाडीचा क्लासमेट होता. मी जसे करेल तसा तो करायचा. त्याला माझ्यासारखे व्हो असे वाटत होते. धनगर समाजाचा तो होता. त्याची परिस्थिती माझ्यापेक्षा अत्यंत चांगली होती. त्याने माझ्या खोलीवर राहायला यायचे ठरवले व स्वयंपाक एकत्र करू असे सांगितले. आलेल्या पहिल्याच दिवशी आम्ही त्याचे २४ इंची सायकलवर डबल सीट बसून बाजारात गेलो. तिथे पावकिलो गोडेतेल घेतले. त्या वेळेला काचेच्या बाटल्या होत्या. आम्ही आनंदाने तेल घेतल व त्या उंच सायकलवर बसून घरी येऊ लागलो. वाटेत वळणावर त्याची सायकल घसरली. ती जास्त उंच असल्यामुळे त्याला सांभाळता आली नाही व आम्ही डांबरी सडकेवर दोघेही पडलो व काचेची तेलाची बाटली फुटली त्यामुळे मिळालेले तेल सुद्धा आम्हाला खाता आले नाही.

मी भगवंताहून येताना सर्वजण ७ वाजता घरी स्वयंपाक करून व जेऊन अभ्यासिकेत यायचो. मी मात्र माझ्या बाकीच्या लोकांबरोबर जेवत नसे कारण मला ते भाजी वाढायचे. मला ते दररोज बरे वाटत नव्हते म्हणून मी सात वाजता थेट स्टडीरुमला जायचो व माझे सर्व रुम मेट स्टडीरुमला आल्यावर मी घरी निघायचो व घरी येऊन हायब्रीडची भाकरी व कोरडी चटणी खायचो. मी एवढे शिक्षण घेतले; पण रात्री दहाच्या पुढे कधी जागलो नाही. पण पहाटे ४ वाजता उठून अभ्यासाची सवय मला होती व शेवटपर्यंत ती राहिली.

आमच्या बी. पी. सुलाखे कॉलेजमध्ये बी. कॉमचा सेंड ऑफ होता. मी भाषण केले त्यावेळी आमचे प्राध्यापक सी. ए. होते. प्रा. लड्डा ते भाषणात म्हणाले की, हा मुलगा पुढे नक्की मोठा कुणीतरी होणार. मी ज्या वेळी सोलापूरला सुरुवातील एम. कॉम. साठी ॲडमीशन घेतली त्यावेळी खर तर मला सी.ए. व्हायचे होते. मी पुण्याला ॲडमीशनही घेतली. पण आर्थिक परिस्थितीमुळे मी रोज एक बिस्कीट पुडा घेऊन वेळ काढत होतो व पंधरा दिवसात

मी परत आलो व एम.कॉम. ला ॲडमिशन घेतली. तिथे एक इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक होते. त्यांची शिकवण्याची कला व विचारातुन प्रेरणा घेऊन मी त्याच वेळी ठरवले होते की एकतर प्राध्यापक व्हायचे नाहीतर पुढारी. मी माझ्या बार्शीच्या कॉलेजमध्ये एम. कॉम. झालो व आमचे प्राचार्य इंगळे सर यांनी मला प्राध्यापक म्हणून १९८५ साली बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये घेतले व म्हणाले सुधाकर मी तुला घेतोय पण तुझी इंटरव्ह्यू ही आपले सेक्रेटरी भोसले हे अमेरिकेला गेलेत ते परत आल्यावर होईल. मी त्या वेळी त्यांना म्हणालो, सर मी तुमचा विद्यार्थी आहे. जर मी इंटरव्ह्यूवमध्ये फेल झालो तर तुमच्याकडे पुन्हा नोकरी मागण्यासाठी येणार नाही व खरचं इटरव्ह्यू चांगला झाला. भोसले साहेब वर्गातच शिकवताना बसले. इन्टरव्ह्यू उत्तम झाला व मी पुढे प्राध्यापक म्हणून एक वर्षे काम केले.

माझा चुलतभाऊ एच. आर. हा पुण्यात शिकत होता. त्याला वाटायचे की मी पुण्यात शिक्षणासाठी यावे पण आर्थिक परिस्थितीमुळे येऊ शकलो नाही. त्यानेच माझ्या नोकरीचा अर्ज एक जाहीरात बघून केला व मी इंटरव्ह्यूला आलो. वास्तविक मी मुंबईहून येताना पहिल्यांदाच पुण्यात उतरलो. इंटरव्ह्यू सकाळी ११ वाजता होता; परंतु मला चार वाजले होते. पण नेमका इंटरव्ह्यू कॉमर्सचा शेवटी ठेवल्यामुळे मला इटरव्ह्यू देता आला. मुलाखत अत्यंत चांगली झाली व मला त्याच वेळेला वाटले की आपली निवड होणार व आपण प्राध्यापक होणार; परंतु मला बार्शी सोडायचं नव्हते. पण या जगात तुमची किंमत दर्जावर नसून ओळखीवर असते आणि माझ्या जागेवर पाटील म्हणून माझ्याच वर्गमित्राची निवड झाली. पण मला जा म्हणून सांगितले नव्हते. मला नोकरीची ऑर्डर आली. पण मला पुण्याला यायचे नव्हते. सर्वजण मात्र नशिबवान आहे. पुण्यात प्राध्यापकाची नोकरी लागली. तू जा असं सांगत होतो. शेवटी मी प्राचार्य इंगळे सरांकडे गेलो आणि ऑर्डर दाखवली. त्यांनी बरं वा मला पुण्याला नोकरी करण्याची इच्छा होती. तू ताबडतोब पुण्याला जा असे सांगितले. माझे मित्र ताराचंदसहित सर्वजण मला पुण्याला जाण्याचा आग्रह करत होते व नाईलाजाने मी १९ जून १९८६ रोजी पुण्याला प्राध्यापक म्हणून येण्याचे ठरवले.

▸▸ ▸▸

# ८. नाटक

आमच्या गावची परंपरा नाटकाची होती. १०० वर्षांपासून गावात नाटक करायचे. संगीत नाटकही व्हायचे. माझ्या आजोबांनी सुद्धा ''भवन सुंदरी''सारखी संगीत नाटके केली. प्रत्येक सुट्टीमध्ये गावात नाटक करून मनोरंजन करत असत. मी इयत्ता सहावीत होतो. आमच्या मोठ्या भावानी व त्यांच्या मित्रांनी गावात नाटक बसवले. ''सख्खे भाऊ पक्के वैरी.'' त्या नाटकात स्त्री पात्र घेण्यास कोणीच तयार नव्हते कारण त्या काळात महिला स्त्री पात्र करत नव्हत्या. कोणत्याही गोऱ्या पोराला स्त्री पात्र दिलं जात होतं. मी प्राथमिक शाळेत होतो. मला विचारलं व मी हे स्त्री पात्र तयार करायला घेतलं. अत्यंत सुंदर नाटक. वास्तव जीवन दाखवणारे. ग्रामीण भागात खूपच प्रसिद्ध झाले. त्याचे अनेक प्रयोगही गावात झाले.

त्यानंतर मी आठवीला गेलो. शेजारच्या तेरखेडा गावी मी हायस्कूलसाठी गेलो. दरवर्षी नाटक होत होते. मला परत स्त्री पात्रासाठी मोठ्या मुलांनी व माझ्या वडिल भावाच्या मित्रांनी विचारले. मला जरा कळायला लागले होते. आता आपण पुरुष पात्र घेतले पाहिजे असे वाटू लागले व मी त्यांना सांगितले, मला आता पुरुष पात्र पाहिजे. सर्व भावाचे मित्र असल्यामुळे त्यांनी मला चक्क अपमानीत करून हाकलून दिले व म्हणाले की, करायचं असलं तर स्त्री पात्र मिळेल, नाहीतर काहीच मिळणार नाही. मला अतिशय वाईट वाटले व माझ्यामधील जिद्द पुन्हा जागी झाली. मी माझ्यापेक्षा छोटी मुलं गोळा केली व एक तीन अंकी नाटक बसवलं व त्यामध्ये डाकूचं पात्र घेतलं. त्या नाटकाचे नाव ''पैसा नाही मग जगता कशाला'' असं होतं. मला वाटतं पुढील काळात या नाटकावर एक मराठी सिनेमा सुद्धा निघाला व आम्ही लहान मुलांनी आमचे मोठ्या गँगच्या अगोदर ते नाटक स्टेजवर आणून दाखवले. त्या नाटकात आता पुण्याचे ॲडिशनल कमिश्नर, क्राईम श्री. अशोक मोराळे यांनी स्त्री पात्र केलेले होते.

आमचे चुलत बंधू रविंद्र याला डीआयजीचं पात्र दिलेलं होतं व मी डाकू होतो. शेवटी हा डाकू डीआयजी च्या गोळीने मरतो असा सीन होता. त्यात त्यांनी गोळी मारायची होती. पण सीनमध्ये हा गोळीच मारीत नव्हता. पंचायत झाली, शेवटी मी अंगावर धाऊन गेलो आणि मग त्याने गोळी मारली. काही झाले की ''खाशा खाशा हुईज खासा'' एवढेच त्याच्या पाठ होते. खुप मजा आली व हाशा पिकला.

त्यानंतर ''गाव साधं व पुढारी शोधं'' हे नाटक आम्ही तयार केले. ग्रामीण भागाचं चांगलं दृश्य त्यामध्ये होतं व टीमके गुरुजी व इतर पात्र अत्यंत मजेशीर होती.

मी दहावीला गणेश विद्यालयात असताना गणेश उत्सवात दर वर्षी एक नाटक बसवायची प्रथा होती. त्यानुसार गणेश उत्सव जवळ आला की नाटक बसवायची तयारी सुरु झाली. नाटक होतं अत्यंत प्रसिद्ध झालेलं, ''वाहतो ही दुर्वांची जुडी'' या वेळी शिक्षकांनी बसवलेलं नाटक असल्यामुळे त्यात स्त्री पात्र कुणी करायचं असा प्रश्न निर्माण झाला. मुली तर ग्रामीण भागात पात्र करत नव्हत्या. त्यामुळे पुन्हा गोरी मुलं शोधायला सुरुवात झाली. ९०% मुलं पात्र करायला तयार नव्हते. शेवटी विचारत, शोधत शिक्षक आमच्या वर्गात आले व तीनचार मुलांना विचारलं. सर्व नाही म्हणाले, शेवटी मी उठून उभा राहिलो व मी पात्र करतो व मी पूर्वी स्त्री पात्र केलेले आहे असं सांगितलं. माझं पात्र निश्चित झाले. मला नाटकांचे पुस्तके देण्यात आलं. त्यावेळी एकच पुस्तक असायचे प्रत्येक जण आपआपले पात्र लिहून घ्यायचे व पुस्तक परत द्यायचे. मला शनिवारी पुस्तक मिळाले. त्यावेळी गावात लाईट नव्हती. चिमणीच्या (रॉकेलचा दिवा) उजेडात मी व एक मित्र दत्ता जो पुढे इंजिनिअर झाला टेक्स्टाईल मीलमध्ये काम करत आहे. आम्ही संध्याकाळी अंदाजे ७ वाजता लिहायला सुरुवात केली व पहाटेपर्यंत १०४ पेजेस हस्तलिखित लिहून काढले. मी सकाळी उठलो, रविवार होता. आमच्या शेतातील ऊसामध्ये बाभळीचे झाड होते. तिच्या सावलीत बसून मी सकाळपासून संध्याकाळपर्यंत सर्व १०४ पेजेस नाटकातील माझं पात्र पाठ करून टाकलं व माझा चुलत भाऊ माणिक याच्याकडून ते खात्री करून घेतली. शिक्षकाच्या नाटकात पात्र करायचं म्हटलं की टेन्शन होत म्हणून प्रॅक्टीसला सुरुवात झाली आणि सर्व शिक्षक बघून त्यांचे त्यांचे पात्र म्हणत होते. पण मी

एकटाच विद्यार्थी असून पाठ असलेलं म्हणून दाखवत होतो. माझा गाव व शाळा याच्यात ५-६ की. मी. अंतर होते त्यामुळे प्रॅक्टीसच्या काळात मी तिथेच रहात होतो व रोज एका शिक्षकाच्या घरी जेवत असे. त्या नाटकात मी ताईचं पात्र केलं. अत्यंत महत्त्वाचं पात्र व ते एवढे प्रसिद्ध झाले की, पुढील २५ वर्षे लोक ते नाटक विसरले नाहीत.

मी स्वतःच लहान मुलं गोळा करून नाटक करण्यासाठी आमची व मुलाची चांगली टीम तयार केली व त्यामधूनच ''क्रांतीवीर ग्रामविकास युवक मंडळ, वडजी'' याची मुहुर्तमेढ रोवली गेली.

▸▸ ▸▸

# ७. क्रांतिवीर

नाटकाच्या निमित्ताने आम्ही बरीच छोटी मुलं एकत्रीत जमत होतो. त्यातूनच ''क्रांतीवीर ग्राम विकास युवक मंडळ'' याची स्थापना झाली. या मंडळाने किमान २० ते २५ वर्षे अत्यंत चांगले काम केले. विद्यार्थ्यांना व युवकांना निर्व्यसनी ठेवणं व त्यांना शिस्त लावणे हे काम फार मोठ्या प्रमाणावर झाले. आम्ही हे मंडळ ज्या वेळेला सुरू केले त्या वेळी त्याची सुरुवात छोट्या लायब्ररीपासून झाली. गावातून वेगवेगळ्या लोकांकडून १०१ पुस्तके मागून आणली व एक जुनी लाकडी पेटी मागून आणली व ती उभी ठेऊन त्यात पुस्तके ठेऊन लायब्ररीची स्थापना केली. ही गोष्ट अंदाजे १९७६-७७ सालातली. गावाच्या पत्र्याच्या चावडीत एक कुड घेतला. ती सारवून काढत होती. ही सर्व कामेही मुलचं करायची. रोज आमची मिटींग त्या लायब्ररीत असायची व तिथे विचारविनिमय करून सर्व गोष्टी ठरवल्या जात. आता नेमकचं त्यावेळी आमची ग्रामपंचायतही बरखास्त झाली होती व त्याचा फायदा आमच्या मंडळाला मिळाला. एवढी शिस्त व प्रेम युवकांमध्ये होते की, एक शिट्टी मारली की पन्नास मुलं जमा व्हायची. एकदा आमच्या गावातल्या ज्ञानोबा सावकार व इतरांनी कोणालाच न विचारता रामायण ग्रंथ लावला. प्रत्येक कांडाला अन्नदान करावयास पाहिजे; पण लाह्या वाटल्या. आता शक्तीचा दिवस उजाडला. खीर करण्यासाठी व काम करण्यासाठी एकही माणुस पुढे येत नव्हता. सावकाराने हाक मारली की लगेच लोक पुढे बघून निघून जायचे. सर्व लोक हताश झाले व आता आलेल्या लोकांना महाप्रसाद देता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. सावकार कळवळू लागले. आता काय करायचं, मग त्यांनी मला बोलावले व म्हणाले आता गावाची इज्जत जायची वेळ आली आहे. काही करा पण हे कार्य पार पाडा. सर्व मुलांना बोलावण पाठवलं. संध्याकाळ होत आली होती.

तेथून पुढे मुलांनी पाणी आणलं, महाप्रसाद बनविला व सकाळी सर्वांना तो वाटला. ऐवढी एकी मी पुन्हा कधीही पाहिली नाही.

गावात लग्न असो किंवा सप्ताह असो, पाणी वाहून आणण्यापासून ते त्यांना योग्य पद्धतीने वाढेपर्यंत सर्व कामेही मुलं विनामूल्य व प्रामाणिकपणे करत होती. क्रांतिवीरच्या काळात गावात जुनं एक शेताचं भांडण सोडलं तर सर्व भांडणे ही क्रांतिवीरच्या माध्यमातून आम्ही मिटवली होती. गावात भावाभावाच्या वाटण्या होणार असल्या तरी त्या आमच्याद्वारेच होत होत्या व या मंडळाचा संस्थापक व अध्यक्ष म्हणून मी २५ वर्षे सक्रिय काम केलं.

मंडळ दरवर्षी जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यामार्फत युवक शिबिराचे आयोजन करत होते. हे अनेक वर्ष केले. त्यात युवकांना प्रबोधन चांगले विचार देण्याचे काम क्रांतिवीर या मंडळाने केले. एकदा या कार्यक्रमाला माजी केंद्रीय मंत्री व माजी राज्यमंत्री मा. ना. बबनराव ढाकणे यांना वडजी या गावी आणायचे असे मी ठरवले व या युवक शिबीरासाठी त्यांना आणायचे म्हणून मी मुंबई या ठिकाणी गेलो. त्यांना विचारून फायनल केले. त्यांनीही येण्याची कबुली दिली. मला अत्यंत आनंद झाला. दुपारी त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी त्यांची अडचण सांगितली. ते जनता पक्षात होते. त्यांची मिटींग दिल्लीला लागली आहे असे सांगितले. मला अतिशय वाईट वाटले, मी तर सर्व ठिकाणी सांगून ठेवले होते की, मंत्री येणार त्यांना मी गयावया केली आणि सांगितले की, तुम्हीच मला कुणाला तरी दुसऱ्याला सांगा. गावभर डंका वाजवलाय, आता जर तुम्ही आला नाहीत तर पूर्ण इज्जत जाईल. तेही लहानपणापासून सगळ्या स्टेजमधून गेलेले होते. त्यांनी ही अडचण ओळखली व त्या वेळेला पंडितराव दौंड हे मंत्री होते त्यांना सांगितले व मला त्यांच्याकडे पाठविले. त्यांनी मंत्री महोदय श्री. ढाकणे साहेबांनी सांगितल्यामुळे यायचे कबुल केले. सगळा प्रोग्राम तयार करून कलेक्टरकडे उस्मानाबादला पाठवला. माझा जीव भांड्यात पडला. मला अती आनंद झाला. कारण मी कॉलेजमध्ये असताना मंडळाच्या कार्यक्रमाला मंत्र्याला आणू शकतो. मी रात्रीच मुंबईहून वडजीला निघालो व दुसऱ्या दिवसी १२ वाजता तेरखेडा स्टँडवर जाऊन पोहोचलो. आनंदाने सांगू लागलो की, कार्यक्रमाला मंत्री येणार. लोकांना आश्चर्य वाटले की, त्या वेळी शंभर गावात कधी कोणी मंत्री कार्यक्रमाला आणला नव्हता व हा मुलगा आणतोय. त्याच वेळेला

आमच्या मंडळातील ताराचंद मोराळे मला भेटला. अती आनंदाने व उत्साहाने ही बातमी त्याला बसमधून उतरल्या उतरल्या सांगितली व पहिलाच बॉम्ब त्याने टाकला व तो म्हणाला, खेड्यात कुठे मंत्री येत असतो का ? पहिली नकार घंटा आमच्याच सदस्यांनी वाजवली. मला खूपच वाईट वाटले. दोन दोन दिवस उपासी राहून स्वखर्चाने आपण ही कामं करत आहोत. आपल्याला प्रोत्साहन देण्याऐवजी शैल्य मामाची नीती लोक अवलंबतात. हे अतिशय वाईट आहे. पण मी धीर सोडला नाही. शेवटी तो दिवस उजाडला. मंत्री त्यांच्या ताफ्यासहीत आले व जवळ जवळ तीन तास गावात राहिले. उत्तम कार्यक्रम झाला. आधी अर्धे लोकं नाव ठेवत होते. मंत्री येत नाही असे म्हणत होते. ते सर्वच आता आनंदी होते व मला येऊन येऊन शाबासकी देत होते.

वडजी गावाला बस आणण्याचे अनेक प्रयत्न पूर्वीच्या गावरान पुढाऱ्यांनी केलेले होते. पट्ट्या (वर्गणी) गोळा केलेल्या होत्या; परंतु त्यात कोणीही यशस्वी झालेले नव्हते. मी ठरवले एकही पैसा कोणाकडून घ्यायचा नाही. पट्टी करायची नाही. पण बस गावाला आणायची, कारण आमचं गाव कोपऱ्यात असल्यामुळे व तिन्ही बाजूने डोंगर असल्यामुळे बाहेर कुठही जायचे म्हटलं की, पाच कि.मी.च्या आत कुठूनच बस नव्हती. माझे त्यावेळी अज्ञान होते. जसे एखादा मुलगा–मुलीला आणण्यासाठी शिदोरी बांधून जातो तसं अज्ञानापोटी मी सोलापूरला भाकरी बांधल्या, मंडळाच्या लेटरहेडवर पत्र लिहिले आणि सोलापूर गाठलं. स्टँडवर उतरलो. बाजूलाच डेपो मॅनेजर जगताप यांचे ऑफिस होते आणि त्यांच्या दारात जाऊन बसलो. आत चिठ्ठी दिली नाही. काही नाही. मला वाटलं कोण दारात आहे म्हणून बोलावत् असतील. पहिला दिवस गेला. कोणीच बोलावले नाही. संध्याकाळी स्टँडवर जाऊन झोपलो आणि दुसऱ्या दिवशी उठून पुन्हा डेपो मॅनेजरच्या ऑफीससमोर जाऊन बसलो. दिवसभर बाकावर बसून होतो. कोणीही बोलावले नाही. दुसरा, तिसरा व चौथ्या दिवशी साहेबांनी विचारलं अरे तो एक मुलगा रोज ऑफिसच्या दारात बसतो, कोण आहे तो ? त्याचं काय काम आहे ! कोणाला भेटायचं आहे त्याला ? असं म्हणून मला बोलावले. मला आनंद झाला. चार दिवस झाले होते. आत गेलो ते आमच्याच मंडळाच्या लेटरहेडवर लिहिलेले पत्र त्यांच्या हातात ठेवलं. त्यात गावाची अडचण बाजारपेठ बार्शी असल्यामुळे तिथे जाण्यासाठी होणारे हाल,

विद्यार्थी शिक्षणासाठी बार्शीत आहेत. त्यांच्या डब्ब्याची सोय व्हावी यासाठी बस गावापर्यंत यावी ही विनंती. त्यांनी पत्र वाचलं व विचारलं एखाद्या आमदाराचे शिफारसपत्र आणलं नाही. मला देवानेच बुद्धि दिली व मी म्हणालो सर आपण आर्मीतून आलेला आहात व आर्मीच्या लोक शिफारसीपेक्षा सत्य गोष्टीला स्थान देतात. म्हणून मी तुमच्यापुढे वास्तव मांडले व कोणाचेही शिफारसपत्र मागायला गेलो नाही. जगताप साहेबांचा चेहरा चमकला. त्यांना आनंद झाला व एका तासात सर्व्हेची बसमध्ये मला बसवून वडजीला पाठवली. गावात बस आली, आनंदी आनंद झाला. आता बस काही दिवसात रोज सुरू होणार, पण शेजारच्या कडकनाथ वाडीच्या लोकांनी विरोध करायला सुरुवात केली. एवढं एवढं गाव तिथे किती लोक असणार आणि कशाला त्यांना गाडी पाहिजे. पण जगताप साहेब दृढ निश्चियी होते. त्यांनी बस फायनल करून तिकीट निश्चिती करून बस चालू केली. पहिल्या दिवशीची पहिली बस येणार होती. माझी गरीबीची परिस्थिती होती. मी घरची ६ किलो हळद चोरली व जनार्दन मोराळे यांचेकडे दिली व त्यांना दोन टोप्या व दोन गमजे आनावयास सांगितले. गावातला बँड होता त्यांनी फुकट वाजवायचं कबूल केले. बस आली. आख्खा गाव गोळा झाला. सगळे मिरवणूकीत सहभागी झाले. सर्व जण वाहं वाहं करत होते. ड्रायव्हर व कंडक्टरची गावातून जंगी मिरवणूक काढली. क्रांतिवीरच्या कामात एक मानाचा तुरा रोवला गेला.

लाईटचंही तसचं झालं. गावात लाईट नव्हती त्यावेळी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यामुले इलेक्शन जोरात होते. पण आम्ही निर्णय घेतला व सर्वांनी मतदानावर बहिस्कार घातला व काही दिवसातच गावात लाईट आली. पुन्हा कळंब तालुक्यावरून दुसरी बस अशी एका मागे एक क्रांतिवीर मार्फत कामे होत होती. सगळ्याचा बघण्याचा दृष्टिकोन बदलत चालला होता. ही मुलं विधायक काम करतात असे आता सर्वांना वाटू लागले होते.

गावात क्रांतिवीरचं काम उभे होताना विरोधही तसाच होत होता. गावात त्या वेळी विरोधात सरपंच दैवान मोराळे, वैजीनाथ मोराळे, शिवाजी मोराळे ही माणसं खुपच स्ट्राँग होती. आमचं चांगलं काम पाहून आमच्या बरोबर बाबुसराव मोराळे, मामा आमच्या बरोबरच काम करत होते व आमच्या प्रत्येक कार्याला प्रोत्साहन देत होते. तसेच मारुती नाना पाटील,

तर सदैव आमच्या बरोबर मुलांतच असायचे. त्यांचा मुलगा राजू व रवींद्र हेही आमच्या बरोबरच असायचे. आम्ही संध्याकाळी झोपायला सुद्धा वड्याला त्यांच्या शेतावर व जनावराच्या गोठ्यातचं असायचो. साहेबराव पाटील शरीराने व आर्थिक परिस्थितीमुळे थकले होते. पण आम्हाला अनेक अनुभव सांगायचे. असे दिग्गज लोक वडजीत होते. रामभाऊ मामा, साहेबराव पाटील व मारुती नाना यांना कोणत्याही कार्यक्रमाला बोलवा ते कोणत्याही विषयावर व कधीही भाषण करत होते. रामभाऊ मामा तर कधीही भेटा एखादा विषय काढून पुढचा माणुस हरेपर्यंत गप्प बसत नव्हते. अशी एक एक माणसं, त्यांच्या तालमीत आम्ही तयार होत होतो.

माणसाने बळाची उपासना केली पाहिजे म्हणून गावात मलीक साहेबाचा उरुस असे. सर्व हिंदू लोकच हा कार्यक्रम करीत होते. त्या उरसाला कुस्त्याचा कार्यक्रमही अनेक वर्षे मंडळामार्फत आम्ही राबवला होता. आता मंडळाचा दबदबा वाढत होता. आम्ही मंडळाचे कोणी दिसलो तर उशीरा प्राथमिक शाळेत येणारे, मास्तर एक तर आर्धी रजा टाकायचे किंवा पळून जायचे. याचा आकस धरुन शेजारच्या गावाचे घुले गुरुजी यांनी माझा छोटा भाऊ माधवराव यास इयत्ता सहावीत नापास केले. मी आठ दहा मुलं घेऊन उस्मानाबादला शिक्षण अधिकाऱ्याकडे गेलो व त्यांना शाळेवर धाड टाकून पेपर पुन्हा तपासायची मागणी केली. त्यावेळी दुपारी ४ वाजता फक्त साहेबाला भेटू देत असतं. आम्हाला शिपायाने अडवले, मी मुलाला सांगितले, त्याला उचला व रस्त्यावर घेऊन जा, तोपर्यंत मी भेटतो. मुलांनी ते काम योग्य पद्धतीने केले. मी महिला उपशिक्षणाधिकारी होत्या त्यांना भेटलो. त्यांनी कार्यवाही लगेच केली व नापास झालेली मुलं पास होती हे बघून त्यांची बदली तालुक्याबाहेर केली.

त्याच वेळी सरपंचानी शाळेत कोंबडा कापून दारु पिऊन मास्तराबरोबर पार्टी केली व एका मुलाला कोंबडा आण म्हणून मारले होते. मी हा प्रश्न बबनराव ढाकणे यांना विधानसभेत विचारायला लावला व चुकीचे काम करणाऱ्याला अद्दल घडविली.

मंडळाच्या कारकीर्दित एक वाईट घटना घडली. एसएफआयच्या मोर्च्यासाठी आम्ही ३० युवक नागपूरला जाणार होतो. सर्व फायनल झाले. पण मला ज्यावेळी नागपूरला जायचे त्याच वेळी बार्शी या ठिकाणी प्राध्यापकाची नोकरी लागली व प्राचार्यांनी मला लगेच रजा

देण्यास अमान्य केले. मी नोकरी सोडावी व नागपूरला जावे असे ठरल. पण सर्व मुलांनी विरोध केला व  जो तो तू नोकरीस रहा असे सांगितले. रेल्वे जाताना मुर्तिजापूर या ठिकाणी रेल्वेस्टेशनवर गाडी थांबल्यावर शेळीला केळीची कातडी टाकली व एक कातडी रेल्वेखाली पडली. ती खाण्यासाठी शेळी फ्लॅटफॉर्मच्या खाली उतरली व रेल्वे चालू झाली व तिच्या अंगावर चाक गेले. हे बघण्यासाठी वजीर नावाचा एक मंडळातील मुस्लीम युवक वाकून बघत होता. एवढ्यात रेल्वेने वेग घेतला व बाजूला पाणी भरायच्या खांबाला तो आपटला व खाली पडला. चेन ओढून मुलांनी त्याला दवाखान्यात नेले. पण त्याचे प्राण वाचवता आले नाहीत. माझं कर्तव्य म्हणून मी त्याच्या आईचा मुलगा झालो. त्याच्या दोन्ही बहिनीच्या लग्नाला मदत केली. औषधपाण्यासाठी त्याच्या आईला मदत केली व दरवर्षी तिला साडी चोळी केली. ही घटना मात्र माझ्या डोक्यातून कधी जातच नाही.

पंतप्रधान मोदी आता जी कामे करतात ती कामे मी ४० वर्षांपूर्वी गावात राबवली. गाव स्वच्छ करणे, गावाला पाणी, लाईट, बस, व्यवसाय, चांगल्या विचारांची मुले, निर्व्यसनी समाज, तंटामुक्त समाज ही सर्व कामे क्रांतिवीर ग्रामविकास मंडळामार्फत मी केली. याचा मला सार्थ अभिमान आहे.

▸▸ ▸▸

# ८. मंदिर व मित्र

गावामध्ये अनेक दिवसांपासून अनेक पुढारी व म्होरक्यांनी गावातील मंदिर बांधण्याचा प्रयत्न केला. अनेक वेळा पट्टी करून सुद्धा त्यांना यश आले नाही. जवळ जवळ ५० वर्षे गावातील लोक मंदिर बांधण्यासाठी चांगला माणूस शोधत होते. अखेरीस एक दिवशी गावकऱ्यांची मिटींग झाली व मला त्या मिटींगला बोलाविले. आमची क्रांतिवीरची अनेक मुलंही त्या वेळी उपस्थित होती. गावकऱ्यांना प्रामाणिक व खऱ्या माणसाची गरज होती. एकमताने गावकऱ्यांचा विचार झाला की, त्या मंदिर कमिटीच्या प्रमुखाचे काम माझ्याकडे द्यायचे. सर्वांनी एकमतानी माझी निवड केली. हे मोठं शिवधनुष्य होतं. कारण एकूणच गावची परिस्थिती, साधी पट्टी गोळा होत नव्हती. प्रामाणिक माणसाच्या हातात पट्टी न गेल्यामुळे अनेक वेळा पट्टीचे पैसे गायब झाले होते. त्यामुळे नवीन पट्टी केली तर लोक पैसे द्यायला तयार नव्हते. अशा वाईट परिस्थितीतही ही जबाबदारी माझ्यावर येऊन पडली होती. मी तर एकदमच न कमावणारा गरीब परिस्थिती असलेला व त्या वेळी तर आमच्या घरची परिस्थिती अत्यंत हालाखाची झालेली होती व मंदिर बांधण्याची जबाबदारी माझ्यावर आली होती. त्यावेळी माझी कोणतीच कुवत नसतांना मी बोलायला उठलो व लोकांना सांगितले की हे मंदिर गावकऱ्याच्या जिवावर झाले नाही तर मी ते स्वतःच्या हिमतीवर व पैशावर बांधीन. बोलून गेलो पण पैशाची सोगं कशी करायची. हे मंदिर तर आता बांधले पाहिजे. त्या वेळी मी नामदेव गुरुजींकडे पट्टी गोळा करायला सांगितले पण पैसे गोळा होत नव्हते. त्याच्यात जवळ पास १० वर्षे गेली. मी पुण्याला नोकरीला लागलो. Income Tax ची प्रॅक्टीस करायला लागलो. माझे सासरे श्री नवनाथ मोराळे यांनी मला प्रोत्साहन दिले. स्वतः त्यांनी पुढाकार घेतला. अतोनात कष्ट घेतले. मी दर महिना – पंधरा दिवसाला जेवढे प्रॅक्टीसचे पैसे जमतील ते गावाला सासऱ्यांकडे पाठवायचो. उधारी करून व ह्या पैशावर जवळ जवळ ५ वर्षेच

मंदिराचे काम चालू होते. गावातली चावडी व जुने मंदिर पाडून त्या जागेवर नवीन मंदिर बांधणे एवढे सोपे नव्हते. त्यांचा कडक स्वभाव यामुळेच ते मंदिर अनेक लोकांच्या विरोधाचा विचार न करता नवनाथ गुरुजी यांच्यामुळे शक्य झाले व मी घेतलेली शपथ पूर्ण झाली.

मंदिरासाठी अनेक लोकांनी मदत केली. हणुमंत जाधवर, सुभाष मोराळे धर्मा व त्याचे बंधू नागरगोजे, धरणाचा एक कॉन्ट्रॅक्टर व राहिलेले जवळ जवळ १९९० ते १९९५ या काळात १५ लाखाच्या आसपास मी थोडे थोडे पैसे जमवून मंदिराला दिले व मंदिर पूर्ण झाले. ही सर्व ईश्वराची कृपा म्हणावी लागेल.

क्रांतीवीरच्या काळात मला माझे भाऊ, चुलत भाऊ व मित्र लाभले व त्याच्या गुणावगुणाचा माझ्या जीवनावर खूप मोठा परिणाम झाला. त्यामध्ये महत्त्वाचा मित्र व चुलत भाऊ राजू जाधवर आमच्या मंडळाचा सेक्रेटरी सांगितलेल्या सर्व गोष्टीची अत्यंत प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणार. जवळ जवळ कळत तसं म्हणजे ५० वर्षे आम्ही एकत्र राहिलो. ही फार मोठी गोष्ट आहे व त्याच्यामुळेच मी कॉमर्स या शाखेत गेलो व आज मी स्थिर होऊ शकलो.

दिलीप मोराळे गावातील हायस्कूलचा मुख्याध्यापक व आमची क्रांतीवीर लायब्ररी चालवणार. राजकारणात जास्त लक्ष न देता आपलं काम भलं आणि आपण भलं. किसनराव पाटील यांचा हा मुलगा अत्यंत धार्मिक. रोज ग्रंथ वाचणारे, आमच्या वडिलाचे मित्र पाटलाचा चहा पंचक्रोशीत प्रसिद्ध.

रवींद्र हा राजूचा भाऊ त्या काळात एम. एस्सी. मायक्रोबायोलॉजी केली; पण या विषयाचा प्रचार नसल्यामुळे त्याला स्कोप मिळाला नाही व त्याला डेअरी सायन्सला अकलूज या ठिकाणी ज्युनियर कॉलेजला नोकरी करावी लागली. आयुष्यात मी युवा अवस्थेमध्ये एकच लग्न जमवलं. ते म्हणजे रवींद्र याच्या लग्नाला नवरदेव उशीरा आला त्यावेळी मोबाईल नव्हते. मला सर्वजन नाव ठेऊ लागले. अखेरीस लग्न पार पडले; पण मी मात्र त्या दिवसापासून लग्न जमवायला सावध झालो.

अशोक मोराळे आमच्या गावचाा सुपुत्र, सखा, पुणे शहराचा Add. C. P. of crime branch अत्यंत हुशार पहिल्या पासूनच होतकरू, चुनचुनीत व चांगले काम करणारा सत्यनिष्ठूर

म्हणून सर्वांना ज्ञात. फौजदारी परीक्षा पास, Co-op च्या अधिकाऱ्याची परीक्षा पास. शेतकरी अधिकाऱ्याची परीक्षा पास व Dy-SP ची ही परीक्षा पास. गर्व न कोरडा अभिमान कधीच नाही. पदाचा गर्वही नाही. शाळेत असल्यापासून आमच्या बरोबर आम्ही नाटक बसवलं होतं. त्यात ही स्त्रीपात्र एकदा केलेलं. राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांनी युवक महोत्सव चालू केला. त्यात ही आमच्या बरोबर हिरीरीने भाग घेणारा. क्रांतीवीर बद्दल काही अफवा असल्या तरी वडिलांना सुद्धा खरं सांगण्याची ताकद असलेला सच्चा मित्र.

दुसरा गावचा सुपुत्र सुभाष मोराळे म्हणजे Jt. commissioner of sales tax असलेला आमचा मित्र, अत्यंत वाईट परीस्थितीत जगलेला. आईच्या कष्टाची जाणिव असलेला. ज्याला शिकवण्यासाठी आईने त्याच्यासाठी अतोनात कष्ट केले. शेतातली भाजी काढणे, डोक्यावर वाहून बसच्या टपावर हमाल नसताना चढवणे. ती टपावरून उतरवून बाजारात डोक्यावर घेऊन जाणे व एक एक पैसा करून आपल्या मुलाला शिकवले. अशी आई लाभणे खरचं भाग्याचं आहे व ते भाग्य आमच्या सायबाला मिळाले. अत्यंत साधा सरळ स्वभाव कोणाविषयीही खोटं मनामध्ये नाही. कष्टाळू म्हणजे कॉलेजला असताना अभ्यास करण्यासाठी केसाला गाठ मारून झोप येऊ नये म्हणून अभ्यास करणारा वडजीचा सुपुत्र.

ताराचंद मोराळे हा आमचा हितचिंतक मित्र अनेक चांगल्या गोष्टी सुचवणारा, मला सगळ्यात जास्त पुण्याला जा म्हणणाऱ्यामध्ये एक नंबरवर असलेला असा मित्र. क्रांतीवीरच्या स्थापनेपासून खांद्याला खांदा देऊन काम करणारा पण तोंड बरोबर नाही. फटकळ बोलणारा, एखाद्याच्या मनाला लागेल का याचा विचार न करणारा. वारंवार अफवा सोडणारा ज्याच्यामुळे अनेक वेळा क्रांतीवीर मंडळात शंकेचं वातावरण निर्माण झाले. पण कोणताही स्वार्थ न ठेवता मनापासून प्रेम करणारा हा मित्र. पोपट मोराळे, अच्युत मोराळे सुद्धा तसेच असे कितीतरी मित्र ज्यांचा मी या ठिकाणी उल्लेख करायला पाहिजे. पण हे चरित्र लांबेल म्हणून ठरावीक मित्राचाच उल्लेख करणे उचित होईल.

सगळ्यात माझा महत्त्वाचा चुलत भाऊ, गुरु व मित्र म्हणजे प्राचार्य हणुमंत जाधवर ज्याच्यामुळे मी माणसात आलो. गुरुपेक्षा चांगल्या गोष्टी ज्याने जीवनभर मला सांगितल्या. अनेक सुख दुःखामध्ये मला साथ दिली व मला कळत असल्यापासून ५५ वर्षे एकत्र राहिलो.

असा परम मित्र. माझ्या झालेल्या सर्व गोष्टीचा खरा एकमेव साक्षीदार व ज्याच्यामुळे मला पुणे पाहायला मिळाले तो म्हणजे एच. आर. आम्ही त्याला इनिशियल नावानं संबोधत होतो. हणुमंत रामभाऊ म्हणून एच. आर. त्याच्याबरोबरचा एक प्रसंग मला आठवतो. माझी आई वारली होती, मी इयत्ता नववीत असेल. अंदाजे १९७५ सालची ही गोष्ट असावी. आईचा मृत्यू होऊन एक वर्ष झाले होते. घरात तिच्या आठवणी तशाच होत्या. आमची परिस्थिती वाईट असल्यामुळे केवळ माझ्या जवळ १२ रुपये होते व एच. आर. जवळ १३ रुपये होतो. आम्ही पंढरपूरला गेलो. नदीत अस्थी विसर्जन करावयाच्या होत्या; पण तिथले कोळी व ब्राम्हण पैसे आपल्याशिवाय क्रियाक्रम करायला तयार नव्हते. आम्हाला पैसे नाही म्हणून त्यांनी हाकलून दिले. आम्ही रोडने वर स्टँडकडे गेल्यासारख केलं. पंढरपूरला रेल्वेपूल एकदम लांब आहे. एक दोन किलोमिटरवरून नदीच्या बाजूने गेलो व दोघेच नदीत उतलो आणि त्याला इकडे तिकडे बघायला लावून मी पटकन आईच्या अस्थी नदीत बुडविल्या व कोणी बघू नये म्हणून परत वरून पळून आलो. या समाजव्यवस्थेमुळे मला आईच्या अस्थी सुद्धा नीट चंद्रभागेच्या पाण्यात बुडवता आल्या नाहीत. दुःख झाले, रडू लागलो. त्या वेळी एच. आरने धीर दिला. अतोनात आई बापावर प्रेम, भावा-बहिनीवर प्रेम व ओत प्रोत देशभक्ती. मनोज कुमाराची नक्कल करून त्याच्या पिक्चरमधील त्याचा सारखा पेहराव करणे त्याच्या कविता ऐकवणे त्याचे मामा किसनराव पाटील धार्मिक होते. रोज ग्रंथ वाचायचे, मांसाहारसाठी हाडही न बाटलेला, शाळेच्या वयापासून पोथीचा अर्थ सांगणारा व आदर्शाचे धडे देणारा असा मित्र होणे नाही.

वसंतराव नाईक शाळेच्या स्थापनेच्या विचारापासून त्या शाळेला ग्रँट येईपर्यंत मी स्वतः चालवले होते. त्याचा तो अध्यक्ष होता. पण माझे नाव त्याच्या बॉडीवर घेतले नाही तरी मी कधी खंत केली नाही व माझ्या पुण्यातल्या संस्था स्थापने मागे गावातील शाळेत माझे नाव घेतले नाही, हे एक कारण आहे. आपण ही संस्था काढायची हा विचार माझ्या मनामध्ये त्याच्यामुळेच आला हे सुद्धा महत्त्वाचे. पण आता तो बदलल्यासारखा वाटतो. संसाराची आस नसणारा आता पूर्ण संसारी माणसासारखा वागल्याचा अनुभव येतो.

▸▸ ▸▸

# ९. पुण्यात प्रवेश

मला अजून तो दिवस चांगला आठवतो, १९ जून १९८६. मी पुण्यातल्या शिवाजी मराठा संस्थेच्या जेधे कला व वाणिज्य महाविद्यालयाचा इंटरव्ह्यू दिला होता. ती मुलाखत अत्यंत चांगली झाली. मला खात्री झाली होती की आपल्या बुद्धीच्या जोरावर आपल्याला प्राध्यापकाची नोकरी १००% मिळणार. २० जूनला कॉलेज सुरू होणार होते. आदल्या दिवशी पुण्यात यायचे व दुसऱ्या दिवशी कॉलेजला रुजू व्हायचे ठरविले. सामान्य परीस्थिती, पुण्यातले स्टँडर्ड, आपल्याकडे सायकल नाही, राहण्याची सोय नाही, कसे होणार याची चिंता होती; पण स्वतःवर खूप विश्वास होता. मी सकाळी वडजीवरून बार्शी मार्गे पुण्यासाठी निघालो. राहण्याची सोय होईपर्यंत कुठेतरी राहिले पाहिजे म्हणून मी आमच्या मंडळातील प्रभाकर मुंढे याला बरोबर घेतले कारण त्याचा सासरा अभिमानश्री सोसायटीमध्ये एका बंगल्याचा वॉचमन म्हणून काम करत होता. त्याचा मालक अमेरिकेत राहत होता. त्यामुळे दोन दिवस तेथे राहता येईल असे गृहित धरून त्याच्याकडे गेलो व नंतर राहण्याची सोय कुठेतरी करू अशामुळे मी त्याला बरोबर घेतले व पुण्याला आलो. कमी किमतीची सुटकेस मी बार्शीत खरेदी केली होती. त्यामुळे तिची क्वॉलिटी चांगली नव्हती. उतरतानाच गर्दीमध्ये तिचा कोंडा मोडला. ती खाली पडली. गर्दीत कशी तरी मी ती सुटकेस बाहेर काढली. आम्ही विचारत विचारत अभिमानश्री सोसायटी शोधून काढली. तो बंगला शोधला पण आश्चर्य म्हणजे तीन दिवसापूर्वीच त्याच्या सासऱ्याने तो बंगला सोडलेला होता. आम्ही त्यांचा पत्ता विचारला. तिथल्या माणसाने आम्हाला सांगितले की वॉचमनचा पत्ता कोण ठेवत व कोण विचारतं. आता मात्र फारच मोठी पंचाईत झाली होती. मी ठरवले आता माझीच राहण्याची व्यवस्था नाही, तर याला कोठे घेऊन फिरणार. तडक स्वारगेट गाठले व त्याला

बार्शीच्या बसमध्ये बसवून दिले. आता संध्याकाळ झाली होती. पुण्यात दुसरे कोणी ओळखीचे नव्हते व एखाद्या लॉजवर उतरावे यासाठी पैसेही नव्हते. शेवटी मी एस. टी. स्टँडवर राहायचे ठरवले. रात्रभर स्वारगेटच्या स्टँडवर बसून राहिलो. डोक्याखाली सुटकेस घेऊन थोडा झोपलो. २० जून १९८६ ला मला कॉलेजला प्राध्यापक म्हणून रुजू व्हायचे होते. सकाळी लवकर उठलो. त्या काळामध्ये सुलभ स्वच्छालय नव्हते. आंघोळीची एस. टी. स्टँडवर सोय नव्हती. संडासामध्ये डालड्याचे डबे ठेवलेलेल असायचे. तो डबा भरून घेतला. बाहेर येऊन केस ओले केले. तोंड धुतले व लोकांना आंघोळ केल्यासारखं वाटावं अशा प्रकारे केस धुतले आणि बिगर आंघोळीचा जेधे कॉलेजला प्राध्यापक म्हणून रुजू झालो. हा माझ्या जीवनातील पुण्यातील पहिला दिवस कधीही विसरणार नाही. त्याच स्वारगेटला आज माझे साधारण १५ कोटी किंमतीचे हॉटेल आहे. ही जिद्द माझी होती की ज्या ठिकाणी आपल्याला स्टँडवर राहावे लागले त्याच स्टँड जवळ आपण हॉटेल काढू असे मी त्याच वेळी कोणतीही ऐपत नसताना मनात खुणगाठ बांधली होती.

कॉलेजमधील पहिलाच दिवस. काही शहरात राहिलेले प्राध्यापक होते. आम्हाला बोलतही नसायचे. त्यांच्याच नादात असायचे. दुपारी आता कॉलेज सुटल्यावर कोठे राहायचे हा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला. मी चौकशी केली असता संस्थेचे होस्टेल होते व कॉलेजचा एक क्लर्क शेळके नावाचा त्याचा रेक्टर होता. मी त्यांच्याकडे गेलो व काही दिवस मला इथे राहू द्या. मी काहीतरी दुसरीकडे राहण्याची सोय करतो असे सांगून होस्टेलच्या रेक्टर रुमध्ये राहायला गेलो. त्या रुममध्ये बाथरुम नव्हती. किचन ओट्यावर बसून तांब्याने थंड पाण्याने आंघोळ करावी लागत असे. मी त्या ठिकाणी साधारण एक महिना राहिलो असेल; पण खेंगरे नावाचा शिपाई होता. तो रोज सकाळी पोहे बनवायचा व आम्हाला खाऊ घालायचा. पुण्यात पहिल्या काही दिवसात शेळके व खेंगरे यांनी खूपच साथ दिली.

त्याच वेळी प्रा. अभिमन्यू कदम हे सुद्धा आमच्या बरोबर राहात होते. त्यांचा गरीब स्वभाव होता. आमच्या तालुक्यातील होते. ते आणि मी रुम शोधू लागलो. रुम रामोशी गेट या ठिकाणी मिळाली. कॉलेजपासून साधारण तीन किलोमीटर रोज चालत कॉलेजला येत

होतो. जेवणाची सोय रुमच्या विरुद्ध दिशेला होती तेही पुढे २ ते ३ किलोमीटर. कॉलेज सुटले की सहा किलोमीटर जेवायला व सकाळी परत चालत जेवायला अशी पायपीट सुरू झाली. आमची रुम म्हणजे कॉटबेसीसवरची रुम.

त्या वेळेला कॉलेजमध्ये प्राध्यापकाला दरवर्षी काढून टाकतात व प्राध्यापकाला चांगली वागणूक देत नाही असे मला कळले. माझी परिस्थिती गरीबीची असली तरी प्रचंड स्वाभीमान व करारी स्वभाव त्यामुळे मी ठरवले जितके दिवस नोकरी राहिल तेवढे दिवस नोकरी करायची. तोपर्यंत एल.एल. बी. ला प्रवेश घेऊ, नोकरी गेली तर वकिली करू. कारण गावाकडे तर जाणे शक्य नाही. मुळातच दोन्ही वडिल बंधू अगोदरच शेती करतायत. आपली भर आपण टाकू शकत नाहीत. त्यामुळे प्राध्यापक किंवा वकिल असे मी ठरविले व दुसऱ्याच दिवशी भारती विद्यापीठाच्या एरंडवणे लॉ कॉलेजला प्रवेश घेतला. मी ज्या ठिकाणी राहत होतो तेथून ते कॉलेज किमान १२-१३ कि. मी. होते. कॉलेजला रोज जाणे आवश्यक नव्हते पण लॉचा अभ्यास करायचा म्हणून त्या वेळी आव्हाड यांचे लॉ क्लासेस कर्वे रोड या ठिकाणी चालू होते. तिथे मी प्रवेश घ्यायचे ठरविले. त्या क्लासमध्ये मी तीन वर्षे क्लासेस केले; पण Adv. S. E. Avhad सर ज्यांना छोटे सर असे म्हटले जात होते त्यांनी एकही पैसा घेतला नाही. कारण त्या काळात मला पगार फक्त १८३६ रुपये दरमहा होता. घरची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर होती. माझा सर्व खर्च ८३६ रुपयात महिन्याचा बसवायचा. त्यात चार वेळा दर आठवड्याला गावाकडे जाण्याच्या खर्चासहित भागवायचे. घरी १००० रुपये प्रतिमहा द्यायचे अशी ही सुरुवात झाली.

मी आव्हाड लॉ क्लासेसला पहिल्यांदाच गेलो. जेष्ठ विधीज्ञ ॲड. भास्करराव आव्हाड मोठे सर किंवा बी. ई. आव्हाड अशा नावाने प्रसिद्ध. त्या वेळी क्लासेस ते आता स्वतः शिकवायचे. ते क्लासेस बंद करून छोट्या एस. ई. सरांकडे सोपवणार होते. त्यांचे शेवटचे लेक्चर त्या बॅचसाठी होते. ते मी आऐकले १८ ते २० विषय सर कोणताही कागद न घेता शिकवत होते. त्यांचे प्रचंड ज्ञान पाहून मी मनात ठरवले आपण उद्यापासून कॉलेजमध्ये पुस्तक न घेता शिकवायला सुरूवात करायची व रात्री मी खूप अभ्यास व पाठांतर करायचो व

प्राध्यापकाच्या माझ्या काळात कधीही पुस्तक हातात न घेता गणित असो किंवा कॉस्ट अकाऊंट असो असे अठरा विषय मीही पुस्तक हातात न घेता शिकवले. याचा मला सार्थ अभिमान आहे.

त्या काळातच माझी मुळे पोसिलाबरोबर भेट झाली. त्यांना मी मराठीत लॉचे सर्व विषय शिकवायचो. त्यामुळे त्याच्या घरी राहण्यासाठी मी सहा महिने गेलो. ते अभ्यासात अतिशय कच्चे होते. पण मराठीमध्ये त्यावेळी पुणे विद्यापीठात लॉ होते ते त्यांनी पाच वर्षात तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. पण सी.आय.डी.चे काम माझ्या बरोबरच केले व माझ्या गावाला जाऊन सगळी माहिती काढून आणली.

मी आप्पासाहेब जेधे कॉलेजमध्ये बावीस वर्षे नोकरी केली. मला माझ्या गावात जेवढे चांगले वाईट अनुभव आले, कदाचित त्यापेक्षा जास्त चांगले वाईट अनुभव मला जेधे कॉलेज व त्या ठिकाणच्या प्राध्यापक बंधु-भगिनीकडून आले. आप्पासाहेब जेधे कॉलेज माझ्या पुण्यातील जीवनाचा पहिला अंक नाटकात ज्या प्रमाणे वेगवेगळ्या घटना घडत असतात त्याप्रमाणे इथेही खूप चांगले व वाईट अनुभव आले. जेधे कॉलेजचे स्टाफरुम म्हणजे छोटा आखाडाच होता. सगळ्यांना बोलण्याचे स्वातंत्र्य होते. या ठिकाणचा प्रत्येक माणूस हा वेगळ्या प्रकारचा होता. वेगळ्या गुणाचा होता व वेगळ्या प्रकारी हातोटी असलेला होता. इथल्या प्रत्येक माणसाकडून मी काहीना काही चांगले शिकलो व त्याचा जीवनात वापर करून माझे जीवन सफल बनविले.

प्रा. एकनाथ वाळके साक्षात आध्यात्माचा झरा. जीवनात आध्यात्म खऱ्या अर्थाने जगले ते वाळके सर, त्यांच्याकडून मी आधात्माचा धडा घेतला.

प्राध्यापक पंदारे यांच्याकडून शिस्त व नोकरीबद्दलचा प्रामाणिकपणा घेतला.

प्रा. थोरात वाय. आर. यांच्याकडून मी कोणाशी कसे वागायचे याचा धडा घेतला.

प्रा. कचरे विद्या यांच्याकडून मी संयम व शांतता हा गुण घेतला.

श्री. सातव यांच्याकडून मी नोकरीतला रुबाब घेतला.

पांडू पवार या शिपायाकडून मी स्वामी निष्ठा हा गुण घेतला.

श्री. बडधे यांच्या आपमानातून मी Income Tax Practice हा व्यवसाय घेतला.

माजी न्यायाधीश चव्हाण सर यांच्याकडून मी कठोर परीश्रम व प्रसंगी विरोध पत्करायची तयारी हा गुण घेतला.

प्राचार्य कांबळे यांच्याकडून धूर्तपणा हा गुण घेतला. प्रा. भोईटे यांच्याकडून मित्रप्रेम हा गुण घेतला. असे जेवढे जेवढे प्राध्यापक मी त्याच्या सानिध्यात गेलो. त्यांच्याकडून एक ना एक गुण मी आयुष्यभर मधमाशीसारखे गोळा करत राहिलो.

माजी न्यायाधिश ॲड. चव्हाण सर हे माझे काही दिवस स्टाफरुम मेंबर होते. मला ते लॉच्या शिक्षणामधील, पेपरमधील माहिती स्टाफरुममध्येच बाजूला घेऊन द्यायचे. सच्चा मित्र प्रेम करणारा माणूस त्यांच्या बरोबर मी त्याच्या मित्राच्या घरी गेलो त्या वेळेला ते न्यायाधिश होते. त्यांचा मित्र लॉच्या प्रश्नपत्रिका काढत होते. गप्पा झाल्या. त्यांनी माझी ओळख करून दिली व हेही लॉ करत आहेत असे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला विचारले काही आय.एम.पी. प्रश्न पाहिजेत का ? त्यावेळी मी त्यांना सांगितले की, मी मार्क मिळविण्यासाठी लॉ करीत नसून ज्ञान मिळविण्यासाठी लॉ करतोय. त्या वेळेला त्यांनी माझी पाठ थोपटली. अत्यंत कडक स्वभाव पण मन मिळाऊ. माझी त्यांची मैत्री गेली ३५ वर्षे सतत टिकून आहे. सगळ्यात आपुलकी असलेला माझा मित्र असे म्हटले तर काही वावगे होणार नाही.

▸▸ ▸▸

# १०. टॅक्स प्रॅक्टीस

मी पुण्यातील जेधे महाविद्यालयात नोकरी करत होतो. त्या वेळी सकाळी ७.३० ते ११.३० या वेळेत महाविद्यालयात असायचो नंतर पूर्ण दिवस सुट्टी. सर्व लोक दुपारी घरी जाऊन निवांत झोपायचे व संध्याकाळी फिरायला जायचे. काही प्राध्यापक मी आमच्याकडे असे पाहिले की दुपारी कॉलेजवरून आले की दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजताच घराबाहेर पडायचे. मी संध्याकाळी लॉच्या क्लासला जात होतो. बाकी वेळ माझ्याकडे दुपारी रिकामाच होता. मी पुण्यातून नुकताच वडगाव (बु.) सिंहगड रोड येथे आमच्या प्राध्यापकाच्या भोसले व भोईटे याच्या शेजारी एक रुम होती तिथ राहायला गेलो. मी त्यांना विचारले राहण्यासाठी रुम मिळेल का ? त्यांच्या शेजारी चाळीत एक रुम होती ती दोन खोल्याची होती. तेही शेजारीच रहात होते. मी तिकडे राहायला जायचे ठरवले. साधारण १९८८ साल असावे. मी वडगाव धायरी भागत राहायला येणे हा माझ्या जीवनाचा टर्निंग पॉईंट ठरला. पण असे ऐकले होते की, आमचे एक जेष्ठ प्राध्यापक यांनी त्याला तिकडे रुम मिळू देऊ नका असाही सल्ला दिला होता. पण भोईटे आणि भोसले यांनी त्यांचे ऐकले नाही व मी सिंहगड रोड, वडगाव त्रिमुर्ती हॉस्पिटलच्या बाजूला रयतमधील मुख्याध्यापक खोत सरांच्या चाळीत राहावयास आलो. मी लॉच्या तिसऱ्या वर्षाला असेल. आमच्या लायब्ररीचे लायब्ररीयन श्री. बढधे होते. ते माझे जवळचे मित्र होते. त्यांना इन्कम टॅक्स रिटर्न भरावयाचे होते. आमच्या सगळ्याचे इन्कम टॅक्स भरले. हे युवराज थोरात भरत होते. पण बढधे आणि त्यांचे जमत नव्हते. मी लायब्ररीत गेलो त्यावेळी त्यांनी माझ्याकडे हा विषय काढला व मला म्हणाले तुम्ही एल. एल. बी. करत आहात तर माझे रिटर्न भरा. मी म्हटले मला येत नाही. कारण लॉमध्ये ते शिकविले जात नाही. ते सी. ए. ला असते. पण त्यांनाही माहित नव्हते. त्यांच्या आज्ञानातून

त्यांनी माझा अपमान केला व म्हणाले काही सांगू नका. तुम्हाला ते यायलाच पाहिजे. तुम्हाला काहीच येत नाही. हा शब्द माझ्या जिव्हारी लागला व माझी जिद्द पुन्हा जागी झाली. मी सिंहगड रोडने येता जाता मला रोज एक श्री. खाडे टॅक्स कन्सल्टंट असा माझ्या घराच्या जवळच बोर्ड दिसायचा. मी ठरवले जातांना त्याच दिवशी त्यांना भेटायचं व संपूर्ण टॅक्सची माहिती करून घ्यायची. मी त्यांच्या ऑफिसला कॉलेज सुटल्यावर घरी जाताना गेलो. त्यांना भेटलो. त्या वेळी ते एम. कॉम., जी. डी. सी. अँड ए. होते. तर मी एम. कॉम., एम. ए., जी. डी. सी. अँड ए. व एल. एल. बी. होतो. त्यांना मी विनंती केली की, मी प्राध्यापक आहे. मला पैसे नको आहेत. मला फक्त शिकून घ्यायचे आहे. माझ्याकडे त्या वेळी स्कूटर होती. त्या स्कुटरची गोष्ट अजूनच वेगळी आहे. मी दररोज प्रा. भोईटे यांच्या स्कूटरवर मागे बसून यायचो. प्रा. भोसले यांच्याकडेही एक स्कूटर होती. एके दिवशी मला उशीर झाला. मी भोईटे यांना म्हणालो की मी भोसलेच्या गाडीवर येतो. ज्या वेळी मी भोसलेच्या गाडीवर बसायला गेलो. सौ. भोसले म्हणाल्या आज कसे काय आमच्या गाडीवर आलात. रोज तर त्यांच्या गाडीवर जात असता. पुन्हा अपमान व माझी जिद्द जागी झाली. मी ठरविले काही झाले तरी आता गाडी घ्यायची. आमच्या शेजारी एक न्हाव्याचं दुकान होतं व त्याने नवीनच स्कूटर घेतली होती व त्याला मोटार सायकल घ्यायची म्हणून त्याला त्याची गाडी विकायची होती. मी ती गाडी ४,५०० रुपयाला विकत घेतली. ती स्कूटर माझ्याजवळ होती. त्यावेळी बिन पैशात एक प्राध्यापक आपल्याकडे शिकायला येतोय म्हणून थोडे तत्त्वज्ञान सांगून त्यांनी मला हो म्हणून सांगितले व मी रोज किमान तीन वर्षे दुपारी १२ ते रात्री ८ वाजेपर्यंत फुकट काम करत होतो, फक्त शिकण्यासाठी. मी वेगवेगळी कामे शिकू लागलो. त्यात काही चूक झाली की मला ऐकावे लागायचे. प्रकाश खाडे म्हणत एवढे शिकलेले व प्राध्यापक एकही चूक व्हायला नाही पाहिजे. मी त्यांच्या पेक्षा जास्त शिकलेलो. प्राध्यापक त्यामुळे मुद्दाम चूका काढून किंचित थोडा अपमान व थोडे तत्त्वज्ञान सारखे ऐकावे लागायचे. पण त्यामुळे मी अत्यंत चांगल्या प्रकारे माहिती करून घेतली. मी ज्यावेळेला प्रकाश खाडे यांच्याकडे टॅक्सचे काम शिकत होतो त्यावेळी त्यांच्याकडे एम-८० होती. मी त्यांच्यापेक्षा तरुण होतो. त्यामुळे

मी त्यांची गाडी चालवायचो व ते मागे बसायचे. त्यावेळी आमचे बरेच प्राध्यापक बंधू मला ड्रायव्हर म्हणत होते. समोर कुणाची हिंम्मत नव्हती. पण पाठी मागे म्हणायचे.

तीन वर्षांनंतर स्वतःच मोकळ्या वेळेत प्रॅक्टीस करायला सुरुवात केली. एकदा दारावर प्लॅस्टीकची भांडी विकणारी व्यक्ती आली. मी व माझ्या बायकोने प्लॅस्टीकच्या बरण्या विकत घेतल्या. त्या वेळी आमच्या शेजारच्या प्राध्यापकाच्या बायका हसत होत्या. ते मी कधी विसरलो नाही व आमच्या परीस्थितीला हसणाऱ्या लोकांना धडा शिकवायचा असेल तर रात्रंदिवस कष्ट करून पैसे कमविले पाहिजे हेच ब्रीद मी घेतले.

मी अनेक काम करत होतो. रात्रंदिवस एक करीत होतो. परिस्थिती थोडी बरी झाली. आमचे हितचिंतक प्राध्यापकांनी पुन्हा मला नाव ठेवण्यात बढती दिली व आता मला ते मॅनेजर म्हणू लागले. मला हे ऐकायला मिळत होते. माझा स्वभाव कडक असल्यामुळे समोर कोणाची बोलायची हिम्मत नव्हती; पण मी हे ऐकत होतो. कोणावर टीका-टिप्पणी न करता प्रगतीची वाट चालत होतो व हळूहळू यशाचे शिखर गाठत होतो. पैसे मिळो न मिळो, 'फी मिळो न मिळो' कष्ट करणे. अत्यंत कमी पैशात दर्जेदार काम करणे हे मी जीवनभर करीत आलो व त्याचे फळही मला मिळाले.

वडगाव धायरी व सिंहगड रोडवर माझे नाव हळूहळू पसरत चालले होते. मी स्वतःच चांगली कामे करत होतो. अनेक शेतकऱ्यांच्या मुलांना बिल्डर करण्याचे काम मी त्या काळात केले. ज्याच्याकडे पैसा असेल व एखाद्याकडे जागा असेल तर त्यांना एकत्र आणायचो. पार्टनरशिप तयार करून देण्यापासून ते इन्कम टॅक्स रिटर्न भरेपर्यंत सर्व कामे मीच करायचो. त्यावेळी कॉम्प्युटर नव्हते. सर्व कामे हाताने लिहायची, अकाऊंटची कामे हाताने रजिस्टरमध्ये लिहायची व त्या काळात आमच्या भागाला अंदाजे १५० बिल्डर होते. त्यापैकी साधारण १२५ बिल्डर लोकांचे काम माझ्याकडेच होते. आता मला चांगले पैसे मिळू लागले. पण त्यापैकी ९०% पैसे मी गावाकडे बांधत असलेल्या मंदिराला दिले व पाच वर्षात मिळालेले पैसे फीमध्ये मी गावातील मंदिर बांधून पूर्ण केले. मी प्रोजेक्ट रिपोर्ट एका दमात न चुकता टॅली करायचो. ५०-५० पेजेसचा प्रोजेक्ट रिपोर्ट; परंतु झटक्यात पूर्ण.

सिंहगड रोड बिल्डर असोसियशनची स्थापना झाली. माझे काम एवढे चांगले होते की, मला अगोदर बिल्डर असोसियशनचे बिनविरोध सचिवपद मिळाले व नंतर अध्यक्षाची निवडणूक झाली. मी त्या वेळी खूपच कष्ट घेतले. मी प्रत्येकी १०० रुपयात रिटर्न भरून द्यायचो. रिफंडही काढून द्यायचो. भरुचा मोतीवाला कंपनी होती. त्यांच्या अनेक सबकॉन्ट्रॅक्टरचीही कामे मी बरीच वर्षे केली. ही कामे करताना मी ढोले पाटील हॉटेलमध्ये बसायचो. तो काळ अतिशय कठीण होता. मी जवळ जवळ १४ वर्षे फक्त संध्याकाळी ११ वाजता एकदाच जेवायचो. एवढे काम मी करत होतो. सकाळी खात नव्हतो. मी सकाळी अंगावर गार पाणी पडल्यावरच झोपेतून उठायचे. कारण नोकरी अत्यंत चोखपणे करण्याचे मी काम केले. मी २२ वर्षे जेधे कॉलेजमध्ये नोकरी केली. पण आपण रजेचे रेकॉर्ड जर पाहिले तर दोन किंवा तीनच रजा माझ्या वर्षाला होत होत्या. कोणतेही काम बुडविले नाही. नोकरी प्रामाणिकपणे केली. इन्कम टॅक्स प्रॅक्टीस प्रामाणिकपणे केली. बिल्डिंगचा व्यवसाय प्रामाणिकपणे केला व समाजकार्य व प्रबोधन आज जवळ जवळ चार चार माणसाचे फुल टाईम काम मी करत होतो. प्रॅक्टीस मधला कळस म्हणजे माझी सीबीडीटीची एक चिफ कमिशनर याच्यासाठी ॲडव्हायजरी कमिटीसाठी करमकर यांनी त्या वेळी एक्सपर्ट म्हणून शिफारस केली. सीसीआयटी गाडगीळ साहेब होते. त्या वेळी मी मुंबई सोडून उर्वरीत महाराष्ट्राचा ॲडव्हायजरी कमिटीचा मेंबर झालो. त्यात एक खासदारही असतात. त्यावेळी कमिटीवर खा. प्रदिपदादा रावत हे होते. त्या वेळच्या कामाचा मला खुप फायदा झाला. रिफंडमध्ये टक्केवारी मागितली जायची. त्या मिटिंगमध्ये आम्ही शिफारस करून सीबीडीटीला पाठवली व म्हटले की ही रिफंडची रक्कम डायरेक्ट खातेदाराला मध्यवर्ती ठिकाणाहून विशिष्ट मुदतीत पोष्टाने जावी व ते मान्यही झाले.

माझी प्रगती होत होती पण जवळच्या लोकांना बहुतेक पचनी पडत नव्हते. लोकांनी निनावी तक्रारी करायला सुरुवात केली. शिक्षण संचालक, कलेक्टर कचेरीतील भ्रष्टाचार निर्मूलन समिती, इन्कम टॅक्स खाते व विद्यापीठ यांच्याकडे अनेक तक्रारी होऊ लागल्या. चौकशा सुरू झाल्या. पण मी प्राध्यापक होतो. सर्व कामे प्रामाणिकपणे करत होतो. मी कोणत्याही प्रकाराची आर्थिक कामे करत नव्हतो. शिकवण्या घेत नव्हतो. त्यामुळे नियमाचा

भंग होण्याचे कारण नव्हते. पण नियतीला मला बोल्ड करावयाचे होते असे आता वाटते. त्यावेळी सगळ्यात त्रास दिला तो डॉ. पठाण शिक्षण संचालक. त्यांनी मला अत्यंत प्रेशर केले. प्राचार्य कांबळेला सांगितले की  तुमच्या प्राध्यापकाला तुम्ही स्वतः घेऊन या. त्यांनी खूपच तगादा लावला. जवळ जवळ सात पेजेस उत्तर तयार केले त्या वेळी प्रा. बेंगाळे यांनी मला खूप साथ दिली व ते उत्तर घेऊन मी डॉ. पठाण यांचेकडे गेलो. त्यांनी दोन तास चौकशी केली. अनेक चुकीचे, बरोबर प्रश्न विचारून हैराण केले. मला हे सहन झाले नाही. मी त्यांना घेरण्याचे ठरविले व सत्याची लडाई लढायची जे होईल ते होईल. त्यांनी माझा बिझनेसवर जास्त जोर दिला होता. त्या वेळी मी त्यांना म्हटलं, ''साहेब मी घरचा श्रीमंत कुटुंबातला आहे. त्यामुळे माझे फॅमिली बिझनेस आहेत. मी महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या नोकरीत कोणतीही कसूर केलेली नाही. मी एक ही नियमबाह्य काम केलेले नाही. भ्रष्टाचार केलेला नाही. त्यामुळे मी गुन्हेगार नाही. तुमच्या कोणत्याही आरोपात तथ्य नाही. राहिला भाग मी दुपारी काय करतो याचा, तर मी प्रामाणिकपणे माझी नोकरी करतो. कॉलेज सुटल्यावर घरी जातो, जेवतो व ज्या ठिकाणी माझी पत्नी व भाऊ व्यवसाय करतात. त्यांना मार्गदर्शन व मदत करतो. हा जर गुन्हा असेल तर तो गुन्हा मी रोज करतो. त्याच्या लक्षात आलं हा जरा आडव्यात चाललेला आहे. मी उसळलो आणि त्यांना म्हटलं की मला आता नोकरीत स्वारस्य नाही. मी तुमच्यावर व प्राचार्यावर केस दाखल करतो व माझी विनाकारण हऱ्याशमेंट करतात. नियमाप्रमाणे महाराष्ट्र सरकारचे एक सर्फ्युलर आहे की एखादे पत्र जर निनावी असेल तर त्याला केराची टोपली दाखवायची; पण तुम्ही इतका रस घेऊन चौकशी का करताय. त्यावेळी त्यांना जाणीव झाली की आता जास्त पिळण्यात मजा नाही व त्यांनी उत्तराचा अर्ज घेतला व पुन्हा कधीही बोलावले नाही.

मी पहिली पाच वर्षे सर्व पैसे गावाकडील मंदिराला दिले. प्रॅक्टीस सोडताना साधारण ७० लाख रुपये क्लायंटला सोडून दिले व मधल्या काळात जे पैसे मिळाले ते तसेच बांधकाम व्यवसायात गुंतविले; पण एक रुपयाही स्वतःसाठी खर्च केला नाही हे महत्त्वाचे.

ही प्रॅक्टीस करताना संतोष बागडे विद्यार्थी म्हणून माझ्याकडे आमच्या सेंटरींग कॉन्ट्रॅक्टरने आणला. त्याला ध चा मा कळत नव्हता. पँट सुद्धा नीट घालता येत नव्हती. मी त्याला दहा

वर्षे हा व्यवसाय शिकविला. हाताखाली लोक दिले, ऑफिस दिले नंतर माझी प्रगती वाढतच होती. मी विद्यापीठात वाणिज्य विद्याशाखेचा डीनही झालो व मला कमी वेळ मिळू लागला. मी त्याला सर्व कारभार दिला. पण एक दिवस सगळेच घेऊन तो त्याच्या घरी पळून गेला. त्याच्या आईचे जागेचे पैसे एका बिल्डरकडून मी मिळवून दिले. कधीही त्याचाच काय पण कोणाचेही काम केले तर मी आयुष्यात कधी त्या माणसाकडून एक पैसा सुद्धा घेतला नाही किंवा अपेक्षाही केली नाही. पण संतोषने नंतर एक पैसाही दिला नाही. मी घरोघरी जाऊन एक एक क्लायंट मिळविले होते. धंदा १५ वर्षे वाढवला होता. तो म्हणाला होता की या प्रॅक्टीसचे गुडविल म्हणून तुम्हाला १/३ पैसे देत जाईल. पण त्याची नियत त्या पद्धतीने वागली नाही व मी ही एक दोन वेळा बोलून तो विषय सोडून दिला. देव त्याचे भले करो.

त्यावेळी माझ्या असं लक्षात आलं की, अनेक बिल्डर अडाणी आहेत म्हणून ते बिल्डर आहेत. बाकी काहीच क्वॉलिटी त्यांच्याकडे नाही व माझ्याही मनात या वेळी बिल्डींग व्यवसायाचे विचार येत होते.

▸▸ ▸▸

# ११. बांधकाम व्यवसाय

पुण्यात आता स्थिरस्थावर व्हायचे म्हणून मी कुठेतरी एक गुंठा जागा घ्यावी व घर बांधावे असा विचार करत होतो. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी मी जागा बघत होतो. मला कोणीतरी हरिश्चंद्र अण्णा दांगट यांची जागा आहे असे सांगितलं. मी त्यांना भेटायला गेलो. ते म्हशी चारीत होते. त्यांनी मला जागा दाखविली. त्या जागेवर नंबर एक भेंडी आली होती. माझ्यातील शेतकरी जागा झाला. खरचं एवढी भेंडी सुंदर आलेली होती. मी त्यांना म्हणालो, अण्णा येवढ सुंदर शेत आणि तुम्ही का विकताय. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की एक म्हैस अचानक मेली व कर्ज झाले आहे. त्यासाठी शेत विकायचे. त्यापुढे अनेक दिवस गेले. मी मात्र बाळासाहेब पोकळे यांच्याकडून त्यांच्या नातेवाईकांची जागा घेतली. त्यावेळी बँकाही कर्ज देत नव्हत्या. आम्ही प्राध्यापक असल्यामुळे आम्हाला खावटी लोन म्हणून फक्त १५ हजार रुपये मिळायचे. बांधकामही आम्ही बाळासाहेबांना दिले. बांधकाम पूर्ण झाले; परंतु हिशोब करताना त्यांनी त्यांच्या पद्धतीने बरोबर पण आमच्या पद्धतीने चुकीचा हिशोब केला. आम्ही या रेटमध्ये बाजरी काच लावत असतो. तुम्हाला टोमॅटो काच लावली त्याचे पैसे एक्स्ट्रा. तुम्ही पॅरापीठ बांधले त्यांचे पैसे एक्स्ट्रा. तुळशी वृंदावन बांधले त्याचे पैसे एक्स्ट्रा. जिन्यावर टोपी बांधली त्याचे पैसे एक्स्ट्रा आणि जवळ जवळ ३० ते ४० हजार रुपये आमच्या बजेटपेक्षा जास्त काढले. आमचे बजेट बिघडले; पण पैशासाठी त्यांनी कधी त्रासही दिला नाही. पण माझ्या मनात ही खंत राहिली. आपण का बिल्डर होऊ नये व आपणही हे करू शकतो. त्याच्या मागची प्रेरणा म्हणजे बाळासाहेब पोकळे.

हरिश्चंद्र अण्णाच्या जागेचा विचार माझ्या मनात तसाच होता. कचरे मॅडमचे मिस्टर एकदा कॉलेजमध्ये आले त्यावेळी हर्षद मेहता प्रकरण घडले होते. बँका बुडत होत्या. ते म्हणाले की पैसे घरी ठेवले की चोरी होते व बँकेत ठेवले की बँका बुडतात. माझी ट्यूब

पेटली. मी कॉलेज सुटले की हरिश्चंद्र अण्णाला गाठले व त्यांना म्हटले की अण्णा माझ्याकडे एक उपाय आहे. तुम्हाला जागा विकायची नाही तर आपण भागिदारी करू कारण तुम्ही जागा विकली की हा त्या वेळी ग्रामीण भाग असल्यामुळे इज्जतीचा सवाल यायचा आणि तुम्हाला ८० हजाराची गरज आहे व त्याच्या ऐवजी मी तुम्हाला एक लाख डिपॉझिट देतो. तुमच्या जागेची किंमत ८० हजार पर गुंठा होती ती आपण एक लाख पकडू व तुमचे पाच लाख भांडवल. पैसे कितीही मिळोत.

तुम्हाला पाचचे दहा लाख देतो. त्यांना तयार केले. तेथून कचरे यांच्याकडे गेलो व त्यांना म्हटले की, तुमच्याकडे पाच लाख रुपये आहेत ते आपण बिल्डिंग कन्स्ट्रक्शनमध्ये टाकू. मी नवीन असल्यामुळे ते घाबरत होते. मी त्यांना सांगितले चेकवर सही तुमची कम्पलसरी ठेवा. हिशोबावर नियंत्रण ठेवा. पैसे कितीही कमी मिळाले तरी तुम्हाला मात्र पाचचे दहा लाख देऊ. ते तयार झाले. पण माझ्याकडे आता जागा होती. बँकेत पाच लाख रुपयेही मिळणार होते; पण माझ्याकडे मात्र एकही रुपया नव्हता. भागिदारी संस्था रजिस्टर करणे, बँकेत खाते उघडणे व जागेचे डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट व पावर ऑफ ॲटर्णी करणे यासाठी तीन चार हजार रुपये लागणार होते. पण माझेकडे तर ते नव्हते. या दोन्ही भागिदाराला मी पैसे मागू शकत नव्हतो. मग मी कॉलेजच्या क्लार्कच्या ओळखीच्या माणसाकडून पाच हजार रुपये पाच रुपये शेकडा प्रती महा या दराने घेतले व सर्व गोष्टी पूर्ण करून ५००० रुपये भांडवलात तेही व्याजाने मी बांधकाम व्यवसाय सुरू केला व तो यशस्वी करून दाखविला.

उधारी व विक्री कौशल्य यामुळे आमचे बिल्डिंगचे स्वप्न पूर्ण झाले व सगळ्यांना त्यांचे पैसे दिले व बिल्डिंगची सुरुवात झाली. त्या अगोदर नाथा ढेबे यांची जागा होती तीन गुंठे त्यावर मी विश्वकर्मा नावाने बिल्डिंग सुरू केली होती व ती सुद्धा त्याच वेळी पूर्ण केली. त्यावेळी तर १ लाखाला दोन रुमचा फ्लॅट व दीड लाखात तीन रुमचा फ्लॅट इतक्या स्वस्तात मी फ्लॅट विक्री केली. पैसे कितीही कमी मिळाले तरी चालतील; परंतु बांधकाम व्यवसाय उभा करायचा हेच स्वप्न मनात बाळगून मी हा व्यवसाय उभा केला. टॅक्स प्रॅक्टीसमुळे व्यवसायाच्या सर्व परवानग्याची माहिती होती. कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा याच्या जोरावर हा व्यवसाय सुरू केला.

मी गावाकडे वडजी या ठिकाणी लायब्ररी सुरू केली होती. पुण्यातही लायब्ररी सुरू करायची ठरविली. मी सिंहगड रोडला राहायला आलो त्यावेळी काका चव्हाण हॉटेलवर असायचे. त्यांची ओळख झाली. आम्ही नवज्योत मित्र मंडळाची स्थापना करून समाजसेवेला सुरुवात केली. त्याच वेळी त्रिमुर्ती हॉस्पिटलच्या भागाला क्रांतिनगर हे नाव त्या वेळचे आमदार व नंतरचे खासदार श्री. अशोक अण्णा मोहोळ यांच्या हस्ते दिले होते. लायब्ररी काढण्यासाठी मी जॉईंट डायरेक्टर ऑफिसला गेलो. लायब्ररीचे ऑफिसमध्ये परवानगीसाठी गेलो. तिथल्या साहेबांनी आमचा भाग ज्यांच्या अधिन येतो त्या रावळ साहेबांना भेटायला सांगितले. त्यांनी पहिल्यांदा एवढे प्रश्न विचारले व एवढ्या अडचणी सांगितल्या की, माझ्या जागेवर दुसरा कोणी असता तर त्याने कधीही लायब्ररी काढण्याचा विचारच केला नसता. पण मी पुरून उरलो व मनात परत जिद्द निर्माण झाली की, आता तर लायब्ररी सुरूच करायची. त्यावेळी तिथे आबा अवचट होते. मी त्यांना बिल्डिंगचा माझा बोलत बोलत इतिहास सांगितला. त्या वेळी त्यांनी मला दुसऱ्या दिवशी या असे सांगितले. त्यांच्या लोकांशी विचार विनिमय केला कारण आत्ताचा जो बंगलोर बायपास आहे त्या ठिकाणी त्याची वीस लोकांची एक एक गुंठा अशी २० गुंठे जागा होती व दुसऱ्या दिवशी मला ती जागा तुम्ही डेव्हलप करा. शिक्षक आहात, फसवणार नाहीत असा विश्वास दाखवला. आता २० गुंठे जागा मला एकट्यालाच डेव्हलप करण्याची संधी प्राप्त झाली होती. त्यांना प्रत्येक गुंठ्याला ४५० स्के. फिट बांधकाम द्यायचे तेही तिसऱ्या किंवा चौथ्या मजल्यावर व एक कुंभार सोडला तर १९ लोकांनी जागा डेव्हलपमेन्टला दिली व विश्वकर्मा डेव्हलपर्सची स्थापना झाली.

मी त्या जागेत ८० फ्लॅटच्या दोन बिल्डिंग बांधल्या. माझ्या जागेसाठी रस्ता सोडला होता. मागच्या बाजूला बाळासाहेब कापरे यांची जागा होती ती व बळीराम शेळके याची जागा त्यावरही मोठी चार बिल्डिंगची स्कीम झाली. जाधवर शेळके असोशिएट व नंतर कटारीया जाधवर असोसिएट, बालाजी असोसिएट, चंद्रमा रेसीडेन्सी अशा अनेक स्कीम जवळ जवळ २००० फ्लॅटच्या मी केल्या व बिल्डर म्हणूनही कोणाची तक्रार न येता नाव कमाविले. काका चव्हाण यांच्याबरोबर चंद्रमा रेसीडेन्सी ही १०० फ्लॅटची स्कीमही केली व

त्यात जेवढे पैसे मिळाले ते सर्व धायरेश्वर विद्या व क्रिडा प्रतिष्ठानच्या बिल्डिंग बांधण्यासाठी दिले. अण्णा जोशी व माटे सर यांच्याबरोबर ही एक स्कीम केली.

मला यात एकच वाईट अनुभव आला तो म्हणजे आडाणी असणारे सुद्धा पार्टनर माझ्यापेक्षा हुशार निघाले. बांधकाम करताना उधारी तुम्हीच आणा, कायदेशीर कामे तुम्हीच बघा, अडचणी तुम्हीच सोडवा व विकायचे कामही तुम्हीच करा. पण पैसे आले की पळत येऊन अडचणी सांगून पैसे काढून घ्यायचे. लोकांची शेवटची बुडणारी वसुलीही माझ्या हिस्स्यावर व भावनात्मकता माझ्याकडे जास्त असल्यामुळे अनेकांना पैसे सोडून दिले किंवा मागण्याअभावी बुडून गेले. पण हा व्यवसाय सुद्धा अनेक गरीब सामान्य लोकांना घरासाठी प्राधान्य देऊन मी केला. याचा मला आनंद वाटतो. नऱ्हेमध्ये आदित्य संस्कृती ही सुद्धा ११० फ्लॅटची स्कीम अत्यंत चांगली व गावात पहिली केली व तीही नामवंत आदित्य बिल्डर्स यांच्या बरोबर.

▸▸ ▸▸

# १२. शिक्षण संस्थेची सुरुवात

मी आप्पासाहेब जेधे कॉलेजमध्ये प्राध्यापकाचे काम करत होतो. मी गावाला हायस्कूल काढण्यात, चालविण्यात, गावात मंत्री आणण्यात, क्रांतिवीर संघटना चालवित असताना असे अनेक अनुभव घेतले होते. त्यामुळे माझी समाज व विद्यार्थ्यांविषयी वेगळीच तळमळ होती. मी अत्यंत प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांसाठी काम करत होतो. ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांविषयी खूप तळमळ होती. विद्यार्थ्यांच्या सुख दुःखात, आनंदात विचाराने मी सामील होत होतो. त्याच्याशी खूपच जवळचे संबंध ठेवत होतो व कडकही तेवढाच होतो. त्यामुळे विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून माझी ख्याती होती. व्यावसायिक व व्यापारी कायदे हा विषय शिकविताना अनेक ग्रामीण मुलांना मी तो विषय इंग्रजीत घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. अनेक विद्यार्थी त्यातून प्रेरणा घेऊन पुढे लॉ ला गेली. अनेक विद्यार्थी चांगले वकिल झाले व पुढे त्यातून अनेक जन न्यायाधिशही झाले. मी विद्यार्थ्यांसाठी भाई वैद्य, निलम गोऱ्हे, बाळासाहेब भारदे अशा सारख्या मोठ्या समाजसेवकास वर्गात बोलाविले. मला अनेक कार्यक्रम घेण्यावर महाविद्यालयाने सहकार्य केले नाही. मग मी विद्यार्थ्याची ''राष्ट्रीय एकात्मता विचार मंच'' ही संस्था काढली व सर्व व्यवहार व काम विद्यार्थ्यांचे दाखवून त्या संस्थेमार्फत अनेक कार्यक्रम करू लागलो. विद्यार्थी पुढे घालून त्यांच्या पाठीमागे राहून सर्व कामे करू लागलो. विद्यार्थ्यांना चांगल्या गोष्टी सांगणे, अनेक वेळा त्यांना प्रेरणा देणे व त्यामुळे मुलाचा चांगला एक गट तयार झाला. ही कामे चालू असताना अनेक प्राध्यापकांना हे सहन होत नव्हते. ते विरोध करायचे, समोर नाही पण सतत खुन्नसने वागायचे. तेवढा तेवढा मी अजूनच जोरात काम करायचो. एकदा आमचे इन्चार्ज प्रा. वाय. आर. थोरात होते. त्यांनी मला बोलावून घेतले व विचारले की तुमच्या खूप ओळखी आहेत. आपण आर्टस् व एम. कॉम्चा शासनाकडे प्रस्ताव केला होता तो नामंजूर होऊन आलेला आहे. त्याची प्रत माझ्या हातात ठेऊन जमेल का आणायला तुम्हाला ही परवानगी. तुमच्या फार ओळखी आहेत असं सांगत

असता. मी म्हणालो बघतो प्रयत्न करून आणि त्या परवानगीसाठी मी अनेक मार्गाने झटू लागलो, प्रयत्न करू लागलो. माझ्या चुलत भावाचा खवा ज्या पेणच्या हॉटेलला होता त्याच मतदार संघाचे आमदार शिक्षण मंत्री झालेले होते व ज्याच्या हॉटेलला हा खवा होता ते नगर अध्यक्ष होते. कोकणातून कनेक्शन काढले. त्यांना जाऊन भेटलो. तीन महिन्यांनी खेटे घालून परवानगी आली. मला अतिशय आनंद झाला; पण कोणीही त्याच्याबद्दल धन्यवाद मानले नाहीत.

परवानगीचे पत्र मिळण्याच्या अगोदर एक आठवडा फक्त प्राचार्य कांबळे प्राचार्य म्हणून आमच्या कॉलेजला रुजू झाले. मी ऑर्डर आणणार होतो त्यावेळी त्यांना विचारले की येता का मुंबईला. आपल्याला बी. ए. व एम. कॉम. चालू करण्याची ऑर्डर मिळणार आहे. प्राचार्य कांबळे, ओ. एस. सातव व मी आम्ही मुंबईला मंत्रालयात गेलो. श्री. जोशी अवर सचिव माझे मित्र होते. गेल्याबरोबर त्यांनी आम्हाला ऑर्डर दिली व आम्ही परत आलो. वास्तविक मागील सहा महिने मी प्रयत्न करून ती ऑर्डर मिळविली होती. शेवटच्या दिवशी प्राचार्य फक्त घेऊन येण्यावेळीच आले होते. कोणतीही प्रोसीजर त्यांनी केली नव्हती. सर्व प्रक्रिया ते महाविद्यालयात रुजू होण्याअगोदरच झाली होती. पुढे काही दिवसांनी महाविद्यालत बी. ए. व एम. कॉम. च्या उद्‍घाटनाचा कार्यक्रम झाला. मी प्रेक्षक म्हणून लोकांमध्ये खाली बसलो होतो. माझी एवढीच अपेक्षा होती की, एका प्राध्यापकाने याच्या मंजुरीला प्रयत्न केले एवढाच उल्लेख कार्यक्रमात झाला तरी आपण धन्य झालो. पूर्ण कार्यक्रम झाला, ना संस्थेने नाव घेतले ना प्राचार्यांनी. कार्यक्रम संपला, धन्यवादाचा चकार शब्दसुद्धा कोणाच्या तोंडातून आला नाही. मला फार वाईट वाटले. खऱ्याची दुनिया नाही. पण मी सगळ्या गोष्टी अपमानकारक झाल्या की त्या पॉझिटीव्ह घेतो. माझी जिद्द पुन्हा जागी झाली व आपण आता नवीन संस्थाच सुरू केली पाहिजे अशी मनात खुणगाठ बांधली.

मी कॉलेजमधून निघालो ते सरळ वडगाव (बु.) सरपंच बाबासाहेब दांगट पाटील यांच्याकडे आलो व त्यांना म्हणालो आपल्याला शाळा काढायची आहे. आम्हाला घरं बांधताना त्यांनी शिक्षक आहोत म्हणून फुकट फ्लॅनवर सह्या, शिक्के दिले होते. त्यामुळे माझ्या मनात त्यांच्याविषयी अत्यंत प्रेम होते व त्यांनाही माझ्या विषयी आदर होता. त्यांचा माझ्यावर विश्वास बसण्यामागे सुद्धा एक किस्सा होता. मी शिक्षण क्षेत्रात काम करतो म्हणून

त्यांना माझा खूप आदर होता. एकदा त्यांना ग्रामपंचायत फंडातून पुस्तके वाटायची होती. बजेटमधील काही हिस्सा पुस्तकावर खर्च करायचा होता. त्यांनी मला व काका चव्हाण यांना ग्रामपंचायतमध्ये बोलावले. मी त्यांना बुक बँकची कल्पना सांगितली व त्यांना म्हटले की, या वर्षी आपल्याकडे जेवढी पुस्तके आहेत ती देतानाच व्यवस्थित परत करायच्या बोलीवर द्यायची व पुढच्या वर्षी नवीन अधिक जुनी असे करत आपण चार वर्षात १००% मुलांना पुस्तके पुरवू शकतो. ती कल्पना त्यांना व सर्व ग्रामपंचायत सदस्यांना खूप आवडली. पण गावच्या मुख्याध्यापकाला ही कल्पना आवडली नाही. कारण पुस्तक खरेदी आमच्याकडे दिली होती व त्यात त्या मुख्याध्यापकाला काहीच फायदा होणार नव्हता व स्कीम मात्र त्याला राबवावी लागणार होती. काही दिवसांनी पुस्तके आल्यावर त्याने शक्कल लढविली. मी व काकांनी पुस्तके खरेदीत कमिशन खाल्ले असे सांगितले. पुस्तक खरेदी २०,००० रुपये व त्यावर कमिशन १०% त्याचे २००० आम्ही दोघांनी खाल्ले असे त्यांनी ग्रामपंचायतला सांगितले. ग्रामपंचायतमधून मला व काकांना बोलावणे आले व मिटींगला बोलावल्याचे सांगितले. आम्हाला कळले नाही; पण ग्रामपंचायत सदस्य तात्या दांगट होते. ते म्हणाले, जाधवर सर आमच्याकडे त्यांच्या टॅक्सच्या कामाचे पैसे दोन दोन वर्षे राहिले तरी मागत नाहीत आणि दोघांत २००० रुपये खाणार मला तर खरे वाटत नाही. आम्ही त्या मिटींगला पुस्तक विक्रेत्यालाही बोलाविले. त्याने २०,००० रु. ची पुस्तके व त्यावर २०% कमिशन दिले व त्याची ४००० रुपयांची वेगळी पुस्तके दिलेले बिल दाखविले व दोन्हीही बिले ग्रामपंचायतीला दिल्याच्या प्रती दाखविल्या व त्या त्यांनी ग्रामपंचायत रेकॉर्डलाही तपासून पाहिल्या व आमच्या विषयीचा विश्वास त्यांचा दृढ झालेला होता.

मी कॉलेजवरून कार्यक्रम संपवून सरपंचाकडे गेलो व त्यांना म्हणालो आपल्याला शाळा काढायची आहे. ते म्हणाले मला तर त्यातलं काहीच कळत नाही आणि कसं काय करणार. मी त्यांना म्हणालो, मी सर्व काही करतो तुम्ही काळजी करू नका. फक्त मदत करा. माझ्या कर्तृत्वावर व प्रामाणिकपणाबद्दल त्यांना विश्वास होता व त्यांनी कबुल केले व दुसऱ्याच दिवशी आम्ही आठवीचा वर्ग वडगावात सुरू करायचे ठरविले. त्या वेळी सातवीपर्यंत प्राथमिक जिल्हा परिषदेची शाळा फक्त होती. पुढच्या शिक्षणाकरीता मुलामुलींना पुण्यात शिकायला पाठविले जात नव्हते. अनेक मुलींच्या आठवीपुढील शिक्षण बंद झाले होते.

आमचा चुलत भाऊ धर्मा यालाही नोकरी नव्हती. त्याला घेऊन मी दुसऱ्या दिवशी सरपंचाकडून एक वर्ग प्राथमिक शाळेचा घेतला व हायस्कूल सुरू केले. पहिल्या वर्षी आम्हाला सात–आठच मुली बळजबरीने मिळाल्या व आम्ही कोणतीही परवानगी न घेता हायस्कूल चालू केले व आमच्या संस्थेची सुरुवात १९९५ साली झाली.

ही संस्था चालू करण्याअगोदरच आठ दहा दिवसापूर्वी एक घटना घडली होती. आमचा चुलत भाऊ हा बी. एड्. करून आलेला होता. बी. ए. बी.एड. तो इंग्रजी विषयाचा होता. आ. अशोक मोहोळ यांचे आणि माझे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. माझे चुलते नेहमी म्हणायचे आमच्या धर्माला काही करून नोकरी लावा. म्हणून मी अशोक मोहोळ यांचेकडे गेलो. त्यांच्या दोन संस्थेची मिळून त्यांच्याकडे ३०–४० हायस्कूल होती. त्यात कुठे तरी लावा म्हणून मी त्यांना विनंती केली; परंतु त्यांनी मला नोकरी शिल्लक नाही असे सांगितले व मला खूपच वाईट वाटले. तोही राग माझ्या मनात होता व हा जेधे कॉलेजमधील अपमानकारक कार्यक्रम यातून आमच्या चंद्रकांत यशवंत दांगट पाटील या पहिल्या संस्थेची स्थापना झाली.

दुसऱ्याच वर्षी ग्रामपंचायतची निवडणूक झाली. दुसऱ्या पार्टीचा सरपंच निवडून आला. आक्रुरशेठ कुदळे हे सरपंच झाले. त्यांनी ताबडतोब मला सांगितले. या वर्षी तुम्हाला आम्ही वर्ग खोल्या शाळेसाठी देणार नाही. तुमची खासगी शाळा आहे व त्याला शाळेच्या खोल्या मिळणार नाहीत. तुमची तुम्ही सोय करा. मी माजी सरपंच दांगट पाटील यांच्याकडे गेलो. त्यांना सर्व वृत्तांत सांगितला. त्यांनी सांगितले आपली शाळेजवळच जागा आहे. गोठा आहे. तिथे काही खोल्या आहेत व त्या भाड्याने दिलेल्या आहेत. त्या खोल्या आम्ही खाली करून घेतल्या; पण त्यातील एकजण पुस्तक विक्रेता काही लवकर निघत नव्हता. आम्ही त्याला खोली भाड्याने बघून दिली. त्याची सर्व पुस्तके वाहून त्याच्या खोलीवर दिली व ती सहा खोल्याची इमारत रिकामी करून घेतली. त्या जागेतच शेणाचा उकिरडा होता तो भरून काढला. तेथे बरेच मोडके सामान होते ते भरून काढले. कालांतराने त्याला दगडाचे कंपाऊंड केले. शाळा त्या ठिकाणी हलविली व जीवात जीव आला.

आमची शाळा बिना परवानगीची होती. ती मिळविण्यासाठी अनेक वेळा काका, नाना व मी मुंबई या ठिकाणी गेलो. मंत्री थोपटे साहेब किंवा आमदार रामभाऊ मोझे यांच्याकडे

कितीतरी चकरा मारल्या; परंतु एकही परवानगी आम्हाला कॉंग्रेसच्या काळात मिळाली नाही. पुढे सत्ता बदलली. शिवसेना – भाजप युती सत्तेवर आली. माझा परिचय पुणे जिल्ह्याचे शिवसेना अध्यक्ष व तरुण व तडफदार नेते मा. श्री. नानासाहेब बलकवडे यांच्याशी झाला व पुढे माझे ते मित्रही झाले. मी त्यांना विनंती केली व त्यांनी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

मी वेगवेगळ्या पद्धतीने शाळेच्या परवानग्या मिळविण्याचे प्रयत्न करत होतो. मला एक मार्ग सापडला. त्यावेळी शशिकांत सुतार हे मंत्री होते व त्यांच्या भावाला खाडे अण्णा जे वडगावातच राहात होते त्यांची मुलगी दिलेली होती. मी त्यांच्याकडे गेलो आणि जनार्दन खाडे तुमचा मुलगा यांना आम्ही मंडळात घेतो असे सांगितले व शशिकांत सुतार साहेबांकडे चला व शाळेला परवानगी मिळण्यासाठी प्रयत्न करा अशी विनंती केली. त्यांनी त्या वेळीच मान्य केले व खाडे अण्णा व मी स्वतः मुंबईला शशिकांत सुतार यांच्याकडे त्यांच्या बंगल्यावर गेलो. त्या वेळी ते पुण्याचे पालकमंत्री होते व सुधीर भाऊ जोशी हे शिक्षण मंत्री होते. अण्णांनी आम्ही  का आलो आहोत हे सुतार साहेबांना सांगितले व त्यांनी तर बॉम्बच टाकला. त्यांनी सांगितले यादी केव्हाच तयार झाली आहे. तुम्ही उशीर केला. मला खूप वाईट वाटले; पण मी अण्णाला प्रेशर केले की आपण शिक्षण मंत्र्याला सांगितले तर नक्की मिळेल असं म्हणा. खाडे अण्णा म्हणाले, तुम्ही प्रयत्न करा शिक्षण मंत्र्यांना बोला. त्यावेळी सुतार भाऊ म्हणाले की ते शिवसेनेचे जेष्ठ नेते आहेत. आपण असं करू त्यांना फोन करण्याऐवजी आपणच त्यांच्या 'रॉयल स्टोन' बंगल्यावर जाऊ व त्यांच्या मंत्र्याच्या लाल दिव्याच्या गाडीत बसवून आम्हाला घेऊन गेले. तिथे गेल्यावर त्यांनीही तसचं सांगितलं उशीर झाला. पण सुतार भाऊ म्हणाले माझे हे सासरे आहेत त्यामुळे भाऊ काही तरी बघा. त्यावेळी मंत्र्यांनी स्वतःच्या हातानी त्या यादीवर हस्ताक्षरात मराठी माध्यम व इंग्रजी माध्यम प्राथमिक अशी नावे लिहिली व आम्हाला काही दिवसातच या परवानग्या मिळाल्या. मी प्रयत्न केला; पण खरं श्रेय खाडे अण्णा यांचे आहे हे मी प्रामाणिकपणे कबुल व मान्य करतो. या परवानग्या मिळाल्या आमच्या शाळा सुरू झाल्या पण हास्यकूल अगोदर सुरू होऊनही अद्याप आम्हाला परवानगी नव्हती. मी नाना बलकवडे यांना वारंवार आठवण करून देत होतो. एकदा त्यांनी मला मुंबईला जाताना बरोबर नेले व सुधीर भाऊ जोशी यांची भेट घालून दिली. त्यांचे जावई शिरीष फडतरे यांची भेट घालून दिली व मला परवानगीस मदत करावयास

लावले व त्यांनी मला एकदाच वडगावच्या संस्थेला एक हायस्कूल इंग्रजी व एक हायस्कूल मराठी धायरीची एक कन्या शाळा व एक प्राथमिक शाळा आमच्या नांदुर जि. बीड साठी एक हायस्कूल अशा सहा शाळा दिल्या व आमच्या संस्थेची वाढ एकदम मोठ्या प्रमाणावर झाली. याचे सर्व श्रेय हे श्रीयुत नाना बलकवडे व शिरीष फडतरे यांना आहे.

पुढे लोकसभेची निवडणूक लागली. नाना बलकवडे व अशोक मोहोळ यांना दोघांनाही लोकसभेचे तिकीट मिळाले. दोघेही माझे मित्र होते. पण नाना बलकवडेनी मला शाळा मिळवून दिल्यामुळे त्यांचे ऋण माझ्यावर जास्त होते. पूर्वी देखील काका, नाना व मी दोन तीन वर्षे मा. अशोक मोहोळ यांचे मागे फिरत होतो पण एकही परवानगी आम्हाला त्यांच्यामुळे मिळाली नव्हती. त्यामुळे नाना बलकवडेंनी मला एक काम सांगितले मतदानासाठी लागणाऱ्या लोकांच्या नावाच्या चिठ्ठ्या तयार करून द्या. सर्व स्टाफ कामाला लाऊन त्या चिठ्ठ्या आम्ही त्यांना मतदान काळात पुरविल्या पण ते काम करताना काका आणि नाना यांना मी सांगितले होते. कारण ते काम विरोधी पक्षाचं होते. काही दिवस तर नाना बलकवडे यांनी मला बळचं प्रचाराला नेले व भाषणेही करायला लावली. ही गोष्ट अशोक अण्णा मोहोळ यांना समजल्यावर त्यांनी मला बोलायचे बंद केले व नंतर त्यांच्यात व माझ्यात कायमची दुरी आली. इतका चांगला मित्र मी माझ्या आयुष्यात गमावला होता माझी काही चूक नव्हती पण संस्थेसाठी मला ही कुरबानी द्यावी लागली. अशा कितीतरी कुरबान्या मी आयुष्यभर वेगवेगळ्या संस्थेच्या कामासाठी देत आलो. पण आनंद एकच होता की संस्था उभी राहात आहे. पुढे माझ्याकडे पैसा होता, बुद्धी होती, भाषण कला होती. पुढाऱ्याला शोभेल असे व्यक्तिमत्त्व होते; पण त्या सर्वांचा त्याग करून संस्था तयार करण्यासाठी मी राजकारणाचा त्याग केला व आपले मित्र राजकारण करत आहेत. त्यांना विरोध नको म्हणून फार मोठी कुरबानी द्यावी लागली. पुढे संस्था वाढत गेली. दांगट पाटील संस्थेत कॉलेज आले. मी स्वतः अनुदानित कॉलेजची नोकरी सोडून विनाअनुदानित कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून आलो. लाखो रुपयाचे आर्थिक नुकसान झाले. त्याची कधी तमा बाळगली नाही व फार मोठ्या त्यागातून संस्थेची उभारणी करावी लागली. दांगट कुटुंबियांनी त्यांची जागा दिली. सर्व जागा १८–२० एकर असेल. त्यांनी ती सुरुवातीला लिहून दिली. त्यांनी केलेल्या या दानामुळे संस्था मोठी होऊ शकली. पुढे सर्वांनी जागा दिल्यावर संस्था त्या ठिकाणी डोंगरावर नेली.

माझ्या बिल्डिंगच्या साईटवरून त्याकाळात ७ लाख रुपयाचे साहित्य नेऊन मी ती शाळा बांधली. मागचीही शाळा पुढे काही दिवसांनी बांधली. त्यात काकांनी दिलेले एक लाखही आम्ही धायरीची शाळा बांधताना परत दिले. ॲड. जगताप यांचे पन्नास हजार विकास पाटील यांचे खडी, डस्ट व मजुरी मिळून फक्त ३ लाख ५० हजार व बाकी सर्व निधी मी उधारी व इकडे तिकडे करून पूर्ण शाळा बांधली. शाळा जोपर्यंत छोटी होती एकट्याने पूर्णपणे सांभाळली. कोणतीच तक्रार येऊ दिली नाही. पण त्याला राजकारणाचे ग्रहण लागलं व विकास पाटील व आ. रमेश वांजळे यांच्या निवडणूकीपासून आमच्या संस्थेला ग्रहण लागले व मी त्यांचा प्रचार केला असे समजून सरपंच व त्यांच्या सर्व घरच्यांचे गैरसमज झाले व माझ्या त्यागाची ऐसी तैसी झाली. वास्तविक मी जर त्या काळात स्वतःची ७ लाख रुपयांची जागा घेतली असती तर ७० गुंठे जागा आली असती व माझा स्वतःचा कॅम्पस उभा झाला असता. पण मी कधीच विचार केला नाही. दांगट फॅमिलीही मनाने चांगली आहे. गैरसमज निघून जातील व सर्व योग्य होईल असे समजून मी काम करत राहिलो आणि खरचं मी शपथपूर्वक सांगतो मी विकास पाटील व रमेश वांजळे यांचा कोणाचाच प्रचार केला नाही व त्या दिवसापासून सर्व राजकारणच बंद करून टाकले परंतु त्या त्यागाचा काहीच फायदा झाला नाही. आता संस्थेला २५ वर्षे होत आहेत. वडगाव व धायरीची संस्था मी स्वतः रजिस्टर केली त्यावेळी मी माझ्या घरची निम्मी लोक टाकू शकलो असतो पण ते मी केले नाही.

कमी शिकलेली लोक स्वार्थामध्ये माझ्यापेक्षा हुशार व शाहणी निघाली व मी माझे एकट्याचेच नाव संस्थेत सचिव म्हणून टाकले. माझा दोन्ही संस्थेतील लोकांना विश्वास होता. पण तो दिर्घकाळ टिकला नाही. तरी आता दोन्ही ही संस्थेला जवळ जवळ २५ वर्षे होत आली आहेत. पण चुकलेच हे मात्र मान्य करायला पाहिजे.

धायरी या ठिकाणी दुसरी संस्था काकाबरोबर तयार करावी अशी माझी मनोमन इच्छा होती. आमच्या चुलत भावाचा मला खूप अनुभव होता. किसन जाधवर हे माझे भावकीतले. त्यांनी पाथरुड ता. भूम या ठिकाणी पन्नास वर्षापूर्वी शाळा काढली होती. त्याच्या बऱ्याच शाखा झाल्या. भूम या ठिकाणी वरिष्ठ महाविद्यालय झाले. 'परांडा' या ठिकाणीही शाळा झाली. आता संस्था नावारुपाला आली होती. मग संस्थेतील लोक जागे झाले व त्यांनाच

काढून टाकले. हे मला माहित होते पण दांगट पाटलांची माणसे तशी नाहीत व काका चव्हाणांची लोकही तशी नाहीत असा माझा विश्वास होता. त्यामुळे मी संस्था स्वतः स्थापन केली. स्वतः संस्था रजिस्टर केल्या. मी त्यावेळी माझ्या घरातली अर्धी लोकं टाकू शकलो असतो; पण या दोन्ही कुटुंबावर प्रचंड विश्वास होता व मनापासून दोन्ही कुटुंबावर मी प्रेम करत होतो. त्यामुळे दोन्ही संस्थेस मी सेक्रेटरी झालो व त्या दोघांनीही आमच्या घरातला माणूस घेण्याबद्दल कधीच आग्रही केला नाही. असो, माझ्या मनात सतत किसन जाधवर यांचा अनुभव यायचा; पण संस्था उभी केली पाहिजे. एका संस्थेत अडचण निर्माण झाली तर दुसऱ्या संस्थेत स्थिर वाटावे म्हणून मी काकांना व नंदुशेठ यांना विनंती करून धारेश्वर विद्या व क्रिडा प्रतिष्ठान ही संस्था दांगट पाटीलच्या काही दिवसातच सुरू करावयास भाग पाडले. तिथल्या सुद्धा सर्व परवानग्यासाठी दिवस रात्र एक केले. काकांनी दोन परवानग्या सोडल्या तर एकही परवानगी आणली नसावी. कन्या शाळा सुरू झाल्यापासून सर्व शाखांचा विस्तार होईपर्यंत भरतीपासून ते सर्व कामे केली. काका राजकारणात असल्यामुळे व पहिल्यांदा ते नगरसेवक या पदासाठी निवडून आले. त्या पाच वर्षांच्या काळात शाळांच्या व संस्थेच्या प्राथमिक अवस्थेमध्ये काकांनी १०% फक्त वेळ दिला असेल. संस्थेची चांगली इमारत झाली पाहिजे म्हणून प्रयत्न केला. एम.बी.ए. ला त्यावेळी चांगली मागणी होती. आम्ही एम.बी.ए. काढायचे ठरविले. सुंदर इमारतीचे डिझाईन केले. काकांनी रात्रंदिवस उभे राहून पुढच्या काळात इमारत पूर्ण केली. माझी परिस्थिती त्या काळात फार बरी नव्हती तरी सुद्धा इकडून तिकडून करून मी धायरीची शाळेची इमारत बांधण्यासाठी एक कोटी नऊ लाख रुपये दिले व कदाचित त्या रकमेवर तेवढेच व्याजही भरले असेल. पण इमारत सुंदर झाली. संस्था छान झाली.

त्या काळात आ. रमेश वांजळे व माझी मैत्री झाली होती. एका खमक्या माणसाबरोबर संस्था काढली पाहिजे म्हणून रमेश वांजळे यांचेबरोबर सुद्धा मी जय गणेश एज्युकेशन फौंडेशन ही संस्था सुरू केली. त्यातही सर्व कामे मी स्वतःच करत होतो. वांजळेंना वेळ नसायचा; पण त्या संस्थेचेही बी.एड्., डी.एड्. इंग्रजी माध्यम शाळा दोन अशा काढल्या. पण पुढे त्यांचे अल्पवयात निधन झाल्यामुळे त्या संस्थेचीही वाढ बंद झाली.

पण आ. रमेश वांजळे मात्र मला नेहमी प्रोत्साहन देत असत. नवले सरांएवढी संस्था

करा. विद्यापीठ काढा. मोठी संस्था करा म्हणून नेहमी प्रोत्साहन देत असत. त्यांच्या गावालाही त्यासाठी आम्ही जमीन घेण्यास सुरुवात केली होती; परंतु २५ एकर जमिन खरेदी झाली आणि पुढे आमदारकीचे इलेक्शन लागले. पुढे सत्कार समारंभ व लगेच निधन यामुळे ते स्वप्न साकार झाले नाही याची खंत माझ्या मनात नेहमीच राहिल.

आमची चंद्रकांत दांगट पाटील लायब्ररी ही अत्यंत चांगली चालू होती. नंदूशेठ यांनी त्यांची जागा आम्हाला मोफत दिली होती व आता नवीन जागा आम्ही पहात होतो. त्या आधी महाराष्ट्रात सर्वात अगोदर खासगी लायब्ररीने कॅलेंडर काढले. महाराष्ट्रभर वाटले, तसेच पहिल्यांदाच खासगी लायब्ररीने महाराष्ट्र पातळीवरचे तीन दिवसाचे शिबीर घेतले. महाराष्ट्राच्या डायरेक्टरसहित अनेक दिग्गज लोक त्या ठिकाणी आले.

सरपंच दांगट पाटलांनी लायब्ररीला सुरुवातील पुस्तके घेण्यासाठी मदत केल्यामुले आम्ही त्यांना अध्यक्ष केले होते. काका कार्याध्यक्ष होते. आम्ही श्री. पोकळे पाटील यांच्याकडून जागा घेण्याचे ठरविले. दादा पोकळे यांच्याकडून त्यासाठी दोन, चार रुमचे फ्लॅट व २००० स्के. फुटचा टेरेस त्याचे खरेदी खत होते. काकांना वाटले की, जागा संस्थेच्या नावावर करायची आहे. त्यामुळे सह्याला कोणीही गेले तरी चालते. कारण जागा तर संस्थेच्या नावावर होते. म्हणून ते म्हणाले की आपणच जाऊन खरेदीखतावर सह्या करू. कोणाचाही उद्देश सरपंचांना टाळण्याचा नव्हता; परंतु त्यांचा गैरसमज झाला व तुम्ही मुद्दाम जाणिवपूर्वक मला सहीला बोलविले नाही असे त्यांना वाटले व पुन्हा चांगल्या नात्यात अडचण आली जणू काय दुधात खडा पडला. आम्ही त्यांना विनंती करून समजावून सांगितले. पुन्हा त्यांचा काही प्रमाणात गैरसमज दूर झाल्यासारखे वाटले. आता कर्ज फिटले आहे. वाचनालय जिल्ह्याचे प्रमुख अ दर्जाचे वाचनालय आहे. त्याद्वारे अनेक उपक्रम राबविले जातात. जवळ जवळ ८० विद्यार्थी वाचनालयात येऊन एम.पी.एस.सी. व इतर तत्सम परीक्षांचा अभ्यास करतात.

मध्येच मी व मुळीक यांनी धनकवडी या ठिकाणी एक संस्था निनाई देवी ही विकत घेतली. पहिली ते दहावी पर्यंत शाळा व इमारत होती. आम्हाला फक्त ती त्यावेळी ६० लाख रुपयाला मिळाली. नंतर मुळीक व आमचे जमेना. मग मी ती शाळा दीड कोटी रुपयाला ठरवून विकत घेतली. नंतर ती संस्था जवळ जवळ तीनचार वर्षे चालवली; पण नंतर थोड्या शाळेसाठी तिकडे वेळ वाया जाऊ लागला व इकडे पारी रोडला नवीन मोठे कॅम्पस

काढण्यासाठी मी शाळा व संस्था पन्नास लाख रुपये कमी घेऊन फुलचंद चाटे सरांना विकली. त्यांनी दोन वर्षे पैसे हळू हळू दिले. पण जवळचे असल्यामुळे मी ती संस्था त्यांना देऊन टाकली. त्यांच्या माध्यमातूनच मग सुनील जायभाय व सरसेकर यांची वाढदिवसाला भेट झाली व सरसेकरांनी नवीन पारी रोडचा कॅम्पस बांधला व सुनील जायभायमुळे प्रेरणा प्रतिष्ठानची संस्था विकत घेता आली. चाटे सर चांगले मित्र आहेत. कष्टाळू आहेत व सातत्याने प्रगतीची पावले टाकतात.

मी नऱ्हे येथे तात्या दांगट यांची जागा घेतली होती. जॉईंट व्हेनचरमध्ये जागा होती. तिथली जागा आमचे जमले नाही म्हणून माझ्या पैशापुरती वाटून घेतली होती. त्या तीन एकर जागेत मला स्कीम करायची होती म्हणून मी चांगला बिल्डर शोधत होतो. मालकाच्या आडमुठ्या धोरणामुळे आमचे चार वर्षे प्लॅन पास केल्यापासून गेले होते. ८० आयबीचा फायदा घेण्यासाठी फक्त एका वर्षात इमारत बांधून कम्प्लीशन घेणे आवश्यक होते म्हणून मी मोठा बिल्डर पहात होतो. कोणीतरी मला आदित्य बिल्डरचे नाव सांगितले. त्यांची माझी भेट झाली. मला ते योग्य वाटले व मी त्यांच्याबरोबर नऱ्हे येथील प्रोजेक्ट आदित्य संस्कृती या नावाने केला. त्या ठिकाणी आमची ॲमिनीटी स्पेस शिल्लक होती. मी त्या काळात एम.बी.ए.ला महत्त्व आहे, आपण चालू करू म्हणून सांगितले. ते तयार झाले व आम्ही आदित्य एज्यूकेशनल फाऊंडेशनची स्थापना केली. सुंदर इमारत बांधली. एम.बी.ए. चालू केले; पण दुर्दैव म्हणजे आम्ही एम.बी.ए. चालू केले व त्याच वर्षांपासून एम.बी.ए. ला स्लॅक सुरू झाले. आम्ही आमचीच जागा व सामाईकातील ३.५० कोटी रुपये फक्त खर्च केले होते. नंतर आमच्याकडे कुलकर्णी नावाचा डायरेक्टर होता त्याने आमच्यामध्ये दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मला आठवते की, एम.बी.ए. कॉलेज व माझ्या राहत्या घरामध्ये फक्त एकच कंपाऊंड वॉल होती, तरी मी किमान दोन वर्षे त्या इमारतीत पाऊल ठेवला नाही. त्यांनी मुलगी आणून ठेवणे. तिला बघायला लावणे, तिच्या कडक स्वभावामुळे चांगले शिक्षक सोडून जाणे व शेवटी एम.बी.ए.ची खराब अवस्था झाली. मी एकदा म्हणालो की शेठ तुम्ही तरी हे घ्या नाही तर मला तरी देऊन टाका. आपण किंमत ठरवू. त्यांनी मला सांगितले की माझी तुमच्या शेजारची पिरंगुटची जागा डेव्हलपमेन्टला घ्या व त्यातून पैसे घ्या. अगोदर त्यांनी हो म्हणून सांगितले. किंमत ठरवून घेतली व नंतर जागा नको, एक वर्षात पैसे

द्या असे सांगितले. मी अडचणीत आलो. कारण त्या इमारतीची व जागेची किंमत बाजार मूल्यानुसार १० कोटी होती व त्याच्या प्रमाणात मला पैसे द्या असे सांगितले. ही किंमत फारच जास्त होती कारण आम्ही फक्त ३.५० कोटी गुंतविले व त्याची किंमत त्याचा हिस्साच मला ५.५० कोटी द्यावा लागला. पण मी तो व्यवहार पूर्ण केला. फार अडचण व फजिती झाली. आता या संस्थेचे एम.बी.ए. आहे. शेजारी इंग्रजी मिडीयम व सीबीएसई शाळा आहे. ज्यु. कॉलेज अत्यंत चांगले चालू आहे.

मी चंद्रकांत यशवंत दांगट पाटील संस्थेच्या बरोबरच कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर फौंडेशनची स्थापना केली होती. १९९५ ला ज्या वेळी माझा मुलगा शार्दुलचा जन्म झाला तेव्हाच संस्थेची स्थापना केली होती. पण २०१४ पर्यंत म्हणजेच जवळपास १९–२० वर्षे त्या संस्थेत काहीच कामकाज केलेले नव्हते. उद्देश हाच होता की काका, नाना व रमेश वांजळे यांच्याबरोबर मोठ मोठ्या शिक्षण संस्था निर्माण करायच्या व आपले व्यक्तिगत काहीच करायचे नाही. या घराण्याचे व माझं कधीही खटकणार नाही हा दृढ विश्वास मनात होता. त्यामुळे तब्बल २० वर्षे मी सर्व माहिती असून व त्या सर्व संस्था सुरू करण्यात माझा सिंहाचा वाटा असून मी स्वतःची संस्था असून एकही शाळा चालू केली नव्हती. कदाचित मी या संस्थामध्ये जे पैसे टाकले तेवढ्या पैशात आरामशीर चार पाच एकर जागेत माझे स्वतःचे संकुल उभे करू शकलो असतो; पण तसे केले नाही. कारण या तिन्ही संस्था त्या तिघाबरोबर फार मोठ्या करायच्या हे स्वप्न मी पहात होतो.

आमच्या सी. वाय. दांगट पाटील संस्थेचे बांधकाम आम्ही दांगट पाटलांनी दान दिलेल्या जागेत डोंगरावर केले होते. रस्ताही पाटलांनीच केला होता; परंतु तो कच्चा रस्ता होता. मुलांचे पावसाळ्यात फार हाल होत होते. तिथे चिखल तयार होत होता व मुलांचे शुज व सॉक्ससहीत पाय चिखलात बुडत होते. त्या वेळी हरिश्चंद्र अण्णा दांगट माझे मित्र व पार्टनर हे या भागाचे पहिले नगरसेवक झाले होते. मी त्यांना म्हटलं अण्णा आमच्या विद्यार्थ्यांचे शाळेवर जाण्यास फार हाल होतात. जरा रस्त्याचे काम करता येईल का बघा. त्यावेळी त्यांनी शिवसेनेच्या आमदाराचे फंड आणला व रस्ता करून दिला. पुढच्या वर्षात जेव्हा ते आमदार पुण्यात आले त्यावेळी त्यांनी कुठे रस्ता केला असे विचारले. त्यावेळी अण्णा म्हणाले की आपण पाहून येऊ. मला त्यांचा फोन आला की ज्यांनी आपल्या रस्त्यासाठी फंड दिला ते

आमदार आपल्या शाळेला भेट देणार आहेत. आम्ही एक तासात येत आहोत. मी तातडीने शाल व श्रीफळ आणले. मुले एकत्रित केली. त्यांचा सत्कार केला. असा एक छोटा कार्यक्रम केला. ती बातमी विकास पाटील यांचे वडिल पंढरीनाथ पाटील यांना समजली व पुढे काही दिवसांनी ते ज्यावेळी शाळेच्या बाजूच्या शेतावर आले त्यावेळी मला बोलावून घेतले व कार्यक्रमाविषयी चर्चा केली. त्यावेळी मला त्यांनी अप्रत्यक्ष सल्ला असा दिला की, विरोधी पार्टीचे किंवा हरिश्चंद्र अण्णा हेही त्यांच्या विरोधी पार्टीचे होते. अशा पाहुण्याला बोलावत जाऊ नका. त्या वेळेपासून पाहुणे बोलावताना अडचणी येऊ लागल्या. माझे मत असे होते की शाळा व शिक्षण संस्था ह्या राजकारणापासून अलिप्त ठेवल्या पाहिजेत व जो शाळेला मदत करेल अशी व्यक्ती व ज्ञानवान लोकही शाळेत बोलावली पाहिजेत. शाळा काही एका पक्षाची नसते. त्यात असणारे विद्यार्थी व पालक हे वेगवेगळ्या पक्षाचे असतात. मला तर अनेक कार्यक्रम करायचे होते. अनेक लोकांना आणून शाळेचा लौकिक व विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढवावयाचे होते. काकांबरोबर असलेल्या शाळेतही तोच प्रश्न येणार असे वाटले. कारण काका डायरेक्ट एक पक्षाचे पदाधिकारी होते. त्या दरम्यान माझे वडिल वारले होते. त्या वेळेला दांगट पाटीलच्या शाखा जास्त होत्या. काका सुद्धा म्हणाले होते की एखाद्या शाळेला तुमच्या वडिलांचे नाव द्यायला पाहिजे. पण पुढे तो विषय कोणीच काढला नाही. मी मात्र धायरीच्या शाळेत काकांच्या आई–वडिलांची नावे शाळा सुरू करतानाच टाकली होती. दांगट पाटील शिक्षण संस्थेत तर नावच चंद्रकांत दांगट पाटील दिले होते. शाळेच्या सर्व शाखांना नाव दिली होती. पण मी सर्व कष्ट करून माझ्या वडिलांच्या नावे कोणीही एखाद्या विभागाला द्या असे कोणीही म्हटलं नाही, ही एक खंत मनात होती.

२०१० साली आमदारकीची निवडणूक लागली. माझे सुदैव हे की माझ्या संस्थेचा एक अध्यक्ष नक्की आमदार होणार व आपल्याला संस्था वाढवता येणार व दुसरे दुर्दैव हे की संस्थेचा एक अध्यक्ष किंवा कार्याध्यक्ष पडणार व त्याचा आपल्याला त्रास होणार कारण विकास दांगट पाटील व रमेश वांजळे यांना एकमेकांच्या विरोधात आमदारकीसाठी मिळालेली तिकीटे. मी दोघांना एकदा म्हणालो होतो की माझी तर पंचायत होणार कोणाचा प्रचार करावयाचा म्हणून मी कोणाचाही प्रचार करणार नाही किंवा माझ्या घरातलेही कोणाचाही प्रचार करणार नाहीत. मी एक पुष्प गुच्छ व एक हातरुमाल आणेन. जो माझा मित्र निवडून

येईल त्याला गुच्छ देणार व जो पडेल त्याला अश्रू पुसण्यासाठी हातरुमाल. मी खरोखरच कुणाचाही प्रचार केला नाही. उलट विकास पाटलाच्या प्रचार ऑफिसमध्ये दोन तीन वेळा गेलो. कोणी काहीच काम विचारुन सुद्धा सांगितले नाही. रवी चरवड त्या वेळी मला विकास पाटलाच्या ऑफिसला भेटले होते. मला वांजळेंनी सांगितले, तुम्ही आमचा कुणाचाही प्रचार करणार नाहीत. पण कोणाकडेच तुम्ही जाऊ सुद्धा नका मी हो म्हणून सांगितले. पुढे निकाल लागला. वांजळे निवडून आले. त्यानंतर मी एकदा गावी गेलो होतो. बाबासाहेब दांगट पाटील सरपंच यांचा फोन आला. कुठे आहात मी म्हटलं मी गावी दिवाळीत आलो आहे. त्यावर त्यांनी सुरू केले तुम्ही आणि वांजळेंनी जमिनीच्या धंद्यात बरेच पैसे कमावले व ते पैसे आमच्या विरोधात निवडणूकीला वापरले. मी म्हटलं उलट त्या काळात एकही जागा मी त्यांना विकू दिली नाही आणि आम्ही कमावलेल्या पैशातून त्यांच्या हिश्याचे त्यांच्या निवडणूकीत पैसे खर्च केले तर माझा काय दोष आहे. मी काही माझे पैसे थोडेच त्यांना दिले व ते पुढे एकमेकांच्या विरोधात उभे राहतील हे मला काय माहित होते. पण त्यांनी काही समजून घेतले नाही, उलट मला त्यांनी सांगितले आल्यावर भेटा. तोपर्यंत मला काहीच माहित नव्हते.

मी ज्यावेळी पुण्यात आलो व माझ्या सर्व्हिस बुकवर सह्या करण्यासाठी सरपंचाकडे गेलो त्या वेळी त्यांचे मोठे बंधू पंढरीनाथ पाटील तिथे होते. त्यांनी सह्या तर केल्या नाहीतच पण अद्यापपर्यंत माझ्या कोणत्याही कागदावर सही केली नाही. पंढरीनाथ पाटील यांना भाऊ म्हणतात त्यांनी उलट मला दम दिला, जिवे मारण्याची धमकी दिली. त्या वेळेस स्वतः सरपंच हजर होते. मी त्यांना विनंतीपूर्वक सांगितले की मी खरचं कोणाचाही प्रचार केला नाही. एक माणूस माझ्यापुढे उभा करा की जो सांगेन की सरांनी आम्हाला अमक्याला मतदान करावयास सांगितले. मग ऐकत नाहीत म्हटल्यावर मी ही तिथेच बसलो व त्यांना म्हणालो की आता हातपाय तोडल्याशिवाय मी जातच नाही. बरीच चर्चा झाली. सरपंच मला म्हणाले तुम्ही आता जावा. मग मी तिथून निघालो. अतिशय वाईट वाटले की इतके प्रामाणिकपणे मी संस्थेचे काम केले. संस्था निर्माण केली, अहोरात्र कष्ट केले पण शेवटी शंकेचेच फळ मिळाले व त्या दिवसापासून माझ्याकडे त्या कुटुंबाचा बघण्याचा रोखच बिघडला. विकास नाना बाहेर गावी होते. मी त्यांना फोनवर हा सर्व वृत्तांत सांगितला. उलट तेच माझ्यावर खवळले.

कशाला तुम्ही घरी गेलात असे म्हणू लागले व मलाच तुमच्याकडे पिस्तुल आहे व मला तुम्ही जीवे मारण्याची धमकी दिली. अशी तुमच्यावर मीच केस दाखल करतो असे म्हणाले. मला अतिशय वाईट वाटले. इतके दिवस एवढे काम करून त्याचे फळ हे मिळावे. आजही नानाचे ते शब्द मी तसेच टेप करून जपून ठेवले आहेत. त्याच्याच दरम्यान सरपंच व विकास पाटलांनी माझा राजीनामा मागितला. हे प्रकरण शांत होईल असे वाटले नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी मा. शरद पवार यांचे सहित सर्वांना पत्रे पाठविली. एस. पी. पुणे, डी. वाय. एस. पी. व आमच्या हवेली पोलिस स्टेशनला तक्रार दिली व त्यात म्हटले की माझ्या किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीस काहीही झाले तरी त्याची संपूर्ण जबाबदारी विकास दांगट पाटील व यांच्या घरच्याची राहिल. आता तर राहिले सुईले संबंधही खराब झाले.

मी विद्यापीठाच्या डीनच्या निवडणूकीला उभा राहिलो होतो. निवडणूकीचा अर्ज भरावयाचा होता. मी सरपंचाला विचारले त्यांनी सही करण्यास नकार दिला. मी सचिव असल्यामुळे मला वरीष्ठ पदाधिकारी अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा कार्याध्यक्षाची सही लागते. नानांना मी फॉर्म दिला. त्यांनी फॉर्महही दिला नाही व सहीही दिली नाही. दोन्ही निवडणूकीत मला एकही सही दिली नाही. पण माझ्याकडून मात्र त्यांच्या प्रचाराची अपेक्षा केली. शेवटी दोन्ही तिन्ही निवडणूकीत व मला लागेल त्या वेळेला काकांनी उपाध्यक्ष म्हणून सह्या केल्या व मी डीनही झालो व व्यवस्थापन परिषदेचा सदस्यही झालो. एवढ्या मोठ्या प्रेस्टीजीयज निवडणूकीत फक्त सहीही केली नाही सहकार्य तर सोडाच.

मग मी काका आणि नंदुशेठ यांना भेटलो व झालेला प्रकार सांगितला. मी प्राचार्य म्हणून सी. वाय. डी. पी. या संस्थेत आलो होतो. मी काकांना म्हणालो की काका आता पुढच्या वर्षी मला एम.बी.ए. चे डायरेक्टर व्हायचे आहे. मला त्या संस्थेत आता राहावत नाही व धारेश्वर या संस्थेत आमच्या घरचे आता निम्मे सभासद घ्या. काका व नंदुशेठ दोघेही हो म्हणाले. पण पुढे काकांनी नावे देऊनही टाळाटाळ केली व आपला शब्द पाळला नाही. पण काकांवरती खुप विश्वास होता. ३२-३५ वर्षे आम्ही दोघे एकत्रित होतो. पण कधीही काकांनी शब्द खाली पडू दिला नाही; पण हा मात्र शब्द टाळला. मला अतिशय वाईट वाटले.

त्याच वेळी नंदुशेठ यांना मी भेटलो. नंदुशेठ एक साधा व प्रामाणिक माणुस. माझा

छोटा भाऊ म्हणून कोणालाही सांगणारे कणखर व्यक्तिमत्त्व मला त्यांनी सांगितले, सर सर्व तुम्ही करताच आणि आमचा काका आणि नाना त्याचं फुकट श्रेय घेत आहेत. तुम्ही खूप बुद्धिमान आहात. तुम्ही काहीही करू शकता. माझा एक सल्ला मानता का! तुम्ही काय करा, आता स्वतंत्र एक संस्था काढा व यांच्यापेक्षा मोठी करून दाखवा. नाहीतर इथं असंच होत राहणार. माझे डोळे उघडले व त्याच क्षणी मी आपली संस्था चालू करण्याचे ठरविले. २०१४ साली मा. मोदी पंतप्रधान झाले. त्याच वर्षी मी कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर या संस्थेची जी अगोदर २० वर्षे संस्था रजिस्टर करून वाट पहात होतो त्या संस्थेची सुरुवात केली व पहिल्याच वर्षी १००० विद्यार्थी व बालवाडीपासून ते कॉलेजपर्यंत सर्व शाखा सुरू केल्या. रात्र दिवस कष्ट करून उभ्या केल्या. या माझ्या संस्थेचे चालू करण्यामागचे सर्व श्रेय हे नंदुशेठ चव्हाण यांचे आहे असे मी मनापासून मानतो. कारण जर त्यांनी त्या वेळेला माझे डोळे उघडले नसते व काका व नानाच्या घरचे लोक माझ्याशी वाईट वागले नसते. तर नक्कीच आजपर्यंत मी संस्था स्वतंत्र सुरू केली नसती.

सुरू केलेल्या तीन ही संस्थेत माझ्या कुणाचे नाव दिले नव्हते याची खंत माझ्या मनात होती म्हणून मी प्रत्येक ब्रँचला जाधवर हेच नाव दिले. माझा मुलगाही आता एल. एल. एम. झालेला आहे. तो अतिशय कष्टाळू व होतकरू आहे. निर्व्यसनी आहे म्हणून आज ही संस्था वाढविली पाहिजे असे मी ठरविले व त्याची पूर्ण इनव्हॉलमेंट पाहून सर्व शाखा सुरू करण्याचे ठरविले. आज के. जी. पासून पी. जी. पर्यंत सर्व शाखा आमच्याकडे आहेत व अत्यंत चांगल्या पद्धतीने सर्व शाखांचे संचलन केले जाते. शार्दुलला तो अकरावीत असल्यापासून ट्रेनिंग दिले. रोज दुपारी संस्थेत माहिती घ्यावयास सांगितले व त्यानेही ज्या वेळेला आम्ही कैलास मानस सरोवर यात्रेसाठी निघालोत त्याच दिवशी सकाळी महाविद्यालयास परवानगी मिळाली होती. ते चालू करून ॲडमिशनपर्यंत सर्व कामे केली. स्वतः कमीत कमी पाच वर्षे त्याने शिपाई घेऊन स्वतः पंचक्रोशीत बोर्ड बांधले. कोणतेही काम करण्यास त्याने हयगय केली नाही. आता आदित्य व जाधवर असे दोन फौंडेशन आहेत. २५-३० शाखा दोन्हीच्या आहेत. शार्दुल संपूर्ण कारभार त्याचा स्वतंत्रपणे पहात आहे. त्याला अनेक जेष्ठ प्राध्यापकांनी त्रास दिला. पण त्याला न डगमगता तोही धुरा अत्यंत चांगल्या पद्धतीने सांभाळत आहे. अशी आमच्या जाधवर फौंडेशनची सुरुवात झाली.

आम्ही बापलेक रात्रंदिवस काम करत होतो. वडिलांचे स्वप्न पूर्ण करावयाचे व वडिलांच्या नावाने विद्यापीठ काढायचे हे स्वप्न मनात घेऊन शार्दुल रात्रंदिवस काम करत होता. त्यात २०१९ मध्ये एप्रिल महिन्यात मला सुनील जायभाय भेटले व तुम्ही विद्यापीठ काढण्यासाठी जागा बघत होतात तर ससेवाडी आमच्या कॅम्पसपासून जवळच १० कि. मी. अंतरावर युनिव्हर्सल इंजिनिअरींग कॉलेज आहे. ते देशमुख साहेबांचे आहे व ते देण्यास तयार आहेत असे सांगितले. मी म्हटलं मोठी जागा व मोठा कॅम्पस आहे. किंमतही मोठी आहे. या वर्षी काहीच तयारी नाही. पुढच्या वर्षी तयारी करू आणि मग घेऊ. पण त्यांनी फारच प्रेशर केले. देशमुख सज्जन हे नावाप्रमाणेच सज्जन, प्रामाणिक व अध्यात्मिक असल्यामुळे आमचे आणि त्यांचे जुळले, व्यवहार झाला व आता व्यवहारात अडचणी येतील. कोरोना जगभर पसरलेला आहे. त्यातून बाहेर पडून हा व्यवहार नीट पार पडेल अशी अपेक्षा आहे. शार्दुलचे व माझे स्वप्न २०२५ साठी विद्यापीठ करायचे हे पूर्ण होऊ शकले अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो व ही प्रेरणा प्रतिष्ठानची सुरुवात जाधवर गड म्हणून होईल अशी अपेक्षा करतो. सद्या सर्व कामकाज प्रेरणाचे शार्दुलच बघत आहे. हे शिवधनुष्य आहे. किंमत मोठी, कॅम्पस मोठा, व्यवहार मोठा व तिथे उत्पन्न काहीच नाही. अनेक अडचणी आहेत. नाव खराब झालेले आहे. त्यामुळे या सर्वांतून बाहेर येऊन नावलौकिक मिळविण्यासाठी वेळ लागेल, कष्ट लागतील व त्रास होईल हे मला माहित आहे. पण आम्ही ते सर्व करू अशी अपेक्षा आहे.

▸▸ ▸▸

# १३. परदेश गमन

साधारण १९८८-८९ चा काळ असेल, त्या वेळी परदेशाला जाणाऱ्याला खूप मान सन्मान होता. विमानात बसून जाणाराचेही लोक खूप कौतुक करीत. मी ठरविले आपण काहीही करून परदेशाला जायचे. पण त्यासाठी पासपोर्ट लागतो. त्या काळात पासपोर्टचे ऑफिस फक्त मुंबईत होते. मी एका एजंटकडे गेलो व त्या वेळी खडकवासला, धायरी, वडगाव बु., हिंगणे या ठिकाणचे सर्व तरुण कार्यकर्ते यांना एकत्र केले. परदेशी जाण्यासाठी तयार केले. साधारण १५-२० लोकांचे पासपोर्ट काढायचे होते. त्यांना तर काहीच माहित नव्हते. आज माझ्याबरोबर आलेले ते सर्व तरुण कार्यकर्ते हे सरपंच, नगरसेवक, आमदार, पक्षाचे तालुका, जिल्हा पातळीवरचे कार्यकर्ते आहेत. याचा मला अभिमान आहे. जगताप पाटील सरपंच होते. काका-नगर सेवक व मान्यवर पक्षांचे जिल्हा प्रतीनिधी, रमेश वांजळे आमदार असे कितीतरी उदाहरणे आहेत. हरिश्चंद्र अण्णा नगरसेवक.

मी त्या एजंटला म्हणालो किती पैसे घेता त्या वेळी त्याने १५०० रु. प्रत्येकी सांगितले. मी त्याला म्हणालो, आमचे एकत्रित १५-२० पासपोर्ट आहेत. तर तुम्ही हजार किंवा बाराशेमध्ये आम्हाला पासपोर्ट द्या. त्या वेळी त्याची भाषा बरोबर नव्हती. काढायचे असेल तर काढा नाहीतर कोणाकडे घ्यायचेत त्यांच्याकडे घ्या असे म्हणून त्याने एकदम टाकून दिल्यासारखे बोलला. मला वाईट वाटले. पुन्हा माझी जिद्द जागी झाली व मी स्वतःच पासपोर्ट काढायचे ठरविले. मुंबईला गेलो, माहिती घेतली, फॉर्म आणले व सर्व कागदपत्रासहित सर्व लोकांचे फॉर्म हातानी भरले. व्यवस्थित तयार केले. सर्व कागदपत्रे जोडून १६ लोकांचे अर्ज दाखल केले. त्यांच्याकडून ऑफिसला भेटीची तारीख घेतली व त्या दिवशी सगळ्याला मुंबईला घेऊन गेलो. सर्व पासपोर्ट आम्हाला पोष्टाने मिळाले. सर्व

पासपोर्ट फक्त तिथली फी भरून मी ते बाकी फुकट काढले. बाकीचा काहीही खर्च आला नाही.

पण त्यावेळी लक्षात आले

कुछ भी असंभव नही है जगमे
सब संभव हो सकता है
कार्य हेतु अगर कमर बांधले
तो सब संभव हो सकता है

कोणत्याही गोष्टीची प्राप्ती करावयाची असेल तर प्रयत्न व प्रामाणिक कष्ट आवश्यक आहेत व आत्मविश्वास महत्त्वाचा आहे. हे लक्षात आले व यश हे खेचूनही आणले जाऊ शकते याची जाणिव झाली व पुढे आयुष्यभर त्याचा मला फायदा झाला.

त्यानंतर मी पहिल्यांदाच युरोपला जायचे ठरविले. हॅपी हॉलिडे या कंपनीमार्फत आम्ही पहिल्यांदाच युरोपमधल्या वेगवेगळ्या राष्ट्राला भेटी द्यायच्या ठरविल्या. त्यामध्ये इंग्लंड, फ्रान्स, बेल्जीयम, व्हॅटीकन सिटी, इटली, स्वित्झरलँड इत्यादी अशा एकूण सात आठ देशाला पहिल्यांदाच भेट द्यायचे ठरले. आमच्याबरोबर व्हीजासाठी त्या १६ पैकी बरेच जण आले. पण काहींना व्हिजा मिळाला नाही. शेतकरी असल्यामुळे त्यांच्याकडे इन्कमचे पुरावे नव्हते; पण रमेश वांजळे यांना मात्र प्रश्न विचारला तुम्हाला कशाला इंग्लंडला जायचे आहे. त्यांनी चमत्कारीक उत्तर दिले. आमच्या देशावर ज्या देशांनी दीडशे वर्षे राज्य केले तो देश कसा आहे हे बघायला जायचे. व्हिजा रिजेक्ट कारण अनावश्यक बोलत आहात. त्यामुळे मते सरपंच, हेमंत पाटील, रमेश वांजळे अशा बऱ्याच जणांचा व्हिजा रिजेक्ट झाला व बाकीचे उरलेले ११ लोक आम्ही युरोप दौऱ्यावर निघालो. आम्ही पुण्यावरून मुंबईला निघालो. तिथून इटली मार्गे आम्ही मिलान हवाई अड्यावरून लंडन या ठिकाणी गेलो. आमचं नशीब असं की, अनेक दिवसांनी त्या दिवशी सूर्य दर्शन झाले होते. त्या देशामध्ये अतिशय थंडी असते. पण खरोखर एवढे प्लॅनिंग त्या देशांनी केले आहे. देश छोटे आहेत पण सुधारणा नियोजनबद्ध त्या देशांनी केलेल्या आहेत. पहिल्यांदा आम्ही लंडन शहरात गेलो. लंडन शहराची

टूर केली. रस्ते, इमारती, नद्या सर्व नियोजनबद्ध विकसीत केले. इंग्लंडच्या राणीचा राजवाडा बंकीहम पॅलेस, शहरातील दुसरा जुना राजवाडा, इंग्लंडची संसद भवन चांगल्या प्रकारचे आर्किटेक्चर पाहून आश्चर्य व आनंद झाला. नदी तर शहरातून वहात असून तिची स्वच्छता सर्व भारतापेक्षा आगळे वेगळे होते. तेथून आम्ही बेल्जियमला गेलो आणि ते ही हवेची बोट घेऊन, दुसऱ्या वेळेला आम्ही इंग्लंडवरून फ्रान्सला Auro train ने गेलो. रेल्वे पण विमानासारखी व तासी २३०-३०० कि. मी. धावणारी. समुद्रात ५० कि. मी. टनेल बनवून ती रेल्वे जाते. किती तरी आश्चर्य पाहिले. जगातला सुंदर आफ्रिका टॉवर, इटलीतील रोम सारखे शहर व स्वित्झर्लँड तर विचारुच नका अत्यंत सुंदर देश. जिकडे तिकडे झाडी व डोंगरावर बर्फ. त्या वेळी आम्ही जगातील उंच डोंगरावर गेलो. माऊंट टिटलीस अत्यंत उंच डोंगरावर बर्फ होता व एक खेळ तिथे चालू होता. टायरमध्ये बसायचे व बर्फावरून उताराला घसरत जायचे. माझे बरोबर शहाजीराव पाटील पोलिस इन्स्पेक्टर होते. आम्ही दोघांनी बसायचे ठरविले. आम्ही बसलो एक एक टायर सोडत होते. माझा टायर सोडला तो जोरात खालच्या दिशेने घसरत चालला व मध्येच माझे तोंड उलटे झाले. टायरने गती पकडली. मला काही कळत नव्हते. कुठपर्यंत जाणार आहे, जीव घाबरून गेला. टायर गतीमध्ये खाली जात होता तेवढ्यात एक खड्डा आला व मी उलटून त्या टायरमधून खाली पडलो. प्रचंड घाबरलो होतो. माणसे नाहीत, बाजूला फक्त बर्फ व खोल दरी. तेथून आम्ही इटलीला आलो. मध्येच आमचा मुक्काम पॅरीस या ठिकाणी होता. ॲन इव्हीनिंग इन पॅरीस या सिनेमाची ज्या ठिकाणी शुटींग झाली त्या ठिकाणी फिरावयाचे होते. नदीतल्या बोटीतून राईड होती. फार मनोहर दृष्य होते. तेथून आम्ही इटलीतील रोम या ठिकाणी गेलो. एका हॉटेलमध्ये उतरलो. आम्हाला जगातील टूरला जोडले होते. त्याचे नाव होते कोणी ट्रॅव्हल्स. जी युरोपमधील सर्वात मोठी ट्रॅव्हल्स कंपनी आहे. सर्व भारतातल्या लोकांसाठी एक मॅनेजर होता. आमच्या बरोबर सरदारजी होता. आम्हाला जेवण करण्याच्या सूचना देण्यात आल्या व सांगितले की तुम्हाला आठपर्यंतच जेवता येईल. आठ वाजता हॉटेल बंद होतात. आम्ही सर्वजण जेवत होतो. आमचे जेवण आठच्या आत संपेल असे आम्ही नियोजन केले होते. पण आठला पाच दहा मिनीट कमी असताना सरदारजी जेवायला आला. बहुतेक त्याने टाकलेली असावी. तो जेवायला बसला

आठला पाच कमी असताना व बरोबर आठ वाजता वेटर आला व त्याच्या समोरचे ताट हिसकावून निघून गेला. त्या ठिकाणी भारतातल्या सारखं नव्हते. आठपर्यंत बसतील त्यांना जेवण किंवा जेवत असलेल्या माणसाच्या पुढचे ताट काढून घेतले जात नाही. पण हा अजब प्रकार पाहून सरदारजी खवळला व धावून गेला. हॉटेलवाल्याने पोलिसाला फोन केला. खासगी गुंड मागविले. इटली हा माफीयाचा देश आहे. जगभर माफीया इटलीचे असतात. तिथे चोऱ्या सुद्धा पटकन करतात. पासपोर्ट सुद्धा अत्यंत जपावे लागतात. एक मिनीट तुमच्या बॅगवरचे लक्ष इकडे तिकडे गेले तर लगेच बॅग गायब होते. पोलिस आले, सर्वजण पळून गेले. पुढे कुणीही जात नव्हते. मी व पाटील साहेब हळूच बाहेर आलो व त्या हॉटेल मालकाला विनंती करून पोलिस परत पाठविले. पण त्याचे खासगी बाऊंसर आले. अतिशय पिळदार देहयष्टी असलेले व बलदंड शरीराचे त्यांनाही आम्ही विनंती केली. पण त्यांनी आमच्या टूर मॅनेजरला सांगितले. सकाळी सहाच्या आत हे शहर सोडायचे. सहानंतर जर तुम्ही आम्हाला दिसलात तर खैर नाही. मॅनेजरने सगळ्याला सकाळी ५.३० ची वेळ दिली. अक्षरश: आम्ही त्या शहरातून काहीही न बघता पहाटे निघून आलो. त्या बदल्यात आम्हाला दुसऱ्यांदा ॲन इव्हिनिंग इन पॅरीसचं दर्शन करून दिलं.

आम्ही मिलानवरून भारतात येण्यासाठी निघालो. त्यावेळी भारतात मोबाईल नव्हते. त्यामुळे आम्हाला घरच्या माणसाला संपर्क फक्त कुठून तरी फोनवरून करावा लागत होता. आम्ही घरी फोन करून सांगितले, आम्ही आज रात्री निघत आहोत व उद्या सकाळी मुंबई या ठिकाणी उतरु व दुपारपर्यंत पुण्याला येऊ. पुन्हा कोणताही संपर्क नाही. आम्ही विमानात बसलो. विमान उड्डान करू लागले. विमान उड्डान करणार एवढ्यात पायलटच्या लक्षात आले की विमानाच्या एका इंजिनात बिघाड आहे. त्याने विमान तिथेच थांबविण्याचा निर्णय घेतला व पुढचे चाक वर घेतले होते ते हवेतच होते. धावपट्टी संपत आलेली होती व विमान तेथेच दाबले व सर्व ब्रेक एकदम लावले. मोठा आवाज झाला. सर्वजण घाबरले. वास्तविक येतानाच पहिल्यांदा एवढा मोठा विमानाचा प्रवास होता. विमान उडाले आम्हाला स्क्रीनवर दाखविले जात होते. विमान समुद्रावरून कितीतरी वेळ जात होते. भीती वाटत होती. जलसमाधी येते की काय ? पण देवाचं नाव घेत घेत आधीच आम्ही आलो होतो. जमिनीवर पाय

पडल्यावर जीवात जीव आला होता. पण परतताना हा काय प्रकार सर्वजण घाबरले होते. आधीच काही वेळा ज्या वेळी विमान आकाशात असते त्यावेळी ढग असतील तर बैलगाडीसारखे खड खड करते. आमचे विमान आम्हाला न उतरवताच दुरुस्तीसाठी नेले. अल इटालीया कंपनीचे विमान होते. तिथे ते अर्धा दिवस दुरुस्त केले. खात्री केली व आम्हाला उड्डानास परवानगी दिली. आम्ही विमानातच होतो. बाहेर सोडत नव्हते. कारण आमचे इमिगिरेशन झालेले होते. कसे तरी दुसऱ्या दिवशी सकाळी आमचे विमान आकाशात झेपावले व रात्री उशीरा आम्ही मुंबई विमानतळावर उतरलो. आम्हाला नेण्यासाठी आलेले लोक घाबरले होते. सकाळी येणारे विमान अजून आले नाही. फोन करता येत नव्हते. घरचे लोकही सतत चिंतेत होते. कोणी कोणी रडत होते. कुणी कुणी उपास धरले; पण आमचा नवरा सुखरुप येऊ दे. असा नवस करत होते. आमच्या पत्नीने त्यावेळपासून आजपर्यंत सोमवारचे व्रत धारण करून महादेवाला साकडे घालून उपवास चालू केले होते व आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी कसे तरी पुण्यात पोहोचलो. जेवढा फिरून आनंद झाला तेवढाच त्रास विमान व इतर अनुभवावरून झाला व पहिली आमची टूर यशस्वी झाली.

## फार इस्ट दौरा

आम्ही युरोपचा दौरा करून आल्यावर आमच्याबरोबर आलेल्या लोकांनाही परदेश वारी चांगली वाटू लागली व ज्यांना येता आले नाही ते म्हणू लागले की या वर्षी तरी आम्हाला कुठेतरी घेऊन जा मग मी श्री. हेमंत जोशी यांना विचारले व त्यांनाही बरोबर घेतले. त्यांनी सांगितले की फार इस्ट म्हणजेच थायलंड, मलेशिया व सिंगापूर या तीन देशाची आपण टूर काढू कारण या देशाच्या व्हिजासाठी काही अडचण येत नाही. मग आम्ही पुन्हा दहा बारा लोक जमलो व फार इस्टला जाण्याची तयारी केली. पण टूर फारच मोठी ठरली. जवळ जवळ १९ दिवसांचा दौरा होता. आम्ही प्रथम थायलंडला गेलो. छोटासा देश पण टूरिस्ट स्थळे अत्यंत चांगली बनविलेली होती. रस्ते, रेल्वे आपल्यापेक्षा छान बनविलेले होते. सुंदर शहरीकरण केलेले होते. हॉटेल्सची व्यवस्था उत्तम होती. आम्ही मलेशियातही गेलो. क्वालालामपूर व तेथून आम्ही जेंटीगला गेलो होतो. जेन्टींग अत्यंत सुंदर डोंगराच्या

कुशीत वसवलेलं शहर. दहा पंधरा किलोमीटर तर जंगलातून विद्युत पाळण्यात बसुन जावे लागले. वॉटर पार्क व अतिशय सुंदर हॉटेल डोळ्याचे पारणे फेडणारा नजारा. तिथेही आम्ही राहिलो. गरीब देश ; परंतु रेल्वे अतिशय चांगली. रेल्वेच्या प्रत्येक डब्यात टि.व्ही. डब्याची क्वालिटीही अत्यंत चांगली. विमान, रेल्वे, बस अशा तिन्ही बाबीमध्ये आम्ही प्रवास केला व सिंगापूरला गेलो. पन्नास लाख लोकसंख्येचा देश अंदाजे पन्नास कि.मी.चा देश पण या दोन्ही देशापेक्षा येथे सुधारणा जास्त होत्या. सुंदर पार्क डेव्हलप केलेले होते. मार्केट अत्यंत चांगल्या डेव्हलप केलेल्या दिसल्या व त्यावर चायनीज लोकांचे वर्चस्वही दिसले. सगळ्यात या ट्रीपमध्ये आम्हाला अनुभव आला तो स्टार क्रुजचा. हे अत्यंत मोठे जहाज २००० राहण्याच्या खोल्या अधिक काही प्रमाणात माल वाहतूक व सर्वात म्हणजे चार थियेटर्स. दोन स्वीमिंग पूल. चार हॉटेल्स त्या जहाजावर होती. मी काका, पाटील साहेब, रमेश वांजळे, रमेश पोकळे, हरिश्चंद्र अण्णा दांगट, बाळासाहेब पोकळे, कचरे मॅडम व त्यांचे मिस्टर, संभाजी राजे इत्यादी आम्ही होतो. नेमका पाटील साहेबांचा वाढदिवस होता. आम्ही जहाजावर साजरा केला. अनेक ट्रीप आम्ही काढल्या. पाटील साहेबांचा ४ जून व माझा ६ जूनला वाढदिवस. आम्ही विमानात किंवा प्रवासात साजरा करत होतो. त्यावेळी आमच्या बरोबर एक चायनीज होता. काका घोषणा देत देत गणपत्ती बाप्पा मोरया म्हणाले व तो चायनिज देखील कसा तरी आवाज काढीत मोठ्याने म्हणत होता. त्याची घोषणा देण्याची पद्धत ऐकून आम्ही खूप हसलो. दोन रात्री आणि तीन दिवस आम्ही जहाजावर होतो. ते जहाज म्हणजे पंचतारांकित नव्हे ७ स्टार प्रॉपर्टी असते. अत्यंत सुंदर व सुबक प्रकारे बनविलेले विशालकाय जहाज. ते जहाज हमराज या हिंदी सिनेमात दाखविलेले आहे. ज्यात सनी देओल व अक्षय खन्ना आहेत. आम्ही सर्व आनंदी झालो. परत आल्यावर आम्ही सिंगापूरमध्ये खूप फिरलो. भारतातल्या लोकांचं तिथं एक आयोआप्पा मंदिर आहे. तिथे रोज लोक जमतात. पण जवळ जवळ सर्व भारतीय रविवारी त्या रोडवर येतात व आपल्याला वाटले की आपण भारतातच आहोत. तिथे फार मोठे मुस्ताफा मार्केट आहे. असं सांगण्यात आलं की तो भारतातला आहे व तो पूर्वी कधी काळी स्मगलर होता. एका रोडपासून पुढच्या रस्त्यापर्यंत अत्यंत मोठा शॉपींग मॉल म्हणजे मुस्तफा मार्केट तिथे भारतातल्या नोटा सुद्धा घेतांना दिसले व एक्सचेंज

सेंटरसुद्धा दिसली. किमान दोन दिवस त्या मॉलमध्ये वेगवेगळ्या विभागात फिरायला लागतील एवढा मोठा मॉल मी पहिल्यांदाच पाहिला होता.

आम्हाला दुसऱ्या दिवशी परत निघायचे होते. रात्री आम्ही रुमवर गेलो. वातावरण दमट होते. वांजळे घोरत होते म्हणून आम्ही त्यांच्या रुममध्ये संभाजी राजे दांगट यांना टाकले होते. रुमला लॉक हे लॅचचे होते. त्यांच्या दारावर कुणीतरी हळूच थाप मारली. राजे बाहेर आले. डोकावून पाहिले बाहेर तर कोणीच नाही. थोड्या वेळानी पुन्हा कुणीतरी दरवाज्यावर थाप मारली. पुन्हा त्यांनी बाहेर डोकावले. कुणीतरी मुद्दाम वाजवून निघून जात होते. पुन्हा थोड्या वेळाने अजून कुणीतरी थाप मारली. राजे पिसाळले व ते डायरेक्ट बाहेर आले व रागात त्याला शोधू लागले. तोपर्यंत लॅचचे कुलूप लागले. तोपर्यंत वांजळे झोपी गेले होते. राजे फक्त अंडरपॅन्ट व तीही पट्ट्याची एवढेच होते. उकडत असल्यामुळे अंगात बनियनही नव्हता. त्यांनी दार वाजवले. आमच्या कोणाच्याच रुमचे नंबर त्यांना माहित नव्हते. कारण आम्हीच त्यांच्या बरोबर सारखे असायचो. पंचायत झाली वांजळे झोपल्यावर कितीही ओरडले तरी उठत नव्हते. पहिलवान गडी. राजे अडचणीत आले. बराच वेळ वाजवलं. वांजळे उठले नाहीत मग दुसरा मार्ग शोधण्यास सुरुवात केली. त्यांना वाटले शेजारी आपलेच असतील म्हणून त्यांनी शेजारच्याचे दार वाजविले. तिथे दुसऱ्याच देशातील कपल होते, ते धावून आले, अडचण झाली. त्यांना इंग्रजी येत नव्हती. त्या हॉटेलमध्ये जगातली सर्व माणसे असल्यामुळे मोठी अडचण झाली. सांगता येत नव्हतं. हिंदी, मराठी कोणाला समजत नव्हती. लिफ्टमध्ये बसले उघडेच व नंतर खाली आले व लगेच वर गेले. लिफ्ट ही काचेची होती. लोक बघत होते. त्याची त्यांना लाज वाटायची. अखेर एका माणसाने कोट दिला. खाली अंडरवेअर मध्ये शर्ट नाही. वर कोट तरीही मजाच झाली. कसंतरी कॅबीनला गेले, भाषा येत नव्हती. तिथे एक माणूस होता तो भारतीय असल्यामुळे त्यानी त्यांना खोली लॉक झाल्याचे हिंदीतून सांगितले. अखेर मास्टर की घेऊन एक जण आला व त्याने रुम उघडून दिली. हा तमाशा झाल्यामुळे राजे पिसाळले होते. त्यांनी रुम उघडल्या उघडल्या वांजळेच्या जवळ गेले व मोठ्याने ओरडले तरी वांजळे उठले नाहीत. अशा अनेक गंमतीशीर गोष्टी या प्रवासात घडत होत्या.

रात्रीची एकदोनची वेळ असेल, पाटील साहेब मला म्हणाले, सर जरा हालल्यासारखं वाटतयं का ? मी त्यांना म्हणालो, अहो काल आपण जहाजावरून आलो त्यामुळे भास होत असतील. तेवढ्यात काका शेजारच्या रुममधून पळत आले व म्हणाले सर आपलं हॉटेल हलतयं. मग मात्र मी ताडकन उठलो, खिडकीत गेलो तर काय हॉटेल एक अर्धाफुट हालत होते. मी सर्वांना सांगितले दिसेल तेथून खाली पळा. मी चुकून लिफ्टचे बटन दाबले व लिफ्ट थांबली. आम्ही आत गेलो तर लिफ्ट २६ व्या मजल्यावर गेली. हॉटेल हालतच होते. मी सायबांना म्हणालो साहेब आपण चूक केली. जर लाईट गेली तर आपण आयतेच डब्यात अडकू व कोंडून मरणार, नशिबाने लिफ्ट थांबली. आम्ही बाहेर पळालो. राहिलेल्या सर्व पायऱ्या जोरात पळालो व पटांगणात जाऊन बसलो. वांजळे सोळा मजले पळून खाली येऊन उघडेच बसलेले होते. मोठ मोठ्याने ओरडू लागले आम्ही आता इथचं मरणार. कशाला आणली होती ट्रीप; पण तेवढ्यात पोलिस आले व त्यांनी इंडोनेशियात मोठा भूंकप जवळ जवळ ७ रीस्टरचा झालेला आहे व त्यामुळे इथे हादरले व इथल्या बिल्डींगला स्प्रींगा असतात त्यामुळे इमारत हलली तरी पडत नाही असे सांगितले. त्या वेळी जीव भांड्यात पडला. पण एकही माणूस हॉटेलमध्ये जात नव्हता. कोणीही सकाळपर्यंत हॉटेलात गेले नाही. सर्वजण रात्रभर ग्राऊंडवर बसून राहिलो. सकाळी जाऊन आंघोळ करून बॅगा घेऊन आम्ही डायरेक्ट विमानतळावर गेलो.

सिंगापूर विमानतळावरून आम्हाला भारतात येण्यासाठी साधारण ६ तासाचा विमानाचा प्रवास होता व हे विमान हिंदी महासागरावरून चेन्नई मार्गे येणार होते. आमचा प्रवास सुरू झाला. अंदाजे दोन तीन तास झाले होते. मी वॉशरुमला जाण्यासाठी उठलो. तेवढ्यात बाहेरील वातावरण खराब आहे. त्यामुळे प्रवाशांनी जागेवर बसावे व बेल्ट बांधावा अशा पायलट सूचना देत होते. मी म्हटलं पटकन जाऊन यावे तेवढ्यात विमान एकदम हवेच्या पोकळीत गेले व साधारण २०० ते ३०० फुट खाली एकदम आले. आम्ही तर म्हटलं आता विमान समुद्रात पडते आहे काही खरे नाही. पूर्णपणे जाणवले की आता विमान खाली जात आहे. पाळण्यात बसल्यावर पाळणा खाली येताना जसं वाटतं तसचं जाणवत होतं. एका एकी विमान हवेच्या पोकळीच्या बाहेर आलं व पुन्हा नीट चालू लागलं. सर्व लोक फक्त एकमेकाकडे

बघत होते. पण कोणीच कोणाला बोलत नव्हते. कसंतरी चेन्नई विमानतळावर विमान उतरलं व जीव भांड्यात पडला व तेथून आम्ही मुंबईत उतरलो व पुण्याचा रस्ता धरला. जेवढा ट्रिपमध्ये आनंद मिळतो बाहेरचा देश बघून ज्ञानात भर पडते तेवढ्याच अडचणीचा सुद्धा सामना करावा लागतो. अशी आमची ही फार ईस्टची ट्रीप झाली. आमच्या या टूर नंतर श्री. हेमंत जोशी यांनी टुर्स अॅण्ड टॅव्हल्स कंपनी ''वक्रतुंड टूर्स अँड ट्रॅव्हल्स'' अशा नावाने सुरू केली.

त्यानंतर आम्ही दरवर्षी जवळ जवळ २५ वर्षे अनेक देशाचा दौरा केला. सर्वच या ठिकाणी वर्णन करणे उचित होणार नाही पण त्यातील काही मोजके अनुभव मात्र विचारात घेणे गरजेचे आहे. आम्ही नंतर चीन व हाँगकाँगचा दौरा केला. चीन देशाने केलेली प्रगती ही वाखाणण्यासारखी आहे. दीर्घकालीन नियोजन तयार करून त्या प्रमाणे वाटचाल करून चीनने फार प्रगती साधलेली आहे. नियोजनबद्ध शहराचा विकास शॅगायमधील त्यांची विमानतळापर्यंत तयार केली गेलेली सुपरफास्ट रेल्वे, शंगाय ते बिजींग १४०० कि. मी. रेल्वे मार्ग व भारतासाठी विचारात घेण्यासारखा प्रकल्प म्हणजे नदी जोड प्रकल्प. चीनने ५० वर्षे सातत्याने नदीजोड प्रकल्पावर काम केले व आज चीनमध्ये फार मोठ्या प्रमाणावर त्याचा शेती व शहरांना पिण्याकरता पाण्याचा वापर व जल वाहतूक फार मोठ्या प्रमाणावर केल्याचे दिसते व उद्योगासाठी खास वसाहती निर्माण करून त्यांना फार मोठ्या उतपदनासाठी सवलती देऊन त्यांना फार मोठी बाजारपेठ उपलब्ध करून दिली व आज त्याचा चांगला परिणाम आपण पहात आहोत की चीन ही एक महासत्ता निर्माण झालेली आहे.

चीनमध्ये लोकांवर फार मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचार केले गेले व कम्युनीस्ट पद्धती बळजबरीने राबवण्यात आली. जरी ५०-६० वर्षे पहिल्या लोकांवर अन्याय झाला, अत्याचार झाला पण आज त्या देशात त्याची चांगली फळे दिसू लागली आहेत.

चीनची शिक्षण पद्धती व त्या ठिकाणी आता विकसीत देशात सरकार स्कॉलरशीप देऊन मुलांना शिक्षणासाठी पाठवत आहे व त्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये त्यांनी अमुलाग्र बदल केला आहे. त्या देशात शिक्षण त्याच्या मातृभाषेत दिले जाते व काही खास शाळा इंग्रजी

माध्यमाच्या आता चीनमध्ये सुरू केल्या आहेत.

जगातील जी काही आश्चर्य आहेत त्यापैकी चीनमध्ये चीनची भिंत आहे व असे म्हटले जाते की ही भिंत चंद्रावरून सुद्धा दिसते. ती पाहण्यासाठी आम्ही गेलो. ५००० कि. मी. ची ही भिंत आहे. असे म्हटले जाते तिथल्या राज्याच्या अनेक पिढ्या ती बांधण्यात गेल्या व आजही ती भिंत तशीच आहे. एवढी महाकाय भिंत खरोखरचं दगडाने बांधलेली आहे. वरून एक ट्रक जाईल एवढी मोठी आहे. चीनची भिंत पाहण्यासाठी आम्ही गेलो. जाताना वृक्षारोपण फार मोठ्या प्रमाणावर झालेले पाहिले. दुभाषाला विचारले की सर्वच झाडे जिवंत कशी दिसतात. त्यावर त्याने जे उत्तर दिले ते अत्यंत महत्त्वाचे होते. त्याने सांगितले की, आम्ही झाडे लावतो व जेवढी त्या वर्षात झाडे मरतील तेवढीच झाडे पुढच्या वर्षी अगोदर लावतो व मग पुढील वर्षीचे वृक्षारोपन करतो मला आश्चर्य वाटले की डोंगराच्या वरच्या टोकापर्यंत पूर्ण झाडे जीवनंत व मला भारतातील वृक्षारोपन आठवले. वृक्षारोपनाचे फक्त पेपरला फोटो येतात. दरवर्षी कोट्यावधी झाडे लावण्याचा संकल्प केला जातो परंतु त्यापैकी किती झाडे जगली हे पाहिले जात नाही व दरवर्षी त्याच त्याच खड्यात झाडं लावली जातात.

हाँगकाँग तर इंग्रजांच्या ताब्यात होते. अंदाजे २००० च्या दरम्यान ते मुक्त झाले. त्यांचा विकास तेथील नियम व चांगल्या गोष्टी अत्यंत चांगल्या होत्या. शिस्त, नियम अत्यंत कठोरपणे तिथले लोक पाळताना दिसत होते. चोरी मारी बिल्कुल दिसत नव्हती. असा हा दौरा झाला.

## ऑस्ट्रेलिया

आम्ही काही अभ्यास दौरे केले. त्यामध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड यासारख्या शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत पुढारलेल्या देशाचाही आम्ही दौरा केला. आम्ही ऑस्ट्रेलियामधल्या चार विद्यापीठांना भेटी दिल्या. त्यामध्ये पर्थ, मेलबर्न या शहरातील महत्त्वाच्या विद्यापीठांना आम्ही भेटी दिल्या. या टूर मात्र आम्हीच डिझाईन केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाला पुढाकार प्राचार्य चिटणीस यांनी घेतला व तिथे काही सेमिनारमध्येही आम्हाला भाग घेता आला. विद्यापीठातील वेगवेगळी डिपार्टमेंट व प्राध्यापकांशी चर्चा करता आल्या व ज्ञानाचे आदान

प्रदान करण्याची संधी मिळाली. आम्ही मेलबर्नमध्ये गेलो त्या वेळी संध्याकाळी ७ वाजताच सर्व शहर बंद होते. काहीच मिळत नाही. सर्व शहरात जबरदस्त शिस्त दिसते. तसे पाहिले तर कमी लोकसंख्या व मोठा भूभाग ऑस्ट्रेलियाला लाभलेला आहे. भरपूर साधनसामुग्री लाभलेली आहे. आम्ही एका दिवशी दुपारी हेलीकॉप्टरमधून राईड मारली व संध्याकाळी पेंग्वीन पाहण्यासाठी थांबलो. संध्याकाळी दिवस मावळायच्या वेळेला हजारो पेंग्वीन समुद्रामधून बाहेर येतात व त्यांची पिल्ले जेथे खोपा करून ठेवलेली आहेत त्या ठिकाणी जातात. ते दृश्य अत्यंत विलोभनीय असे असते व ते पाहण्यासाठी संपूर्ण जगातून हजारो लोक त्या ठिकाणी येतात. ऑस्ट्रेलियामध्येही खूप थंडी असते. चिटणीस सरांच्या श्रीलंकेच्या मित्रांनी आम्हाला ७ स्टार हॉटेलमध्ये जेवण ठेवले होते. त्या ठिकाणी काही भारतीय विद्यार्थी आम्हाला भेटले. आम्ही अपार्टमेंट भाड्याने घेऊन राहत होतो. स्वतःचा स्वयंपाक स्वतः करणे, भांडी घासणे अशी सर्व कामे आम्ही वाटून करत होतो व या प्रत्येक ट्रिपमध्ये प्राचार्य बाबासाहेब सांगळे, प्रा. अरुण गायकवाड यांचा समावेश असायचा. त्या ठिकाणी सिटी बस फुकट. आम्हाला सकाळी सातची वेळ सरकारी अधिकाऱ्याने एका समुद्र किनाऱ्यावरच्या हॉटेलमध्ये दिली होती. आम्ही राहात होतो तेथून ते लांब होते. आम्ही सकाळी अंधुक उजेडात गेलो. बाहेर चौकशी करावयाची होती. एक माणूस दिसला. बोलण्यावरून तो भारतीय वाटला. त्याने आम्हाला योग्य पद्धतीने माहिती दिली व त्याला विचारले असता २ कि. मी. फुटपाथ स्वच्छता मी घेतलेली आहे असे त्याने सांगितले. तो विद्यार्थी म्हणून शिकत होता व पहाटे स्वच्छतेचे काम करत होता. अनेक देशाचा दौरा केल्यानंतर आपल्या आणि बाहेरच्या देशात एक फार मोठी तफावत आढळली ती म्हणजे पुढारलेल्या देशातले विद्यार्थी हे काम करत करत शिक्षण घेतात. हे वर्क कल्चर त्या त्या देशांनी रुजवले आहे व भारतातील ९९% विद्यार्थी हे शिक्षण घेताना काहीच करत नाहीत व कोट्यावधी मॅन आवर्स वेळ वाया घालवताना दिसत आहेत. हे भारत देशात कधी होणार व करोडो लोकांना विशिष्ट प्रवाहात आणण्याचे कोणतेही प्रयत्न करताना विद्यापीठे व सरकार दिसत नाही. ही मोठी खंत आहे.

आम्ही पर्थ शहरामध्ये असतांना समुद्र किनाऱ्यावर भारतीय हॉटेल आहे असे आम्हाला समजले. भारतीय पद्धतीचे पूर्णपणे जेवण व तिथे बील करण्यासाठी माणूस नव्हता. हॉटेलचे

नाव ‘‘अन्नपूर्णा’’ असे होते. केळीच्या पानावर जेवण कुठे काय खायचंय ते खा फक्त किमान तुम्हाला बंधन फक्त त्यात ६ ऑस्ट्रेलियन डॉलर टाकावे व तुम्हाला त्याच्यावर द्यायचे असतील तर पैसे द्या नाही तर काहीही बंधन नव्हते. हे हॉटेल एक तामिळ माणूस चालवत होता.

## मॉरीशस व दुबई

त्यानंतर आम्ही एकदा दुबई व मॉरीशसचा दौरा केला. त्यामध्ये माझ्याबरोबर मी काका, आ. रमेश वांजळे, मानाजी गांधले, रवि चरवड व हेमंत जोशी होतो. या वेळी मात्र आम्ही सिंहगड रोडचे सहाच लोक होतो. जातानाच आम्ही चार दिवस दुबईत राहिलो. दिवसभर दुबई टूर केली. शारजा स्टेडियम पाहिले. ज्या ठिकाणी पूर्वी भारत – पाकिस्तानचेच अनेक क्रिकेट सामने प्रसिद्ध होते. ते त्या ठिकाणी होत होते. शेजारील आम्ही आता त्याला युएई म्हणतो. ते तीन देश मिळून तयार झाले आहे. दुबई, शारजा व अबुधाबी छोटे छोटे देश आहेत; परंतु सुधारणा फार मोठ्या प्रमाणावर प्रमाणबद्ध पद्धतीने केल्या जात होत्या. त्या देशांना पूर्णपणे वाळवंट आहे. पाऊस कित्येक वर्षे त्या भागात पडत नाही परंतु तिथे लाईट कधीच जात नाही. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून स्वच्छ पिण्याचे पाणी बनविले जाते व मुबलक प्रमाणात ते सर्वांना पुरविले जाते. तिथे कायदे अत्यंत कडक आहेत. राजेशाही पद्धत आहे. पोलिसच अनेक निर्णय खालच्या पातळीवरच घेतात व जरी कोर्टात केस दाखल केली तरी निकाल आठ दिवसात लावला जातो असे आम्हाला सांगितले. नियम अत्यंत कडक पद्धतीने पाळले जातात. भारतातले लोक तिथे मात्र सरळ चालतात. ड्रायव्हिंगचे नियम अत्यंत कडक आहेत. दारू पिऊन कोणी गाडी चालवू शकत नाही. लायसन्स रद्द केले जाते आणि चार पिढ्याचा जरी एखादा राहात असला तरी त्याला पूर्ण नागरिकत्व दिले जात नाही. त्याने चूक केली की त्याचे कार्ड जप्त केले जाते व राष्ट्रीयता काढून घेतली जाते. त्यामुळे सगळे लोक सरळ वागतात. तिथे मतदान नाही त्यामुळे कुणाचे लालुल चांगुल केले जात नाही.

आम्ही राजाचा महाल ही पाहिला. अत्यंत भव्य पद्धतीने तो बनविलेला होता व शेकडो मोर त्या बंगल्याच्या प्रांगणात मोकळे सोडलेले होते. मग आम्ही दुपारी सफारी वर्डला गेलो.

वाळवंटात गाड्या चालवायच्या व वाळूची टेकडी असेल तेथून जायचे. त्याच्या टोकावरून जायचे व भितीयुक्त आनंदाच्या वातावरणात आम्ही ते पाहिले. दिवस मावळायच्या वेळेला आम्हाला तिथल्या वाळवंटात दूर अंतरावर असणाऱ्या तबेल्यात गेलो तिथं आरबासारखा ड्रेस घालायचा. अरेबियन संगीत, सिनेमासारखे जाळावर फिरवत मटन, बोकड भाजने व अरबासारखा ड्रेस घालून फिरायचं, गाणी ऐकत जेवण घ्यायचे व ज्यांना हुक्का ओढायचा त्यांना तिथे मोठ मोठे नक्षीदार हुक्के ठेवलेले होते ते ओढायचे व रात्री उशीरा आम्ही परत आलो.

दुबई फेस्टिव्हल तिथे खूपच प्रसिद्ध आहे. आम्ही बूर्ज खलीपा हॉटेल पाहिले व संध्याकाळी दुबई फेस्टीवलला भेट दिली. सर्व जगातील अनेक देशाचे काही एकरात स्टॉल लागले होते. प्रत्येत देशाचे पदार्थ तेथे विकायला होते व सांस्कृतिक कार्यक्रमही तिथे होते. त्या देशाचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या देशातील लोकांना आमंत्रित करायच्या अनेक गोष्टीमध्ये सवलती द्यायच्या. त्या काळात विमान तिकीटाला कन्शेशन, शहरात बस फुकट. त्या वेळी मोबाईल नव्हते तर कॉल फॅसिलिटी स्वस्तात. प्रत्येक गोष्ट फेस्टीव्हलच्या काळात स्वस्त व त्यामुळे जगातील लोक तिकडे आकर्षिले जातात व मोठ्या प्रमाणावर बाजाराला प्रोत्साहन मिळते.

दुसऱ्या दिवशी तेथून आम्ही मॉरीशसला गेलो. दक्षिण आफ्रिकेच्या बाजूला जे समुद्रात एका बाजूला अत्यंत शांत समुद्रात हे एक बेट आहे. अत्यंत स्वच्छ व एकदम निळे भोर पाणी , काहीही प्रदुषन नाही. अत्यंत हिरवेगार बेट म्हणजे मॉरीशस, वैशिष्ट्य म्हणजे तिथे अनेक भागांत मराठी बोलली जाते. हिंदी बोलली जाते व बिहारमधून पूर्वी शेती करण्यासाठी गुलाम नेहले जात होते त्यामुळे मूळ भारतीय वंशाच्या लोकांचीच संख्या त्या ठिकाणी जास्त आहे. तिथे ऊस हे मुख्य पिक आहे. कुठेही जिकडे तिकडे ऊसाचेच पिक दिसते व डोंगरावरही ऊस. आम्ही तिथे गेलो त्यावेळी महात्मा गांधीसारखा तिथला स्वतंत्र सेनानी जिकडे तिकडे पुतळे असलेला माणूस म्हणजे 'राम गुलाम'. अशा सुंदर देशामध्ये आमचे एका निवांत जागी हॉटेल होते. मी व वांजळे पोहत बसायचो स्विमींग टँकमध्ये व बाकीचे काही लोक निवांत लावत बसायचे. एके दिवशी आम्ही समुद्रात गेलो. १०० वर्षांपूर्वी एक जहाज बुडालेले होते

व ते छोट्या पानबुडीच्या साहाय्याने बघायचे. ते पाहण्यासाठी गेलो. ते जहाज समुद्राच्या तळात तसेच होते. अत्यंत भयंकर महाकाय जहाज व समुद्रातील प्राणी पहात पहात आम्ही त्यातून बाहेर पडलो. पाणबुडीत कोंडल्यासारखे वाटत होते. हेमंत जोशी यांना चक्कर आली व वर आल्यावर १०-१५ मिनीटे आम्ही घाबरलो की आता हा माणूस उठतो की नाही व तिथून आम्ही परत भारतात आलो.

## अमेरिका

आम्ही अमेरिकेतील विद्यापीठांना भेटी देण्याचे ठरविले व चिटणीस सरांनी सर्व प्लॅन केला. आम्ही बुकिंग केले. कोणत्याही एजंटचा वापर केला नाही व बऱ्याच ठिकाणी आम्ही सुटस् भाड्याने घेतले. भारतीय पदार्थांचे पॅकेटस् आम्ही सर्वांनी ठरवून ५-५ किलो बरोबर घेतले होते. या टूरला मात्र मी, प्राचार्य चिटणीस, प्राचार्य निकम, प्राचार्य बाबा सांगळे, प्रा. अरुण गायकवाड व ढोले पाटील असे पाच जण गेलो. जातानाच आम्ही सर्व प्रथम इंग्लंडमध्ये दोन दिवस थांबण्याचा प्लॅन केला होता. पूर्वीच्या ट्रीपमध्ये आम्हाला आवडलेली ठिकाणं आम्ही पुन्हा पाहिली. नाईल नदी, लंडनचा ब्रिज व आम्ही लंडनमधील दोन विद्यापीठाला भेटी दिल्या. तेथील शिक्षण पद्धती समजावून घेतली. लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्सला भेट दिली. बंकीम हॅम पॅलेस, विविध गार्डन व पर्यटन स्थळालाही भेट दिली व तेथून अमेरिकेला रवाना झालो. अमेरिकेला सुरुवातीला आम्ही न्यूयॉर्क मार्गे वॉशिंगटन डी-सी ला गेलो. तिथे दोन दिवस राहिलोत व वॉशिंगटनमध्ये व्हाईट हाऊस, वेगवेगळ्या सायन्स म्युझीयम यान, सर्व शोध अशा अनेक गोष्टी पाहिल्या. अमेरिकेतील शिस्त, वाहन चालविण्याची पद्धत, सर्व लोक स्वतःचं काम स्वतःच करतात अशा अनेक गोष्टीने आम्ही भारावून गेलो.

संध्याकाली ७ वाजता आम्ही भारतीय पद्धतीचे जेवण घेतले व आम्ही बाय रोड नायगरा धबधबा पाहण्यासाठी निघालो. आम्हाला चिटणीस सरांचा एक मित्र भेटला. त्याने सर्व गोष्टी पुढे नियोजित केल्या व साधारण १२०० कि. मी. अंतर जाण्यासाठी आम्ही निघालो. कार एकदम आलिशान होती. त्याचा ड्रायव्हर मोहम्मद रफी, लता मंगेशकर यांची

जुनी गाणी लावत होता. नाव पटेल होते. आम्ही चौकशी केल्यावर समजले की, तो पाकिस्तानातील आहे. पण खुप प्रेमळ व चांगला होता.

नायगरा धबधबा ते वॉशिंगटन हे अंतर आम्हाला वाटलं खूप वेळ लागेल पण रस्त्याचा दर्जा, कमी गर्दी, मोठी चांगली गाडी यामुळे एवढे अंतर आम्ही पहाटे पाच वाजताच तिथं पोहोचलो व मुख्य धबधब्याऐवजी आम्ही पहाटे दुसराच धबधबा बघितला व आश्चर्यचकीत झालो. उजेड पडल्यावर आम्ही पुन्हा बघण्यासाठी गेलो तर दुसऱ्या लोकांनी तो शेजारी दुसऱ्या बाजूला असल्याचं सांगितले. नायगरा धबधब्याच्या नदीच्या एका बाजूला अमेरीका आहे, तर दुसऱ्या बाजूला कॅनडा आहे. अत्यंत भव्य व पांढरा शुभ्र पाण्याचा प्रवाह अत्यंत मोठा हा जगातील सर्वात मोठा धबधबा आम्ही पाहिला व रस्त्याच्या मार्गे आम्ही न्यूजर्शी वरून न्यूयॉर्कला पोहोचलो. न्यूयॉर्क ही अमेरिकेची आर्थिक राजधानी आहे. त्या ठिकाणी निग्रोची संख्या जास्त आहे व चोऱ्यांचे प्रमाणही जाणवले त्यामुळे आम्हाला थोडा सावधानतेचा इशारा दिला गेला होता. आम्ही स्टॅच्यू ऑफ युनिटी टॉवर यासारख्या पर्यटन स्थळाला भेटी दिल्या.

तिथून आम्ही फ्लोरींडा येथे गेलो व तिथल्या युनिर्व्हसिटी ऑफ साऊथ फ्लॉरींग या विद्यापीठाला भेट दिली. त्या ठिकाणी आमचे प्रेझेन्टेशन होते. आम्ही उतरल्यापासून हॉटेलपर्यंत व सेमीनार होर्ट पर्यंत एक एक मिनीटाचं नियोजन एकही प्राध्यापक एक मिनीटही वाया घालवत नव्हता. आम्हाही त्याच पद्धतीने वागावे लागत होते. त्या ठिकाणी एक दिवस आम्हाला दिलेला होता. आम्ही प्रेझेन्टेशन करताना सर्वसाधारण प्रत्येकाला एक तास वेळ होता. आम्ही अर्धा तास प्रेझेन्टेशन करायचे त्यावर प्राध्यापक आमच्या विषयानुसार अमेरिकेत काय त्या विषयाची स्थिती आहे हे सांगत होते. व त्यावर मग प्रश्नोत्तरे होत. एक मिनिटही लवकर सोडले जात नव्हते. पूर्ण वेळ उपयोगात आणला जात होता. हे मात्र भारतात अनेक ठिकाणी घटताना दिसत नाही. आम्हाला दुपारी जेवण देताना सुद्धा चायनिज दाखवले जात होते व त्याही वेळा चायनिज जेवणाची माहिती व रेसीपी सांगितली जात होती. एवढा विनियोग वेळेचा केला जात होता.

तिथे आम्ही एक सेंटर पाहिले. त्याला पटेल कनव्हेशनल सेंटर असे नाव दिले होते. त्यावेळी चौकशी केली असता समजले की गुजरातचे पटेल म्हणून एक डॉक्टर जोडपे आहे. त्यांचे स्वतःचे चार्टर विमान आहे. स्वतःची विमा कंपनी आहे. त्याने या युनिवर्हसिटीला १०० कोटी रुपये डोनेशन दिले व आशिया खंडातील कोणत्याही देशातील विद्यार्थी अमेरिकेत पहिल्यांदा शिक्षण घेण्यासाठी आला तर त्याला काही काळ राहणे व मार्गदर्शन करुन त्याला त्याच्या विद्यापीठापर्यंत ॲडमिशन होईपर्यंत पूर्ण मार्गदर्शन केले जात होते. अशी मोठी माणसही पहावयास मिळाली. त्याचबरोबर तिथे पेट्रोल पंपावर कर्मचारी नसतात. सर्व काही ॲटोमॅटीक. एक सरदारजी अमेरिकेत आहे. त्याचे चार हजार पेट्रोल पंप असल्याचेही तिथले रहिवासी व चिटणीस सरांचे मित्र श्री. सुब्बाराव यांनी सांगितले. पेट्रोल पंपावर कॅश स्वीकारली जात नाही. कार्ड स्वीप करायचे व तेवढे पेट्रोल येते.

त्यानंतर विद्यापीठातील इंजिनीअरींग डिपार्टमेंट पाहण्याचा आग्रह श्री. सागर ढोले यांनी केला कारण त्यानी नवीनच इंजिनिअरींग कॉलेज पुण्यात सुरू केले होते. आम्ही दोघेच त्या ठिकाणी गेलो वेगवेगळे डिपार्टमेंट पाहिले. आपल्यासारखीच नुसतीच इमारत भव्यता फक्त नव्हती तर शिक्षक प्रॅक्टीस घेताना दिसले. प्रॅक्टीसला जास्त महत्व दिल जाते होते. अजून एक नवीन गोष्ट आम्हाला बघावयास मिळाली ती म्हणजे तिथले माजी विद्यार्थी विद्यापीठातल्या डिपार्टमेन्टमध्ये येऊन शिकवतात. व त्याचा फायदा विद्यार्थ्यांना जास्त होतो. कारण त्याच्या पातळीवर येऊन ते शिकवतात. आपल्यासारखी नॉन टिचींगची गर्दी तिथे दिसत नाही. एक दोन लोकच अख्खा विभाग सांभाळताना दिसतात. ज्यावेळी आम्ही पेंटेट पाहिले त्यावेळी भारतीय विद्यार्थ्यांनीच जास्तीत जास्त पेंटट मिळवलेले दिसले पण त्या विद्यापीठाच्या नावावर ते दिसले.

तिथून आम्ही ओरलंडोला गेलो तिथली डिस्नीलँड प्रसिद्ध आहे. तिथे पूर्ण एक दिवस लागतो. एवढा मोठा परिसर त्या ठिकाणी आहे. साहसाचे अनेक गेम त्या ठिकाणी पाहायला मिळाले. पण त्यात सर्वात मोठा खेळ बघण्या लायक खेळ म्हणजे ३डी मध्ये तिथे विमानाचा खेळ व स्पायडर मॅन हा गेम जणू काही आपणही त्याच्या बरोबर पळत आहोत. असं भासत

होत. थ्रील, भीती व आश्चर्य याचा साक्षात नमूना म्हणजे ऑरलंडो हे डिस्नीलॅन्ड होय.

तिथून आम्ही शिकागोला गेलो. शिकागो पासून आम्हाला इंडियाना पुलिस स्टेटला जायचे होते. ते चार तासाच्या अंतरावर होते. चिटणीस सराचे मित्र श्री. शर्मा हे आम्हाला स्वतःची गीडी घेऊन नेण्यासाठी आले होते. त्यांची पत्नी ही पुण्यातील असल्यामुळे आम्हाला अनेक वेळा त्यानी घरीही जेवायला नेले. अत्यंत स्नेह दिला त्याच विद्यापीठ बॉलस्टेट युनिव्हर्सिटी पूर्णपणे दाखविली. अमेरिकेत सर्वच विद्यापीठाचा एरीया अनेक हजार एकरात असतो. वेगवेगळे तिथे सेंटर असतात. ब्लू -लाईट म्हणून लाईट लावलेल्या असतात, कुणाला अडचण आली किंवा काही प्रॉब्लेम निर्माण झाला तर तिथले बटन दाबले की लगेच पोलीस गाडी येते व मदत करते. बॉलस्टेट विद्यापीठ फार मोठे होते. त्यांच्या अनेक बिव्डींगवर सौर ऊर्जा होती. आधी त्या ठिकाणी संगीत विभाग पाहिला. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र रुम व त्यासाठी कॉम्प्युटरवर सर्व शिक्षण रियाज करताना काय चूका झाल्या हे सुद्धा कॉम्प्युटर सांगते. तिथे छोटे स्टेज, मोठे स्टेज सर्व प्रॅक्टीस उपलब्ध होते. सर्व वयस्कर शिक्षक रिटायरमेंन्ट शिक्षकासांठी नाही व परमनन्ट ही सर्वात आधी शिक्षकच होतात. त्यांचे एमबीए डिर्पाटमेंन्ट पाहिले. शेअर मार्केट विभाग पाहिला. प्रॅक्टीकल म्हणजे डायरेक्ट तिथून शेअर खरेदी विक्री स्वतः विद्यार्थी करतात. अशा प्रकारे प्रॅक्टीस करतात. असा अत्याधुनिक एमबीए विभाग व त्याचे डीन शर्मा होते.

तिथे फक्त डाऊन टाऊन एरियातच गर्दी असते पण शहरा बाहेर एकरानुसार बंगल्याच्या मोठमोठ्या कॉलनी असतात. बंगलेसुद्धा किंवा साहित्याची डीझाई' मॉलमध्ये रेडीमेड पाहायची व बंगला सुद्धा स्वतःच फीट करायचा व त्याची लाईफ गॅरंटी १००-१०० वर्षाची असे क्वालीटीचे व महत्त्वाचे म्हणजे बोगस मालाला तिथे लगेच बँन केले जाते व सर्व अॅटोमॅटीक. तुमचा बंगला समजा एक एकरात आहे आजुबाजूचे गवत व स्वच्छता तुम्ही तुमची करायची असते. गवत जर १० इंचापेक्षा जास्त वाढले की कॉर्पोरेशनची नोटीस येते व आठ दिवसात गवत काढा असे सांगितले जाते व नाही काढल्यास ते येतात गवत कापतात व बिलाची नोटीस देतात. अशी खूप शिस्त पाहावयास मिळाली. मॉलही मोठ मोठे आहेत. सर्व

वस्तू डिस्प्ले केल्या जातात. गार्डन सुद्धा कसे दिसेल ते डिस्प्ले केले जाते व ऑर्डर दिल्यास तसेच तयार करुनही मिळते. पॅकेज सगळा विभाग पंख्यांचा लाईट म्हटल की संपूर्ण विभाग लाईटचाच असे सर्व प्रकारचे मॉल उपलब्ध आहेत.

आपल्या भारतासारखी तुकड्याची शेती तिथ नाही तर मैलात शेतीचे फार्म असतात व एकच माणुस मशिनच्या साहय्याने शेती करत असतो. फार मोठ्या प्रमाणावर मकाचे पिक दिसले. मैलोन मैल फक्त एकाच माणसाची शेती असते.

आम्ही त्या अगोदर शिकागोमध्ये शहर पाहिले सव्वाशे वर्षापूर्वी एक महान संन्याशाने भारत मातेचे नाव जगाच्या पाठीवर पोहचवल ते शहर होते शिकागो. त्याठिकाणी आम्ही ते ठिकाणही पाहिले की ज्या किठाणी धर्म परिषद झाली होती व त्यात दोन मिनिट मिळालेल्या माणसाने बंधुभगिनी हा शब्द उच्चारताच दोन मिनीट तर टाळ्याच पडल्या होत्या त्या भूमीचे दर्शन घेऊन आम्ही पवित्र झालो.

आम्ही तिथुन बॉलस्टेट विद्यापीठात आलो सर्व पाहिले व पुन्हा तीनचार दिवस तिथे राहून परत आमचे भारतासाठी विमान हे लंडन मार्गे शिकागो वरुन होते. पुन्हा आम्हाला सोडण्यासाठी शर्मा पती पत्नी स्वतः आले. रस्त्यात फार मोठा फार्म लागला. चौकशी केली असता तो फार्म २००० एकर जमिनीवर होता. १०,००० गाई त्यामध्ये होत्या आम्ही तो पहायचं ठरवलं. हायवे पासून सुरू होत होता. तिथंच गवत कापणारी यंत्र होती. गाईना बसण्यासाठी व चाऱ्यासाठी बेगळा विभाग होता. दूध काढण्यासाठी शंभर गाई एक वेळा त्या मशीनवर उभा राहून दूध काढण्याची व्यवस्था होती. एक राऊंड मशीनचा पूर्ण होई पर्यंत पूर्ण दूध निघायचे शेजारीच दूध शीतकरणाचा कारखाना होता. दूध निघाले की एका टाकीत गरम व्हायचे दुसऱ्या टाकीत थंड व्हायचे व लगेच मोठमोठे आपल्या टँकरच्या दुप्पट लांबीचे टँकर दूध भरून शहरात पाठवले जायचे. त्याच्या बाजूला एक दुग्धजन्य पदार्थ बनवण्याचा कारखाना होता उरलेले दूध पाईपलाईनने त्या कारखान्यात जायचे व आईस्क्रीम व इतर पदार्थ तयार केले जायचे. हायवेच्या आऊटलेटला जेवढे पदार्थ लागतात तेवढे ठेऊन उरलेले गाईच्या शेणापासून बायोगॅस तिथच बाजूला तयार केला जायचा व हायवेला लगेच गॅस पंप व तिथ

त्याची विक्री असा अजब फार्म मी जीवनात कुठेच पाहिला नव्हता.

आम्हाला शिकागोला सोडून शर्मा दांम्पत्य परत आले व आम्ही शिकागो विमानतळावरून लंडनकडे प्रयाण केले. त्यावेळी तिथे वादळ झालेले होते. वातावरण बरोबर नव्हते. आम्हाला त्यावेळी तिथ शर्मा साहेबांनी किस्सा सांगितला, गुजरातचे एक आजोबा नातु व मुलाला भेटायला आले. मुलगा व सुन नोकरीला गेल्यावर मुलगा माकड चेष्टा करु लागला म्हणून आजोबानी त्याला फक्त टपली मारली व त्या लहान मुलाने लगेच ९११ ला फोन केला व पोलिसाला सांगितले की आजोबानी त्याला मारले. He asalted me पोलीस आले त्या म्हाताऱ्याला घेऊन गेले. वडील आल्यावर त्याने त्याच्या वडीलाला सांगितले काय काय घडले आजोबाला मुलाने सोडवून आणले. आजोबा त्याच्या मुलाला म्हणाले, बाबा मला तुझी अमेरिका बघायची नाही व इथली जेलही बघायची नाही. मला भारतात लगेच जायचे आहे. तिथे लहान मुलाला मारू शकत नाहीत.

आम्ही ज्यावेळी हायवे वरून प्रवास करत होतो. त्यावेळी पोलीसाचे सायरन वाजले पोलीसांची गाडी उलट्या दिशेने वनवेमधून येत होती. सर्व हायवेच्या गाड्या जागेवर शांत उभ्या राहिल्या व अगोदर पोलिसाला वाट दिली. हेही मोठे आश्चर्य व नियम पाळणारे लोक आम्ही पाहिले. आम्ही परत शिकागोवरून निघालो वादळानंतर आमचा प्रवास होता. एक तास झाले असेल की विमान फार हालत होते. बाहेरचे वातावरण खराब आहे. जागेवरून उठू नका बेल्ट बांधा असे पायलट नेहमी सांगत होता. असे भीतीमध्ये किमान एक दोन तास तरी गेले असतील व मधून मधून पुन्हा पुन्हा ते घडत होते.

तिथून आम्ही लंडनला पोहचलो दुसऱ्याच विमानतळावर हे विमान उतरले होते व आमचे विमानतर तिथून एक तासावर होते. विमानाला दोन तासच अंतर होते व लंडनची गर्दी व हा वेळ हाही चिंता वाढवणारा होता. तसे तरी सव्वा तासात आम्ही पोहचलो. तिकीट दाखवून आत गेलो तर तिकीट काढताना चूक झाली होती. सांगळे सरांचे तिकीट हे सकाळ ऐवजी संध्याकाळचे होते व आम्ही प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही. आमची तिकीटे कॅन्सल केल्यावर नुकसान जास्त होत होते. शेवटी चिटणीस सराचे एकट्याचेच

तिकीट बदलून ते दोघे आमच्यानंतर संध्याकाळच्या विमानाने आले व आम्ही त्याच्या आधी आलो.

## नेपाळ - कैलास मानस सरोवर

एकदा आम्ही कैलास मानस सरोवरला दर्शन घेण्यासाठी जावयाचे ठरविले. भारतातून जाणे मुश्किल आहे. कारण हे स्थान आता चीनच्या ताब्यात आहे. ज्या वेळेला १९६२ साली चीन व भारताची लढ़ाई झाली त्या वेळी चीनने भारताच्या ताब्यातून घेतला व आता चीनचा ताबा त्या ठिकाणी आहे. त्यामुळे भारत सरकारकडून फक्त १००–१०० माणसाच्या १० तुकड्याच पाठवल्या जातात. त्यामुळे नंबर लागणे मुश्किल आहे. पण आम्हाला असे समजले की नेपाळला जायचे व तिथून तिबेट मार्गे कैलास मानस सरोवरला जायचे व पंधरावीस हजार लोक भारतातील नेपाळ मार्गे दरवर्षी जातात. मग आम्ही नेपाळ मार्गे जाण्याचे ठरविले. नेपाळ हे पूर्णपणे हिंदू राष्ट्र आहे. त्या ठिकाणी भारतातील काही तिर्थक्षेत्र आहेत. पशुपतीनाथ हे त्यातील एक उदाहरण आहे. नेपाळ व भारत देशाच्या करारानुसार नेपाळला जाण्यासाठी व्हीजा लागत नाही. व्होटर आयडी असले तरी नेपाळमध्ये सोडतात. आम्ही नाना–नानी टूर्स याच्या बरोबर भारतात अनेक तिर्थक्षेत्राच्या टूर्स केल्या होत्या. त्यांची ही पहिलीच ट्रीप होती व कैलास मानस सरोवरला जायचे निश्चित केले. कैलास मानस सरोवर म्हणजे सगळ्यात शेवटचे हिंदू धर्मातील तिर्थक्षेत्र. अती दुर्गम व कठीण अशा प्रकारचे. आम्ही जाण्याच्या अगोदर दोन दिवस नेपाळमधील विविध ठिकाणाला भेटी दिल्या. माझ्या बरोबर अग्रवाल शेठ होते. त्यांचे वय साठपेक्षा जास्त होते. तरीही दुर्गम भागात येण्यासाठी तेही आमच्या बरोबर निघाले. आमच्या बरोबर महिलांची संख्या जास्त होती. त्यामुळे जबाबदारी होती. नेपाळमधून आम्ही नेपाळच्या चीनच्या बॉर्डरला आलो व नदीच्या अलीकडे नेपाळचे सेंटर होते व नदीच्या दुसऱ्या बाजूला चीनची मिलीटरी चौकी होती. चीनच्या चौकीत प्रवेश केल्याबरोबर त्यांनी आमचे पासपोर्ट काढून घेतले. कारण कैलास मानस सरोवरला एवढे हिंदु लोक येतात व त्याचे ते दैवत आहे म्हटल्यावर आंतरराष्ट्रीय वादात पुरावा नको म्हणून आम्हाला व्हिजा वगैरे काहीच दिला नाही. उलट आम्हाला नंबर दिले. प्रत्येक तुकडीत

अंदाजे ५० लोक व प्रत्येकाच्या साहित्याला व त्या व्यक्तीला एकच नंबर फक्त १ – २ – ३ – १० – २० – ३० – ५० असे माणसालाही नंबर दिले गेले. चायनात प्रवेश केल्याबरोबर तिथली संडासची रुम हे एक अत्यंत घाणेरडा अनुभव देणारी गोष्ट. संडासमध्ये फक्त ३ फुटाची भिंत व संडास आपल्यासारखे नाही. खाली खड्डा व सौच्च तसेच साठलेली मरणाची घाण हा अनुभव अतिशय वाईट. तिथून डोंगर दुर्गम असल्यामुळे व जाण्या येण्याचा प्रवास हा तेरा दिवसांचा असल्यामुळे पाच माणसाला स्वतंत्र टोयोटा गाडी व ड्रायव्हर अतिशय मुजोर. आम्हाला अगोदरच सूचना देण्यात आल्या होत्या की त्यांच्याशी काहीच बोलायचे नाही. त्यांना ज्या वेळेला थांबायच त्या वेळी ते थांबतील. त्यांना जीतपर्यंत जायच तीथपर्यंत जातील. तुमच्या पैकी कोणीच काहीच बोलायचे नाही व तेही तुमच्याशी बोलणार नाहीत. त्यांचे जिथे उभे राहायचे ठरले तेथेच ते सर्वजण थांबायचे, शिगारेट ओढायचे. थोडे थांबायचे व पुन्हा चालू लागत. प्रत्येक मुक्काम हा थोडा लवकरच ठरवला जात होता कारण हिमालयाचा भाग आहे. रोज दुपारी चार नंतर कधीही वातावरणात बदल होतो व मुसळधार पाऊसही येतो त्यामुळे दररोज उतरल्यापासून दिवस मावळेपर्यंत डोंगर चढण्याची प्रॅक्टीस करावी लागत होती. कंपल्सरी रोज प्रॅक्टीस करायची. डोंगराची उंची रोजची रोज वाढत चाललेली होती. हवा विरळ होत चालली होती. तिथे कोणत्याही प्रकारची झाडी नाही. एक तर बर्फ आणि बर्फ वितळला तर खाली खडक त्यामुळे ऑक्सीजनचे प्रमाण दररोज विरळ होत चाललेले. त्या प्रदेशात एवढी थंडी होती की आम्ही सर्वांना आतुन थर्मल, त्यावर आपला ड्रेस, त्यावर गरम कपडे व त्यावर रेनसुटस्. पाच पाच कपडे अंगात घातले तरी थंडी कमी होत नव्हती. अंघोळ तर सोडाच तेरा दिवस तोंडाला पाणी लावण्याची सुद्धा हिंमत होत नव्हती. पाणी पिण्यासाठी तर गरमच प्यावे लागत होते. पण चुकुण साध पाणी पिण्याची वेळ आली तर ओठाला चूनचून करत होतं. हळूहळू जेवण कमी होत चालले होते. पुढे पुढे तर फक्त वेगळ्या प्रकारचे सूप पिण्यासाठी मिळू लागले. आपल्याला मिळालेला निवास जर पहिल्या मजल्यावर असला तरी दहा पायऱ्या चडायला आमच्यासारख्या तरुण माणसाला नको वाटायचे. पुढे पुढे तर रात्री रोज एक रक्त पातळ होण्यासाठी गोळी दिल्याशिवाय झोपू देत नव्हते. कारण एवढी थंडी की, रात्रीत माणूस रक्त गोठून मरून जाणार.

तिबेटमध्ये वस्ती अतिशय पातळ आहे. १००-२०० किलोमिटरला कुठेतरी २००-३००. जास्तीत जास्त ५०० लोकांची वस्ती व तेही पूर्वीचे मेंढपाळ. ज्या ठिकाणी थांबले तेच गाव. पण चीनने त्या ठिकाणी आता शिस्तबद्ध विकास केला आहे. तिबेटमध्ये चीनी संस्कृती मुरवली आहे. प्रत्येक छोट्या गावात एक शाळा, एक पोष्ट ऑफिस, एक पोलिस स्टेशन व एक आर्मी सेंटर. बांधकाम सगळ्याची सारखी जाणीवपूर्वक गावे वसवलेली व त्यावर पूर्णपणे चीनचं वर्चस्व. तिबेटच्या एखाद्या मुलीने जर चीनी माणसाबरोबर लग्न केले तर त्याच्या आई बापाला बक्षीस दिले जाते. शाळेत चीनी भाषेचा वापर करायचा. बाहेरच्या देशाचं काहीच माहिति होऊ द्यायचं नाही. वर्तमान पत्र, टि.व्ही., बाजार सगळ्यांवरच नियंत्रण. त्यामुळे तिथल्या लोकांना बाहेरच्याचं कांहीच देण घेण नाही अस वातावरण निर्माण केलेले. तिथल्या गावात जी दुकान होती ती विचित्र होती. किराणा, भाजी, फर्निचर, मशिनरी पासून मोटार सायकलपर्यंत सर्वच एकाच दुकानात, लाईटमध्ये अंतर जास्त असल्यामुळे ताराचा वापर करून वीज नेण्यापेक्षा सौर ऊर्जेचा फार मोठा वापर केला जात होता. रस्ते एक नंबर तयार केलेले. या भागात सर्व भाग मिलीटरीच्या ताब्यात. कैलास मानस सरोवर तसे पाहिले तर भारताच्या सीमेपासून वर डोंगरात २५ कि. मी. फक्त आहे.

अखेर आम्ही खाली असलेल्या मानस सरोवरला पोहोचलो. आमची राहण्याची व्यवस्था मानस सरोवरच्या दुसऱ्या बाजूला सरोवर शेजारीच केली होती. साधारण मानस सरोवराची प्रदक्षणा ही ६० कि.मी.ची असल्यामुळे आम्हाला ती गाड्यानेच करावी लागली. पण तिथे अनेक साधू होते. ते मात्र हे सर्व पायी करत होते. छोटे मोठे मठही राज्यात अनेक ठिकाणी होते. आमचं नशीब एवढे चांगले की आम्ही पुजा करायला पोहोचलो आणि सूर्य दर्शन झालं. आम्ही सरोवरामध्ये अंघोळी केल्या. खरं तर आम्ही मानस सरोवरला जाण्याआधी मला फिसुळाचा त्रास झाला होता. गाठ यायची व ती फुटायची. डॉक्टरने मला ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले होते; पण मी ठरवले तिर्थयात्रेला जायचे आहे. जे व्हायचंय ते होऊ द्या. बघू काय होतय आणि खरचं मी मानस सरोवरला अंघोळ केली आणि तो आजार कायमचा आपोआप बरा झाला. हा माझा व्यक्तिगत अनुभव आहे. पाणी अतिशय थंड होते. आम्ही पाण्यात बुडलो व डोकं भिजवलं कारण पाणी अती थंड होते. दोनदा मानस सरोवरात अंघोळ

/ स्नान करण्याची संधी मला मिळाली. मानस सरोवरापासून कैलास पर्वत १५-२० कि. मी. आहे. पण त्याची सावली मानस सरोवरामध्ये पडलेली मी स्वतः पाहिली. हे सुद्धा एक आश्चर्यच होतं.

पुन्हा आम्ही संध्याकाळी मुक्कामाला कैलास पर्वताच्या पायथ्याजवळच राहिलो. जाताना अंतर कमी कमी आम्ही जात होतो व वातावरणाशी एकरूप होत होतो. वातावरण सुट होतं का ते बघत होतो. तिथं तर आता ऑक्सिजनचा खूपच अभाव होता व प्रदक्षिणा कैलास पर्वताची करण्यासाठी तीन दिवस पायी चालावे लागत होते. अनेक लोक तरी तिथचं मुक्कामाला थांबले. त्यांनी तिथे येऊन प्रदक्षिणा करण्याचे टाळले. आम्ही डावीकडून उजवीकडे अशी कैलास पर्वताला प्रदक्षिणा घालत होतो. पण तिथले बौद्ध लोक हे उलट्या दिशेने प्रदक्षिणा घालताना दिसले. अतिशय दुरगम अशा पद्धतीनेही वाट होती. घोडा घेण्यास परवानगी होती. प्रत्येक घोड्याला तीने दिवसाला ५ हजार रुपये भाडें होते. दुसरा कोणताच पर्याय नव्हता त्यामुळे आम्ही घोडा घेतला. माझी पत्नीही माझ्या बरोबर होती. बरोबर फक्त ५ किलो वजन घेण्याची परवानगी होती. त्या प्रत्येक घोड्याबरोबर एक माणूस बरोबर होता व त्यातही आता चांगल्या सुधारणा झाल्या आहेत. त्यामुळे राहण्याची किमान मातीच्या खोल्या तरी बऱ्या होत्या. अंघोळीचा तर प्रश्नच नव्हता. एवढी थंडी होती की विचारु नका. रोज एकदा तरी वाटायचे की आपण आता मरणार. आपण परत जात नाही. एवढी ही कठीण प्रदक्षिणा एक बाजू तर अतिशय कठीण चढ आहे व लगेच तेवढाच उतार. एवढा उतार की काही ठिकाणी बसून उतरावे लागत होते. त्यावेळी घोडेवाले आपल्याला खाली उतरवून पुढे भेटतात. ऑक्सिजनच्या नळकांड्या प्रत्येकाजवळ दिलेल्या होत्या व मोठी नळकांडी घेऊन एक माणूस एका एका ग्रुप बरोबर चालत होता. अशी कैलास पर्वताची यात्रा केली. कैलास पर्वत इतका उंच आहे. आजपर्यंत त्या पर्वतावर कोणीही चढलेला नाही. हे वैशिष्ट्य आहे व या पर्वतावर साक्षात महादेवाचे स्थान आहे असे म्हटले जाते. तिथल्या पर्वतात ॐ आवाज घुमतो व पर्वताची रचनाच सर्व बाजू महादेवाच्या पिंडीसारखी आहे. जीवनात एकदा तरी कैलास मानस सरोवर यात्रा करावी असा परीसर आहे. सरोवरात पहाटे देव-दैवत अंघोळीला येतात असा समज आहे. डोंगराच्या दुसऱ्या बाजूला असुरांना अंघोळ करण्यासाठी तसेच

सरोवर आहे. पण ते लोक लांबूनच पाहतात. म्हणतात की रावणाने स्वतःला अंघोळ करण्यासाठी त्या सरोवराची निर्मिती केली. येताना मात्र दोन दिवसातच परत आणले. रस्ते व गाड्या रोज १००० कि. मी. परत आलो. आम्ही मानस सरोवराचे पाच लिटर पाणी बरोबर आणले होते. नेपाळमध्ये विमानातून ते आणायला परवानगी दिली ; पण दिल्लीला उतरल्यावर आम्हाला फक्त १०० मिली ठेऊन बाकीचे पाणी फेकून द्यायला लावले. ही भारतीय कायदा व्यवस्था, नाही तिथे नियम लावणार व नाही तिथे लावणार नाही.

## श्रीलंका

मी आणि डॉ. सानप सर एका सेमीनारसाठी श्रीलंकेतील युनिव्हर्सिटी ऑफ कॅलेनियाला गेलो. आम्ही मुंबईवरून थेट कोलंबोला गेलो व तेथून जवळच हे विद्यापीठ होते पण कोलंबोच्या बाहेर होते. विद्यापीठातील कार्यक्रमात आम्ही गेलो. तिथल्या सेमीनारमध्ये माझे लेक्चर झाले. एनसेंट रिलेशनस् वुईथ श्रीलंकाच्या विषयावर मी बोललो. माफा नावाचा एक प्राध्यापक डॉ. सानप सर यांचा विद्यार्थी होता. त्याच्याकडे आम्ही शेजारीच हॉटेलमध्ये रहात होतो. श्रीलंकेचे सृष्टी सौंदर्य अत्यंत चांगले होते. केरळसारखा हिरवागार प्रदेश व डोंगर व नद्या चहुबाजूने समुद्र अंदाजे ४५० कि.मी. x २०५ कि.मी. भूप्रदेश. आम्ही गेलो त्याच्या आधीच तमीळ अतिरेक्यावर मिलीटरी ऑपरेशन झालेले होते त्यामुळे वरच्या भागात थोडे भीतीचे वातावरण होते. श्रीलंकेत ९०% लोक बौद्ध आहेत. बाकी ख्रिश्चन व मुसलमान. आम्ही भारतातून गेल्यामुळे आम्ही गौतम बुद्धाच्या भूमितून गेल्यामुळे आम्हाला खूपच सन्मान दिला जात होता. अनेक बुद्ध मंदिर व स्तूप आम्ही पाहिले. बुद्ध भिक्षुकांचे अनेक आश्रम आम्ही पाहिले. रेग्यूलर शिक्षणासाठी त्या ठिकाणी सर्वांचा शाळेत नंबर लागत नव्हता. त्यांच्या बाहेरुन शाळा त्या आश्रमता भरत होत्या. त्या ठिकाणी सर्रास बौद्ध भिक्षुच्या आश्रमात या शाळा व कॉलेज वर्ग चालताना दिसले. विद्यापीठही आख्ख्या श्रीलंकेत पाचच आहेत. इंग्रजांनी स्थापना केलेली विद्यापीठे आजही चांगल्या स्थितीत आहेत व मोठ्या जागेत वसली आहेत. अशा दोन तीन विद्यापीठालाही आम्ही भेटी दिल्या. एक आठवड्यासाठी आम्ही गेलो होतो. त्यामुळे माझ्याकडे भरपूर वेळ होता. श्रीलंकेची भाषा शिंहली आहे. अनेक

लोकांना हिंदी समजत नाही पण तिथल्या सर्रास थियेटरला हिंदी सिनेमे दिसतात. मी सुद्धा एक अमिताभ बच्चनचा सिनेमा तिथल्या लहान मुलांना घेऊन पाहिला व त्यांच्या भाषेतलाही एक सिनेमा पाहिला. आम्ही रामायणाची आठवण तिथल्या लोकांना करून दिली पण ते रावणाला मानणारे असल्यामुळे बुद्ध धर्मात नंतर गेल्यामुळे थोड्याच प्रमाणात त्यांना रामायण माहित आहे. पण एक पर्वत आम्हाला तिथे दाखवला व खरोखरच एका पर्वतावर पूर्ण झाली व दुसऱ्या पर्वतावर एक गवताची काडी सुद्धा नाही. काळा भोर भाग. तिथे अशी आख्याईका आहे की हनुमानाची शेपटी पेटवली व लंका दहन केली त्या वेळेला हनुमान त्या ठिकाणी उतरला होता. तिथे आज सुद्धा काहीच उगवत नाही. आम्ही कोलंबोला जाऊन तिथले क्रिकेट ग्राऊंड लांबूनच पाहिले कारण त्या वेळी भारत–श्रीलंका क्रिकेट सामना चालू होता. समुद्र किनारा पाहिला. एका दुर्गम भागात गौतम बुद्धाचे मंदिर आहे. तेही पाहिले. आमच्यासाठी माफाच्या मित्रांनी त्याच्या घरी जेवण दिले. तिथे संगीत पार्टी ठेवली. प्रत्येकाची घरे व बंगले अत्यंत सुंदर होती. त्या भागात लाकडाचा खूप पुरवठा असल्यामुळे लाकडाचा वापर बंगल्यात मोठ्या प्रमाणावर दिसून आला. आपल्यापेक्षा त्याची डॉलरची अवस्था फार बिकट आहे. आपल्या एक रुपयाला त्यांचे दोन रुपये किंमत आहे. त्यामुळे प्रत्येक वस्तुची किंमत आपल्या पेक्षा दुप्पट दिसून येते. त्या देशाचं वैशिष्ट्य म्हणजे सर्व वस्तू व माल बाहेरच्या देशातून आयात करावा लागतो. शेती सोडून त्या देशात काहीच उत्पादन होत नाही. प्राध्यापक व डॉक्टरांना खूप मान आहे. त्यांना गाडी घ्यायची असेल तर कमी व्याजाने कर्ज मिळतात.

▸▸ ▸▸

# १४. भारत भ्रमण

भारत देशामध्येही मी खूप पर्यटन केले. त्यापैकी जास्तीत जास्त पर्यटन हे तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी केले. भारतामधील अनेक महत्त्वाच्या व कठीण तीर्थक्षेत्राला भेटी दिल्या. त्यापैकी उत्तर भारतातील वैष्णोदेवी असो किंवा उत्तर भारतातील चारोधाम. म्हणजेच गंगोत्री, यमोनोत्री, केदारनाथ व बद्रिनाथ ही तीर्थक्षेत्रे हिमालयात अत्यंत दुर्गम ठिकाणी आहेत व बराचसा अनुभव इथेही कैलास मानस सरोवर यात्रेसारखा येतो. मी दोनदा ही तिर्थ यात्रा केली व हिमालयातील सुंदर निसर्गाचंही रम्य दर्शन झालं. आम्ही नाना नानी टूर्स बरोबर गेलो. माझ्या भ्रमणामध्ये तीर्थ यात्रा जास्त होत्या व त्या तीर्थयात्रेमध्ये वयस्कर महिलांचा समावेश होता. ज्या मुलांना नोकरीमुळे आपल्या आईला तीर्थयात्रेला घेऊन जाता येत नाही त्यांच्या आईचा मी सुद्धा मुलगा झालो. मी त्यांना तीर्थयात्रेला घेऊन गेलो. उदा. आमच्या गावचे सुपुत्र व पुणे शहराचे ॲडीशनल कमीशनर ऑफ पुलिस अशोक मोराळे असोत की महाराष्ट्र राज्याच्या सेल्स टॅक्सच्या जॉईंट कमिशनर सुभाष मोराळे यांच्या मातोश्री असोत अशा अनेक जेष्ठ महिलांना मला तीर्थयात्रेला घेऊन जाता आले व माझ्या आईची उणिव भरून काढता आली. माझी आई मी नववीत असतांनाच वारली व तीची सेवा करण्याची संधी मला कधीच मिळाली नाही. याची नेहमी मला खंत वाटते. आम्ही उत्तर भारतातील चारधामला निघालो. यात्रा मोठी कठीण होती. येथून सुरुवातीलाच आम्ही रेल्वेने गेलो. दिल्ली या ठिकाणी उतरलो. तेथून आम्ही हरीद्वारला बसने गेलो. दौरा मोठा होता. जवळ जवळ तीन आठवड्याचा दौरा होता. आम्ही दोन मुक्काम हरीद्वार या ठिकाणी केले. संध्याकाळची तिथली गंगा आरती केली. तो अत्यंत सुगम सोहळा आहे. हजारोंच्या संख्येने लोक गंगा आरतीसाठी जमतात व गंगेत स्नान करतात. तेथून आम्ही जोशी मठ मार्गे सुरुवातीला यमनोत्रीला गेलो. हे कठीण एवढ्यासाठी आहे की हिमालयाच्या अनेक खोऱ्या आहेत व

प्रत्येक वेगवेगळ्या खोरीमध्ये हे एक एक तिर्थक्षेत्र आहे. यमनोत्रीलाच यमुना नदीचा उगम होते. दुर्गम डोंगर व खोल दऱ्या असल्यामुळे व हिमालयाचे डोंगर ठिसूळ असल्यामुळे नेहमी हे डोंगर घसरत असतात व केव्हा रस्ता बंद होईल सांगता येत नाही व केव्हा आपल्या अंगावर एखादा दगड पडेल व आपण जिवंत सुद्धा राहणार नाही असे अनेक प्रसंग येतात. बऱ्याच वेळा रस्ता हा एकेरी असतो. भूस्ल्लखन झाल्यावर तिथे अडकून पडतात. पण आमचं नशीब असं की एका ठिकाणी फक्त आम्ही येतांना एक-दोन तास अडकलो पण एकदाही आम्हाला अडकून बसावे लागले नाही. नाही तर अनेक लोक दिवस दिवस अडकून पडतात. जवळ जवळ दोन तिर्थासाठी घोडा लागत नाही. नाहीतर यमनोत्रीला जाण्यासाठी जवळ जवळ ९ कि. मी. घोड्यावर कमी रस्त्यावरून जावे लागते व कधी घोडा घसरला तर एवढी खोल दरी की प्रेतही मिळणार नाही व माणूस तर जिवंत राहणारच नाही. कड्या कपारातून रस्ता काढलेला. घोड्यावर बसण्याची सवय नसल्यामुळे खाली चामडी निघतात व खडी तपश्चर्या होते. अशा दुर्गम भागात हे क्षेत्र आहे. रात्री ७ ते सकाळी ७ वाजेपर्यंत हिमालयातील अनेक ठिकाणचे रस्ते बंद असतात. पण दिवसभर प्रवास करून सुद्धा आपण १००-१५० कि. मी. अंतरच कापतो व बस मात्र आठ-दहा तास चालत असते. चढ-उतार, दुर्गम रस्ता व बस सुद्धा आपल्याकडचा ड्रायव्हर चालवू शकत नाही. एकदम दरीच्या बाजूला रस्ता, एकदम काठोकाठ. त्यामुळे नेहमी भीतीचे वातावरण. तसे गंगोत्रीलाही आम्ही गेलो, बद्रीनाथला गेलो पण केदारनाथ हे तिर्थक्षेत्र पुन्हा अवघड आहे. जाण्यासाठी जवळ जवळ चौदा किमी व तेवढेच घोड्यावरून परत. नंतर आता पाच वर्षापूर्वी जेव्हा हा भाग अती पावसाने वाहून गेला. त्या वेळेला आम्ही मुक्काम केलेला सर्व रहिवासी भाग पूर्णपणे वाहून गेला होता. तिथे एक खडा सुद्धा शिल्लक नव्हता. पुरातन अजब मंदिर त्या ठिकाणी पाहायला मिळाली व दर्शनाचा दुर्लभ लाभही मिळाला.

येताना आम्ही जोशी मठ या ठिकाणी थांबलो. त्या ठिकाणी शंकराचार्यचा मठ आहे. त्या मठामध्ये आम्ही गेलो. शंकराचार्याचे दर्शन घेतले. त्यांच्याबरोबर भजनाच्या कार्यक्रमात सहभागी झालो व त्यांच्याबरोबर बोलण्याचीही संधी प्राप्त झाली.

वैष्णोदेवी व जम्मू यात्रा ही आम्ही केली. वैष्णोदेवीच्या दर्शनालाही लोक रात्री डोंगरावर चढतात. आम्हीही जवळजवळ १२ कि. मी. वर चालत गेलो व पहाटे परत चालत आलो. शार्दूल छोटा होता तरी तो वर चढला. उतरताना मात्र तो थकला कारण पहाट झालेली होती. झोपेची वेळ झाली होती. म्हणून येताना अर्ध्यातून घोडा घेतला. पण दुसऱ्या दिवशी तिथल्या माणसाकडून पाय चोळून घ्यावे लागले. दोन दिवस नीट चालता येत नव्हते. जम्मूचा राजवाडा पाहिला, हरीशिंग यांचा.

एकदा आम्ही काशीलाही गेलो. त्यावेळीही आमच्या बरोबर अनेक वयस्कर लोक व महिला होत्या. काशी विश्वेश्वराचे मंदिर तिथले दर्शन घेतले. उत्तर काशी या ठिकाणी जाऊन बुद्धाचे दर्शन घेतले. त्याला बोध गया म्हणतात. अत्यंत रम्य परिसर आहे. ज्या बोधीवृक्षाच्या छत्रछायेत गौतम बुद्धांनी ज्ञान प्राप्त केले ते ठिकाण पाहिले.

रामाची अयोध्या पाहिली. रामलीलेचे दर्शन घेतले व ज्या ठिकाणी राम जन्मले त्या ठिकाणी त्याचे मंदिर होण्यासाठी शंभर वर्षे लागले. हे राज्यकर्त्यांचे दुर्दैवही पाहिले.

जगातील आश्चर्य ताजमहाल पाहिला. खरोखरचं हे एक जगातील आश्चर्य आपल्या देशात आहे. पण त्याची बांधणी, तटबंधी सर्व काही जशास तसे आहे. संगमरवरामध्ये बांधलेले हे स्मारक खरोखरच आर्श्चयकारकच आहे.

आम्ही एकदा भुवनेश्वरला गेलो. तिथली अनेक मंदिरे पाहिली. महादेवाचे मोठे मंदिर जगन्नाथ पुरी ... पाहिले. त्यांच्या दारात शिवाजी महाराजांनी लोखंडाचा स्तूप लावलेला पाहिला. सूर्य मंदिर पाहिले व इंग्रजांनी त्याची तोडफोड केली होती तेही पाहिले. मूर्ती अधांतरी कशी हे पाहण्यासाठी त्यांनी कळस पाडला व त्या मंदिराचे अर्धे काचे नुकसान केले. सूर्य रथाचे चाक या ठिकाणीच आहे. अष्टोप्रहर चालत राहण्याचा ते संदेश देते.

एकदा आम्ही कन्याकुमारी पाहिली. समुद्रामध्ये असलेल्या एका खडकावर सुंदर असे स्वामी विवेकानंदाचे स्मारक अत्यंत सुंदर रितीने बांधलेले आहे.

एकदा आम्ही बालाजी मंदिर पाहिले. त्या मंदिराची भव्यता, सौंदर्य, लकाकी, गर्दी, त्याची प्रेरणा, भक्ती सर्व पाहिले व मन थक्क झाले. कल्की अवतार, अम्मा भगवान आश्रमही

पाहिला. तो चेन्नईच्या जवळ आहे. तेथून येताना हैद्राबाद पाहिले. तिथला मोठा स्टुडिओ पाहिला व त्याची बांधणी सौंदर्य अगाध पसरलेला. तो सर्व स्टुडिओ बघून आश्चर्य वाटले. त्याला रामोजीराव फिल्मसीटी म्हणतात.

त्याचप्रमाणे वेगवेगळ्या भागात असलेली बारा ज्योतीर्लिंगे पाहिली. मथुरा, द्वारका व महाराष्ट्रातील अनेक तिर्थक्षेत्रे गेली अनेक वर्षे थोडी थोडी पाहिली. या ठिकाणी मुद्दाम जास्त विस्तृत वर्णन केले नाही कारण आपला मूळ विषय बाजूला राहिल म्हणून.

# १५. वडजीचा बंगला

वडजी माझे जन्म गाव. अनेक दिवसाची कर्मभूमी. त्या ठिकाणी आपण घरच्या जागा व व मी बांधून दिलेली घरे भावाला देऊन टाकू व आपण स्वतंत्र जागा घेऊन बंगला बांधावा असा विचार आला. खरं तर त्यावेळी माझ्या घरची दोन घरे होती, ज्यात मोठे दोन्ही भाऊ राहात होते. मी सासऱ्याच्या घरी अत्यंत सुखात राहात होतो. पण उगाच मनात आले व मनात आले की मी ते पूर्ण करतो व मनात येते त्याच्या मागे सुद्धा काही प्रयोजन असतात. त्या विचाराच्या वर्तमानात भविष्य काळ दडलेला असतो. मी नामदेव अण्णाची जागा घेतली होती. वास्तविक त्या वेळी ती पाच हजार रुपयाला ठरली होती. त्यांच्या मुलाच्या आजाराला व इतर खर्चाला खरं तर जवळ जवळ सगळे पैसे दिले होते; परंतु काही लिहून घेतले नव्हते व नामदेव अण्णा वारले. माधवरावांनी त्याच्या मुलाबरोबर ठरवून पुन्हा त्या जागेची किंमत ५०,००० हजार रुपये गुंठा ठरवली व ते एक लाख रुपये देऊन मी ती जागा माझ्या नावावर खरेदी केली. त्याच्या मुलांनी तिथली सगळी निलगिरीची झाडे तोडून नेली. काही दगड होते तेही नेले. खरं तर जागा विकल्यावर काही संबंध नसतो पण पहिलाच चांगूलपणाचा तोटा होऊ लागला. नामदेव अण्णाच्या भाऊजईंच्या भावाला ताराचंद याला जागा घेण्याअगोदर मी भेटलो होतो व त्यांच्या आमच्या बरोबर भावकीतल्या दोन जागा आहेत. त्या मी घेऊ का म्हटल्यावर त्यांनी सांगितले की त्या दोन्ही जागा आमच्या हिस्स्याला आलेल्या आहेत व तुम्हाला ती शाळेसमोरची जागा घेण्यास हरकत नाही. त्यानंतरच मी ती जागा घेतली; परंतु तिने तिच्या नवऱ्याचे प्रेत त्या ठिकाणी वारल्यावर उतरवले व ती त्या जागेवर हक्क सांगू लागली. भेटेल त्याच्याबरोबर माझ्याविषयी चुकीचे बोलू लागली. आमच्यावर अन्याय केला, आमची जागा बळंच घेतली असे आरोप करू लागली. वास्तविक विचारुन घेतलेल्या जागेची

त्यावेळी गावात १०,००० रुपये सुद्धा गुंठा नसेल. पाच पट पैसे देऊन घेतलेल्या जागेला सुद्धा या पद्धतीने त्रास दिला व किमान पाच वर्षे आरडाओरडा केला व बंगल्याची सुरुवातच अशा पद्धतीने झाली.

माझ्या बाजूला ढाकणेची दोन गुंठे जागा होती. त्याच्याही वाटण्या होत्या. गावातील घर हे त्याच्या मोठ्या भावाला व कोट्यावरची मोकळी जागा ही बारक्या भावाला. त्यांचा बारका भाऊ रामू माझ्या मागे सहा महिने फिरत होता. चार जणाकडे जाऊन माझी जागा घ्या म्हणून वशीला लावत होता. मला स्वतःला ज्या वेळी भेटला त्यावेळी सगळी जागा द्यायला तयार झाला. पण मी म्हटले मी तसं करणार नाही. जागा तुझ्या नावावर असली तरी तुझा मोठा भाऊ हा वेडसर आहे त्यामुळे घरच्याला विचारल्याशिवाय मी ती जागा घेणार नाही व शेवटी जास्त पैसे देऊन मी ती एकच गुंठा जागा घेतली. त्यातही लिहून देतांना उभी जागा लिहून दिली व त्यातही अर्ध्यात मोठ्या भावाने घर बांधले. तरीही मी म्हणालो ठीक आहे. वडिलांचे आणि गोरख ढाकणे यांचे संबंध चांगले आहेत. मोकळा एक गुंठा मला ठेवा कारण मला तीथे बांधकाम करायचे नाही. ती जागा मी मोकळी ठेवणार आहे. कारण मला पार्किंगसाठी ती जागा मी मोकळी ठेवणार आहे. कारण मला पार्किंगसाठी ती जागा पाहिजे. माझ्या शेजारी दोन जागा होत्या. एक गुंठा ढाकणे यांची व एक गुंठा अतिक्रमण असलेली बन्सीभाऊ यांची. आमचे आजोबा सांगत होते की त्या जागेवर आमचे भाऊकीचे उकीरडे होते. हळूहळू ती जागा त्यांनी बळकावून कुड, मग साधी घरे, मग पक्की घरी असे केले व आमची भावकी मोठी असल्यामुळे व ती थोडी जागा असल्यामुळे त्याकडे सर्वांनी दुर्लक्ष्य केले व ती जागा त्यांना गेली. मी व माझ्या जवळच्या लोकांनी त्यांना पर्यायी जागा व बांधून देण्याचे कबूल केले. सुदन पाटलाच्या इथे मिटींग झाली. एक गुंठा जागा ज्याची त्यावेळी किंमत दहा हजार रुपये होती. ती जागा तीन लाख पन्नास हजार रुपये बळजबरीने मला तयार केले व दोन गुंठे जागा माझी मालकी सातबारा  असा सवदा जगात् कुठेच नव्हता. परंतु काही लोकांनी फूस लावून तोही सौदा मोडला व मला त्या ठिकाणी जागा मिळू द्यायची नाही हे ठरवून तसे काम सुरू केले.

पुढच्या तोंडाला बन्सीभाऊ मोराळे यांचे कच्चे बांधकाम होते. त्यांनाही जागा व बांधकाम करून देतो असे सांगून जवळच्या काही लोकांनी प्रयत्न केले. पण त्यांना देऊ नका म्हणणाऱ्याची संख्या व प्रयत्न यशस्वी झाले.

वास्तविक त्या जागेच्या कितीतरी पट आपण पैसे द्यावयास तयार होतो पण अखेर प्रयत्न फसले. खरे तर त्या दोघांचीही आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट होती. दोघांचीही मुले मी अत्यंत कमी फी मध्ये व उधारीमध्ये नर्सिंगला शिकविले व त्यांना नोकरी लावून त्याचा काहीही उपकार न ठेवता उलट विरोधात काम करायला त्यांनी सुरुवात केली. जाणीव ठेवली नाही. शेवटी मी ठरविले की मला कुठे गावाकडे राहायचयं. घर रिकामेच राहणार आहे. जेवढं मिळेल तेवढेच बांधू.

रमेशच्या बंगल्याचे काम करायचे होते मी त्याला सांगितले की तुझ्या बरोबर माझ्याही बंगल्याचे काम कर त्याने अती उत्साहाने व स्वतः माझ्यापेक्षा जास्त कष्ट करून हा बंगला पूर्ण केला. जवळ जवळ ४-५ हजार स्के. फुटाचा तीन मजली बंगला तयार झाला. रमेशमुळेच केवळ हे शक्य झाले. पण गावात माझे सख्खे भाऊ व सख्खे मेहुणे यांना बांधायला न दिल्यामुळे या दोघांची नाराजी मात्र कृतीतून दिसून आली.

आता दोन बाजू आपण सोडवल्या. ढाकणेच्या बाजूची पाच पट किमतीत घेतलेली जागा सुद्धा लोकांनी कॉम्प्रमाईज करून अर्धी त्यांना वापस द्यायला लावली व राहिलेल्या जागेच्या नोंदीच्या कुरघोड्या अजूनही चालू आहेत. हा असा गावगाडा. शेजारी आमच्या वडिलांचे दुसरे मित्र झाबूनाना याची जागा होती. मी रमेशला सांगितले होते की अगोदर कंपांऊड करा. लोक नंतर अडचणी निर्माण करतात व शेवटी तसेच झाले. तीन फुट जागा आपली असताना त्याने आपल्या भिंतीला चिटकून घर बांधले व आपल्या पाण्याच्या टाकीच्या भिंतीवर दोन फुट त्यांच्या संडासची भिंत काढली. खरं तर त्या वेळेला बापु म्हणजे माझा मोठा भाऊ हा म्हणत होता की मी ते आडवतो व पण मी म्हटलं दादाचा दोस्त आहे, प्रामाणिक राहिल. पण त्यानेही शेवटी तेच केले व शेवटी आमची ६० x ३ फुट एवढी जागा बळकावून आमच्या बंगल्याच्या पाईपलाईन खाली त्याच्या बाजूला येऊ दिल्या नाहीत. त्या

पहिल्या मजल्यावरून आम्हाला खाली आणाव्या लागल्या. तीन बाजू झाल्या. आता शेवटची बाजू तरी कशी राहिल. शेवटच्या मागच्या बाजूला ज्याची जागा होती ते शिवा पुढारी पण ती जागा पडीक होती; परंतु पाच फुट कोपरा आवडा बाईचा होता. वास्तविक बांधकाम करताना प्रत्येक बाजूला मी तीन फुट जागा सोडावयास लावली होती ती तर सोडाच पण आम्हाला खेटून बांधून आमची खिडकी बुजवायची तयारी. वास्तविक आवडाबाईला ट्रॅक्टर घेताना मी त्या काळात पस्तीस हजार रुपयाची मदत केली होती. ते पैसे बिनव्याजी दोन वर्षे थोडे थोडे मला परत दिले पण त्याचे उपकार कोणीही ठेवले नाही. खरं तर बाजूचे हे चारी लोक माझ्यापुढे काहीच नव्हते. आपल्यासारख्या माणसाला सुद्धा लोक या पद्धतीने वागतात. गरीबाची काय अवस्था असेल. बंगला तयार झाला. आता यावर्षी पुजा करावी म्हटलं तर त्यावर्षी माझ्याहून मोठा भाऊ बापू म्हणजे मधूकर आजारी पडला व त्यातच तीन महिन्यांनी त्याचे निधन झाले व पुन्हा एक वर्ष पुजा करायची नसते म्हणून पुजा थांबली. ती अखेर तीन वर्षे झाली. अजून पुजा करायला मुहूर्त व मुड आला नाही. एवढा त्रास ह्या बंगल्याचा झाला; परंतु गावात फार मोठी वास्तू उभा राहिली व जाता येता सगळ्याला माझी आठवण येईल हे समजून यातच मी समाधान मानले.

▸▸ ▸▸

# १८. गावाकडील स्वप्न

वडजी गावावर माझे अत्यंत प्रेम होते. त्यामुळे मातृभूमीचा विकास करण्यासाठी मी रात्रदिवस झटत होतो व आता पुण्यात आपण चांगले बस्तान बसवले आहे. त्यासारखे गावात आपण व्यवसाय व इतर गोष्टी सुधाराव्यात म्हणून सासरे वारल्यावर मेव्हणाही गावाकडे होता त्याला काहीतरी चांगलं करून देऊ म्हणून मंगल कार्यालय व शाळा काढून द्यावी असे ठरविले. त्याने पहिल्या दिवसापासून मला फसवायचे प्लेनिंग केले होते की काय कळत नाही पण तशी कृती पुढे समोर आल्यामुळे वाटते. जागा नावावर करताना दोघाच्या नावावर निम्मी निम्मी करायची होती पण तिथेही त्याने खोटेपणा करून एक त्याच्या नावावर ती जागा केली. शाळेची जागाही एकत्र तीन एकर करून देतो असे सांगितले. ती जागा फक्त एक किलोमीटर लांबीची पट्टी २५ फुटाची ज्यात काहीच करता येऊ नये अशी करून दिली. एकत्र रुंद जागा हलकी शाळेला व काळी जमीन त्याला हे ही न करता खोटेपणा करून वेळ काढून तिथेही फसवणूक केली. पुढे कार्यालयाचे बांधकामाचे जवळ जवळ सगळेच पैसे मी देऊन पूर्ण केले होते. माझ्या मनात काहीच नव्हते व एवढी मोठी फसवणूक घरातला सख्खा मेव्हणा करेल असं कधीच वाटलं नाही. पुढे जागेची भांडणे झाली. शेजारील माणसाने त्या जागेत पुढेच कब्जा केला त्याला देण्यासाठी सुद्धा सात लाख माझ्याकडूनच नेले होते. ती जागाही त्याने स्वतःच्या नावावर करून घेतली व त्या जागेचे रोडमध्ये गेल्याबद्दल अंदाजे २७-३० लाख रुपये आले. त्याचाही हिशोब दिला नाही तर उलट ग्राम पंचायतचे कारण सांगून दुश्मनी सुरू केली व बोलायचे सुद्धा बंद केले.

तिथे शाळाही काढली होती. त्याचा मोठा खर्च मीच केला होता. कर्ज काढून बांधकामाला पैसे दिले होते. बेंच, बस सर्व खर्च मी केला होता. पहिल्या दोन वर्षी आम्हाला कार्यक्रमाला

बोलावले व शेवटी तेही बंद केले.

दहा – बारा एकर जमीनीवर पाईपलाईन करून हौद बांधून कंपाऊंड करून केळीची बाग लावली होती. मी त्या काळात १२–१४ लाख रुपये खर्च केले होते. त्यातुनही काही उत्पन्न हातात येऊ दिले नाही. लाखो रुपये देऊन त्याच्याच कल्याणाचा विचार करून वडजीत मोठे काही तरी करण्याचे माझे स्वप्न भंग झाले.

मी स्वतः मेव्हण्याला कित्येक वर्ष पुण्यात सांभाळले. त्यांच्यावर माझ्या सख्या भावापेक्षा प्रेम जास्त केले पण ते उतराई झाले नाहीत. माझी त्यांच्याकडून कधीच काही अपेक्षा नव्हती. पण ज्या पद्धतीने ते वागले बदनामी, शिव्या देणे या सारखी कृत्य सुद्धा माझ्या बाबतीत त्यांच्याकडून घडली याचे वाईट वाटते.

माझे सासरे देव माणूस होते. लोक जरी त्यांना वाईट म्हणत होते तरी माझ्यावर मुलापेक्षा त्याचं प्रेम होतं व माझही त्याच्यावर. त्यांचा स्वभाव रोख ठोक होता व ते खरं बोलायचे व ते लोकांना पटत नव्हते म्हणून लोक नावे ठेवत; पण साधा माणूस होता. त्यांचे माझे स्वप्न वडजीत काही तरी करण्याचे होते. ते मात्र मेव्हण्यामुळे मी थांबवले व त्रास करून घेण्यापेक्षा संपर्क नको. लाखो रुपये त्यांनी नाही दिले तरी चालतील ते नंतर पाहू; पण संघर्ष नको म्हणून मी वाट पहात आहे.

▸▸ ▸▸

# १७. भाऊजी

मी नोकरीला असलो तरी माझा पगार तुटपुंजा होता. समोर आव्हाने आ वासून उभी होती; पण मी कधी कोणापुढे हात पसरला नाही व खोट्या गोष्टी करून कधीही कोठेही व केव्हाही गैर संपत्तीवर नजर ठेवली नाही व ते मी आजपर्यंत पाळले आहे. भाऊजी आमच्याकडे पुण्याला आल्यावर मी त्यांची खूप सेवा केली. मला अती आनंद व्हायचा. त्यांची मुलगी घाण संडास असेल तर त्यात जात नव्हती त्यावेळी मी स्वतः संडास धुवायचो. त्यावेळी मी कधीही असा विचार केला नाही की मी प्राध्यापक आहे, संडास कसा धुवायचा. मीही त्यांच्याकडे गेल्यावर मला अतिशय आनंद होत होता. मी कधीही भावनिक नव्हतो. प्रॅक्टीकल विचार मी करायचो व त्यांचा फायदा होईल हेच विचार करायचो. मी प्रत्येक सुख दुःख त्यांच्याबरोबर वाटायचो पण कधीही वाईट परिस्थिती असली तरी व्यक्तिगत लाभासाठी दुसऱ्यासारखा मी कधीही प्रयत्न केला नाही. अनेक गोष्टी मी त्यांच्या भल्याच्या केल्या. त्यांना पुण्यात बंगला बांधायचा होता. एच. आर. ला तो बांधायचा होता. पण त्याला बांधकामातील काहीच माहिती नव्हते म्हणून मी स्वतः भाऊजीला बोलावून तो बंगला मी बांधला. पण आमच्या भावाला वाटायचे की हा त्यात पैसे खाईल म्हणून त्याने नेहमी माझ्या विरोधात त्यांच्याकडे वातावरण तंग ठेवले. काहीही सांगून माझी बदनामी कशी होईल व आमचे संबंध कसे खराब होतील हे त्याने नेहमी प्राधान्याने पाहिले. असा माझा पक्का समज आहे.

भाऊजीची पत्नी माझी चुलत बहिण असली तरी तसे मला कधीच वाटले नाही. माझ्या सख्ख्या बहिणीपेक्षा तिच्यावर मी प्रेम केले. तिचा कोणताही शब्द खाली पडू दिला नाही. मी प्राध्यापकी विसरुन, काळ वेळ विसरुन एखाद्या शिपायापेक्षा जास्त त्यांची सेवा करत होतो. कधीही माझ्या मनात दुजाभाव आला नाही.

माझ्याकडे एका बिल्डींगमध्ये पैसे गुंतवले होते. कापरेच्या बरोबरच्या बिल्डिंगमध्ये. कापरे व शिंदे यांनी खोटा हीशोब करून ४५ लाख रुपये तोटा आम्हाला भरावयास लावला. ते सर्व पैसे मी भरले. तरीही त्याचे सर्व मुद्दल पैसे मी भाऊजींना दिले. त्यावर काहीही नफा मात्र देऊ शकलो नाही व त्यांचे पैसे त्यांना फ्लॅट घेण्यासाठी देताना २० लाख रुपये कमीला जागा विकून ते पैसे त्यांना वेळेत दिले. तोट्याचा विचार केला नाही.

त्यांना चरवडाची एक जागा मी घेऊन दिली होती. त्याच्यामध्ये नंतर समजले की काही अडचणी आहेत. ते लीटीगेशन सोडवण्यासाठी व कोर्टात कॉम्प्रमाईज करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी गेला. जाहिर नोटीस झाली होती. कॉम्प्रमाईज झाले होते व त्याला २५ लाख रुपयेही देऊन झाले होते. वास्तविक मला जमीन खरेदी व्यवहारातील अडचणी माहित असल्यामुळे मी ती जागा क्लिअर पाहिजे जर अडचण आली तर मलाच नावे ठेवतील. मी चांगुलपणा म्हणून खरेदी खत, सगळे क्लिअर झाल्यावर करण्याचं ठरविलं होतं. पण एका दिवशी संध्याकाळी अचानक भाऊजीचा फोन आला की या व्यवहारात फार उशीर होत आहे व तो कॅन्सल करा. इथली लोक पैशाच्या व्यवहाराला चांगली नाहीत. जाहीर नोटीस झालेली आहे. ॲग्रीमेंट फायनल झाले आहे. त्यांना २५ लाख रुपये देऊन झालेले आहेत. आता जर व्यवहार कॅन्सल झाला तर विसाराचे पैसे बुडले तर काय करायचे. मला खूप वाईट वाटले. मी चरवडाकडे गेलो. त्यांना विनंती केली, व्यवहार कॅन्सल करण्याविषयी भाऊजीने सांगितले असे सांगितले. माझे आणि त्यांचे चांगले संबंध असल्यामुळे पैसे हळूहळू परत देण्याचे कबूल करून घेतले. २० लाख त्यांनी दोन वर्षात परत केले. ते मी भाऊजींना देऊनही टाकले. पण पाच लाख रुपयेचे चेक दिले पण ते डीसऑनर केले व आजपर्यंत ते पाच लाख रुपये मला त्यांनी परत दिले नाहीत. तेवढेच त्याचं देणे आहे. खरं तर मी त्यांच्या एका पैशातही लाजीमदार नाही. मी त्यांचा व्यक्तिगत एक पैसाही आजपर्यंत वापरला नाही. त्यांचाच काय कोणाचाच पैसा मी आजपर्यंत वापरला नाही व तशी अपेक्षाही ठेवली नाही. पण त्यांनी माझ्याशी बोलणे बंद केले. त्यांना कारखान्यासाठी जागा बघून दिली. त्यातही निकमला परस्पर भेटून आणखी दहा लाख वाचले असते पण तिथेही घाई करून खरेदी करून घेतली.

आमची बहिण दुसऱ्याजवळ वाईट, वंगाळ बोलते ते लोक मला प्रेमाने सांगतात. त्यांना मी माहित आहे. वाईट वाटतं पण मी विश्वास कसा निर्माण करणार त्यांचे मनच माझ्याविषयी लोकांनी व त्यांनी कलुषित केलेले असेल तर हे कसं शक्य असणार. सगळ्यात वाईट वाटलं ते त्यांच्या मुलीची लग्नपत्रिका त्यांनी मला दिली नाही व लग्नालाही बोलाविले नाही. फक्त राहून राहून एकच वाटतं की, आपली काही चूक नसताना सगळ्या जगात त्यांना प्रिय मानलेले असताना पुढचे लोक तसे वागत असतील तर देवानेच काही तरी भले करण्यासाठी असे केले असावे असे मी मानतो व स्वतःची सांत्वना करतो. पण जगात एवढे वाईट अनुभव व प्रसंग देवाने कोणावरही आणू नये अशी मी देवाला प्रार्थना करतो व तुकारामाच्या अभंगातील एक वाक्य आठवते.

**वाहिल्या उद्वेग दुःखची केवळ**
**भोगणे हे फळ संचिताचे**

▸▸ ▸▸

# १८. एम.आय.टी. परिवार

१९ जून १९८६ ला मी पुण्यात आलो तेही बळजबरीने. मला पुण्यात येण्याची इच्छा नव्हती. नियतीने व परिस्थितीने मी पुण्यात नोकरीसाठी आलो. त्याच्या अगोदर आमच्याच कॉलेजमध्ये श्री शिवाजी मराठा सोसायटीच्याच जागेत एमआयटी कॉलेज भरत होते अशी मला माहिती मिळाली व मी ज्या वर्षी आलो त्याच वर्षी ते कॉलेज आमच्या कॉलेजमधून कोथरुडला गेल्याचे समजले. आपल्या गावाकडची किंवा लांबचे नातेवाईक कुणी आहेत का त्यांच्याकडे कधी वेळ घालविण्यासाठी किंवा करमत नसेल तर जाऊ म्हणून मी शोधतच होतो. डॉ. विश्वनाथ कराड सर हे लांबून नातेवाईक लागतात म्हटल्यावर मी त्यांच्या संपर्कात आलो. उगीचचं अधुनमधून भेटायचो. त्यांचे काम, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम व एखाद्या संतासारखी वृत्ती पाहून त्यांचा मला खूप आदर वाटत होता. सर्वसामान्य प्राध्यापक पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात एवढं मोठं साम्राज्य तयार करू शकतो. यामुळे मला त्यांचा अभिमान वाटत होता व नकळत वाटत होते की आपण ही असचं काही तरी केलं पाहिजे. सरांचा आदर्श घेतला पाहिजे व त्यांचे अनुकरण करू लागलो. जवळ जवळ पहिली तीन वर्षे मी रोज एमआयटीत जात होतो. कॉलेज सुटले की तिकडे जायचं. त्या वेळेला मंगेश बापू कॉलेजलाच होते. हळूहळू त्यांची माझी मैत्री झाली. सबंध अत्यंत चांगले झाले. मंगेश बापुही मोठ्या कराड सरांच्या पावलावर पाऊल टाकून चालत होते. कठोर परिश्रम व प्रामाणिकपणे फार मोठ्या प्रमाणात काम करत होते. मोठ्या सरांवर बापुची खूपच श्रद्धा होती. हा त्यांचा चांगुलपणा मला खूप भावला. जवळ जवळ गेली पंचवीस वर्षापेक्षा जास्त दिवस झाले असतील मी मोठ्या सरांचा वाढदिवस ३ फेब्रुवारी कधीही चुकवला नाही. बाहेरगावी जावे लागले तरी रात्री परत येऊन मोठ्या सरांना शुभेच्छा द्यायच्याच व सर्व लोक, मित्र, पाहुणे तिथे भेटत होतो.

मंगेश बापु आणि आम्ही विद्यापीठात अनेक वर्षे एकत्र काम केलं. अनेक लोकांनी आमच्यात फुट पाडण्याचा कित्येक वेळा प्रयत्न केला. पण मी कधीही तसुभरही हाललो नाही. एका इलेक्शनला बापु मॅनेजमेंट कौन्सिलला उभे होते. त्यांना मुद्दाम काही लोकांनी वेगळे केले. आम्ही पॅनल केला. मी त्या वेळेला पुणे विद्यापीठात वाणिज्य विद्याशाखेचा डीन होतो. मला पुढच्या पार्टीने सांगितले की तुम्ही बापुचा प्रचार करू नका. तुम्हाला आम्ही बिनविरोध निवडून देतो व मला माझ्यासमोर उभ्या असलेल्या उमेदवाराचा विड्रॉल फार्म ही दाखवला. पण मी त्यांना म्हटले, मला तुम्ही काहीही पद दिले तरी मी फारच भक्कम आहे. कोणत्याही आमिषाला कधीही बळी पडत नाही व ते सत्य करून दाखवले. त्या निवडणुकीत मी ४ मतांनी पराभूतही झालो. पण बापूवरची श्रद्धा मी कधीही ढळू दिली नाही. पुढे अनेक कार्यक्रम – संस्थेचे मुख्य  कार्यक्रम याला बापू मला आवर्जून बोलावत होते व आमचा घरोबा दिवसेंदिवस वाढतच गेला व एकामेकातील प्रेम वृद्धिंगत होत गेले.

मी ज्या वेळी मोठ्या सरांकडे घरी भेटायला जायचो त्यावेळी राहूलदादा एकदम छोटा होता. आता तो एकदम यशस्वी संस्थाचालक झालेला आहे. नवनवीन विचार, सतत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम व उत्तम नियोजन आर्थिक खर्चावर कमालीचे लक्ष. हे सर्वच गुण राहूलदादामध्ये आहेत व सरांच्या पावलावर पाऊल टाकून संस्थेची फार मोठी भरभराट व विद्यापीठात रुपांतर दादांनी करून दाखविले आहे. एनटीसी – नॅशनल टीचर्स काँग्रेसमुळे राहूलदादाची व माझी अत्यंत जवळिक झाली. दुसऱ्याला योग्य आदर देणे, पुढच्याचा गुणाचा वापर आपल्या संस्थेसाठी करून घेणे हे अत्यंत चांगले गुण राहूलदादामध्ये मला दिसतात व त्याचे भवितव्य अत्यंत उंच दिसते.

अनेक वेळा मी सरांकडे घरी गेलो ; पण मोठ्या काकू, छोट्या काकू यांनी मला अनेक वेळा जेवायला दिले. चांगली वागणूक दिली व लहान मुलाप्रमाणे वागवले. ही त्याची संस्कृती मी कधीच विसरणार नाही.

एमआयटीचा अनुभव लक्षात घेऊन मी मंगेश बापुला विनंती केली की बापू अजून एक संस्था आपण सुरु करू. बापूच्या साहाय्याने आम्ही मिटींग घेतल्या व अत्यंत चांगली बॉडी तयार केली. त्यामध्ये ॲड. आव्हाड बी. ई. अध्यक्ष, डॉ. विश्वनाथ कराड सर कार्याध्यक्ष, मी सेक्रेटरी, मंगेश बापू खजिनदार व ॲड. एस. ई. आव्हाड व खाडे साहेब सदस्य अशी

भारदस्त बॉडी तयार केली व संस्थेला नाव आयआयटी म्हणजेच इंडियन इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी संस्था नोंदणीही केली. आम्हाला ॲड. जगदीश मुळीक यांनी वडगाव शेरी या ठिकाणी दोन एकर जागा दान देण्याचेही कबूल केले. पण एवढी मोठी माणसं आमची कुणाची भेटचं व्हायची नाही. शेवटी कॉम्प्युटरचा क्लास सुरू करू असे ठरले व बी. ई. आव्हाडाच्या क्लासमध्ये दुपारी ते चालवायचे. एक वर्ष ते चालले. एकदा एक प्रसंग झाला. क्लासच्या गच्चीमध्ये कॉम्प्युटर ठेवण्यासाठी जागा करायची कारण क्लासला अडचण होत होती म्हणून बाल्कनीमध्ये ग्रील करून काचा बसवून तिथे ठेवायचे व काही काचा खराब झाल्या होत्या त्या बदलून घ्यायच्या होत्या त्यावेळी तेवढे पैसे संस्थेच्या खात्यावर होते. मोठ्या आव्हाड सरांना भेटायचे म्हणजे कमीत कमी दोन ते तीन तास अपॉईंटमेंट घेऊन जावे लागायचे. नंबर लावून मोकळ्या वेळेत मी छोट्या आव्हाड सरांना भेटलो व मोठ्या सरांकडे का आलोय हे त्यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी सांगितले की आता क्लास मीच घेतो. मोठे सर काही त्या जागेकडे पहात नाहीत आणि आमची प्रॉपर्टी आहे. तुम्ही एवढा छोटा खर्च कशाला करता. मीच करून घेतो. तुम्ही जा म्हणून मी त्यांना न भेटता घरी आलो. ते छोट्या सरांनी काम पूर्ण करून घेतले. पुढे सहा महिन्यांनी मोठ्या सरांना हे माहित पडले. त्यांनी मला बोलावून घेतले व फाड फाड बोलले. माझ्या जागेत एक तर फुक्कट क्लास घेता व छोट्या सरांकडून त्याची मला न सांगता दुरुस्ती करून घेता. मी त्यांना खूप सांगण्याचा प्रयत्न केला की मी आपणाला भेटायला आलो होतो. छोट्या सरांनी ते स्वतः केले आहे. मला त्यांनी परत पाठवले होते. पण न ऐकता क्लास बंद करा व मंगेश बापूला सांगतो ते सर्व बंद करा. मी हताश झालो. अपमानीत होऊन उठून आलो. पण मी तो अपमान मनावर घेतला नाही कारण मी त्यांना गुरू व मार्गदर्शक मानून, त्यांना आदर्श मानून काम करत होतो. त्या अगोदर टेलीफोनसाठी चिठ्ठीचाही मोठ्या सरांचा तसाच अनुभव आलेला होता. त्यामुळे आता मी ठरविले की, मोठ्या झाडाखाली छोटे झाड वाढत नाही आणि आपण आता आपली स्वतःची संस्था काढली पाहिजे व या अपमानातून प्रेरणा घेऊन कदाचित त्यांना देवांनी तशी बुद्धी दिली असावी की जेणेकरून मला संस्था काढण्याची प्रेरणा मिळेल व मी संस्था काढून ती नावारुपाला आणण्यात यशस्वी झालो. त्याला त्यांची प्रेरणादायी कृती ठरली.

▸▸ ▸▸

# १९. संघटना

अनेक संघटनामध्ये मी लहानपणापासून कार्यरत होतो. कुठे पदाधिकारी तर कुठे सदस्य; पण कोणत्याही संघटनेत प्रामाणिकपणे व कठोर परिश्रम घेऊन काम करण्याची माझी प्रवृत्ती होती. कोणत्याही संघटनेत मी लहानपणापासून एक पथ्य पाळले होते. जरी मी सुरुवातीला अत्यंत गरीब परिस्थिती होती. क्रांतीवीर संघटना मी वयाच्या १३-१४ व्या वर्षांपासून चालवत होतो. पण कधीही पैशाला हात लावला नाही. मी हिशेब ठेवणार व दुसऱ्याकडे पैसे ठेवणार. तो माझा चांगला गुण आजपर्यंत सांभाळला. कोणत्याही संस्थेच्या किंवा संघटनेच्या पैशाला हात लावायचा नाही; तर उलट आपल्यालाच जेवढे पैसे त्यात टाकावे लागतात तेवढे त्यात टाकायचे व कोणतीही संघटना व संस्था चालविताना समाजसेवा हा मूळ हेतू लक्षात ठेवायचा व कार्य करायचे. मी क्रांतीवीर ग्रामविकास संस्थेत जवळ जवळ २५ वर्षांपेक्षा जास्त काळ केले. मी स्वतः अध्यक्ष होतो.

मी पुण्यात आलो. पहिले दोन तीन वर्षे तर मी मला परत बार्शीला स्थायिक होता येईल का याचा प्रयत्न करत होतो. पण पुणे सोडण्यासाठी अनेकांचा विरोध होता व मीही शेवटी हळूहळू पुण्यात रुळायला लागलो. पुण्यात मी सिंहगड रोडवरील वडगाव (बु.) येथील खोत चाळीत पहिल्यांदा राहावयास गेलो. त्यावेळी पुण्यात खूपच थंडी होती. मी काही दिवस शहरात राहिल्यामुळे ती जागा जास्त बंदिस्त असल्यामुळे तेथे थंडी कमी होती पण मी ज्यावेळी खोत चाळीत राहावयास आलो ती रात्र मला अजून आठवते. दरवाजे साधे होते. खाली साधी शहाबादी फरसी होती व रात्री खूपच थंडी वाजू लागली. पातळ सतरंजी व एक शाल त्यावर काही भागेना. मी पोत्यातील ज्वारी खाली एका कोपऱ्यात ओतली व पोते झाडून त्यात घुसलो पण रात्रभर झोप आली नाही व दुसऱ्या दिवशी गरम कपडे विकत आणले. ही

एक आठवण. पुणे सोडण्याचा विचार हळूहळू मनातून काढून टाकला. सुरुवातीला आल्याबरोबर अनेक लोक नोकरीसाठी भेडवत होते. या संस्थेत काढून टाकतात असे सांगत होते. मला कसलीही भीती नव्हती कारण मी प्रामाणिकपणे व चांगल्या पद्धतीने काम करत होतो. दोन वर्ष झाल्यावर सगळ्याला ऑर्डर मिळाल्या कायम घेण्याच्या पण मला मात्र ऑर्डर दिली नाही. त्यावेळी सातव साहेब सेक्रेटरी होते व अण्णासाहेब पाटील उपाध्यक्ष होते. मी सातव साहेबांना भेटलो. त्यांनी मला अण्णासाहेबांना भेटा, त्यांच्या हातात आहे असे सांगितले. मी अण्णांना भेटलो. सर्व परिस्थिती सांगितली. ते करमळ्याचे असल्यामुळे व मी बार्शीहून आलो आहे हे सांगितल्यावर त्यांनी ऑर्डर द्या असे सांगितले व मी नोकरीत कायम झालो. सतत नोकरीच्या बाबतीत भीतीचे वातावरण मी त्या संस्थेत पाहिले. मी नेहमी चळवळीत असल्यामुळे मला राहवत नव्हते. त्यात प्रा. भोसले यांना मेमो दिला होता. त्यावेळी त्याची अत्यंत वाईट परिस्थिती होती. त्यात लहान लहान दोन आवळी जावळी मुले झालेली. ते दवाखान्यात ॲडमीट व अशा काळात त्यांना मेमो देऊन प्राचार्यांने हॅरशमेंट चालवली होती. ते मला म्हणाले मागासवर्गीय संघटनेकडे आपण जाऊ म्हणून मला घेऊन गेले. तिथे माझी प्रथम डॉ. खंडागळे यांची भेट झाली व त्याच संघटनेचे दुसरे पदाधिकारी प्रा. बेंगाळे यांचीही भेट झाली. त्या दोघाचे संघटनेचे कार्य त्या काळात अत्यंत चांगले चालू होते. अन्यायाच्या विरोधात धडक काम ते करत होते. मग मीही संघटनेचा पदाधिकारी म्हणून जवळ जवळ १५-२० वर्षे त्यांच्याबरोबर काम केले. पण पुढे मागासवर्गीय संघटनेत फुट पडली. प्रत्येकजण वेगळी संघटना काढून स्वतःच पुढे होऊन काम करू लागला व माझीच संघटना चांगली असे म्हणून लागला व निश्चितच संघटनेत फुट पडून पुण्यात चार पाच मागासवर्गिय संघटना तयार झाल्या. मला नेहमी कटकटीत राहाणे आवडत नव्हते. फुट मला कधीही मान्य नव्हती. वर्चस्वाची लढाई मान्य नव्हती. मग मी हळूहळू काम करण्याचे कमी केले व मीही वेगवेगळ्या कामात व व्यवसायात अडकत गेल्यामुळे त्या संघटनेचे काम बंद केले.

अनेक वर्ष मी प्राध्यापक संघटनेतही काम केले. पुण्यात पुटा नावाने प्राध्यापकाची संघटना होती व बाहेर पुक्टो नावाने शिक्षक संघटना होती. मी अनेक वर्ष त्यात काम केले.

पण नंतर असे लक्षात आले की इथेही ठराविक लोक आपलं वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत व दुसऱ्याला नेतृत्त्व देत नाहीत किंवा काम करण्याची संधी देत नाहीत व तिथे कामाला स्कोप नाही म्हणून हळूहळू जाणे कमी केले व नंतर मी संघटनाच नसल्यात जमा झाली व मी ही प्राचार्य झाल्यामुळे मी प्राध्यापक संघटनेतून बाहेर पडून प्राचार्य संघटनेत काम चालू केले.

नंतर मी प्रचार्य संघटनेत काम चालू केले. प्राचार्यांचे अनेक प्रश्न आहेत ते सोडवले पाहिजेत. प्राचार्य हा शासन, संस्था, शिक्षक व विद्यार्थी यांचा दुवा आहे व तो सक्षम असेल तरच त्याचं महाविद्यालय चांगले चालू शकतं नाहीतर महाविद्यालयाला उतरती कळा लागू शकते असं माझं मत होतं. म्हणून प्राचार्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आपण या संघटनेत काम केले पाहिजे व त्या पद्धतीने मी काम चालू केले. आमच्याकडे प्रत्येक विद्यापीठाची संघटना असते व महाराष्ट्र पातळीवर एक सर्वांची मिळून असते. तिथेही मला वर्चस्वाची मारामारी दिसली. काम करण्यापेक्षा पदाला महत्त्व देणारे लोक दिसले. ठराविकच प्राचार्य, पदाधिकारी काम करत होते. मी जॉईन झालो त्या वेळी प्राचार्य निकम व त्याचे विविध विद्यापीठातील काही प्राचार्य कार्यकर्ते चांगले काम करत होते. पण या जुन्या लोकांनी दुसरी फळी तयारच केली नाही किंवा त्यांच्या कामाच्या व्यापात ते राहून गेले हे मला माहित नाही. पण संघटनेच्या बाबतीत ही फार मोठी चूक प्राचार्य संघटनेनी केली. कदाचित यामुळे प्राचार्य संघटनेचे अस्तित्व सुद्धा धोक्यात येण्याची शक्यता मला वाटते. आता तर प्राचार्य पद पाच वर्षाचे झाल्यामुळे नवीन प्राचार्यांना संघटनेत जास्त रस नसल्यासारखे झाले आहे व नावाला कार्यक्रमाला हजेरी लावायाची असे अनेक लोक त्यात आहेत. सध्या मी पुणे विद्यापीठाच्या प्राचार्य फोरमचा व महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचा सरचिटणीस आहे. पण मी कामावर समाधानी नाही. चांगला काम करता येईल अशी परिस्थिती निर्माणच होणार नाही अशी काही लोक नेहमी काळजी घेत असतात व त्यामुळे हे काम ही काही दिवस वाट पाहून सोडून द्यावे या विचाराचा मी आहे. मी कधीही कोणत्याही कामात हार मानणारा नाही. उलट कोणी विरोध केल्यावर मी दुप्पट वेगाने काम करतो व ज्या वेळी माझी जिद्द जागी होते. त्यावेळी तर मी काहीही काम आजपर्यंत करून दाखविलेली आहे. जवळचेच लोक विरोधात काम करताना दिसतात. त्यांना वाटत असेल की पुढच्याला समजत नाही. पण मला खंत आहे. माझ्याच

गाडीत औरंगाबादला येऊन मला न मत देणारेही मित्र माझ्याबरोबर होते. फक्त एक मताने माझा पराभव झाला.

गेली पंचवीस वर्ष पहिल्या बॉडीनी कागदपत्राचं एकही काम केलं नव्हतं. प्राचार्य संघटनेला जागा मिळाली. ती नावावर सुद्धा चॅरीटी कमिशनरकडे केलेली नव्हती. पंचवीस वर्षांच ऑडिट नाही. वर्षाला इलेक्शन असून १५-१५ वर्षे त्याचा चेंज रिपोर्ट नाही. माझे व चॅरिटी कमिशनरच्या ऑफिसमधील काही लोकांचे चांगले संबंध असल्यामुळे त्यांचे मार्गदर्शन घेऊन मी ती सर्व कामे पूर्ण केली. पण त्याबद्दल ओपन सभेत शब्द काढायचा नाही व मला क्रेडीट मिळू द्यायचे नाही व सहकार्य करायचे नाही. आजपर्यंत एकही कागद माझ्या हातात दिलेला नाही. कोणतेही रिपोर्ट नाही. मिटींग रजिस्टर नाही. एकही कागद मी सचिव होऊन ३ वर्षे झाली तरी चार्ज सुद्धा नाही ही मात्र खंत नेहमी माझ्या मनात राहिल. पण केवळ जागा वाचवण्यासाठी व त्या जागेवर बांधकाम होण्यासाठी मी फक्त थांबलेलो आहे व यात काम करण्यापेक्षा आता मी भारतीय पातळीवरती प्राचार्य संघटना रजिस्टर केली आहे व त्याचे कामकाज मी चालू करणार आहे.

प्राचार्य संघटनेमुळे महाराष्ट्रातील अनेक प्राचार्यांचा संबंध आला. ओबीसीची संघटना काढून काम करायचे होते. म्हणून प्राचार्य डॉ. तायवडे नागपूर यांनी प्रयत्न केले व अखिल भारतीय ओबीसी महासंघ ही संस्था काढायचे ठरले. त्या संस्थेच्या पूर्ण संस्था नोंदीचे काम मी केले व आता ती संस्था कार्यरत आहे. मी पूर्ण भारताचा उपाध्यक्ष आहे. आजपर्यंत चार मोठी अधिवेशने झाली आहेत. ओबीसी मंत्रालय क्रिमीलीअरची मर्यादा वाढवणे. प्रत्येक जिल्ह्याला ओबीसी होस्टेल अशी अनेक चांगली कामे या संघटनेत झालेली आहेत व चालू आहेत.

▸▸ ▸▸

# २०. विद्यापीठ

आमची सर्व महाविद्यालये ही पुणे विद्यापीठ आत्ताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत आहेत. त्यामुळे मी नोकरीला लागल्यावर पहिल्या पाच-सात वर्षात विद्यापीठाचा संबंध आला नाही. एखादे काम असेल तर क्लार्कबरोबर जायचे, ते करून घ्यायचे. प्रत्येक इलेक्शनला डॉ. बाबासाहेब सांगळे मात्र उभे राहायचे व प्रचाराच्या वेळेला ते कॉलेजमध्ये यायचे. प्रा. बटुळे हे शाहू कॉलेजमध्ये होते तेही उभे राहायचे व प्रचाराला आमच्या कॉलेजमध्ये यायचे. मग मी ठरविले की आपण ही विद्यापीठात निवडणूक लढवायची व काम करायचे. मग मी बिझनेस  लॉ बोर्डामध्ये उभा राहिलो व निवडून आलो. जरी माझ्याकडे चेअरमन होण्यासाठी कॅपॅसिटी होती तरी प्राचार्य सुर्यवंशी हे सिनिअर होते व त्यांना मी चेअरमन केले व त्यांच्याबरोबर सर्व काही शिकून घेतले व त्याच्या पुढच्या वर्षी मात्र मी बिझनेस लॉ बोर्डाचा चेअरमन झालो. त्यामुळे मी ॲकॅडमिक कौन्सील व फॅकल्टी मेंबर आपोआप झालो व विद्यापीठात काम करण्याची चांगली संधी प्राप्त झाली. त्याच वर्षी बाबा सांगळे यांनी डिनची निवडणूक लढविली होती व ती अतिशय अटीतटीची झाली होती. सांगळे सरांच्या प्रचाराची धुरा मी चांगल्या प्रकारे सांभाळली व त्यामुळे विद्यापीठ क्षेत्रातले लोक कसे व किती खोटे बोलतात व मतदान कसे करतात याचा चांगलाच अनुभव आला. त्या वेळी मात्र बाबाचा फक्त एक मताने पराभव झाला. पण विरोधात फारच मोठे लोक होते. हिऱ्याच्या कॉलेजचा डिन झाला. त्यावरून धडा घेऊन आम्ही चांगलेच जोरात काम सुरू केले. आलेल्या कोणाचेही काम असो ते प्रामाणिकपणे करावयाचे व त्याचा चहा सुद्धा प्यायचा नाही व सर्वच लोकांची कामे करायची. तशी आमची निष्ठा होती व त्याचप्रमाणे आम्ही अतिशय प्रामाणिकपणे काम केली. पुढच्या पंचवार्षिकला निवडणूक लागली व पुन्हा

आम्ही सगळ्यांनी बाबासाहेब सांगळे सर यांना परत उभा केले व ती निवडणूकही अत्यंत अटीतटीची झाली. पण आमच्या मागे मागील पाच दहा वर्षात लोकांची कामे केल्यामुळे आमच्या मागे चांगलेच लोकमत होते. अनेक प्राध्यापक आमच्या बाजूने काम करत होते. ती निवडणूक आम्ही प्रचंड बहुमताने जिंकली. आता पूर्ण कॉमर्स फॅकल्टीच आमच्या ताब्यात आल्यामुळे आम्ही सर्वांची चांगली कामे केली. सर्वांना कामात सहभागी करून घेतले. त्यामुळे पुढच्या पंचवार्षिकला मला सर्वांनी डिनचे कॅन्डीडेट केले व मी तर अत्यंत चांगल्या मताने वाणिज्य विद्याशाखेचा डीन म्हणून निवडून आलो. मी डीन झाल्यावर विद्यापीठाच्या सर्वच कामाचा गाढा अनुभव मिळाला कारण डीन हा विद्यापीठाच्या प्रत्येक कामात समाविष्ट असतो. परीक्षेचे लोक नेमणे, प्रश्नपत्रिका पॅनल बनविणे, परीक्षा सुरळीत होतील हे पाहणे, पेपर तपासणी करून घेण्यास मदत करणे. पेपरमध्ये गैरप्रकार झाले तर शिक्षा किंवा प्रमाद समितीत राहून शिक्षा करणे, सुट्ट्या ठरविणे, विविध समित्यांवर सदस्य नियुक्त करणे अशा सर्वच प्रकारची कामे डीन करत असल्यामुळे त्या पाच वर्षात तर अनेक विभागात मन लावून काम केल्यामुळे मला सर्वच विभागाचा अनुभव मिळाला. त्यातून सर्वच लोकांची अनेक कामे मला करता आली. प्रामाणिकपणे व नीतीमत्तेने कोणताही स्वार्थ न ठेवता ही कामे केली. त्यामुळे इलेक्शनमध्ये सुद्धा डीनच्या वेळेला सुद्धा लोकांकडे टीका करण्यासाठी मुद्दे नव्हते. इतके चांगले काम मी करू शकलो याचा मला सार्थ अभिमान आहे.

विद्यापीठ क्षेत्रामध्ये अनेक लोकांचे संबंध आले. त्यांची रुपे समजली. काही लोकांची कार्यकर्तृत्त्व कळाली, समजली व त्यातून शिकून मी स्वतःचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व बनवू शकलो. सातत्याने सर्वांसाठी लढत राहिलो. वास्तविक विद्यापीठाची डिग्री घेताना धर्माचर व सत्यम वद ह्या गोष्टी लोक विसरतात ही खरी खंत आहे. विद्यापीठातील अनेक कुलगुरु व अधिकारी यांचे माझे चांगले संबंध होते. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. नरेंद्र जाधव हे कुलगुरु असताना मी पदाधिकारी झालो त्याच्याकडून सतत फ्लॅशमध्ये राहणे व आपल्या ज्ञानाच्या जोरावर कीतीही साधा मानुस पुढे जाऊ शकतो ही प्रेरणा घेतली. त्यानंतर डॉ. चहांदे यांच्याकडे काही काळ चार्ज होता. त्यांच्याकडून मी ज्ञान व स्पष्टपणा हे गुण घेतले. डॉ. अरुण अडसुळ याच्याकडे काही काळ चार्ज होता. त्यांचा ही स्पष्टपणा हा गुन मी घेतला. डॉ. शेवगावकर

यांच्याकडून शांतपणा हा गुण घेतला. डॉ. गाडे यांच्याकडून शांत राहणे व आपल्याला जे काम करायचे ते करायचे. लोकांचे ऐकून घ्यायचे व आपल्याला जे योग्य वाटते तेच करायचे हा गुण घेतला व आता डॉ. कामळकर यांच्याशी जास्त संबंध आला. कारण त्याच्या काळात मी व्यवस्थापन परिषद सदस्य झालो. त्याच्याकडून मी नम्रता हा गुण घेतला. काही झाले तरी त्याला शांततेने तोंड देता येते हेही मी शिकलो.

विद्यापीठात काही अधिकारी अत्यंत तळमळीने व चांगले काम करणारे मी पाहिले. त्यात भाऊ भडकवाडे, पाटील व असे अनेक कितीतरी अधिकारी. त्यांनी चांगली चांगली कामे केली. डॉ. चव्हाण यांच्यासारख्या परीक्षा विभागात काम करणारा चांगला अधिकारी व्यवस्थेचा शिकार झाला हेही मी डोळ्यांनी पाहिले आहे.

आमच्या व्यवस्थापन परिषदेच्या निवडणुकीत फारच चांगले वाईट अनुभव आले. मुळचा मी शिक्षक संघटना सदस्य होतो त्या वेळेपासून संघटनेचा मला अभिमान होता. जरी मी प्राचार्य झालो तरी सातत्याने शिक्षक संघटनेस प्रत्येक इलेक्शनला पाठिंबा द्या म्हणून मी जात होतो. पहिल्या इलेक्शनला मी पाठिंबा व तिकिट मागितले. मला तिकीट नाकारण्यात आले. मी निवडून आलो. दुसऱ्यांदा मी डीनच्या इलेक्शनलाही प्राध्यापक संघटनेचा पाठिंबा मागितला. पण त्याही वेळेला मला पाठिंबा नाकारण्यात आला. मी नेहमी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सतत विनंती करत होतो की एकदा तरी मला संघटनेचा पाठिंबा द्या पण मला पाठिंबा एकाही इलेक्शनला मिळाला नाही. पण व्यवस्थापन परिषदेच्या आधीच निवडणुकीला ॲकॅडमी कौन्सीलच्या माझ्या विरोधात बळजबरीने माणूस शोधून उभा केला. काही करून मला निवडून येऊ द्यायचे नाही अशी सर्वांनी तयारी केली होती. पण मी विद्यापीठात चांगले काम करून एवढे लोक तीनही जिल्ह्यात मिळविले होते की विचारु नका व सर्वात जास्त मतांनी मी विद्यापीठात निवडून आलो; परंतु व्यवस्थापन परीषदेच्या निवडणूकीत मात्र अचानक शेवटच्या दिवशी प्राध्यापक संघटनेने मला पाठिंबा दिला व मी बिनविरोध निवडून आलो व महिला राखीव मधून अजीत पवार यांच्या पत्नी मा. सौ. सुनेत्राताई पवार याही बिनविरोध निवडून आल्या. माझ्या जागेवर झालेली निवडणूक या आधी कधीही बिनविरोध झाली

नव्हती व सर्वोच्च बॉडीवर मी निवडून गेलो. ही निवड होण्यासाठी अनेक लोकांनी मदत केली. त्यात प्राधान्याने डॉ. महेश आभाळे व श्री. पांडे सर यांचा सिंहाचा वाटा आहे.

मला या ठिकाणी सांगतांना खेद होत आहे की जितका माणूस हुशार, चांगला, सत्यवादी व कोणाच्या दबावात येणारा नसेल तर अशा माणसाला अनेक महत्त्वाचे लोक जवळ करत नाहीत हेच नेमके माझ्या बाबतीतही झाले. कारण प्रत्येकाला भीती वाटते की हा माणूस आपल्या म्हणण्याप्रमाणे वागणार नाही. कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही व आपल्या मनाप्रमाणे काम करणार नाही. कारण तो स्वतंत्र विचारसरणीचा आहे. त्याचा मला जीवनात नेहमीच तोटा झाला. मग ते विद्यापीठ क्षेत्र असो किंवा राजकीय क्षेत्रामध्ये सुद्धा माझा माझ्या सर्व जवळच्या लोकांनी फक्त वापर करून घेतला. पण उभे राहायचे म्हटले की नको. राजकारणात तर मला खूपच अनुभव वाईट आला. त्यांचा फक्त प्रचार करायचा, पण तिकीट मात्र दुसऱ्याला द्यायचे. असो कदाचित परमेश्वराची इच्छा वेगळी असेल व माझ्या हातून त्याला वेगळेच काही तरी करून घ्यायचे असेल असे मला वाटते. त्यामुळे अशा प्रकारच्या राजकारणापासून देवाने मला दूर ठेवण्याचा प्रयत्न केलेला असावा. कारण राजकारणासाठी लागणारे व्यक्तिमत्त्व पैसा व भाषण शैली हे सर्वच गुण माझ्यामध्ये आहेत. पण कुणीही कधीही त्याचा विचार करून पुढे पाठवण्याचा विचार केला नाही ही एक खंत माझ्या मनात नेहमी राहिल.

विद्यापीठामध्ये सुद्धा मी निर्भिड व प्रामाणिकपणे माझी मते  मांडतो. ते लोकांना खपत नाही. माझा त्यात काहीच स्वार्थ नाही व माझे व्यक्तिगत कामही मी कधीच सांगत नाही. मी जे बोलतो, सांगतो व मांडतो ते सार्वजनिक हिताचे मांडतो. ज्यासाठी आपली निवड झाली त्या सर्व घटकाच्या कल्याणाचा विचार करणे हे प्राथमिक कर्तव्य मानतो. पण लोकांना तसा माणूस नको असतो. त्यांच्या बाजूने बोलणार, हो हो म्हणणारी, खरे खोटे न पाहता पुढे पुढे करणारी माणसे लोकांना आवडतात. हे मात्र अतिशय वाईट आहे व त्याचा नेहमी अनुभव मला पावलो पावली येत आहे.

आमच्या बाजूच्या लोकांच सर्वात जास्त नुकसान डॉ. उंबरानी प्र.कुलगुरु यांनी केले.

त्यांना डीनचा चार्ज दिल्यापासून त्यांनी एक पार्टी चालविली व त्यांनाच विद्यापीठ कमिटी दिल्या व आमच्या बाजूच्या लोकांना जाणीवपूर्वक टाळले. फक्त गोड बोलणे व मी पुण्याबाहेर जात नाही म्हणून मला पुण्याबाहेरची कमिटी द्यायची व रेकॉर्ड बनवायचे की तुम्ही कमिटी नाकारता. हे तर आम्ही डीन असताना लोकांनी केलेले हे प्रकार आम्हाला ज्ञात आहेत व खरं तरं बार्शीला मी जिथे विद्यार्थी व नंतर प्राध्यापक होतो तिथे ते होते. शाहूला प्राध्यापक होते. मी डीन झाल्यावर पहिल्यांदा त्याच्या कॉलेजला गेलो. पण माझी शंका शंबर टक्के खरी वाटते असे त्याचे वर्तन दिसून येते यात शंका नाही.

मी जवळ जवळ आठ-दहा वर्षे नर्सिंग कौन्सिलवर ही संस्था चालकाचा प्रतीनिधी म्हणून काम केले. तिथेही तेच अनुभव पाहायला मिळाले. वर वर्णन केलेल्या माणसासारख्या माणसालाच महत्त्व व पदाधिकारी म्हणून विचारात घेतलं जातं. पण प्रामाणिक, परखड, सत्यवादी, हुशार, जाणकार अशा माणसाची नेहमी लोकांना भीती वाटते म्हणून ते लांबूनच आदर दाखवण्यातच भले मानतात असाही तिथे अनुभव आला. या नर्सिंग कौन्सिलचा मतदार संघ मात्र संपूर्ण महाराष्ट्र होता. मतदार संघ पूर्ण महाराष्ट्र व जागा एकच संस्थाचालक व सगळ्याचे मतदान. त्यातही मी जिंकून आलो व अत्यंत चांगले काम करण्याचा प्रयत्न केला.

# २१. मित्र

मी पुण्यात आल्यावर अनेक लोकांशी संबंध आला; परंतु त्या पैकी जास्त जवळिक व मैत्री काही ठराविक लोकांशीच झाली. ज्याचा चांगला वाईट परिणाम माझ्या विचारावर व जीवनावर झाला.

लायब्ररी काढण्याच्या उद्देशाने भेट झालेले रावळ साहेब हे माझे जिवलग मित्र झाले होते. माझ्या वडिलांची सुद्धा त्यांनी खूप सेवा केली. किमान आठ-दहा वर्षेच आमची ही मैत्री टिकली. कारण एके दिवशी ते कॉलेजमध्ये आले व मला पाच हजार रुपये मागितले व त्यांच्या गावाकडची बायकोकडील प्रॉपर्टी पोराच्या नावावर करायची आहे व मला आत्ताच पैसे पाहिजेत असा हट्ट धरला. पण खरोखरच माझ्याकडे त्या वेळेला पैसे नव्हते व कुठून मिळण्याची शक्यताही नव्हती. माझा पगारही त्या वेळी तेवढा नव्हता व मी जे वेगवेगळ्या व्यवसायातून पैसे कमावत होतो ते वडजी या ठिकाणी मंदिर बांधण्यासाठी सातत्याने पाठवत होतो. खरोखरच पैसे नव्हते. पण त्यांनी ते समजून घेतले नाही व तिथून निघून गेले ते कायमचेच. पुन्हा कधीही भेटायलासुद्धा आले नाहीत. खरं तर माझी काहीच चूक नव्हती. पण हे घडलं ते सत्य आहे.

उबाळे व पाटील साहेब हेही दिर्घकाळ मित्र राहिले. कारण पुढे स्वारगेटचे होटेलच आम्ही एकत्रित बांधले व पुढे चालू ठेवले. उबाळे वरती मी खूप प्रेम केले त्यांनी सुद्धा कोणतेही माझे काम नेहमी केले; पण त्यांना ट्रक मी तसाच दिला एका माणसाकडून. व्याजाने त्यांना पैसे द्यायला लावले व मी ते भरले. पण त्यांनी तेरा चौदा लाख होत होते. पाटील साहेबापुढे हे प्रकरण गेले. त्यांनी नऊ लाखावर तोडगा काढला. पण मला त्यातील एकही

पैसा मिळाला नाही. पण मी मैत्री सोडली नाही. अलिकडे त्यांच्याही वर्तनात फरक पडल्यासारखे वाटते.

काकाची आणि माझी मैत्री गेली ३२ वर्षे पेक्षा जास्त आहे. प्रामाणिक मित्र व हितचिंतक म्हणून नेहमीच त्यांनी चांगले काम केले. सन्मानाने वागणूक देणे व मृदुता यामध्ये त्यांचा हात कोणीच धरणार नाही.

नानाचा संबंध शैक्षणिक कार्यापुरताच आल्यामुळे त्यांचा विचार कधी मी मित्र म्हणून केलाच नाही.

बाबासाहेब सांगळे यांचे बरोबर जोडगोळी म्हणून अनेक वर्षे काम केलं. जवळ जवळ २५-३० वर्षे आम्ही काम केले. पण विद्यापीठाच्या बाबतीत मला त्याचा अनुभव अत्यंत मोठा आहे. त्यांनी एखादी गोष्ट सांगीतली की मी म्हणायचो त्याचा काय संबंध आहे. पण ती गोष्ट तशीच घडायची अत्यंत हुशार व प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचा अभ्यास त्यांचा आहे. त्याचा मला विद्यापीठात काम करताना खूप फायदा झाला.

राजेंद्र महाराज येप्रे व माझी अध्यात्मामुळे मैत्री झाली. मी त्यांचे कीर्तन शिवजयंतीमध्ये ठेवले होते. त्यावेळी आम्ही नवज्योत मित्र मंडळामार्फत दहा दिवस शिवजयंतीचे कार्यक्रम करत होतो. त्यानंतर अनेक तिर्थयात्रा आम्ही बरोबर केल्या. अनेक कार्यक्रमांना आम्ही एकत्र राहिलो. येप्रे महाराज म्हणजे साक्षात ज्ञानाचा अखंड झरा. कठोर परीश्रम करून ज्ञान प्राप्ती करणे व कोणतीही गोष्ट प्राप्त करून घेणे हे त्यांचे वैशिष्ट, त्यांचे विशेष कौतुक म्हणजे स्वतः श्रीमद भागवत् कथा सांगायला शिकले. कीर्तन तर उत्तम प्रकारे करतातच. त्यातला पहाडीपणा हा अत्यंत महत्त्वाचा. अलिकडची महत्त्वाची ओळख म्हणजे ते शिव व्याख्याने व गायन करून ज्ञान देणे ही त्याची हातोटी. त्यांच्या किर्तनातून अनेक नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. हे माझे आध्यात्मिक मित्रच म्हणावे लागतील.

शांतु सेठ यांच्याबरोबर व्यवसायिक संबंध आले. पण महाराष्ट्र राज्य नर्सींग कौन्सिलच्या निवडणुकीच्या वेळेला त्यांचे महाराष्ट्रभर असणारे संबंध जाणवले. प्रत्येक गोष्ट चिकित्सक पद्धतीने पाहणे, चांगल्या वाईट परिणामांचा विचार करणे व वास्तव परखड मांडणे हे त्यांचे

गुण वाखाणण्यासारखे आहेत.

दादासाहेब गाडेकर यांचे आणि माझे या पाच वर्षात संबंध आले. पण दोस्ती करण्याच्या लायकीचा माणूस म्हणून त्यांच्याकडे मी पाहतो. बोलायला फटकळ पण जमीन व्यवसायातील अभ्यास अत्यंत गाडा. फक्त एक दोष त्यांच्यामध्ये आहे. तो म्हणजे पुढची काम घ्यायची, घेतच राहायची व मागील कामाकडे त्यामुळे आपोआप दुर्लक्ष होते. मी नवीन संस्था घेतल्यावर त्यांनी लोन मिळविण्यासाठी वर्षभर खूप प्रयत्न केले. त्याला यश आले नाही पण त्यांची तळमळ व मित्र प्रेमाचे दर्शन मला त्यातून झाले.

हरिश्चंद्र अण्णा व माझी जागेपासून ओळख झाली. पण त्याचं रुपांतर मैत्रीत झालं. पुढे ते नगरसेवक झाले. मी पंचधातूची मूर्ती व एक साधी देवीची मूर्ती त्यांच्या ंमदिराला दान दिली. त्यांना नवरात्र महोत्सव करण्यासाठी सुरुवात करून दिली. गेली कित्येक वर्षे मला न चुकता नवरात्र महोत्सवाच्या उद्घाटनाला न चुकता बोलावतात. मंदिर बांधले होते. पण आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी कळस बांधला नव्हता. तो कळसही मी बांधून दिला. खरं तर दान केल्यावर ते गुप्त असावे अस असते; परंतु मला मात्र असे वाटले की एक पाटी त्यांनी त्याबद्दल बसवायला पाहिजे होती. कारण ज्या वेळी मी दान केलं त्या वेळी माझी आर्थिक परिस्थिती एवढे दान करण्यासारखी नव्हती. तरी मी त्यांच्या कष्टाकडे बघून हे दान दिले होते. ही मात्र मनात एक खंत आहे. कारण नवीन पिढीला काय माहित होणार की आपण मदत केलेली आहे.

अनेक मित्र आहेत. चांगले, वाईट अनुभव त्यांच्यापासून मिळाले. पण हे लिखाण लांबू नये म्हणून थांबतो.

⏩⏩

# २२. सोनेरी आमदार स्व. रमेशभाऊ वांजळे

स्वर्गीय आमदार रमेशभाऊ वांजळे हे माझे सगळ्यात जिवलग मित्र. तसा मित्र होणे नाही. मित्राकडून स्वार्थ नाही. त्याच्या पैशावर नजर नाही. आपणच त्याला काही मदत करू शकतो का हे नेहमी पाहणारा सच्चा मित्र. रामधारी सिंह दिनकरांनी वर्णन केलेल्या रस्मी रथी पुस्तकातील वचनाप्रमाणे. साक्षात श्रीकृष्ण जातात कर्णाकडे आणि त्याला सांगतात की तू थोरला पांडव आहेस चल तुला सर्व राज्य देऊन टाकू. त्या दुर्योधनाची साथ सोडून दे. त्यावेळी मैत्रीची व्याख्या त्याने सांगितली.

मित्रता बढ़ा अनमोल रतन
कब इसे तोल सकता है धन
धरती की तो है क्या बिसात
आजाय अगर स्वर्ग हात.

हे वचन तंतोतंत पाळणारा सच्चा माणूस. कोपरे गावात शिवजयंतीला व्याख्यान देण्यासाठी मी गेलो त्यावेळी त्यांची माझी ओळख झाली. आधी छोटीशीच होती. पण हळूहळू संपर्क वाढला व घट्ट मैत्रीत रुपांतर झालं. मी ज्या वेळेला पासपोर्ट काढला त्या वेळेला मी त्यांचाही पासपोर्ट काढला होता. पण दुर्दैव त्यांना इंग्लंडचा व्हिजा मिळाला नाही. कारण त्यांना कशासाठी जायचंय असं विचारलं असता आमच्या देशावर दीडशे वर्षे राज्य ज्यांनी केलं तो देश कसा आहे हे पाहायचा आहे असे उत्तर त्यांनी दिलं त्यामुळे त्यांना युरोपाच्या दौऱ्यावर येता आलं नाही म्हणून त्यांच्यासाठी आम्ही फार इस्टचा दौरा केला. त्यावेळेला अनेक प्रकारे विनोद करून सगळ्याला हसवत राहायचे. पुढे त्यांनी आणि मी फॅमिली सहीत युरोपाचा दौरा केला. मुलावर त्यांचे अतोनात प्रेम होते. त्या मुलांना काही व कितीही रुपयांचे खायला मागितले तरी ते द्यायचे. त्याच्यावर अत्यंत प्रेम होतं. लोकांनाही फार अभिमान वाटावा एवढा दानशूर

माणूस मी कोठे बघितला नाही. मी एकदा गाडी चालवत होतो. ते माझ्या शेजारी बसले होते. त्यांनी हाताकडे पाहिले. माझ्या हातात टायटनचे घड्याळ होते. त्यांनी ते काढून घेतले व माझ्या हातास त्यांच्या हातातले घड्याळ घातले व ते परत घेतले नाही. नंतर त्याचा सेल संपला. त्या वेळी मी व काका दिल्लीत होतो. घड्याळाचा सेल चेक करताना मी सहज त्याची किंमत विचारली. त्यावेळी दुकानदाराने सांगितले साहेब हे घड्याळ इम्पोर्टेड आहे व याची किंमत १ ते सव्वा लाख रुपये आहे. अशा अनेक हजारो लोकांना मदती केल्या.

नेहमी ते मला म्हणायचे. सर सिंहगडच्या नवले सरांसारख्या मोठ्या संस्था सुरु करा. मी तुमच्याबरोबर आहे व मला नेहमी म्हणायचे. तुम्ही चूक करत आहात नाना आणि काका यांच्या नादी लागून. तुमच्या आयुष्यातील महत्त्वाचे तास पण वाया घालवू नका. त्यांचा तुम्हाला काही उपयोग व्हायचा नाही. ऐन वेळेला ते तुम्हाला मदत करणार नाहीत. पण मी मात्र मैत्री महत्त्वाची मानली व त्यांच्याकडे या विषयावर नेहमी दुर्लक्ष केले.

मग त्यांच्या म्हणण्यानुसार एक संस्था सुरु केली. वांजळे याचे प्रेम गणपतीवर खुप होते. रोज ते पुण्यात आल्यावर दगडू शेठ गणपतीला नक्कीच जाणार. त्यामुळे आम्ही संस्थेला नावही जय गणेश एज्युकेशनल फाऊंडेशन असे दिले व त्यात दोन शाळा व डी.एड. व बी.एड या शाखा घेतल्या व संस्था सुरु झाल्या. आम्ही त्यांच्या गावाला एनडीएच्या जवळ आहिरे गावाला २०० एकर जमीन घ्यायचे ठरविले. त्यात निम्म्या जागेवर शिक्षण संस्था व अर्ध्या जागेवर व्यवसाय करायचा असे ठरविले व २५-३० एकर जमीन खरेदी केली व त्यावेळी त्याची निवडणूक लागली व आमचे जागा घेण्याकडचे लक्ष ही कमी झाले. जागेचा व्यवसायही आम्ही चांगला केला होता. व्यवसायासाठी अनेक जागा आम्ही खरेदी केल्या होत्या; परंतु निवडणूक लागल्यावर सर्व व्यवहार थांबून निवडणूक हेच काम शिल्लक राहिले. मी दांगट पाटील शिक्षण संस्थेचाही सचिव होतो; परंतु त्यांनी मला कधीही प्रचार करा. मला निवडणूकीला मदत करा असा आग्रह धरला नाही. उलट ते म्हणायचे, मला तुम्ही माहित आहात. पण दांगटाला काहीतरी वाटेल त्यापेक्षा तुम्ही आमचा कुणाचाही प्रचार करू नका व सभेलाही येऊ नका. परंतु शेवटी व्हायच तेच झाले आणि दांगट पाटलांनी गैरसमज केला व मी जेव्हा ही गोष्ट त्यांना सांगितली त्यावेळी ते म्हणाले, तुम्ही जीव जरी दिला आणि खरं

सांगायचा प्रयत्न केला तरी त्यांना खरं वाटणार नाही आणि ते सत्य ठरलं.

पुढे निवडणूक झाली. वांजळे निवडून आले. मोठी मिरवणूक निघाली. त्यांना भेटण्यासाठी काही न्यायाधीश वकील व बिल्डर आले होते. आम्हाला त्यांच्या घरी भेटायला जायचे होते. पण त्यांना मी फोन केला ते म्हणाले अहो एवढी मोठी माणसं आहेत तर मीच मध्येच येतो व चालू मिरवणूकीतून हळूच घरी आले सर्वांना भेटले व मग गेले. पुढे पुढे ते एवढे फेमस झाले होते की त्यांना बघायला व सत्कार करण्यासाठी रोज शेकडो माणसं येऊ लागली. अनेक लोक त्यांच्याकडे समस्या घेऊन येऊ लागली. त्या समस्या ते फोनवर सोडवू लागले. लोक कोर्ट व पोलिस स्टेशनमध्ये जाण्याऐवजी त्यांच्याकडे येत व दोन मिनीटात ते ऐकून त्यांच भांडण मिटवित होते. सिंहगड रोडवरील बाकीच्या लोकांचे ऑफिस त्यांनी बंद करून लोक धंद्याला लागले व त्यांना वाटले की आता आपली दाळ शिजत नाही. काही शैक्षणिक गोष्टी असतील तर त्या माझ्याकडे ते सोपवत होते.

श्रावणबाळासारखे त्यांनी वृद्ध लोकांच्या अनेक यात्रा काढल्या. त्यांना व्हिआयपी ट्रिटमेंट, बॉटलबंद पाणी, जेवण, रेल्वे तिकीट, राहणे सर्व मोफत व ज्या वयस्कर लोकांना कोणी विचारत नव्हते त्यांना या यात्रा केल्या. हिंदुना काशी, हरिद्वार मुस्लीम असेल तर राजस्थानातील दर्गा अजमेर, मागासवर्गीय लोकांना नागपूर दिक्षा भूमी किर्तनालाही सर्वांना मोठा लाडू व पाण्याची बॉटल. शाळेतही पाव किलोचा एकच लाडू त्या विद्यार्थ्यांना देणार म्हणजे असं काही डोक चालवायचं की तेथे कुणाचेच चालणार नाही.

निवांत वेळेत नेहमी म्हणायचे मी मोठा पुढारी व राजकारणी होण्यासाठी काय केले पाहिजे. मी त्यांना सागायचो, की पहिले रम, रमा, रम्मी याच्यापासून दूर राहिले पाहिजे व इतिहासातील उदाहरण मी त्यांना द्यायचो व त्यांना पटायचं मग त्यांनी माळ घालायचं ठरविलं. त्यांनी हळूहळू तुकारामाची गाथा पाठ करायला सुरूवात केली व बघता घता ती पाठ करून टाकली. त्याची भाषणे होऊ लागली. गीता फडाफडा म्हणू लागले. दिसायला असला रांगडा माणूस, पैलवान माणूस व गाथा पाठ, टि. व्ही व सर्व लोक आश्चर्य करत व ते नेहमी डायलॉग म्हणायचे, ''मै तो दिखने में व्हिलन हू लेकीन काम हिरो का करता हूँ'' व लोक अजूनच कौतुक करायचे. त्यांची ख्याती सोनेरी आमदार म्हणून सर्व दूर पसरली होती.

मला एकदा बसल्या बसल्या ते म्हणाले किती वय झालं. मी म्हटलं येत्या जूनला ५० वर्षे होतायत. पण मी आजपर्यंत वाढदिवस केलेला नाही. त्यांनी म्हटलं की असं कसं काय ? होय खरचं मी आजपर्यंत वाढदिवस केलेला नाही एकदाही. त्या वेळी त्यांनी सांगितलं थांबा आपण तुमचा या वर्षी खूप मोठा वाढदिवस साजरा करू व एक सत्कार मोठ्या माणसाचाही ठेऊ व त्यांनी अण्णा हजारे यांना विचारलं. त्यांनी येण्याचं कबुल केलं. पण नेमकं त्यांचं आंदोलन रामलीला मैदान दिल्लीला सुरू झालं ३ जूनला व माझा वाढदिवस हा ६ जूनला व त्याही वर्षी वाढदिवस रद्द झाला. पुढच्या वर्षी त्यांनी सांगितलं परत आपण आण्णालाच बोलावू व त्याही वेळी अण्णा दिल्लीला उपोषणाला बसले व दहा तारखेला वांजळेंच अकस्मात निधन झालं. मला तर खरचं वाटत नव्हते. मला शार्दूलचा फोन आला, काकांची प्रकृती गंभीर आहे असं टी. व्ही. ला दाखवतात. माझा दुपारी फोन झाला होता. मी वहिनीला फोन केला. त्याही म्हणाल्या काही नाही. माझा ही फोन झालेला आहे. पण त्यांच्या मृत्यूची घटना ही नक्की घातपात असावा अशीच आहे. कारण त्यांचे सगळे रिपोर्ट हे नॉर्मल आहेत व एवढा मोठा बलदंड माणूस अचानक जातो हे मात्र नक्की शंकास्पद आहे. कोणाचाही या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. दुसऱ्या दिवशी त्यांची अंत्ययात्रा सुरू झाली. कोणीही न सांगता सर्व लोकांनी आपली दुकाने बंद केली. थोडा थोडा पाऊस येत होता. शाळेतील अनेक मुले दप्तर घेऊन तशीच अंत्ययात्रेमध्ये सामील होत होती. हजारो माणसं सामील झाली व कधी नव्हे ती न भूतो न भविष्यती अशी गर्दी त्या अंत्ययात्रेत झाली. माणसाचा महापूर आला. पूर्ण सिंहगड रोड पाच सहा कि. मी. अंत्ययात्रा निघाली. सर्व पक्षाचे सर्वच मोठे नेते श्रद्धांजलीसाठी आले. अशी अंत्ययात्रा पुण्याच्या इतिहासात कधीच निघाली नाही. अशा या महान माणसाचा अर्ध्यावरचं शेवट झाला व खऱ्या अर्थाने माझा आधार गेला व मी पोरका झालो. त्यांच वय जास्त नव्हतं. मुलं छोटी छोटी होती. सगळी पोरकी झाली. मात्र या रोडवरच्या विरोधकांनी पार्टी साजरी केली. त्यांचे हजारो कार्यकर्ते होते ते सर्व पोरके झाले. आज जर ते असते तर ते पुण्याचे खासदार झाले असते व ते नेहमी म्हणायचे मी बायकोला आमदार करणार व ते नक्की खरे झाले असते.

▸▸ ▸▸

# २३. व्याख्याने व प्रवचने

मी अनेक वर्षे विविध विषयावर व्याख्याने दिली. त्यामध्ये शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, स्वातंत्र्यवीर सावरकर, राणी लक्ष्मीबाई, महिला सबलीकरण व असे कितीतरी राष्ट्रीय नेत्यावर मी नेहमीच व्याख्याने दिली व ती सर्वांना भावली. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे आद्य क्रांतीगुरु लहुजी वस्ताद यांच्यावर मी अनेक वर्षे अभ्यास केला. त्यांच्या विविध ठिकाणांना भेटी दिल्या. त्यांची माहिती गोळा केली व पानमळ्यातील श्री. खंडाळे यांच्या वतीने एक कॅसेट प्रसिद्ध केली व तिच्या पाच हजार प्रती काढून वाटल्या. लहुजी वस्तादासारखा माणूस कोणालाच माहित नव्हता. तो मी उजेडात आणला याबद्दल मला खूप समाधान आहे. लहुजी वस्ताद किती मोठे होते हे त्यांच्या शिष्याच्यावरून तुमच्या लक्षात येईल. लहुजी वस्तादाचे शिष्य उमाजी नाईक, महात्मा फुले, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके त्यांचे शिष्य - लोकमान्य टिळक. त्यांचे शिष्य चाफेकर बंधू व त्यांचे शिष्य सावरकर. स्वातंत्र्य संग्रामाची खरी सुरुवात लहुजींनी केली पण ती पडद्याआड राहिली. ती बाहेर काढणे व सर्व मातंग व रामोशी समाज जागा करणे हे शक्य झाले व आता लहुजी वस्तादाच्या नावाने अनेक संघटना व संस्था स्थापन झाल्या आहेत व त्या त्याचं कार्य समजून सांगण्याचं काम करत आहेत.

यात सर्वात महत्त्वाचं म्हणजे माझे विद्यार्थी जे जेधे कॉलेजमध्ये होते व जे मातंग समाजातील होते. त्यांना एकत्र करून त्यांना लहुजी वस्ताद सांगून भडकावत व जाधव यासारख्या मुलांनी अलवसा फौंडेशन काढून हे कार्य पूर्ण करत आहेत व लहुजीनवर सिनेमा सुद्धा काढण्याचा त्यांचा मानस आहे.

मी जवळ जवळ १४ वर्षे टेल्को कंपनीत त्यांच्या एच. आर. विभागात व्याख्याने देत

होतो. सुरुवातीला हे व्याख्यान दीड तासाचे होते व नंतर मी कामगार व अधिकाऱ्यांना मोटीव्हेशन या विषयावर व्याख्यान देत होतो. प्रत्येक व्याख्यानाला त्याचा नियम २००० रुपये असा होता. पण मी दोन सेशन घेऊन १४ वर्षे मी मोफत टेल्को कंपनीत व्याख्याने दिली व ती इतकी प्रसिद्ध झाली की दोन सेशनच्यामध्ये १५ मिनिटाचा ब्रेक होता. लोकांनी तो रद्द केला व सतत ३ तास व्याख्यान द्यायला लावले. पाणी न पीता हातात चिठ्ठी न घेता तीन तास व्याख्यान देतात व एकही कर्मचारी हालत नव्हता. ही माहिती त्या वेळचे जनरल मॅनेजर यांच्याकडे गेली. त्यांनी त्यांचा मॅनेजर व्याख्यानाला न सांगता पाठवला व त्याने रिपोर्ट दिला की लोक सिनेमाला सुद्धा ३ तास बसत नाहीत. पण ३ तासात माझ्या व्याख्यानाला एकही माणूस हालत नाही व टेल्कोने मला २०० लेक्चरमध्ये एकही ॲडव्हर्स रिमार्क नाही म्हणून आदर्श व्याख्याते म्हणून गोल्ड मेडल देऊन सत्कार केला. त्यावेळी अधिकारी सुभाष चंद्र जाधव व देसाई होते. तेही खूप चांगल्या पद्धतीने काम करत होते.

अनेक ठिकाणी अनेक गावात, ग्रामीण भागात, झोपडपट्ट्यात, कॉलेजात कुठेही हजारो व्याख्याने आतापर्यंत मी दिली व जनजागृती करण्याचे काम केले त्याबद्दल मी समाधानी आहे.

नंतर मी अध्यात्माचा अभ्यास केला व व्याख्यानाबरोबरच प्रवचनेही करू लागलो. विविध विषयावर प्रवचनेही मी केली. पण कामाच्या व्यापात पुढे पुढे ती कमी होत गेली.

त्यानंतर युनिव्हर्सल कॉलेज घेतल्यावर तर अडचणीमुळे व धावपळीमुळे सर्व ज्ञान विसरल्यासारखे झाले व त्याच एका कामात अडकून गेलो.

▸▸ ▸▸

# २४. वडजी ग्रामपंचायत

वडजी हे माझं प्रिय गाव. त्या गावावर मी फार प्रेम केले. त्या गावाच्या विकासासाठी मी माझ्या आयुष्यातील फार मोठा भाग खर्च केला. सुरुवातीला क्रांतीवीर ग्रामविकास मंडळाच्या मार्फत फार मोठ्या प्रमाणावर काम केले व त्यानंतर १० वर्षे सपोर्ट करून ग्रामपंचायत निवडून आणली व आता गेली २५ वर्षे तर मी स्वतःचाच पॅनल उभा करून निवडून आणला व बऱ्याच वेळा ९ पैकी ९ तर काही वेळा १० पैकी १० सीट निवडून आणले. गावामधील अतिक्रमणे निघावीत म्हणून मी अनेक लोकांना पाठिंबा देऊन निवडून आणले. पण एकाही सरपंचाने एकही अतिक्रमण कधी काढले नाही. उलट अतिक्रमणे गावात मोठ्या प्रमाणात वाढली. सुरुवातीला दोन वेळा सुदन पाटलाला निवडणूकीत मदत केली. नंतर सुनील सरपंचाला जवळजवळ १५-२० वर्षे व आता रमेश जाधवर याला पाच वर्षे पण मला ज्या पद्धतीने गाव सुधारणारा माणूस पाहिजे होता. तसा माणूस मिळाला नाही. राजकारण फार अवघड व वाईट असते. त्यामध्ये दोनदा आमच्या चुलत बहिणीला व स्वतः माझ्या भावाच्या मुलीला व सख्या मेव्हण्याला पाडावे लागले. त्यातूनच फार मोठे वैर व आर्थिक व सामाजिक नुकसान पदरात पडले. खरं तर एका निवडणूकीत मी गावात बिनविरोध इलेक्शन करण्याचे ठरविले. दोन्ही मोठे गट एकत्र केले. पण गावातील साध्या लोकांनी त्यांचे लोक विरोधात उभे केले व मतदान घडवून आणले. परिणामी आमचेच सर्व लोक निवडून आले. पण मला एका गोष्टीचे फार वाईट वाटले की, आम्ही ज्याला सरपंच केले त्यांनीच पुढच्या निवडणूकीत आम्हाला आतून विरोध केला व नीट प्रचार तर केला नाहीच उलट आमच्या लोकांना मतदान केले नाही. सर्व पार्ट्या एकत्र करून निवडणूक लढविली. त्यामध्ये आधीच्या निवडणूकीत मी चुलत बहिण व भावाची मुलगी यांना पाडले होते. त्यांना एक एक वर्षे सरपंच करू असा मी शब्द दिला होता. पण दोघाही पार्ट्यांचे चुकले आमच्या काही लोकांनी

निवडणूकीनंतर एकमेकांशी संबंध चांगले ठेवले नाहीत तर सरपंच करण्याच्या वेळेला पूर्वीच्या जुन्या गोष्टी उकरून काढून सरपंच करायला विरोध केला व तो विरोध फार मोठा असल्यामुळे मला तो विरोध मोडून काढता आला नाही व मी दिलेला शब्द खोटा ठरला. नाही म्हणत नव्हते व करतही नव्हते. लोक स्वार्थासाठी काय करू शकतात व कोणत्याही थराला जाऊ शकतात याचा अनुभव मला या ग्रामपंचायत निवडणूकीत आला व आमचे, आमच्या मेव्हण्याचे संबंध कायम तुटले. त्यामध्ये माझे नुकसान जास्त झाले. आर्थिक उन्नती व संस्थात्मक उन्नती थांबली व आमच्या बायकोचे व माझे नेहमी गावाकडील राजकारणामुळे खटके उडाले व माझा सख्खा भाऊ व सख्खा मेव्हणा एकमेकाविरोधात उभा राहिल्यामुळे आमच्या दोन्ही कुटुंबातही अंतर निर्माण झाले व कोणी कोणाला बोलेनासे झाले. मी निवडणूका जिंकलो पण स्वतः हरलो व निवडणुकांमुळे एकमेकांचा वाईटपणा घेण्याची वेळ आली व एकूणच राजकारणाचा मोठा फटका मोठ्या प्रमाणावर मला बसला. तो कशानेच भरून येणार नाही. एवढे अगणित नुकसान या ग्रामपंचायतमुळे झाले.जशी ग्रामपंचायत गावात झाली. त्यावेळी माझे आजोबा पहिले दहा वर्षे सरपंच व नंतर माझे वडिल, मोठा भाऊ, छोटा भाऊ सगळे सदस्य ; परंतु ग्रामपंचायत एक प्रश्न चिन्ह म्हणूनच माझ्यापुढे उभा राहिल्याचे एकंदरीत दिसते व ही ग्रामपंचायत नसून माझ्यादृष्टीने तर ती पंचायतच ठरली. असे आता मला वाटू लागले आहे.

▸▸ ▸▸

# २५. कर भला तो हो बुरा असा अनुभव

खरं तर कर भला तो हो भला अशी म्हण आहे. पण माझ्या बाबतीत ही उलट म्हण ठरली. कारण मी अनेकाचं चांगलं केलं पण माझं चांगलं होण्यामध्ये क्वचितच लोकांचा सहभाग मला जाणवला. मी नेहमी मोठा विचार करायचो व आपल्या जवळचे लोकही मोठे झाले पाहिजेत याचा विचार मी नेहमी करायचो. त्यातूनच पुण्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी मी डॉ. वाळके व रमेश जाधवर यांना बोललो. ते तयार झाले; पण नावावर काहीच नको टॅक्स वगैरे याचीही जबाबदारी नको व तीन वर्षात पैसे दुप्पट मिळावे व मिळतील असे मार्केट ज्या वेळी मी त्याच्या बरोबर व्यवहार केला त्या वेळी जमिनीचे भाव पटापट वाढत होते. त्यामुळे ते शक्यही वाटत होतं. पण हे मार्केट दर पाच वर्षात एक-दोन वर्षाचे तेजीत येत व नंतर त्यातली तीन वर्षे निवडणूकीच्या आधी व नंतरच्या काळात मंदी असते हे माझ्याही लक्षात आलं नाही. वास्तविक त्याची गुंतवणूक ही माझ्याकडे किंवा माझ्या व्यवसायात नव्हती. माझा त्या गुंतवणूकीत काडीचाही संबंध नव्हता व नाही. पण जवळच्या माणसाचे भले होत आहे तर आपल्या ज्ञानाचा फायदा इतराला झाला तर आनंद वाटेल या स्वच्छ व प्रामाणिक हेतूने मी ते केलं. पहिला त्यांचा व्यवहार त्यांना मी एक जागा धायरीमध्ये घेऊन दिली होती. त्यातही रमेश पोकळेनी पुढची जागा दाखवली व खरेदी करून दिली व तीच जागा दुसऱ्यालाही खरेदी दिली होती व नंतर ते माहित झाले. नंतर मला मागची जागा घ्यावी लागली. त्या जागेची किंमत आम्ही ठरविली व तीन वर्षात डबल द्यायचे ठरले. पण गंमत अशी झाली की त्या काळात नेमकी मंदी आली व मला डॉ. व रमेशचे फोन सुरू झाले. मी ती जागा नाईलाजाने दुसऱ्याला विकली. पण डबल पैसे होण्यामध्ये २० लाख रुपये कमी पडले. ते मी स्वतःचे भरले. वास्तविक मी का तसे केले. मी माझ्या जवळचे संबंध नसतांना २०

लाख रुपये का भरले हे मलाही कळले नाही. पण त्यांचा व्यवहार पूर्ण केला.

त्यानंतर मला सुनील जाधव भेटला व त्याने मला माझ्याकडे गुंतवणूक करा मी तुम्हाला ३ वर्षात ती जागा दुप्पट किंमतीत विकून देतो असे सांगितले व मी त्याच्या बोलण्यात अडकलो व मी दिवाळीच्या वेळी गावी गेल्यावर डॉ. व रमेश यांना बोललो की माझ्या मित्राकडे असे प्रपोजल आहे. त्यांनी सांगितले की आम्ही तयार आहोत. वास्तविक त्या व्यवहारातही मला एक रुपयांचा फायदा नव्हता. फक्त मी यांचे पैसे त्याच्याकडे गुंतवणार बाकी काहीच संबंध नाही व मला त्यात नफ्यात काही हिस्साही नाही. पण मी का त्यात अडकलो. मला दुसऱ्यांदाही कळले नाही काय होत होते. मलाही समजले नाही पण हे घडून गेले. त्यांच्या जागेचे पैसे त्यांनी परत गुंतविले व ते मी तसेच एकही पैसा माझ्याकडे न ठेवता मी ते तसेच गावाकडून येऊन डायरेक्ट दिवाळीच्या दिवशी त्याला घरी जाऊन काहीही लिहून न घेता दिले. त्यावेळी माधवराव व माझी पत्नी साक्षीदार होत्या.

नंतर जाधव यांनी मला नेहमी वेगवेगळ्या जागा दाखवल्या. अगोदर मला वारज्याची जागा दाखविली. ती पसंत आहे का हे विचारले. मी ती पसंत केली; पण पुन्हा मात्र बावधनची जागा दाखविली व त्या बांधकाम करण्यासारख्या जागा होत्या त्यामुळे मला त्या मान्य होत्या. उलट मी माझ्या जवळचे ३५ लाख रुपये त्याला अजून दिले व मला ही तुमच्याबरोबर घ्या असे सांगितले व नंतर त्याने पुण्याच्या बाहेर चांदखेड गावी जागा दिली.

नंतर नोटबंदी झाली. बांधकामाचे व प्लॉटींगचे सर्व मार्केट कोसळले. विकण्याचं म्हटलं कमी किमतीत तरी गिऱ्हाईक मिळत नव्हतं व मध्येच डॉ. व रमेश मात्र जणू काही मी पैसे माझ्या व्यवसायात गुंतवले असे तगादा लाऊ लागले. कदाचित त्यांचीही काही चूक नव्हती. त्यांना सांगितल्यापेक्षा जास्त वेळ झाला होता. पण त्यांनीही कधी समजून घेतले नाही की हे पैसे जमिनीत गुंतविले आहेत व जमीन तशीच आहे. मी त्यांच्या एकाही पैशात व्यक्तिगत मिंधा नाही. पण वारंवार तगादा लावून व मीही आज उद्या पैसे मिळतील असे समजून पुन्हा मी चूका करत गेलो व माझे शाळेचे बांधकाम चालू असताना मी त्यांना पैसे वर वर देत राहिलो. वास्तविक आता मी त्यांना त्यांनी गुंतविलेल्या पैशापेक्षा पन्नास लाख जास्त दिलेले

आहेत. दिलेल्यापैकी अर्धे पैसे हे व्याजाचे आहेत. ते व्याजही मीच भरत आहे. ज्या वेळी जमीन विकली जाईल त्यावेळी टॅक्सही मीच भरणार आहे. वास्तविक मी फक्त मध्यस्थ होतो. पण जवळच्या माणसाला  पैसे मिळावे म्हणून मी मदत केली. पण ती एवढी आंगलट येईल असे वाटले नाही.

वास्तविक जाधव यांनी या प्रकारे वागायला न पाहिजे होते. त्याला जमीन विकू म्हटलं तर आता गिऱ्हाईक नाही व प्लॉटींग करू थांबा जास्त पैसे मिळतील असं म्हणून पाच–सहा वर्षे त्यांनी काढली. पण मी का अडकत गेलो हे मला कळत नाही. कदाचित डॉ. व रमेश यांच्या प्रेमाचा पगडा जास्त झाला की कोरडी इज्जत म्हणून मी तसा वागलो हे मला कळत नाही. पण त्या व्यवहारात सुनील जाधव, डॉ. व रमेश यांचा मला विनाकारण त्रास झाला. वास्तविक मी मध्यस्थी होतो व त्यांच्या फायद्याचा माझ्याशी काहीच संबंध नाही. पण चांगुलपणाची शिक्षा मी भोगत आहे आणि आता रमेश व डॉ. हे परत तगादा लावत आहेत. काय करावं कळत नाही. पण हे वरील सत्य मी शपथपूर्वक सांगत आहे. आणखी एक जागा खडकवासला या ठिकाणी होती. ती जागा महार वतनाची होती. ती आम्ही घ्यायची ठरविली. त्यातली २० गुंठे जागा परत रमेश, बाबुराव व डॉ. घेणार होते. त्यांनी फक्त ३० लाख रुपये दिले. वतन असल्यामुळे आपण रजि. ॲग्रिमेंट केले आहे. मी त्यांनाही ते करून देऊ शकत होतो. पण जवळचे आहेत, कोठे फसू नाहीत म्हणून मी त्या जागेचे रिग्रेंड व इतर प्रक्रिया चालू केल्या. भारताची सरकारी ऑफिस प्रक्रिया अशी आहे की त्याला सुद्धा आता पाच वर्षे झाली. पण सारखी फाईल खालून वर व वरून खाली. त्यामुळे ती वेळेत होत नाही. मीही त्यातली ४० गुंठे जागा घेतली आहे. मी हळूहळू त्यांना ६०% पैसे दिलेही आहेत पण आता ते आम्हाला जागा नको असे म्हणू लागले आहेत. या पद्धतीने प्रेमाने मी खूपच अडकलो याचा विचार ते करतील व परमेश्वर त्यांना सद्‌बुद्धी देईल व माझी सुटका करेल अशी अपेक्षा करतो. कारण मी एकाही पैशात कुणाचा लाजीम नाही. पण असे कदाचित स्वभावामुळे व चांगुलपणामुळे घडत असावे असे वाटते व यात मला कर भला तो हो बुरा असा अनुभव येताना दिसत आहे.

▸▸ ▸▸

# २८. वाईट अनुभव

एकदा दादा घुले माझ्याकडे आले व त्यांची वेळूची जागा घ्या असे म्हणाले. मला काही जागा घ्यायची नव्हती कारण एवढ्या बाहेर जागा घेऊन काय करायचे असं मला वाटत होतं. त्यामुळे मी त्यांना टाळत होतो. कदाचित असे कळते की त्यांना कर्ज फेडण्यासाठी व मुलीच्या लग्नासाठी अडचण होती. जवळ जवळ दीड ते दोन वर्षे ते माझ्या मागे होते. सारखे शेतातील भाजीपाला घेऊन येणे, त्यांच्याकडे म्हशीचा गोटा होता तर दूध घेऊन येणे असा त्यांनी घरोबा वाढविला व एकदा पत्नीला जागा तर बघुन घ्या म्हणून गळ घातली. आम्ही शेती पाहण्यासाठी गेलो. शेती अत्यंत उत्तम होती. म्हशीचा गोटा उत्तम होता. त्यामध्ये १००–१५० म्हशी होत्या. खतामुळे शेती ही उत्तम होती. त्यांच्या शेतीतील काही भाग जो वर डोंगरावर आहे तो आम्ही पार्टनरशीपमध्ये पूर्वीच प्लॉटींगसाठी घेतला होता. त्यामुळे खाली साडेचार एकर जमीन होती त्यात अंजीराची बाग होती व दादा मात्र शेती अत्यंत चांगली करत. त्यांची हातोटी चांगली होती. आम्ही शेती पाहिल्यावर आमच्या मॅडमला वाटले की आपल्याकडे भरपूर शेती आहे; पण आपल्या घरापासून १२–१३ किलोमीटर म्हणजे जवळच थोडीही शेती नाही व फार्म हाऊस चांगले होईल व आम्ही ती शेती घ्यायचे ठरविले व ती घ्यायची म्हणून बाजूची वरच्या डोंगराची लागून जमीनही घेतली. त्या जमिनीसाठी आमचा पैसे देण्याचा कालावधी एक वर्षाचा ठरला व हप्ते ठरले त्याप्रमाणे मी पैसे देत गेलो. खरेदीखत झाले कंपाऊंड, बाग लावणे यासारखी कामे दादाच करीत होते. मी त्यांना फक्त पैसे द्यायचो. त्यांची विहीर होती त्यावरून पाईपलाईन आपल्या शेतातूनच गेलेली होती. त्यामुळे त्याचे अर्धे पाणी आपल्याला द्यायचे हेही ठरले होते. पण कधीही एक लिटर पाणी त्यांनी आपल्याला दिले नाही. शेताच्या मध्य भागातून रोड देण्याचे कबूल केले होते पण तोही दिला नाही. त्या जमीनीचा ताबा सुद्धा तीन–चार वर्ष त्यांच्याकडेच होता. तो सुद्धा बळजबरीने घ्यावा लागला.

दादा अत्यंत चांगला माणूस पण अस का वागले कळले नाही. त्यांचे पैसे पूर्ण देऊन झाले होते. सहा महिने उलटले होते. अचानक मला त्यांची एक चिठ्ठी मिळाली ती चिठ्ठी ते घरी देऊन गेले होते. मी ती वाचली व मला पैसे वाढवून द्या म्हणून त्यात लिहिले होते व कारण तुम्ही ठरल्यापेक्षा उशीरा पैसे दिले असे त्यात लिहिले होते व मला जर पैसे दिले नाही तर मी तुमचे नाव चिठ्ठीत लिहून आत्महत्त्या करणार व त्याला तुम्ही सर्वस्वी जबाबदार असणार असं लिहिलेलं होतं. मी त्यांना पैसे दिलेले सर्व पुरावे काढले व माझ्या असं लक्षात आलं की आपल्याकडून त्यांनी ५० लाख रुपये जास्त घेतले आहेत. ती जागा घेतली त्यावेळी माझी डीनची निवडणूक चालू होती व लगेचच महाराष्ट्र राज्य नर्सिंग कौन्सिचीही निवडणूक होती त्यामुळे सतत मी व्यस्त होतो व सतत येऊन ते पैसे मागायचे व मी देत गेलो. तसेच ते पैसे वेळेत दिले का हेही पाहिले तर ते पैसे वर्षाच्या आत नऊ महिन्यातच आपण त्यांना दिले होते. त्यावर त्याच्याकडून मी ॲड. भगवानराव साळुंखे त्यांच्या व माझ्या जवळचे आहेत. त्यांच्यापुढे सगळा हिशोब दाखवला तरी ते मान्य करायला तयार नव्हते. मग मी पोलिसात तक्रार नोंदविली की त्यांचे पैसे काहीच देणे नसताना मला हे आत्महत्त्येची धमकी देत आहेत व त्यांच्या लोकल आमदारालाही पत्र दिले व भेटलो. त्यावेळी आ. थोपटे होते. त्यांनाही सर्व दाखविले व पोलिस कम्प्लेंट करून ताबाही घ्यावा लागला. एवढा चांगला माणूस का बदलला असेल ते कोड आजपर्यंत मला सुटले नाही व पैशासाठी लोक काहीही करू शकतात व कितीही खोटे वागू शकतात. याचा ज्वलंत अनुभव मला आला. त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या विहिरीत अर्धा हिस्सा व जागेच्या मधून ६० फुट रस्ता ही कबूल केला होता. नंतर तेही त्यांनी दिले नाहीत व खोटे वागले.

शांतु सेठ व आमचे अत्यंत चांगले संबंध होते व आहेत. त्यांच्याविषयी मी पूर्वी मित्रामध्ये लिहिलेले आहे. पण त्यांचा एक अनुभव या ठिकाणी लिहिणे मला गरजेचे वाटते. आम्ही आदित्य संस्कृती नावाने स्कीम केली होती. त्या ठिकाणी आमचे ठरलेले होते की एक बंगला बांधायचा व तो १० गुंठे जागेवर बांधायचा. तिथे जागेत २.५० गुंठे जागा कमी केली. बंगला आदित्य गार्डन सिटीतला दाखविला व त्याचा आकार लहान केला. लॉक ॲण्ड की बोलणी

होती; परंतु फक्त स्लॅब टाकून तो तसाच सोडून दिला व शेवटी मी लोक लाऊन पूर्ण केला. मी एकदा त्यांना हिशेब मागितला तर एवढा अपमान केला की कधीही जीवनात माझ्या तोंडावर एवढे कोणी बोललं नव्हतं. एवढं मला सुनावले व म्हणाले तरी लोक मला म्हणत होते की अतिशय वाईट माणूस आहे त्याच्याबरोबर करू नका व यापुढे हिशोबाचा नाव काढायचे नाही. मला त्यांच्या हिशोबात समाधान नव्हते. कदाचित त्यांचं खरंही असेल पण मला समजावून सांगणे गरजेचे होते; परंतु उलट अपमान केला हे मी जीवनभर कधी विसरु शकणार नाही.

मी आणि वांजळे यांनी एक जागा श्री. लायगुडे यांची घेतली होती. त्या जागेत श्री. बाळासाहेब पारगे यांच्या चुलत बहिनीची जागा होती. आम्ही ती जागा सुरुवातीला घेतली नव्हती कारण त्या बाईचा नवरा वारलेला होता व तिची मुले छोटी छोटी होती. पण वांजळे यांच्याकडे बाळासाहेब आले व एक वर्षानंतर बळचं ती जागा आम्हाला विकली. वांजळे असतानाच संपूर्ण व्यवहार पूर्ण केला. एकही पैसा देणे राहिले नाही. उलट वांजळेंनी त्यांनाही काहीतरी रक्कम दिली; परंतु वांजळे वारल्यावर व त्याच्या बहिनीची मुले मोठी झाल्यावर त्या जागेचे लिटीगेशन तयार केले. वास्तविक बाळासाहेबांनी संपूर्ण व्यवहार केला होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे ५ लाख रुपये राहिले असं खोटं सांगितलं तरी वहिनीने ते पैसे वांजळे वारल्यावर महिन्याच्या आत मुलीचे लग्न म्हणून दिले. पण याची जाणीव तर त्या कुटूंबाने ठेवली ना बाळासाहेबांनी. वास्तविक बाळासाहेबांनी त्यांना सांगून हे प्रकरण मिटवायचे असते; परंतु त्यांनी काही प्रयत्न केला नाही व आम्ही जो त्याच्यावर विश्वास ठेवला त्याचा घात केला.

बाळासाहेब पारगे व आमचे संबंध या जमीन व्यवहारामुळे आले व ते म्हणाले की माझ्याकडे जमीन आहे शाळा कॉलेज काढू. आम्ही ट्रस्ट तयार केली. १० एकर जागा ते दान देतो म्हणाले. जागेवरचं कर्ज आम्ही फेडलं. जवळजवळ २२ लाख रुपये आम्ही भरले व नंतर ते काम त्यांनी फिसकटवलं व जागा दिली नाही व शाळा कॉलेज झाले नाही. त्या व्यवहारालाही आता १०-१२ वर्षे झाली. पण अजून पैसे दिले नाही व काहीच नाही ते पैसे

माझे एकट्याचे नव्हते. जाधव व अगरवाल यांचे होते. ते अजूनही माझ्या नावाने बोंब मारत आहेत व बाळासाहेबाला फोन केला किंवा भेटलो की आता काम होतचं मी देऊन टाकतो असं नुसतं चाळवा चाळव, चाल ढकल करतात. जीवनात हाही एक वाईट अनुभव कारण त्यांनी त्याची १०० एकर जागा डेव्हलपमेंटला दिली आहे. त्याची काही अडचण वाटत नाही. पण हे मात्र कथन सत्य आहे.

संतोष जैन व माझी भेट वांजळेच्या निवडणुकीच्या वेळी वांजळेंनी त्यांची जमीन त्याला विकली त्या वेळी झाली. मलाही त्यांनी गुंतवणूक करण्याबद्दल आग्रह केला. मी थोडीच गुंतवणूक त्यांच्याकडे केली. पण मला वांजळेनी त्याच्याबरोबर गुंतवणूक करू नका. तो तुम्हाला गोड बोलून फसवेल असे सांगितले. मग मात्र मी तेवढ्याच पैशावर थांबलो. आम्हाला दोन तीन जागा जैनने विकल्यामुळे थोडा विश्वास निर्माण झाला होता. त्यामुळे मी त्याच्याकडे दोन तीन ठिकाणी गुंतवणूक केली. त्याचबरोबर वांजळे आणि त्यांनी नऱ्हेतील जागा घेताना मला ७५ लाख देण्याचे लेखी अॅग्रीमेन्ट करून दिले. पण तिथलेही पैसे मला त्यांनी दिले नाहीत. मला माझ्या पूर्वीच्या मुद्दल पैशासाठी १३८ ची केस करावी लागली. तेव्हाच शेलार व सोनवणेची जमीन ही मला लेखी रजि. कागदपत्र करून ती जागा मला मिळाली नाही. अनेक दिवस त्या माणसाचा मला त्रास झाला. शेवटी मोठ्या प्रमाणात रक्कम कमी करून त्याच्या बरोबर सेटलमेन्ट केला व त्याने नवीन जागा माझ्या गळ्यात घातली. वर्णन करून सांगीतले की आता तीच आपण हॉटेल काढू. जैन रेस्टॉरेन्ट करू फार चांगले चालले. पण आता ती जागा विकून टाकू म्हणून मागे लागले आहोत.

आमचे स्वारगेटचं हॉटेल चालवायला घेतल्यावर माझी व सचिन घाडगे याची भेट झाली. हॉटेल मेनू अत्यंत चांगल चालवत होता. पण ज्या वेळी त्याला कमी पडलेलं भांडवल मी त्याला एका सावकाराकडून आणून दिलं आहे हे समजल्यापासून उबाळे व पाटील यांनी त्याला इतका त्रास दिला की त्याला हॉटेल सोडणे भाग पडले व त्या सावकाराचे पैसे गेले. तीनपेक्षा जास्त वर्षे झालं. आडकून पडले व ते मला आता मागत आहेत.

त्यापेक्षा सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे शेटेच्या जागेचे कर्ज मिळवून देतो म्हणून गेली

तीन वर्षे मला अडकवून ठेवले. या महिन्यात होणार, पुढच्या महिन्यात होणार असं करून तीन वर्षे काढले. भले त्याच्या अडचणी असतील पण कमीटमेंट केल्यामुळे मीही पुढच्या लोकाला त्याच तारखा दिल्या व खोटा पडलो. त्याच्यामुळे मी शेटे आसाराम याला व्याजाने बाहेरून आणून पैसे दिले व ते सगळे लोक माझ्या मागे लागले आहेत व सचिन घाडगेलाही बरेच पैसे मी सुद्धा उसने दिलेले आहेत व फार मोठ्या प्रमाणात मी अडकून पडलो आहे व सातत्याने कारणे ऐकून घेत आहे.

मी एक जागा दांगट संस्थेसाठी होस्टेलला भाड्याने घेतली होती. वांजळे व पोकळे यांची मैत्री होती. त्याचेही लॉजींग चालत नव्हते. म्हणून मी ती भाड्याने घेतली. त्याला कुणीही घेत नव्हते. थोडी त्या जागेची बदनामी ही होती; परंतु मी मित्र प्रेमापोटी ती घेतली. सरपंच, काका नाना यांचा ती जागा घेण्यास विरोध होता. पोकळे मला म्हणाले की किमान पाच वर्षे तरी घ्या. मी ती जागा सात वर्षे भाड्याने वापरली. रीतसर त्यांना तीन महिन्याची नोटीस दिली. जो कालावधी रजिस्टर ॲग्रीमेंटमध्ये लिहिलेला आहे व सर्व जागा त्यांना दाखवून सर्व वस्तू दाखवून खाली केली व त्यांनी चिडून आम्हाला दोन कोटीच्या नुकसान भरपाईची नोटीस दिली. तसेच त्यांनी दिवाळीत माझ्याकडून दोन लाख रुपये सोने सोडवायचे म्हणून उसने नेले. तीन चार दिवसात देतो असे सांगितले. दोन वर्षांनी वाळूचा हिशोब करतानी मी ते कापले म्हणून त्याचा मुलगाही बोलायचा बंद झाला. त्याचबरोबर त्यांनी पन्नास गुंठे जागा आम्हाला विकली व तिच्यातही लिटिगेशन तयार झाले व ती जागा ही आमच्या हातातून जवळ जवळ गेल्यातच जमा आहे. कोर्टातून काही खरा न्याय मिळतो असे दिसत नाही.

तात्या दांगट यांची नऱ्हेमधील जागा मी डेव्हलपमेंटला घेतली. पण त्यांची सर्व भावाची ४० एकर जागा मी युएलसी मधून सोडवून आणली. त्या काळात दोन कोटी रुपये खर्च केले. ३ वर्ष काम करत होतो व पाच किलो वजन कमी झाले होते. मी ऑर्डर करून मुंबईवरून डायरेक्ट त्याच्या घरी गेलो व त्यांना आनंदाची बातमी सांगितली. पण त्यांचा एक भाऊ लगेच म्हणाला की आता भाव वाढवून द्या. मला अतिशय वाईट वाटले की आपण एवढे

अवघड काम केले त्याच्याबद्दल काहीच नाही. नंतर नंदू शेठ व काका यांनी मध्यस्थी करून तीन एकरजागा मला द्यायची व मी जेवढे पैसे टाकले आहेत ते मीच फेडायचो. दर वेळेला नवीन मुलगा येऊन कारभार पहायचा. शेवटी ठरल्यावर ही आमचं ॲग्रीमेन्ट कॅन्सल झाल्यावर मला ॲग्रीमेंट करून द्यायच्या वेळेला आबांनी तीन चार पोरांना पळून जाण्यास सांगितले त्यावेळी मध्यस्थानेही पाठ फिरविली. मी दोन वर्षे पळत होतो. पोलिस स्टेशन, रजिस्ट्रार, भागीदारी संस्था त्यांचे काही पाहुणे व खरी मदत केली व समजून घतेले ते त्यांच्या कुलकर्णी वकिलांनी. खरं तर मांगीलाल बाफनाला मी भागीदार घेणार होतो. त्यामुळे मी त्यांची व दांगटाची मिटींग करून दिल्यावर तर प्रकरण बिघडले. मी एवढं काम करून त्यांची जमीन सोडवून दिली. त्याच्याबद्दल त्यांनी कधी आभार तर मानले नाहीतच. पण ज्या ज्या ठिकाणी त्रास देता येईल त्या त्या ठिकाणी त्रास दिला. प्रत्येक नोंदीला ऑब्जेक्शन घेतले व मला दिलेल्या जागेतून नऊ गुंठे जागा कमी दिली. त्याच्या जागेतील ४ गुंठे अतिक्रमन हे कुटे लोकांनी केलेलेही माझ्या हिश्श्यावर टाकले व माझ्या शाळेच्या इमारतीच्या बाहेर फ्रंटेजला व गेटलाच भाजीच्या पत्र्याच्या टपऱ्या टाकून अतिक्रमण केले. कुणाचं भलं केलं तर त्याचा एवढा वाईट परिणाम आपल्यावरच होतो असे क्वचित उदाहरण असतील. पण मला मात्र हे अनुभवायला मिळत आहे. कसं वागावं सत्य की असत्य असा प्रश्न पडतो. पण मी सल्ल्याचा मार्ग सोडणार नाही.

आबा बागुल व निकम संजय यांची आणि माझी आम्ही एक जागा कोथरुडला विकत घेतली त्या वेळी झाली. आबा म्हणजे आई व बाबा त्याप्रमाणे त्यांनी जनतेची सेवा केली. सर्व प्रथम काशी यात्रा हा प्रयोग त्यांनी केला व हजारो लोकांना त्यांनी काशी यात्रा घडवून आणली अशी म्हातारी माणसे होती की त्यांना त्यांच्या मुलाबाळानेही कधी कुठे नेले नसेल अशा लोकांना काशी यात्रा घडवली. नवरात्र महोत्सव खऱ्या अर्थाने पुण्यात पहिल्यांदा रुजवला तो आबा यांनी. निकम आणि आम्ही तो व्यवहार पूर्ण केला. चार पैसेही मिळाले. पण ज्या पद्धतीने व्यवसाय करायला पाहिजे तसा झाला नाही.

आम्ही लायगुडेच्या जागेला कंपाउंड घालण्यासाठी पोलिसांकडे बंदोबस्तासाठी अर्ज

केला. पी. आय. ओळखीचा. ॲडिशनल कमीशनर ओळखीचे पण एका हवालदाराने १० हजार रुपये खाऊन पूर्ण केस उलटवली व हे सिव्हील मॅटर आहे असे करावयास भाग पाडले. वास्तविक जागा आम्ही घेऊन १२ वर्षे झाली. ती आम्ही रजि. डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट करून बांधायला दिली. पूर्वी त्या जागेवर आमचे कंपाऊंड आहे. पण नगरसेवक लायगुडेनेही फोन केला. त्यांच्या बाजूने व काहीही संबंध नसताना कोर्ट वाचते ना पोलिस सत्य पाहतात व खोट्या गोष्टीसाठी आम्हाला कमीत कमी चार पाच कोटीचे बांधकाम मागत आहेत. मी गृहमंत्र्याला ही कळवल पण उत्तर आलं तर नवलचं. हा पोलिस खात्याचा अत्यंत वाईट अनुभव आला व सत्याला किंमत नाही हे कळले.

त्याच जागेचे मी डेव्हल्पमेंट ॲग्रीमेंट केले म्हणून कॅपीटल गेनची इन्कम टॅक्सची नोटीस आली. त्या वेळेला नुकतीच नोटबंदी झालेली होती. नव्या नोटाही छापून चलनात आल्या नव्हत्या. त्या वेळी साहेबांनी बोलावून घेऊन पंधरा लाख रुपये मागितले. मी त्यांना प्रामाणिकपणे सांगितले की अजून जागा पडीक आहे. कोणतेही बांधकाम केलेले नाही. त्याचा महानगरपालिकेने प्लॅन पास केला नाही. डेव्हलपर व आमची भांडणे आहेत. कॅपीटल गेन आत्ताच बसत नाही. तरी ऐकत नव्हते. नोटबंदीनंतर एवढे पैसे शक्य नव्हते. मी त्यांना सांगितले की बाजारात नोटाच नाहीत तर पैसे कोठून देणार. मार्चच्या शेवटच्या दिवशी चुकीची ऑर्डर करून लाँगटर्म कॅपीटल गेन असून त्याला शॉर्ट टर्म करून पावणे दोन कोटी रुपये टॅक्स काढला व ऑर्डर केली. मग अपील केले. त्या ठिकाणी बेनुपानी नावाचा अधिकारी होता. बोलूच द्यायचा नाही, अपमानकारक बोलायचा व मी किती कडक आहे हे दाखवायचा व त्याने पंचवीस लाख रुपये मागितले व मी माझ्या सी. ए. द्वारे ते त्याला दिले. त्या वेळेला ती ऑर्डर निल करून मिळाली. हा भारत देश पोलिसांकडून न्याय नाही, कोर्टातून न्याय नाही व इनकम टॅक्सचे सुद्धा अन्यायकारक नियम हा सगळ्यात मोठा माझ्या जीवनातला अनुभव मिळाला.

▸▸ ▸▸

# २७. एक वाईट अनुभव

आसाराम शेटे यांची आणि माझी ओळख संदीप पोकळे यांनी करून दिली. त्यानुसार त्याची शिंदेवाडी येथे जागा होती. त्यामध्ये पार्टनर व्हा म्हणून मला त्याने ऑफर दिली. त्यानुसार मी त्याच्याकडे जवळ जवळ दीड कोटी रुपये गुंतवले. बरेच वर्षे झाल्यावर काहीच होत नाही म्हणून मी त्यांच्या पार्टनरशीपमधून बाहेर पडलो. पण तो अडचणीत होता. माझ्याकडे आला. कोणाकडून तरी मला व्याजाने पैसे काढून द्या अशी गळ घातली. माझी जीवनात हाल अपेष्टा झाल्यामुळे माझा स्वभाव भावनिक व दुसऱ्याला मदत करणे अशा प्रकारचा झाला आहे. पण त्याचा मला फायदा होण्याऐवजी तोटाच जास्त झाला आहे. त्यानुसार त्या सावकाराने रेट ठरवून माझ्या नावावर चेक दिला व मला त्यात अडकविले. पण त्यावेळी कळले की शेटे हा गयावया करतो व अडचण सांगतो तसा तो नाही. दाखवणे व प्रत्यक्ष यात खूप फरक आहे. वारंवार मला त्याने नाक घालून फसवले. गेली सहा वर्षे व्याजतर सोडाच पण एकही रुपया त्याने दिला नाही व त्या सावकार लोकांनी माझा जीव काढला. गंमत अशी की काही दिवसांनी त्या सावरकाराचा मुलगा इंग्लंडला शिकायला जाणार होता म्हणून त्याने मला काही करा व २५ लाख रुपये द्या म्हणून सांगितले. मी आता अडचणीत आलो. माझ्या चुलत भावाच्या मुलीचे लग्न सात आठ महिने पुढे होते म्हणून मी त्याच्याकडून व्याजाने आणले व त्या सावकाराला दिले. शेटे नुसता व्यवहार होत आहे आणि देतो असे करून लग्नाची वेळ आली तरी त्याने पैसे दिले नाही. मला तर त्याला लग्नाला पैसे देणे आवश्यक होते. मी परत व्याजाने पैसे काढून त्याला दिले. शेटे मात्र  माझी अडचण पहात नव्हता. फक्त गोड बोलत होता व हळूहळू आता कळते की तो अंतर्गत नियोजन करत होता. त्याने राहता बंगला जावयाच्या नावावर केला. शेती वेगवेगळ्या पाहुण्याच्या नावावर केली व उरलेली शेती



स्वच्छता मोहिमेअंतर्गत (डावीकडून) आ. भीमरावअण्णा तापकीर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सरदार पाटील, पुणे जिल्हा परिषद उपाध्यक्ष शुक्राचार्य वांजळे,



(डावीकडून) राजेश पांडे, खा. भरतकुमार राऊत (आदर्श पत्रकार), ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार रविंद्र आंबेकर.



आ. नरेंद्र दराडे यांच्यासमवेत




(डावीकडून) सुषमाजी अंधारे, नीलिमाताई गोऱ्हे, एकनाथ खडसे





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर बिनविरोध निवड झाल्याप्रसंगी



शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य विनोदजी तावडे यांच्या हस्ते लोकमत आयकॉन ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र पुरस्कार स्वीकारताना. सोबत राजेंद्र दर्डा, अजिंक्य डी.वाय. पाटील, विजय दर्डा.



(डावीकडून) माजी मंत्री रमेशअप्पा थोरात, खा. सुप्रियाताई सुळे (आदर्श खासदार पुरस्कार)



उडान पुस्तक प्रकाशनावेळी संजय घोडावत (आदर्श उद्योगपती), माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री नारायण राणे, खासदार व माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, कुलपती–भारती विद्यापीठ डॉ. शिवाजीराव कदम

## आदर्श शिक्षक पुरस्कार



आदर्श शिक्षक पुरस्कार प्रसंगी (डावीकडून) डॉ. शिवकुमार डोंगरे (आदर्श प्राध्यापक), आदर्श कुलगुरु डॉ. पं. विद्यासागर, माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसेपाटील, माईर्स एमआयटी अध्यक्ष डॉ. मंगेश (बापू) कराड, युवराज शहा (आदर्श शिक्षणसंस्था चालक)



उपसंचालक, क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य नरेंद्र सोपल, आदर्श जिल्हा क्रीडा अधिकारी विजय संतान, एसपीपीयुचे क्रीडा संचालक डॉ. दीपक माने



हिंदी, मराठी तसेच दक्षिण भाषीय चित्रपटातील सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांच्यासमवेत




किर्तन महोत्सव सोहळ्यात ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील (आदर्श किर्तनकार पुरस्कार)




शिवजयंती महोत्सव कार्यक्रम



आदर्श शिक्षक पुरस्कार प्रसंगी (डावीकडून) डॉ. शिवकुमार डोंगरे (आदर्श प्राध्यापक),
आदर्श कुलगुरु डॉ. पं. विद्यासागर, माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसेपाटील,
माईर्स एमआयटी अध्यक्ष डॉ. मंगेश (बापू) कराड, युवराज शहा (आदर्श शिक्षणसंस्था चालक)



सावकाराला खरेदी देऊन कर्ज काढले व कायदेशीर काहीच ठेवले नाही व मला मात्र चेक देऊन दर सहा महिन्यांनी ॲग्रीमेंट करून नवीन चेक देतो व ते सुद्धा मरणाचा त्रास देऊन नोटीसा देईपर्यंत साधा चेक सुद्धा बदलून देत नाही.

मी त्याला शिवनातीकडून पैसे व्याजाने घेऊन दिले. कारण परत रडत माझ्याकडे आला व मी शिवनानीला पैसे द्या असं म्हणालो व त्यांनी तेवढाच शब्द पकडला व पंचाहत्तर लाख रुपये माझ्याकडून वसूल केले. कारण मी मध्यस्थ राहून एक जणाचे पैसे त्याला दिले होते. त्याने त्यातूनच कापले व गेली तीन वर्षे त्या ७५ लाख रुपयाचे व्याजही मी भरत आहे.

त्याच्या जमिनीला गिऱ्हाईक मिळवण्यासाठी मी सुद्धा खूप प्रयत्न केला. नंतर जास्त फसवणूक झाली. ती घाडगेमुळे त्याने तीन वर्षे खाल्ली व काम केले नाही, उलट त्यामुळे काम होईल म्हणून मी त्याला वर वर पैसे देत गेलो व कामाचे मोजणीचे, फीचे असे १५-२० लाख रुपये पुन्हा दिले व शेटेने एकही रुपया खर्च केला नाही.

सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे माझ्याकडे तो रडू लागला व मी पतपेढीतून कर्ज काढून २० लाख रुपये चेकने त्याच्या बायकोच्या नावावर दिले. त्याने ते देतो म्हणून मला ६ एकर जागा नोटरी करून लिहून दिली होती. ती कुणाला तरी खरेदी दिली व मी त्याला ऑब्जेक्शन दिल्यावर मला पैसे देतो म्हणून नवीन चेक दिला व ऑब्जेक्शन काढून घेतल्यावर एक रुपयाही दिला नाही. कशी कोणाशी मैत्री करावी व विश्वास ठेवावा एवढा विश्वासघाती माणूस मी कुठही बघीतला नाही. पण एके दिवशी एका माणसाला घेऊन आला. तो गुंडाचा माणूस होता व त्याला दोन लाख पस्तीस हजार दिल्याशिवाय तो माझ्या घरातून हालत नाही असे सांगितले व काही करून मी दोन दिवसात पैसे देतो असं म्हणून मी कोल्हापूरच्या एका व्यवहाराला नऊ लाखाचा चेक दिला होता त्यातून ते पैसे दिले. पण एक वर्ष झाले एकही रुपया दिला नाही. माझा भाऊ कॅन्सरने सिरीयस होता, तीन महिने मी रोज चार पाच लोकांना ज्याच्याकडे माझे पैसे आहेत त्यांना मी फोन करत होतो. पण एकानेही एक रुपया सुद्धा दिला नाही. शेटेच्या गाडीत मला पैसे दिसले पण एक रुपया सुद्धा दिला नाही असा हा माणूस. सारखं वडिल वारले त्यात चार महिने काढले. आता कोरोनामुळे लॉकडाऊन आहे, भेटत

नाही व सर्वात माझ्या जीवनामध्ये विश्वासाचा घात जर कुणी केला असेल तर शेटे आसाराम. आता पतपेढी काढून देऊन सुद्धा वर्ष उलटून गेले. खाते आता एन. पी. ए. झाले आहे पण या माणसाला काही घाम येत नाही. १३८ केस करून केव्हा निकाल लागणार व कधी पैसे मिळणार. सावकार तर मला झोप येऊ देत नाहीत. काय कराव हा प्रश्न माझ्या समोर आहे पण देव काही त्याला सद्‌दबुद्धी देत नाही व मी काय पाप केले ते फेडण्याची वेळ त्याने माझ्यावर आणली हे कळत नाही.

त्याला पैसे दिल्यामुळे मी कोल्हापूरचा चेक पास करू शकलो नाही व माझा त्यामुळे व्यवहार कॅन्सल झाला. चार महिन्यापूर्वी मी त्याच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी राजगड पोलिस स्टेशनमध्ये गेलो. कारण ती शेती त्या हद्दीत आहे. त्याने दोन महिन्यात व दोन हप्त्यात पैसे देतो असे लिहून दिले. तिथला ए.पी.आय. सुद्धा ओळखीचा व नातेवाईक आहे. पण त्याने काहीही अजून ॲक्शन घेतली नाही उलट त्या जागेला तोच गिल्हाईक बघत आहे व त्यामुळे शेटे काही लक्ष देत नाही आणि पोलिसही शांत आहेत व त्यात आता कोरोना लॉकडाऊन आल्यामुळे मी मात्र परमेश्वरावर विश्वास ठेऊन बसलो आहे.

एके दिवशी ॲड. चव्हाण रणजीत हे माझे गुरु व मित्र त्याच्या विषयी मी पूर्वी मित्रामध्ये लिहिले आहे. ते माझ्याकडे आले व बरोबर ॲड. खुने होते. खुनेही त्यांचे जवळचे मित्र ते अडचणीत होते. त्यात पन्नास लाख रुपयाची निकडीची गरज होती. पुण्यात चहुकडे फिरुन झालं होतं. पण कुठही त्यांना कुणीही पैसे देत नव्हते. तेवढे पैसे बँकेत भरले तर बँक त्यांना मदत करणार होती नाहीतर त्याची महत्त्वाची इमारत व जागा जी फर्ग्युसन कॉलेजसमोर आहे त्यावर जप्ती आणणार होते. सगे सोयरे, मित्र व सावकार यांनी कोणीही त्यांना उभे केले नाही. माझ्याकडे आल्यामुळे मला मोठेपणा वाटला व मी त्यांना आश्वासन दिले की तुम्हाला मी प्रयत्न करून बाहेरून पैसे मिळवून देतो व मी बाहेरुन पुन्हा एका मारवाड्याकडून चेक घेतला तोही हुशार होता. त्याने सांगितले की वकिल, पोलिस, पुढारी यांना मी पैसे देत नाही. कारण हे लोक कधी उलटतील त्याचा भरवसा नाही. त्याने माझ्या नावावर चेक दिला व मी त्याला ते पैसे दिले. एक वर्षात त्यांनी मला ते पैसे परत दिले व देतांना ५ लाख रुपये मागे राहिले.

मारवाड्याने तर पाच लाख रुपयावर व्याज लावले व आता पाच वर्ष झाली. ॲड. खुने यांनी दर वर्षाला एक लाखाप्रमाणे ५ वर्षे ते पैसे परत दिले व तो आता म्हणाला की संपले पैसे व मारवाड्याने मात्र त्याने दिलेले पैसे व्याजात जमा केले व आता पैसे मागण्यासाठी फोन केला की मी तर तुमचे पैसे दिले असे म्हणू लागला व मारवाडी मात्र बाकी मागत आहे. अशी किती तरी उदाहरणे आहेत की ज्यांना मदत केली, जामीन राहिलो व मीच अडचणीत आलो.

# २८. अक्षय तृतियेचा मुहूर्त

आज ज्यांच्या विषयी मी लिहिणार आहे ते दोघेही माझ्या जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. केवळ त्यांच्या प्रेरणेमुळेच मी माझी शिक्षण संस्था सुरू करू शकलो. कदाचीत परमेश्वरानी त्यांना तशी बुद्धी दिली असावी व त्यातून सकारात्मक ऊर्जा घेऊन मी संस्था चालू करून उंच शिखरापर्यंत नेऊ शकलो व त्यातून मला चांगली प्रेरणा मिळाली म्हणून जरी मी त्यांचे काही दोष सांगितले तरी मी मात्र ते माझ्या जीवनाचे टर्निंग पॉईंट समजतो व नेहमी त्यांच्या त्या कृतिमुळे माझी उन्नती झाली म्हणून मी त्यांचा जन्मभर ऋणी राहू इच्छितो व मनापासून माफी मागतो.

आमची दांगट पाटील संस्था अत्यंत चांगली चालत होती. परवानग्या मिळविण्यासाठी खूपच त्रास झाला. पण अत्यंत प्रयत्न करून सगळं मिळविले. आमच्या संस्थेमध्ये त्याच्या स्वार्थासाठी ज्यांना अडचण होत होती. त्या लोकांनी माझ्या विरोधात मोहिम उघडली व कोणत्याही गोष्टी चुकीच्या दृष्टिने मांडायला सुरुवात केली व त्या गोष्टी दांगट फॅमिली ऐकू लागली. अगोदरच वांजळेच्या व विकास नानाच्या निवडणुकीपासून आमचे विनाकारण संबंध खराब झालेले होते. त्यावेळीही मला जीवे मारण्याची धमकी पंढरीनाथ भाऊ यांनी सरपंचादेखत दिली होती व मागे सांगितल्याप्रमाणे मी सर्व श्रेष्ठी व पोलिसांना कळविले होते. ते प्रकरण तिथे काही वर्षे थांबल. पण आमच्याकडे काही लोकांना पाटील, तांबडे, मोटे इत्यादी लोकांना डबल कामाबद्दल डबल पगार दिला जात होता व तो मीच चालू केला होता. पण अनेक गोष्टी ह्या नानाच्या कानात लोक सांगू लागले व त्यामुळे मी ते पत्र नानाकडे पाठविले व त्यांचा पगार नानांनी बंद केला. वास्तविक मीच चालू केला होता त्यामुळे मी बंद करणारच नव्हतो. पण नवीन लोकांना काम द्या ... एकाला डबल काम देणे योग्य नाही असे

मत नानाचे होते. ते बरोबर ही आहे. पण काही शिपाई, क्लार्क, मुख्याध्यापक यांनी चुकीची माहिती व खोटी माहिती देण्यास सुरुवात केली. अगोदरच निवडणुकीपासून संबंध चांगले नव्हते व त्याच्या डोक्यात किंतु होता. तो वाढवण्याचं काम केलं व चुकीचं काम करणारा, डबल पगार घेणार व व्यवस्थापन करताना दुखावलेला स्टाफ यात यशस्वी झाला. वास्तविक माझ्या कोणत्याही विद्यापीठाच्या फॉर्मवर नाना व सरपंचानी एकदाही सही केली नाही व मला इलेक्शनला अडथळा आणला व तेही एसपीपीयू पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखेचा डीन याची निवडणूक किंवा ज्याला अजित दादाच्या मिसेस सौ. सुनेत्राताई उभ्या होत्या त्या व्यवस्थापन परिषदेच्या निवडणूकीला सुद्धा मला माझ्या निवडणूक फॉर्मवर सही केली नाही. मी प्रत्येक निवडणूक काकांच्या सही घेऊन लढविली ही फार मोठी ... अन्यायकारक बाब घडली व माझ्याकडून मात्र त्यांचा प्रचार करावा अशी सर्व दांगट फॅमिलीची इच्छा होती ही किती अयोग्य गोष्ट होती हे लक्षात येते.

एके दिवशी ऑगस्ट २०२० च्या पहिल्या आठवड्यात नानांनी मला बोलाविले. त्या मिटींगमध्ये केशव त्यांचा मोठा मुलगाही हजर होता व डायरेक्ट नानांनी सुरुवात केली की तुम्ही तुमचा मुलगा शार्दुल जसा शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी तयार केला तसा मला माझा मुलगा तयार करायचा आहे. चांगली गोष्ट आहे. मला वाटलं की तुम्ही तज्ज्ञ आहात. तुम्ही त्याला तयार करा असं म्हणतील पण तसा चांगला विचार न मांडता तुम्ही आता राजीनामा द्या व त्याला काम करू द्या असं मला बोलावून त्याच्या ऑफिसमध्ये डायरेक्ट सांगितलं. वास्तविक संस्था काही प्रायव्हेट प्रोप्रायटरी फर्म आहे का की ती मी व माझी खानदान चालवणार, ही संस्था कायद्याने निर्माण झालेली आहे. कायदे कानून आहेत, नियम आहेत. कायद्याचा कोणताच विचार नाही, मी पंचवीस वर्षे माझ्या तरुण वयातील या संस्थेत घालवली. तन, मन व धन खर्च करून उभी केली व अचानक मला धक्का बसला. मी त्यांना सांगितले की सर्व शाळेचा व्यवहार तुम्ही बघा. मी प्राचार्य आहे. मी बारा वर्षात अनुदानित वरून विनाअनुदानितवर आलो आहे. एक कोटी पेक्षा जास्त नुकसान माझे फक्त पगारात झाले आहे. त्यामुळे मी ते सोडणार नाही तसेच शाळेचे बांधकामही मी माझ्या साईटवरून

सात लाख रुपयाचे त्या काळात साहित्य नेऊन बांधकाम केले आहे. त्यातील एकही पैसा तुम्ही मला अजून वापस दिला नाही. त्या काळात १० हजार रुपये गुंठा जागा होती. मी ७० गुंठे जागा घेऊन स्वतःची संस्था सुरु केली असती. पण मला एकत्रित काम करायचे होते व खरोखरच दांगट फॅमिलीवर माझे अतोनात प्रेम होते. ते मी शब्दात व्यक्त करू शकत नाही.

मी १५ ऑगस्टला मुद्दाम ओपन भाषण केलं. त्यांच्या लक्षात यावं म्हणून पण धृतराष्ट्रासारखे पुत्र प्रेमात अंध झाल्यामुळे त्यांनी जसं चांगल वाईट समजत नव्हत कदाचित तसं झाल असाव.

आता वर्षभर ते शाळाचा कारभार पहात आहेत; परंतु एक शिपाई दारात उभा करून कोण किती वाजता आला व कोणी वाहतूक भत्ता किती लावला व कशाला काय खर्च केला याशिवाय काही बघितलं नाही. संस्था चालविणे म्हणजे शैक्षणिक काम मोठं असते. याची जाणीव अद्याप त्यांना झालेली दिसत नाही. अनेक संस्था तज्ज्ञ लोकांचा सल्ला घेतात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था चालवतात. पण यांच मात्र उलट आहे. ज्याला काही माहिती नाही. शिपाई, क्लार्क, कामचुकार मास्तर यांचा सल्ला घेऊन संस्था चालविली जात आहे. हे संस्थेचे दुर्दैव आहे व मी पंचवीस वर्षे त्यात जीव टाकला. त्यांचा एकही सल्ला घ्यायचा नाही, काही कायदेशीर गोष्टी सांगितल्यावर त्या वेगळ्या अर्थाने घ्यायच्या हेही चुकीचे आहे. त्याचप्रमाणे पहिलं काम चार्ज घेतल्यावर त्यांनी शाळेच्या बाबतीत केलं ते म्हणजे माझ्या सख्या भावाची मुलगी, बहिनीचा मुलगा, आमच्याकडे काम करणारी शिक्षिका, माझ्या भावाची सून यांना काढून टाकले जे प्रामाणिकपणे योग्य नियमाप्रमाणे काम करत होते. तरीही मी बोललो नाही. आज सुधरतील, उद्या सुधरतील अशा आशेवर मी आहे. आजपर्यंत गेली १५ – २० वर्षाचे रेकॉर्डही हरवलेलं आहे. प्रोसीडिंगवर सह्या करत नाहीत. मी जेवढे चालवता येते तेवढं चालवत आहे.

मी आणि काका गेली जवळपास ३२ वर्षे एकत्र काम करत आहोत. सुरुवातीला सिंहगड रोडला गणपती फार कमी व कमी गणपती उत्सव साजरा केला जायचा. आम्ही एकत्र येऊन त्यावेळी काका अध्यक्ष व मी सचिव अशी संस्था रजिस्टर करून नवज्योत मित्र

मंडळ ही संस्था त्यावेळी सुरू केली. नंतर अनेक कार्यक्रम आम्ही एकत्र केले. त्यामुळेच सार्वजनिक लायब्ररीचा जन्म झाला. तीही अत्यंत चांगल्या प्रकारची चालू आहे व तालुका दर्जाची ही अ दर्जाची लायब्ररी आहे. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे व आमच्या चुलत भावाचा अनुभव लक्षात घेता एका संस्थेवर अवलंबून राहायचं नाही म्हणून दुसरी संस्था धारेश्वर नावाने काकाबरोबर काढली. वास्तविक पहिल्यांदा ज्या वेळी त्यांच्याकडे कन्या शाळा काढायची होती त्या वेळेला त्यांचा विरोध होता व आम्हाला काहीही झंजट नको असे सर्वजण म्हणत होते. पण मी बळजबरीने त्यांना पटवून ही कन्याशाळा व संस्था सुरु केली हे काकाही मान्य व कबूल करतील. काका धायरीच्या मतदार संघातून पहिले नगरसेवक झाले तसे आधीपासून ते सक्रिय राजकारणात होते. जिल्हा युवकचे ते बरेच वर्षे अध्यक्षही होते व नगरसेवक झाल्यावर पहिली पाच दहा वर्षे त्यांनी फार कमी वेळ शाळेसाठी दिला. शाळेचे बांधकाम मात्र पूर्णपणे त्यांनी उभे राहून करून घेतले व सर्व शैक्षणिक बाबी मी बघत होतो. आता संस्था नावारुपाला आली आहे. मध्यंतरी ज्या वेळेला वांजळे निवडणुकीनंतर दांगट पाटलाचे व माझे संबध खराब झाल्यावर मी काकाकडे गेलो. नंदु सेठ यांचेकडेही गेलो व पुढील काळात आमचे निम्मे सभासद संस्थेत टाकू व मी एम.बी.ए. ला डायरेक्टर म्हणून काम करतो यावर सर्वांचे एकमत झाले होते. काकांनी त्या वेळेला मोठ्या मनानी ते मान्यही केले होते. पण आता माझ्या लक्षात येतय की मी एमबीएला डायरेक्टर म्हणून जाणार होतो व ते त्यांनी कबुल व मान्य केलं होतं. ती अडचण होईल म्हणून माझा एमबीए बंद करण्यास विरोध असून सुद्धा तातडीने जेवढे फास्ट एमबीए बंद करता येईल ते त्यांनी केले. मी नावाची यादीही पाठविली होती परंतु काकांनी चाल ढकल करून ते मागे टाकली व दिलेला शब्द पाळला नाही. काका असं करतील व शब्द बदलतील यावर आजही विश्वास बसत नाही.

शाळेचे बांधकाम होऊन १२-१४ वर्षे झाली आहेत. त्यामध्ये माझी त्या काळी परिस्थिती नसताना मी एक कोटी नऊ लाख रुपये वरवर शाळेची इमारत बांधण्यासाठी दिले आहेत. त्याचा हिशोब त्यांच्याच क्लार्कने टाईप करून मला दिलेला आहे. पण सोयीस्कर त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मी ते एक कोटी रुपये देताना जवळ जवळ सर्व पैसे व्याजाने काढून

दिले होते. किमान चार पाच वर्ष त्याचे व्याजही मी भरलं आहे. पण सध्या वर्षाला खर्चापोटी पाच लाख रुपये देऊन माझी बोळवणी केली जाते. पहिले चार पाच वर्षे ज्या वेळी शाळेला काहीच उत्पन्न नव्हते त्या वेळी दरवर्षी आम्ही बसून एकत्रित सर्व हिशोब करत होतो. गेल्या दहा वर्षात एकदाही काकांनी हिशोबाची मिटींग घेतली नाही. वास्तविक संस्था आता मोठी झाली आहे. पण हिशोब व बजेटच्या वेळेला कधीच बोलाविले जात नाही. मागच्या वर्षी एकदा मी हिशोबाचा विषय काढल्यावर व सध्या इलेक्शन पिरीयडमध्ये इनकमटॅक्सची रेड पडल्यापासून मी कागदपत्र व हिशेब ठेवायचे बंद केलेले आहे. त्यामुळे माझ्याकडे कुठलाही हिशेब नाही असे स्पष्ट सांगितले. मी ही त्यांना मला आता संस्थेत काम करणे सहन होत नाही हे म्हटल्यावर मात्र आम्ही तुम्हाला कधीच काढणार नाही. तुमची खुर्ची आम्ही नेहमी तशीच ठेऊ असे चांगले उद्‌गार काढले. हा फरक तरी किमान दांगट पाटील व काकामध्ये जाणवला. माझे नुकसान जरी झाले तरी त्यांच्या भावना माझ्या बाबतीत चांगल्या आहेत. त्यामुळे तेवढे तरी ऐकल्याने मला सुख मिळाले. सध्या काका कोणतीही गोष्ट विचारत नाहीत. सर्व गोष्टी मनानेच करतात. फक्त इन्स्पेक्शन व कागदपत्र व चेकवर सह्या करणे एवढेच काम आता उरले आहे. तुकारामाच्या अभंगाप्रमाणे तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता. तसं

सुधा म्हणे आता

उरलो सह्यापुरता अशी अवस्था माझी झाली आहे. काकाकडे शाळेची इमारत बांधण्यासाठी एक कोटी रुपये गुंतविले त्यावेळी तीच ही जागा लाख रुपये गुंठा होत्या. त्यावेळी त्याचे १०० गुंठे जागा आली असती व आता त्याचे पंचवीस कोटी रुपये झाले असते.

नंदु शेठ खरं बोलले होते. ते मला म्हणाले होते की सर तुम्ही कष्ट करता डोकं चालवता व तुमच्या नावाने काहीच नाही. तुम्ही तुमची स्वतंत्र संस्था सुरू करा. तुम्ही ते करू शकता व तुमच्यात ती ताकद आहे. त्यांचे ऐकून मी संस्था सुरू केली व ती यशस्वीही झाली. आम्ही इंजिनिअरींगसाठी पाच एकर जागा घेतली होती त्यावेळी काकांना पैसे नव्हते तर आमच्या दोघांच्या नावावर जिजामाता बँकेतून कर्ज घेतले होते. नंतर विकास पाटलाची खाण तिकडं

आल्यामुळे काकांनी तिथं इंजिनिअरींग काढण्याचा विचार रद्द केला व ती जागा आम्ही डेव्हलपमेंटला दिली. वास्तविक दोघांनी निम्मे पैसे टाकून वैयक्तिक नावावर जागा घेतल्या व त्यात वैयक्तिक उत्पन्नही मिळाले. पण काका एकदा बोलता बोलता म्हणाले की ही जागा पाच एकर आपण संस्थेसाठी घेतली होती व त्याचेही आपल्याला पैसे मिळाले. फायदाच झाला नाही का ? पण तसं नाही ते पैसे प्रत्येकानी वैयक्तिक टाकले होते. त्यात संस्थेचा एकही पैसा नव्हता व एकदा तर माझे एक कोटी आहेत हेच विसरले. मला धक्का बसला. काकासारखा खरचं चांगला माणूस मी माझ्या जीवनात पाहिला नाही. सत्य व खरे वागणारा पण मला मात्र तसा अनुभव संस्थेच्या बाबतीत आला नाही याची खंत माझ्या मनात जीवन भर राहिल. मी नेहमी म्हणायचो

मित्रता बढा अनमोल रतन
कब इसे तोल सकता है धन
धरती की तो है क्या बीसाद
आ जाय अगर स्वर्ग ही हात.

माझं तसचं झालं. मित्रासाठी मी पैशाला कधी किंमत दिली नाही. पण मला काका व नंदु शेठ नक्की न्याय देतील अशी पूर्ण अपेक्षा आहे. नसेल तर माझं नशीब हिच परमेश्वर इच्छा असे मी समजेन.

▸▸ ▸▸

# २९. संस्थेतील विविध उपक्रम

शार्दुलने अकरावी पासून ट्रेनिंग घेऊन सर्व संस्था अत्यंत चांगल्या चालविण्याचा अनुभव घेतला. त्यात शैक्षणिक गुणवत्ता सुधारते एवढेच नाही तर त्याचे उत्तम आर्थिक नियोजनही करत आहे व त्यामुळे माझी जी स्वप्न होती ती संस्थेच्या बाबतची पूर्ण होणार यात काहीही शंका आता उरली नाही. माझी स्वतंत्र संस्था निर्माण होण्यामागे जी विविध कारणे होती त्यापैकी मला विविध उपक्रम राबवण्यात येणाऱ्या अडचणी हे मुख्य कारण होते व तेही शार्दुलच्या रुपानं साकार होत आहे. कारण शार्दुल नुसत्या कार्यक्रमाच्या आयडियाच डोक्यात आणत नाही तर उत्तम प्रकारे त्याचे नियोजन करून त्या कार्यक्रमाच्या आयडियाची तो अंमलबजावणीही तेवढ्याच उत्तम पद्धतीने करतो. विविध उपक्रमात सर्व थरातील विद्यार्थी व लोक यांचेसाठी तो कार्यक्रम करता त्यात एक कल्ली पणा नसतो. त्याने जेवढे कार्यक्रम सुरू केले त्याला मी कधी विरोध केला नाही. एखादा कार्यक्रम जरी पटला नाही तरी त्याला तसे बोललो नाही व पूर्ण स्वातंत्र्य दिले. मी शार्दुलच्या बाबतीत नेहमी म्हणतो की,

Shardul is man of Idia

& who impliment it successfully.

त्यामुळे आमच्या संस्थेत कार्यक्रमाची, उपक्रमाची मांदियाळी असते व जेवढे लोक कार्यक्रमासाठी सहभागी पाहुणे व पुरस्कारार्थी म्हणून येतात ते सर्वजण शंभर टक्के मार्क देतात व हेच या कार्यक्रमाचे व शार्दुलचे यश आहे. विविध उपक्रमामुळे व कार्यक्रमामुळे संस्थेच्या नावलौकिकात प्रचंड भर पडलेली आहे व याचे सर्व श्रेय हे शार्दुलला जाते. अत्यंत कष्ट करून प्रत्येक गोष्ट प्रामाणिकपणे तो नेहमी करतो व संस्थाला सर्वोच्च शिखरावर नेटून तो पोहोचवेल त्यात आता अजिबात माझ्या मनामध्ये शंका नाही.

संस्थेमध्ये जे अनेक कार्यक्रम व उपक्रम राबवले जातात त्यापैकी काही महत्त्वाचे उपक्रम मी थोडक्यात आपल्याला सांगणार आहे. आम्ही घरातले कोणीच स्वतंत्र आमचा वाढदिवस साजरा करत नाहीत तर त्या वेळी एखादा कार्यक्रम घेऊन त्याच कार्यक्रमात फक्त एक गुच्छ स्विकारतो. मी तर मागे म्हटल्याप्रमाणे जन्मल्यापासून किमान ५२ वर्षे होईपर्यंत एकही वाढदिवस साजरा केला नाही. कारण तशी आमच्याकडे प्रथाही नव्हती. पण पुढे शार्दुलने व पत्नीने आग्रह करून तो चालू केला. कार्यक्रमाची सुरुवात माझ्या वाढदिवसाने होते म्हणजे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच होते. कारण माझा वाढदिवस ६ जूनला असतो. हा वाढदिवस आम्ही ''कीर्तन महोत्सव'' या नावाने घेतो. तीन दिवस विविध चांगल्या महाराजांची किर्तने ठेवली जातात व शेवटच्या दिवशी काल्याच्या कीर्तनात एक गुच्छ घेऊन व एखादा यज्ञ करून वाढदिवस अन्नदान करून साधेपणाने वाढदिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमात आदर्श कीर्तनकार हा महाराष्ट्र पातळीवरचा पुरस्कार सुद्धा दिला जातो.

## श्रीमद् भागवत सप्ताह

दर तीन वर्षांनी अधिक महिना येतो. या महिन्यात एक सप्ताह हा श्रीमद् भागवत सप्ताह महिला मंडळ आयोजित करते व गेली २५ वर्षे सातत्याने या सप्ताहाचे आयोजन केले जाते. कीर्तन महोत्सव व भागवत सप्ताह साजरे करण्यामागचा एकच उद्देश असतो की समाजामध्ये चांगले व अध्यात्मिक विचार पसरवणे व चांगुलपणा व समाजात शांतात प्रस्थापित करण्यासाठी व चांगले संस्कार करण्यासाठी हे दोन्हीही कार्यक्रम आयोजित केले जातात.

## आदर्श माता पुरस्कार

सौ. सुरेखा जाधवर माझी पत्नी हिचा वाढदिवस ३१ ऑगस्टला असतो व तो आम्ही आदर्श माता पुरस्कार देऊन साजरा करतो. ज्या मातेने सोन्यासारखी चांगली व समाजोपयोगी व संस्कारी मुलाना जन्म दिला आहे. अशा दोन मातांना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. आतापर्यंत पहिल्या वर्षी आम्ही मा. मंत्री सदाभाऊ खोत यांच्या मातोश्री व श्री. राहुल कराड यांच्या मातोश्री तसेच माजी मंत्री महादेव जानकर यांच्या मातोश्री व खा. धैर्यशील माने यांच्या मातोश्री मा. खा. निवेदिता माने यासारख्या दिग्गज मातांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले

तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्याही महिलाच असतात व त्याही आमदार खासदार किंवा माजी मंत्री यासारख्या असतात.

## आदर्श शिक्षक पुरस्कार

लगेचच पुढे आठ दिवसांनी शार्दुलचा वाढदिवस आठ सप्टेंबर या दिवशी असतो व तो आम्ही आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन साजरा करतो. कारण पाच सप्टेंबर हा शिक्षक दिन असतो. लगेच हा कार्यक्रम आम्ही घेतो. त्यामध्ये महाराष्ट्रातील आदर्श कुलगुरु, आदर्श प्राध्यापक, आदर्श प्राचार्य व आदर्श शिक्षक एवढ्याच मोजक्या पण नामांकित लोकांना हा पुरस्कार दिला जातो. आतापर्यंत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विद्यासागर व गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सांळुके यांना हा पुरस्कार दिला आहे व त्याप्रमाणे योग्य निवड करून बाकीचेही पुस्कार दिले जातात.

## स्वच्छता व व्यसनमुक्ती मोहिम

अनेक वर्ष ज्यु. कॉलेजची मुलं घेऊन अॅड. शार्दुलने बऱ्याच वेळा १०० गाव, १०० शाळा व १०० मंदिर यांच्या स्वच्छतेचा कार्यक्रम राबविला, तसेच त्या कार्यक्रमात व्यसनमुक्ती हाही कार्यक्रम राबविला, सध्या तरुण वर्गात व्यसनाचे प्रमाण वाढत आहे व त्यामुळे युवक हा बलशाली व सुसंस्कृत राहिलेला नाही. त्यामुळे हा उपक्रम युवकासाठी अत्यंत महत्त्वाचा साबीत झाला.

## विविध स्पर्धा

कै. उद्धवराव जाधवर निबंध स्पर्धा व स्व. आमदार रमेशभाऊ वांजळे वक्तृत्व स्पर्धा या स्पर्धा शाळा पातळीवर राबवल्या जातात व दरवर्षी या स्पर्धामध्ये जवळ जवळ १०,००० निबंध व १,००० विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेत असतात व जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्रभर या स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचबरोबर महाविद्यालय पातळीवर भारुड स्पर्धा, वक्तृत्व, कथाकथन, वादविवाद व पथनाट्य स्पर्धा यांचे आयोजन केले जाते व या सर्वांमध्ये ज्वलंत विषय यावर उपक्रम राबवण्यात येतो.

## विज्ञान प्रदर्शन

महाराष्ट्र पातळीवरील विज्ञान प्रदर्शन संस्थेत भरवले जाते. यात विद्यार्थ्यांना विज्ञानाचे ज्ञान प्राप्त व्हावे व त्यांनी विज्ञानाचे नवनवे प्रयोग सादर करावेत व विज्ञानाचा समाज उपयोगी वापर व्हावा व विद्यार्थ्यांना स्टेज उपलब्ध करून देणे हा या मागचा चांगला उद्देश आहे.

## क्रिडा महोत्सव

सर्व शाखाअतंर्गत क्रीडा स्पर्धा या महोत्सवात भरवल्या जातात. तसं तर आमच्या संस्थेत बालवाडी ते १० वी पर्यंत मोटार स्कील अंतर्गत वर्षभर क्रीडाचे कार्यक्रम घेतले जातात. विद्यार्थी हा बलवान झाला पाहिजे कारण आमच्या संस्थेचे ब्रीदच असे आहे. ''बल, बुद्धी व सद्‌विचारासाठी शिक्षण''. त्या अंतर्गत बलवान पिढी व्हावी या हेतूने मुलांना खेळासाठी प्रोत्साहन नेहमीच दिले जाते व फिरता करंडकही ठेवला जातो. या वर्षीपासून नवीन कॅम्पस घेतल्यापासून  इंजिनिअरींगच्या महाराष्ट्र पातळीवरील स्पर्धांचे आयोजनही या महोत्सवात केले जाते.

## सांस्कृतिक महोत्सव

विद्यार्थ्यांना त्यांच्या कला गुणाला वाव मिळावा म्हणून दर वर्षी जवळजवळ १० दिवस या महोत्सवाचे आयोजन केले जाते. मुलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अनेक सिने कलाकारांना मार्गदर्शनासाठी बोलविले जाते व मोठ्या उत्साहात हा महोत्सव साजरा केला जातो.

## 'दारु सोडा दूध प्या' कार्यक्रम

नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला ३१ डिसेंबर या दिवशी गेली दहा वर्षे सातत्याने हा कार्यक्रम हवेली पोलिस स्टेशन व आमच्या संस्थेमार्फत आयोजित केला जातो. त्यात वर्षाची सुरुवात दारु पिऊन न करता दूध पिऊन करावी व चांगला व्यसनमुक्तीचा संदेश लोकांपर्यंत या कार्यक्रमाद्वारे पसरवला जातो. हे पाहून आता पुण्यात अनेक ठिकाणी स्वयंस्फूर्तीने काही मंडळांनीही हा उपक्रम चालू केला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

# शौर्य पुरस्कार

दर वर्षी संस्थेमध्ये हा पुरस्कार दिला जातो. भारतीय पातळीवर ज्या मुलांनी शौर्य गाजविले आहे त्यांचा सत्कार राष्ट्रपतीच्या हस्ते केला जातो. त्याच पद्धतीने हा पुरस्कार मिलिटरीतील उच्च अधिकारी बोलावून त्यांच्या हस्ते केला जातो व दोन वर्षांपासून तर आर्मीमध्ये आजी किंवा माजी सैनिकांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याचे कामही संस्था करत असते.

# शिव जयंती

आमचा भाग म्हणजे शिवछत्रपती महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी. त्या भूमीत आमची संस्था कार्य करते. त्यामुळे मी स्वतः पुण्यात शिवाजी महाराजांचे बालपण गेले तिथं शिवाजी महाराजांच्या नावाने एकही कॉलेज नव्हते; पण त्यांच्या नावाने वडगावामध्ये शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू केले व त्याचा प्राचार्य म्हणून काम करत आहे. त्याचा मला अभिमान आहे. शिवाजी महाराजाचे चरित्र माहित व्हावे व सर्व युवक समाजाभिमुख व्हावा म्हणून अत्यंत मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम आयोजित केला जातो. मोठी मिरवणूक काढून समाज जागृती करून विद्यार्थ्यांसाठी मोठ्या वक्त्याचे व्याख्यान आयोजित केले जाते.

# जीवनगौरव पुरस्कार

आमच्या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त हा जीवनगौरव पुरस्कार दरवर्षी दिला जातो. यामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक व पत्रकारीता अशा क्षेत्रांमध्ये ज्यांनी उत्तम कार्य केले आहे व त्यात आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे अशा दिग्गजांचा सत्कार यात केला जातो व तो महाराष्ट्र नव्हे तर भारतीय पातळीवरील हा पुरस्कार आहे. त्यात आम्ही आतापर्यंत हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, भारताचे नेते शरद यादव, माजी मंत्री एकनाथ खडसे व माजी मुख्यमंत्री श्रीयुत नारायण राणे यासारख्या दिग्गजांना दिला आहे. पत्रकारीतामध्ये दिल्ली येथील सुदर्शन टि. व्ही. चे मुख्य संपादक श्री. चव्हाण के यांनाही दिलेला आहे.

# युवा संसद

शार्दूलचा अत्यंत आवडता हा कार्यक्रम आहे. एमआयटीचा छात्र संसद हा कार्यक्रम असतो. त्याच्या धरतीवर श्री. राहुल कराड यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्र पातळीवरील हा कार्यक्रम आहे. यासाठी शार्दूल फार कष्ट घेतो. कारण विविध क्षेत्रातील लोकांना आणणे व तेही २० ते २५ मुख्य लोक गोळा करणे हे सोपे काम नाही. पण गेली पाच वर्षे या पाचही युवा संसद कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत व त्याला फार मोठे मोठे दिग्गज उपस्थित राहिलेले आहेत. हा कार्यक्रम दोन दिवस चालतो. दीड-दोन हजार युवक याचा लाभ घेतात. महिलांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतो. यात अत्यंत चांगल्या दर्जाचे व्याख्याते असतात व विषयही तसेच अत्यंत देशाच्या व समाजाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे असतात. यात आदर्श मुख्यमंत्री, आदर्श मंत्री, आदर्श खासदार, आदर्श युवा खासदार, आदर्श आमदार, आदर्श नगरसेवक, आदर्श जिल्हा परिषद सदस्य, आदर्श युवा पुरस्कार, आदर्श सरपंच असे अनेक पुरस्कार दिले जातात. त्याची अत्यंत नि:पक्ष व चांगली निवड केली जाते. सहभागीच्या संख्या मोठ्या असल्यामुळे पास ज्यांना मिळेल त्यांनाच या संसदेला हजर राहता येते. सर्व पक्षाच्या लोकांना या कार्यक्रमाला बोलाविले जाते. कारण आम्ही कोणत्याच पक्षाचं काम करत नाहीत. जो चांगला काम करतो त्याला पाठिंबा देतो. यात आतापर्यंत मा. मनोहर जोशी, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, महादेव जानकर, चंद्रकांत दादा पाटील व बाळासाहेब विखे पाटील, गोव्याचे मुख्यमंत्री श्री. सावंत साहेब असे कितीतरी दिग्गज येऊन गेले आहेत. त्याचबरोबर यात अधिकारी व पत्रकाराचा समावेशही असतो. टि. व्ही. वरील सर्व महत्त्वाचे संपादक येऊन गेलेले आहेत. या सर्व कार्यक्रमासाठी एकही पैसा कोणत्याही सहभागी युवकाकडून घेतला जात नाही. प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सोशल ट्रस्ट तर्फे शार्दुल अनेक अशा प्रकारचे कार्यक्रम घेतो व एक दिवस हा कार्यक्रम संपूर्ण भारतात ओळखला जाईल व शार्दुलच्या कार्याचा गौरव होईल यात मला शंका नाही.

▸▸ ▸▸

# ३०. मनातील खंत

मी जीवनामध्ये अनेक गोष्टी केल्या. मी ज्या लहानपणी कधी विचारात घेतल्या नव्हत्या किंवा ज्याची मी कल्पनाही केली नव्हती त्या गोष्टी मी साध्य केल्या परमेश्वराने माझ्या अपेक्षेपेक्षा कितीतरी पटीने मला यश दिले त्यामुळे मी देवाचे आभार मानतो. कधीही मी वाईट गोष्टीचा विचार केला नाही. दुसऱ्याच्या वाईटाचा तर कधी विचारच केला नाही. अतोनात जीवनभर कष्ट केले. कोणत्याही सुखाची अपेक्षा केली नाही. कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्याची हिम्मत ठेवली व प्रत्येक कितीही अवघड काम असलं तरी ते हातात घेतल्यावर कधीच सोडून दिलं नाही व प्रत्येक कामात यशस्वी झालो. त्रास झाला पण परमेश्वराने अपयश कधीच पदरात टाकले नाही. मला काही गोष्टी करायच्या होत्या किंवा काही गोष्टी अपेक्षित होत्या त्या मिळाल्या नाहीत किंवा करायला वेळ मिळाला नाही व त्या आता शक्य होतील असेही वाटत नाही. त्यामुळे काही मनामध्ये खंत राहिल्या आहेत. त्या व्यक्त करणे गरजेचे आहे.

## चांगले मित्र मिळाले नाहीत

ज्याप्रमाणे पाहिजे त्या प्रकारचे मला मित्र मिळाले नाहीत. कामापुरते बरेच मित्र झाले व ते काम संपल्यावर मैत्रीही तशीच दूर गेली. पण जीवाला जीव देणारा, सुखात व दुःखात सहभागी होणारा, दिलासा देणारा, वैचारीक बाबतीत सहभागी होणारा असा चांगला मित्र मिळाला नाही याची खंत माझ्या मनात नेहमीच राहिल.

## वापर करून घेतला

असे अनेक लोक व मित्र आहेत की ज्यांनी फक्त माझा वापर करून घेतला व पुढे मिठाला जागले नाहीत. याचा अर्थ मला त्यांच्याकडून काही आर्थिक किंवा कोणत्या प्रकारची

अपेक्षा होती. असा नाही पण अपेक्षा एवढी होती की त्यांच्या जीवनात आपल्यामुळे अमुलाग्र बदल झाला. सुधारणा झाली. एखादी गोष्ट साध्य झाली अशा एकाही माणसाने जाणीव ठेवली असे दिसत नाही व त्यातली त्यात राजकारणातल्या मंडळीचा जास्तीत जास्त समावेश आहे असे मला वाटते. ज्याचे भले केले तेही शेवटपर्यंत राहिले नाहीत.

माझ्या जीवनात मी नेहमीच लोकांचे भले करत आलो. त्यामुळे अनेक लोक संपर्कात आले. काम झाले. काही दिवस जवळ राहिले; पण ज्याचा १००% आपल्यामुळेच फायदा झाला, ज्यांनी आपले कितीही उपकार मानले तरी त्याच्यावरील उपकाराचे ओझे फिटणार नाही असे सुद्धा लोक स्वार्थ संपला की दूर गेले व शेवटपर्यंत हाय हॅलो पुरते सुद्धा उरले नाहीत.

## व्यायामाला वेळ देता आला नाही

मी दररोज व्यायाम करतो. लहानपणापासून सातत्याने मी व्यायाम, योगासने व खेळ खेळलो. पण मला नेहमी माझी शरीरयष्टी चांगली व पेहलवानासारखी करायची होती. पण परिस्थितीमुळे मला कधीही व्यायामाला तेवढा वेळ व पैसा खर्च करता आला नाही. पिळदार शरीराचे माझे स्वप्न होते ते कधीही पूर्ण करता येणार नाही ही खंत नेहमी माझ्या मनात राहिल.

## संगीत

मला संगीत शिकण्याची खुप आवड होती. अनेक वेळा मी शिकण्याचा प्रयत्नही केला. पण माझी आर्थिक परिस्थिती सुरुवातीला चांगली नव्हती व नंतर वेळ देता आला नाही. पण एक तरी वाद्य आपल्याला चांगले यावे असे मला सतत आज सुद्धा नेहमी वाटते.

## चांगले लोक मिळाले नाहीत

सर्वात मोठी माझी ही खंत आहे. मला जशी पाहिजे तशी माणसे मिळाली नाहीत. हे लोक मग कर्मचारी असोत, माझ्या गावातले लोक असतो, मित्र असोत किंवा पार्टनर असोत. ज्या पद्धतीने पुढे जाण्याचा माझा विचार होता त्या पद्धतीने विचार करणारे लोक मला मिळाले नाहीत. नाही तर आज अजूनच चित्र वेगळं असतं. एवढचं काय पी. ए. साठी आलेली माणसं सुद्धा त्या प्रकारची मिळाली नाही. ही एक खंत माझ्या मनात नेहमी राहिल. कारण मी जेवढा

वेळ काम करतो तेवढं फिरण सुद्धा लोकांना करता आलं नाही व हळू हळू लोक पळून गेल्याचे चित्र मला दिसलं म्हणून बरीच कामे मी स्वतःच केली.

## घरच्यांची साथ मिळाली नाही

माझ्या घरचे भावंड ही ज्या पद्धतीने वागायला पाहिजे होतो त्या पद्धतीने वागली नाहीत. एखादा व्यवसाय किंवा नोकरी काम त्यांना दिलं तर तितक्याच प्रामाणिकपणे पूर्ण केलेलं आढळत नाही. उलट घरच्या लोकांनी जास्तीत जास्त सहभागी होणे गरजेचे आहे पण लांबून बघणे व कोणतीच अपेक्षा न ठेवणे असे वागले. निरपेक्षता हा चांगला गुण आहे. विरोध न करता काही न बोलता शांत बसून राहणे. आज जर घरच्या प्रत्येकाने दिलेला स्वतंत्र व्यवसाय नीट केला असता तर आज अजूनच प्रगती झाली असती. पण फार थोड्या अपेक्षावर जगण्यातच त्यांनी धन्यता मानली.

## वडजीचा प्रोजेक्ट

वडजी गावावर माझे खूपच प्रेम आहे. गावासाठी अनेक गोष्टी मी अनेक वर्ष केल्या. वडजीला एक दवाखान्याचा मोठा प्रोजेक्ट काढण्याच स्वप्न माझे अपूर्ण राहिलेले आहे व ते पूर्ण होते की नाही हे आता परमेश्वरालाच माहित. पण हा प्रोजेक्ट मी पूर्ण करू शकलो नाही याची मात्र माझ्या मनात खंत आहे.

## आदर्श गावाचं स्वप्न

माझे वडजी गाव हे आदर्श गाव व्हावे हे माझे स्वप्न होते. त्यासाठी अनेक वर्ष मी कार्यरतही राहिलो. पण पुण्याला आल्यामुळे व नंतर इथल्या व्यापात अडकल्यामुळे मला ते काम पूर्ण करता आले नाही व पुढचे मी ज्याच्यावर विश्वास टाकला, निवडून दिले, ज्याच्यासाठी अतोनात कष्ट केले ते लोक कुचकामी निघाल्यामुळे व एकमेकांच्या वैरामध्येच आनंद मानत राहिल्यामुळे मला माझे गाव आदर्श करता आले नाही. कारण अण्णा हजारेपेक्षा ४० वर्षापूर्वी आपल्या गावात चांगल्या योजना राबवल्या जात होत्या. मी त्या वेळी स्वतः तिथ होतो. पण आज ती खंत राहिली आहे.

▸▸ ▸▸

# ३१. माझे घर

आमचं कुटुंब आता फार मोठं झालेलं आहे. आम्ही चार भाऊ, त्यांची मुले व त्यांची लग्न होऊन त्यांची मुले. एकत्र कुटुंबातील तोटे ओळखून सुरुवातीपासूनच मी त्यांना स्वतंत्र राहून आपआपले संसार व्यवस्थित करण्यास भाग पाडले. त्यामुळे पुण्यात बरेच जन स्थाईक झाले आहेत. प्रत्येकाची स्वतंत्र घरे, बंगले झालेले आहेत. सर्वजण बायकासहीत नोकरीला आहेत. आम्ही चार भावंड त्यातील मोठे दिनकर अत्यंत कणखर व जबरदस्त व्यक्तिमत्त्व; परंतु आजोबाच्या व आमच्या कसोटीला कधी उतरला नाही. गाव कारभार व दोन वेळा उपसरपंच बरेच वर्ष व्यसनात अडकलेला. आता वय ६५ पेक्षा जास्त असेल. त्याला तीन मुलं. एकाचा २० व्या वर्षी ॲक्सीडेंट होऊन तो गेला व अण्णा सुद्धा आता अर्धांग वायू झाल्यामुळे घरी असतो. आता तो चांगला आहे. फिरतो, शेतापर्यंत जातो. दुसरा माझा मोठा भाऊ म्हणजे मधुकर ज्याला आम्ही बापू म्हणत होतो. अत्यंत गरीब स्वभाव माझ्यापेक्षा मोठा असला तरी मी कधी खवळलो तर उलट बोलणार नाही संयमी. त्याला दोन मुले, दोन मुली. मुलगा बालाजी व अप्पा दोघेही पुण्यात सेटल झालेली आहेत व त्यांच्या बायकाही नोकरी करतात. दोन वर्षांपूर्वी बापूचा कॅन्सरमुळे मृत्यू झाला.

तिसरा नंबर माझा होता व चौथा माधवराव. माझे वडिल मरताना मी त्यांना शब्द दिला होता की, मुलाप्रमाणे सांभाळिल. तोही अत्यंत गरीब स्वभावाचा, कितीही त्रास झाला तरी कधी काही मागणार नाही. अति मर्यादेचे पालन करणारा. तोही पुण्यातच सेटल झालेला आहे व छोटी एक बहिण जी बीड जिल्ह्यात दिली आहे. तिचे मिस्टर कंडक्टर होते, तेही रिटायर झाले आहेत. असं आमचं त्यावेळचं एक कुटुंब.

आता मला दोन मुले आहेत. शार्दुल व जयप्रकाश. जयप्रकाश मोठा आहे. तोही अत्यंत गरीब स्वभावाचा मान वर करणार नाही. उत्तम मर्यादेचे पालन करणारा असा आहे. तो जीम चालवतो. ज्याचे उद्‌घाटन धर्मेंद्र हिरो यांनी केलेले आहे व ती उत्तम जीम आहे.

# ३२. चि. शार्दुल

शार्दुल हा माझा दोन नंबरचा मुलगा. गणेश विसर्जन म्हणजेच गणेश चतुदर्शी दिवशी आम्ही मिरवणुकीतून परत आल्यावर संध्याकाळी जन्मला. त्यावेळी आमचा विश्वकर्मा अपार्टमेंटचा स्लॅपही होता. लहानपणापासूनच अत्यंत चंचल व आईचा लाडका आहे. लहानपणापासूनच लहान मुले गोळा करून माझी नक्कल करायचा व मी जसा भाषण करतो तसं मुलांना गोळा करून भाषण करायचा. फोन करायची नक्कल करायचा व फोनवर ऑर्डर द्यायचा. दोन गाड्या खडी पाठवा, एक गाडी वाळू पाठवा व तशीच नक्कल करायचा. त्याला मी आपल्याच दांगट पाटील संस्थेच्या रॉयल रोजेश इंग्लिश मेडिअम शाळेत घातले. पहिल्यापासून संस्थाचालकाचा मुलगा म्हणून वागणूक दिली नाही. सामान्य विद्यार्थ्यासारखे वागवले. दर वर्षी तो चांगल्या मार्कांने पास होत गेला. दहावीलाही त्याला चांगले मार्कस् मिळाले व त्याचा नंबर बी.एम.सी. कॉलेजला लागला.

स्वतःच्या मार्कावर तो तिथं लागला व ११ वी व १२ वी कॉमर्समधून केले. खरं तर त्याला चांगले मार्क्स होते. त्याला सायन्सला घालून डॉ. इंजिनिअर करता आलं असतं. मात्र त्याचे मन त्यामध्ये अजिबात नव्हते व त्यानेही त्याला दुजोरा दिला. बारावीलाही त्याला अत्यंत चांगले मार्क्स मिळाले व त्याचा नंबर १२ वी नंतरच्या लॉ ला लागला व तोही आय. एल. एस. लॉ कॉलेजमध्ये लागला. जे अत्यंत नामवंत आहे. तिथंही नंबर लागत नाही. तिथेही त्याचा नंबर स्वतःच्या मार्कसवरच लागला. तिथं त्याने पाच वर्षांचा बी.ए.एल.एल.बी. हा कोर्स पूर्ण केला व पुढे अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठातून एल.एल.एम. केले. हे करताना त्याने इतरही पाच सहा कोर्स केले. जे लॉमधील कोर्सेस आहेत. डी.टी.एल., डी.एल.एल. व एल.डब्ल्यु., एम.बी.ए. इत्यादी डीग्री त्याने केल्या. माझे जसे शिक्षण भरपूर

झालेले आहे तसेच त्याने त्यापेक्षा एक तरी डिग्री जास्त घेण्याच्या हेतूने शिक्षण घेत आहे. हे शिक्षण घेताना इयत्ता अकरावी पासूनच माझ्या शेजारी कॉलेजहून आल्यावर बसून पाच–सात वर्षे संस्था चालवण्याचे ज्ञान घेतले व आता तो संपूर्ण संस्था चालवत आहे. मी त्याला फक्त सपोर्ट करीत आहे. नवीन युनिव्हर्सल इंजिनिअरींग कॉलेज तर तो पूर्णपणे स्वतःच हँडल करत आहे.

शार्दुलला एकही मित्र नाही. एकही व्यसन नाही व २४ तास संस्थेच्या हिताचे काम तो करतो. प्रत्येक शाखेच्या व्यवस्थित मिटींग घेणे, त्याचं शैक्षणिक व आर्थिक नियोजन करणं अशी अनेक महत्त्वपूर्ण कामे तो स्वतः करतो आहे. शिक्षक भरती असो किंवा शासकीय कामे असोत. सर्व कामे अत्यंत प्रामाणिकपणे, सचोटीने व कष्टपूर्वक तो करत आहे व वयाच्या पंचवीसीत तो एक चांगला संस्था चालवणारा व्यक्ती म्हणून पुढे येत आहे. संस्थेमध्ये जेवढे उपक्रम व कार्यक्रम चालतात त्यांच सगळं नियोजन व अंमलबजावणी, राबवणूक शार्दुल स्वतःच करतो. खरं तर आमच्या संस्थेत जेवढे कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात तेवढे उपक्रम व कार्यक्रम क्वचितच एखाद्या संस्थेत राबविले जातात. आर्थिक स्थितीवर त्यांचे चांगलेच नियंत्रण आहे व त्याच्या हातात संस्थेचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल आहे. यात मला काहीही शंका नाही. म्हणूनच मी त्याचेकडे सगळी धुरा सोपवलेली आहे व निश्चिंत झालेलो आहे व मला तुकारामाच्या अभंगाची नेहमी आठवण होते.

आपल्या हिताशी जो असे जागता<br>
धन्य माता पिता तयाचीया<br>
कुळी कन्या पुत्र होती जे सात्वीक<br>
तयाचा हरीक वाटे देवा<br>
गीता भागवत करीती श्रवण<br>
अखंड चिंतन विठोबाचे<br>
तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा<br>
तरी माझ्या दैवा पार नाही.

चांगली संतान होणं, निर्व्यसनी असणं, कष्टाळू व होतकरू असणं हे नशीबानेच मिळतं व मला हे नशीब प्राप्त झाले आहे. मी त्याच्या वयाचा होतो. अत्यंत सामान्य परिस्थिती होती. त्या वेळी सुद्धा मी खूपच कडक होतो. तसाच शार्दूल आहे. पायावर पाय ठेऊन प्रगती करत आहे. त्याच्या वयाचा मी होतो तेव्हा नुकताच मी प्राध्यापक झालेलो होतो व शरीरयष्टीही अशीच होती व स्वभावही असाच होता. माझे वार्षिक उत्पन्न २५ हजार रुपये फक्त होते व आज शार्दुलचे उत्पन्न संस्थेचे १० कोटीपेक्षा जास्त वर्षाला आहे. त्यामुळे त्याला प्रगती करण्याला भरपूर वाव आहे. माझे विद्यापीठ स्वतःचे करण्याचे स्वप्न तो साकार करेल यात कोणतीही शंका राहिलेली नाही. हॉटेलिंगचा नाद नाही. चांगले वाईट मित्र नाहीत. फिरण्याचा नाद नाही. २४ तास संस्थेच्या उत्कर्षाचा विचार व सकाळपासून संध्याकाळपर्यंत संस्थेचे काम व आता तर नवीन कॅम्प्स मोठा असल्यामुळे व तो ५० एकरात असल्यामुळे सकाळी इथल्या संस्था व रोज दुपारी युनिर्व्हसल संस्था असे सतत तो काम करत आहे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो पूर्णतः शाकाहारी आहे. त्यामुळे एकही वाईट सवय त्याला नाही. आईवडिलांचा मान ठेवणे व वडिलांना दैवत मानत हे संभाजी महाराजासारखं ध्येय त्याने अंगिकारले आहे.

▸▸ ▸▸

# ३३. सौ. सुरेखा

ही माझी पत्नी. अत्यंत कष्ट करणारी व कठोर परिश्रम करणारी. आमच्या लग्नाला तीस वर्ष झाली. माझी सुरुवातीची परिस्थिती चांगली नव्हती. मी नोकरीला असताना दोन हजार रुपये पगार होता व तिची आर्थिक परिस्थिती माहेरची खूपच चांगली होती. पण प्रत्येक कामात सहभाग घेऊन अपार कष्ट करून जेवढे असेल तेवढ्यात तिने समाधान मानले. आमच्याकडे काहीच नसल्यापासून तिने संसाराला सुरुवात केली व आज एवढे ऐश्वर्य आहे. तरी सुद्धा कष्ट करण्याची तिची तयारी पाहून आश्चर्य वाटते. अजिबात ऐशाराम करत नाही व सातत्याने संसारात गुंतून असते. मी स्वतः अठरा-अठरा तास अनेक वर्षे काम केली. पण कधीही तिने तक्रार केली नाही. हॉटेलिंग नाही. फिरायला नाही. शॉपिंग नाही. पण कधीही तक्रार केली नाही. परिणामी तिने घरच्या कामात गुंतवून घेतले. जवळजवळ सर्वच वर्षे म्हणजे ३० वर्षात तिने तिचे काम आणि त्यामुळे आता मात्र मला त्रास होत आहे. कारण तिला कशाचीच सवय राहिली नाही. आम्ही दहा मिनीट गप्पा मारु शकत नाहीत. कारण कधीच गप्पा न मारल्यामुळे सवयच राहिली नाही आणि आताही आम्ही सर्वजन सतत कामात असतो.

मॅडमनी कामात स्वतःला एवढे गुंतवून घेतले की आमच्या दांगट पाटील नर्सिंगची मेस तिने चालविली. एखाद्या वेळेस बाई आली नाही तर स्वतः ती मुलाचा स्वयंपाक करत होती. १०० मुलीची मेस स्वतः चालवत होती. पण वाईट एकाच गोष्टीचे वाटते की विकास पाटलांनी कधीही जगात चालला आहे तेवढा भाव दिला नाही. नेहमी ३००-४०० रुपये पर विद्यार्थी कमी द्यायचे व दोन दोन वर्षे वाढ द्यायची नाही. सर्व सुट्ट्या कापायचा व वर्षाचा हिशोब केल्यावर काहीच खाली उरायचे नाही. वास्तविक नर्सिंग कॉलेज मीच काढले. त्यांचा कॉलेज काढायला विरोध होता. सर्व गोष्टी परवानगीसहीत मीच केल्या. पण बाहेरच्या खानावळी

एवढाही भाव मात्र नानांनी दिला नाही याची खंत माझ्या मनात राहिल. तिला मी अनेक वेळा सांगितलं की आता चालवू नको. मुद्दाम ते लोक तुला रेट व्यवस्थित देत नाहीत व वर्षाला १० हजार रुपये सुद्धा मिळत नाहीत. मी तुला १ लाख रुपये देतो पण ती सोडत नाही. म्हणते की जर आपण सगळं केलेलं असेल तर बघू. मला वाटतं तोपर्यंत मी चालवणार एवढ विरुद्ध परिस्थितीत सुद्धा ती काम करते याचे मला आश्चर्य व समाधान वाटते कारण मी तिला आयुष्यात वेळच देऊ शकलो नाही. त्यामुळे तिने तिला सर्व कामात गुंतवून घेतले आहे.

आमचे एकमेकांवर खूप प्रेम आहे. एक तास सुद्धा आम्ही दूर राहू शकत नाहीत व आता तिच्या कामात गुंतवून घेतलेल्या स्वभावामुळे एक तास एकत्रित ही राहू शकत नाही. कारण तिची कामे ती स्वतः करते. आता सुद्धा स्वयंपाक करते. घरातील कामे सुद्धा बाई आली नाही तर स्वतः करते. देवधर्मामध्ये तिने स्वतःला अडकवून घेतलेले आहे. स्वतःचे मंदिर बांधायला लावले व देवाची कपडे सुद्धा स्वतः शिलाई मशीनवर शिवते. देवात खूप स्वतःला वाहून घेतलेले आहे. तिचा स्वभाव जास्तच जिद्दी आहे. एखादी पटणार नाही अशी गोष्ट माझ्याकडून घडली तर १०-१०, २०-२० वर्षे विसरत नाही. एवढाच तिचा वाईट स्वभाव आहे. विसरतच नाही त्यामुळे मला कधी - कधी ती बदला घेण्यासाठी माझ्या जीवनात आली आहे असे वाटते. कारण आमच्यामुळे व तिच्या भावांच्या वाईट स्वभावामुळे तिचं माहेर तुटलं असं ती म्हणते. त्यामुळे कधी बदल्याची भावना असल्यासारखं वागते. एवढं सोडलं तर माझा संसार वाढवण्यामध्ये, फुलवण्यामध्ये व तो उत्तम जोपासण्यामध्ये तिने तिचे संपूर्ण जीवन वेचलेले आहे. यात शंका नाही.

एकादी नागीन तरी बदल्याची गोष्ट विसरेन परंतु मॅडम विसरुच शकत नाही. अती कट्टरपण पण सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला तिने दिलेली गोष्ट म्हणजे उत्तम, कष्टाळू, स्वाभिमानी, निर्व्यसनी, हुशार व आपले हित व उद्देश साध्य करण्याची हिम्मत असलेला मुलगा शार्दुल दिला त्यामुळे माझी पत्नी माझ्यासाठी अत्यंत उत्तम व प्रिय व्यक्ती आहे.

▸▸

# ३४. मुलास पत्र

प्रति,

प्रिय शार्दुल,

अनेक उत्तम आशीर्वाद

मी तुझे गेल्या पंचवीस वर्षापर्यंत निरीक्षण करत आहे. अगदी जन्मल्यापासून तू चंचल आहेस. कधीही कोणत्याही गोष्टीचा हट्ट धरला नाही व एखादी गोष्ट मला पाहिजे असे तू मला कधीही म्हटला नाही. कधीच काही मागितले नाही. सातत्याने चांगल्या गोष्टी करीत राहिल्यास. कठोर परिश्रम करून आपले शिक्षण तू स्वतःच्या हिमतीवर चांगल्या कॉलेजामधून पूर्ण करून दाखवलेस. आता सर्व संस्थाचा कारभारही अत्यंत चांगल्या पद्धतीने पार पाडत आहेस. स्वतःला कष्टाळू, प्रामाणिक, अभ्यासू व नवनवीन योजना सुचवणारा व राबवणारा म्हणूनही तुझा नावलौकिक होत आहे. अगदी कमी वयात खेळायच्या व मौज करायच्या वयात तू स्वतःला या पवित्र कामात अडकून घेतलेस व खेळायच्या व बागडायच्या वयात स्वतःवर अन्याय करून तू कर्तव्यदक्षतेने संस्थेचे काम करतोस. वडीलांना दैवत मानून व त्यांच्या वाईट परिस्थितीची जाणिव ठेऊन उत्तम प्रशासक म्हणून काम करत आहेस यात काही शंका नाही.

मी लिहिलेल्या आत्मचरीत्रात मी माझे सर्व चांगले वाईट अनुभव लिहून ठेवले आहेत व चांगले प्रामाणिक काम करणाराला फार त्रास होतो. सर्वजण त्याला फसवण्याचा प्रयत्न करतात.. वाईट मित्रापासून तू लांब राहावे. चांगले प्रामाणिक मित्र नसतील तर मित्र नसलेले परवडले हे माझ्या अनुभवावरुन मी तुला सांगत आहे. कधीही कोणाबरोबर पार्टनरशीपमध्ये कोणताही धंदा करू नकोस. आपल्याला त्यामध्ये कधीच फायदा झाला नाही. सगळ्यांनी

घेता येईल तेवढा गैरफायदाच घेतला व कामे मात्र आपण केली. एखादे दुसरे काम कमी झाले तरी चालेल पण भागीदारी आपल्याला लाभत नाही असे दिसते. त्यापासून सावध रहा.

कधीही कोणत्याही एका व्यवसायावर अवलंबून राहू नकोस कारण कधी कोणता व्यवसाय अडचणीत येईल सांगता येत नाही. म्हणून विविधता हा गुण व्यवसायात पाळणे गरजेचे आहे. त्याचबरोबर कधीही जास्त कर्ज अंगावर करून घेऊन झोप घालवून घेऊ नये. कर्जाशिवाय प्रगती होत नाही. पण ते कर्ज नेहमी आपण सहज फेडू शकतो त्याचे टेन्शन राहणार नाही. एवढेच कर्ज ठेवायचे. एक – दोन वर्षांनी उशिरा प्रगती झाली तरी नियोजन करूनच कोणतेही काम हातात घेणे व पूर्ण करणे. तुला अजून खूप वर्ष प्रगतीला वाव आहे. मला मिळण्यासाठी ज्या गोष्टीला ५० वर्षे लागली तेवढे वर्षे तुला काम करायला संधी आहे.

इंग्रजीत एक म्हण आहे. Health is wealth ही म्हण खरी आहे.

नेहमी स्वतःच्या शरीर प्रकृतीकडे चांगले लक्ष ठेवले पाहिजे. जेवण वेळेत घेतले पाहिजे. सकस आहार घेणे गरजेचे आहे. तू शाकाहारी असल्यामुळे संतुलित आहारावर लक्ष असणे गरजेचे आहे. चांगल्या प्रकृतीसाठी व उत्तम स्वास्थ्यासाठी व्यायाम आवश्यक आहे. दररोज किमान एक तास व्यायाम गरजेचा आहे. एवढा वेळ नक्की स्वतःसाठी काढला पाहिजे.

तू वकील झालेला आहेस, पूर्णपणे संस्था पहात असताना आपला हॉटेल व्यवसाय व इतर व्यवसाय पहात पहातच थोडी वकीलीची प्रॅक्टीस ठेवणे गरजेचे आहे. तुझे लग्न झाल्यावर पत्नी तुला मदत करेल. त्यावेळी तिच्यावर काही कामे सोपवून थोडा वकीली व्यवसाय करणे गरजेचे आहे. पैसा कमविण्यासाठी नाही पण अनुभव व लोकांवरती वचक ठेवण्यासाठी हे गरजेचे आहे असे मला वाटते.

अनेक लोक तुला संस्था कार्यात आणण्याबद्दल साशंक होते व आणू–नये असे ते म्हणत होते; परंतु त्या सर्वांना तुझ्या कर्तृत्वातून तू साबीत करून दाखवलं की तू कोण आहेस व कमी काळातच तू नाव लौकीक कमावलास तो तसाच टिकवून ठेवण्यासाठी नेहमी तत्पर राहावे.

कमी वयामध्ये अत्यंत चांगले कर्तृत्व व वक्तृत्व तू प्राप्त केले आहेस. तू चांगला वक्ता

होऊ शकतोस यात शंका नाही. त्यामुळे काही ठराविक लोकांवर व राष्ट्रीय नेत्यावर तू व्याख्याने द्यावी असे मला वाटते. त्यात तू यशस्वी वक्ता म्हणून नावाजला जाशील यात शंका नाही.

तुझ्या वयाप्रमाणे तू जो रागवत आहेस हे साहजिकच आहे. पण आपण मालक आहोत. आपल्या हातात पूर्ण सत्ता आहे व आपण कोणताही निर्णय घेऊ शकतो. त्यामुळे शांततेने निर्णय घेण्याचा प्रयत्न करावा. कोणताही निर्णय घेताना शांतपणे योग्य निर्णय घ्यावयास पाहिजे. कारण निर्णयाची व्याख्या तशीच आहे. Decision means choosing best alternative amongst alternatives त्यामुळे योग्य पर्यायाची निवड करून निर्णय घेऊन स्वतःला यशस्वी करावयास पाहिजे.

कोणतेही काम नियोजनाशिवाय करणे योग्य नसते. योग्य नियोजन व योग्य निर्णय व योग्य राबवणूक यातून यश शक्य होते व ते दीर्घकाळ टिकते. यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा, निर्व्यसनीपणा, योग्य निर्णय व चारित्र्य (Character) या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या सर्व तुझ्यात आहेत. पण त्या काळाच्या ओघात शिथिल होता कामा नयेत. चारित्र्य हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. स्वामी विवेकानंद सांगतात.

When you loose your wealth

nothing is lost

When you loose your health

some thing is lost

but when you loose your character

everything is lost.

पैसा व शरीर प्रकृती केव्हाही मिळविता येते पण ज्या वेळेला एखादा माणूस चारित्र्य हरवतो त्या वेळेला सर्व हरवल्यासारखं आहे. हे प्रामुख्याने लक्षात ठेव. लोक काहीही म्हणतील, आपला दृढ विश्वास स्वतःवर असणे गरजेचे आहे. चांगल्या माणसाला जाणिवपूर्वक लोक नाव ठेवत असतात.

तुला जास्त सांगण्याची आवश्यकता वाटत नाही पण सांगावे वाटले. तू चांगल्या तालमीत तयार झाल्यामुळे तुला अडचणी कमी येतील कारण मी संपूर्ण अडचणी व अयोग्य लोकामध्ये राहून ही यश प्राप्त करू शकलो. तुझ्यातही तेच गुण आहेत. तू कष्टाळू, प्रामाणिक, अभ्यासू, निर्व्यसनी व कठोर निर्णय घेण्यास पात्र आहेस त्यामुळे तुला यश मिळेल व तू अनेक यशाची शिखरे पादाक्रांत करशील व आपले विद्यापीठाचे स्वप्न साकार करशील यात आता मला शंका वाटत नाही. तुला माझ्यातर्फे अनेक उत्तम आशीर्वाद.

तुझे बाबा

# ३५. शैक्षणिक विचार

आजची भारत देशातील शिक्षण पद्धती ही इंग्रजांनी तयार केलेली होती. इंग्रजांना फक्त या देशात कारकून पाहिजे होते. त्यामुळे पूर्वी भारतात असलेली शिक्षण पद्धती मोडून काढून भारत देशात ही आधुनिक शिक्षण पद्धती १८३५ सालापासून लागू केली गेली. ती आजतागायत चालू आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे उलटून गेली तरी त्यात आपण काहीच बदल केलेला नाही. इंग्रजांनी जाणीवपूर्वक बल, बुद्धी व सद्‌विचार ज्याच्यावर पूर्वीची शिक्षण पद्धती अवलंबून होती ते काढून टाकूनही शिक्षण पद्धती बनवली व माणसाला संस्कार होणार नाहीत याची काळजी घेतली. खरं तर संस्कार कुटुंब, देश, माता-पिता त्यांच्यावर प्रेम असेल तर सामाजिक शांतता लाभेल. पण याला महत्त्व दिलं जात नाही. पूर्वी लोक माता, पित्याची व गुरुजी आज्ञा पाळत होते. स्वतःच्या देशासाठी व मातृभूमीसाठी स्वतःचे प्राण देण्यात धन्यता मानत होते. आता कोट्यावधी लोक या शिक्षण पद्धतीमुळे या सर्वांपासून वंचित होऊन अत्यंत स्वार्थी व खोटारडा समाज निर्माण होत आहे. याकडे शिक्षण तज्ज्ञाचे लक्ष नाही. सर्व लोक भारत देशाचे वाटोळ कसं होईल यामध्येच मशगुल आहेत. जे विद्यार्थी गुरुंनी सांगितलेलं सगळ प्रमाण मानत होते. तेच विद्यार्थी शिक्षकाला मारहाण करताना दिसत आहेत. काहीही ऐकायला तयार नाहीत. या धोरणात आमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. अनेक पोलिस स्टेशन काढण्यापेक्षा समाज हा संस्कारी होईल याकडे लक्ष दिलं तर लोकंच चुकीचं वागणार नाहीत व सर्व लोक नियमांच पालन करतील. समाजाविषयी देशाविषयी जे ज्ञान द्यावयास पाहिजे तेच दिले जात नाही व सर्वात महत्त्वाचे म्हणजे या देशातील शिक्षण व्यवस्थेमध्ये जो चांगलं वागतो. प्रामाणिकपणे राहतो, त्याला एकही मार्क नाही किंवा त्याचा मार्कशीटमध्ये उल्लेखच नाही. त्यामुळे स्पर्धेतून संस्था व चांगुलपणा बाजूला काढून टाकलेला

दिसतो. हे भारत देशाच्या दृष्टिकोनातून अत्यंत घातक आहे. या देशात अल्प संख्यांक समाज आपआपल्या धर्माचं शिक्षण ऐकू शकतात; परंतु बहुसंख्याक लोक आपल्या देशात आपल्या सुसंस्कारी ग्रंथाच शिक्षण देऊ शकत नाही. माणसावर संस्कार केले तर तो माणूस घडतो नाहीतर तो प्राणीच असतो. ही शिक्षण तज्ज्ञात भुरळ का पडलेली आहे हे समजत नाही. बलवान भारत करायचा असेल तर व्यायामाला मार्क्स पाहिजेत. सुसंस्कारी भारत करायचा असेल तर संस्काराला, चांगुलपणा सत्यवादाला मार्क्स पाहिजेत या शिक्षण पद्धतीत काहीच नाही. हे दुर्दैव आहे.

आहार विहार व विचार यांची सांगड असते. सध्याच्या तरुण पिढीला व मुलांना काहीच माहित नाही अशी अवस्था झाली आहे. फक्त मार्क्स मिळवायचे व पास व्हायचे एवढेच माहित आहे व अनेक मुलांना तर स्वतःचं नाव देखील लिहिता येत नाही. तरी काहीच परिणाम नाही हे फार मोठे षढयंत्र असले पाहिजे असे मला वाटते.

हे मी माहित करून माझ्या शिक्षण संस्थेचे ब्रिद वाक्य हे ''बल, बुद्धी व सद्‌विचारासाठी शिक्षण'' असे ठेवले आहे. कारण शिक्षणाचा उद्देश त्या मुलाला माणूस बनवणे असा असावा लागतो.

माझी स्वतःवर व देवावर श्रद्धा आहे त्यामुळे मी तर देव मानणारा आहे. त्यामुळे आपण आपल्या चांगल्या गोष्टीपासून हलत नाहीत व चांगले संस्कार सोडत नाहीत. पण माणसाची कोणावरतरी श्रद्धा पाहिजे. हे मात्र नक्की मला तर देवावर श्रद्धेचा चांगलाच अनुभव आलेला आहे. यात शंका नाही.

**SUDHAKAR E. AVHAD**
B.Sc.(Hons.) ; LL.M.
ADVOCATE

Office :
1 + 2 Siddharth Chambers, 16/1, Erandwana,
Karve Road, Pune - 411 004.
Phone : 5431424, 5431434

।।श्री ।।

२५ मे, २००२

प्रति,

प्रिय डॉ. सुधाकरराव जाधवर,

स. न.

आजच आपल्या सुयशाची बातमी वाचली. खरचं अवर्णनीय आनंद झाला ! खूप वेळ दुरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु सतत अभिनंदनाचे फोन चालू असल्याने दुरभाष्य होऊ शकले नाही.

तुमचे अनेक कारणास्तव अभिनंदन करतो. अनेक कर्तबगार माणसे आयुष्यांत एम. ए. होतात, एम.कॉम. होतात. एल. एल. बी., एल. एल. एम. होतात. अगदी शेवटी पीएच.डी. होतात. आम्हास आनंद होतो आणि अभिमान वाटतो की, आमचे स्नेही जाधवर सर एकाच आयुष्यात हे सर्व झाले. मला वाटते अशी कर्तबगारी अत्यंत दुर्मिळ आहे.

आपण ज्या पार्श्वभूमीवर हे यश नव्हे ही यशोशिखरें पादाक्रांत केलीत त्यावरून तर आपले यश ‘दैदिप्यमान’ आहे. एका खेडेगावातील शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या शेतकरी कुटूंबातील घटकाने मिळविलेले यश तुम्हांसोबतच आम्हांसही अभिमान वाटते.

सर, याशिवाय आपल्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू मी खूपच जवळून पाहिलेत. हाडाचा शिक्षक, बिल्डर, शिक्षण संस्थाचालक, बँकर, समाजसेवा इ. क्षेत्रात आपण प्राविण्य मिळविलेत. यासाठी आपण घेतलेल्या श्रमाची मी कल्पना करू शकतो. थोड्याशा यशाच्या हळकुंडाने पिवळी होणारी माणसे तुमच्या तुलनेत किती खुजी आहेत हे समजून येते. नाही तरी आपल्या जवळच्या माणसाची उंची समजण्यास जाणकारांनाही उशीर होतो.

माझा आवडता तत्त्वज्ञ H. W. Longfellow ची उक्ती तुम्हास पूर्णपणे लागू पडते –

"The height by the great men
reached and kept were not
attained by a sudden flight;
But they, while their companious
Slept, were toiling upward in night".

'Discreati' ने सांगितल्याप्रमाणे,

"The secret of success to constancy to purpose", तुमच्या जीवनात दिसून येते.

राष्ट्रसंत तुकाराम महाराजांना

''असाध्य ते साध्य करिता सायास !
कारण अभ्यास तुका म्हणे !!
हेच आपल्या यशाचे गमक आहे.

आपल्या आयुष्यात यश, समृद्धी व कष्ट यांचे संबंध काय आहेत हे Lord Reading नावाच्या इंग्लीश बॅरीस्टरने फार सुंदर शब्दात सांगितले आहे.

"Lord Reading When joined the Bar thought that it would be a bed of roses and no bed or all bed and no roses !"

Lord Reading प्रमाणे आमच्या डॉ. जाधवर यांनाही विश्रांती उसंत नाही याचीही आम्हांस जाणीव आहे.

मित्रवर्य, तुम्हास कळकळीचे सांगणे की तुम्ही आता अशा उंचीवर पोहोचला आहात की, बहिणाबाईंच्या शब्दांत –

''जग जग माझ्या जीवा
असं जगनं तोलाचे !
उच्च गगनासारखं
धरतीच्या रे मोलाचे !

नाहीतर विचाराला न वाहिलेलं कसं असत ते Sir Winston Churchill यांनी कन्येला ला लिहिलेल्या पत्रात सांगितले आहे –

"I have achieved a great deal to achieve nothing in the end."

सर, आपल्या सारख्या स्वकर्तबगारीने यशोशिखरे सर करणाऱ्या महामानवाचे वर्णन भर्तृहरीचे नीतिशास्त्रात केले आहे –

‘‘रत्नैर्महार्हैस्तुतुषर्न देवा<br>
न भजिरे भीमानिष्ण भीतिम !<br>
सुधां विना न प्रथखुर्निरामं<br>
न निश्चिताथी द्विस्यांनी धीरा !!’’

आपल्या सोबत आपल्या प. पू. मातोश्री व पिताजी यांचे आशीर्वाद हेच आपल्या यशाचे सूत्र आहे.

संत तुकाराम म्हणतात

‘‘जया कुळी कन्या पुत्र होती सात्वीक !<br>
तयाचा हरीख वाटे देवा !!’’

आपल्या यशाची कमान अशीच वाढत राहो अशी ईश्वरचरणी प्रार्थना !

आपल्या सोबत सर्व कुटुंबियाचे अभिनंदन !

प्रत्यक्ष भेटीत कधीकधी भावना व्यक्त करणे शक्य होत नसते म्हणून हा पत्रप्रपंच !

कळावे,

लोभ आहेच वृद्धींगत व्हावा.



# सुधाकर

वडजीमध्ये जन्मले धुरंधर
गोंडस गोरे डोळे पाणीदार
हुशार चुणचुणीत फार
वर्गात नेहमी पहिला नंबर
आशेचा किरण वाटे वारंवार
अमृताचे कर सुधाकर सुधाकर ।।१ ।।

माध्यमिक शिक्षण तेरखेड्याला
उच्च माध्यमिक बार्शी कॉलेजला
उच्च पदवी सुलाखे कॉमर्स कॉलेजला
अंकेक्षण कर पद्धतीवर भर
तेथेच झाले प्रथम प्रोफेसर
विद्यार्थी प्रिय सुधाकर सुधाकर ।।२ ।।

वडजीत प्रथम हायस्कूल स्थापनेनंतर
जेधे कॉलेजला स्थलांतर
बांधकाम व्यवसाय हातभार
चक्रफिरे अर्थारजनावर
शिक्षण संस्था उभारण्यावर भर
दूरदृष्टीचे सुधाकर सुधाकर ।।३ ।।

नऱ्हेत दोन्ही माध्यम कला, वाणिज्य, सायन्स सुरु
उच्च पदवी शिक्षणशास्त्र पदवी सुरू
नर्सिंग कॉलेज सात संस्था सुरु
पंधराशे कर्मचारी राबे होतकरू
के. जी. ते पी. जी. चाले निरंतर
अन्नदाते सुधाकर सुधाकर ।।४ ।।

चंद्रकांत दांगट कॉलेजला प्राचार्य झाले
नर्सिंग कॉलेज परिषद अध्यक्ष बनले
सावित्रीबाई फुले विद्यापीठ डीन झाले
पुस्तके ह्यांची पदवी अभ्यासाला
विद्यावाचस्पतीसह पदव्यांचा गळी हार
पदव्यांचे महामेरु सुधाकर सुधाकर ।।५ ।।

इंजिनिअरिंग मेडिकल कॉलेजवर भर
गरीब विद्यार्थी वसतीगृहावर
सुरेखाताईंची शिस्त विद्यार्थिनीवर
पुत्र जयप्रकाश शार्दुल वारसा चालवणार
जाधवर कुल कर्तव्याच्या शिखरावर
यशस्वी जीवनाचे शिल्पकार सुधाकर सुधाकर ।।६ ।।

**भारत धावारे**

Jadhavar®
The Symbol of Success (Since 2014)

"Education for Strength, Intellect & Wisdom"
- Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar

# JADHAVAR GROUP OF INSTITUTES

The foundation provides quality education in the fields of Management, Arts, Commerce, Science, Nursing, Junior College, International Schools, Open University Center, Schools & School of Education. **Jadhavar Group of Institute's** operates under the expert guidance of Educationist **Dr. Sudhakarrao Jadhavar**. The group has one clear mission to deliver quality education to the upcoming generations.

13000+ STUDENTS | 500+ STAFF | 30+ SCHOOLS COLLEGES | 100%* PLACEMENT ASSISTANCE

## MANAGEMENT
M.B.A. / P.G.D.M
Phone - 9823872816
www.adityainstitute.co.in

## NURSING
A.N.M / G.N.M.
Phone - 8459727432
www.jadhavarfoundations.org

## YCMOU
B.A / B.Com / B.C.A. / M.C.A / D.S.M.
Phone - 8459763113

## SR. COLLEGE
Internal & *External
BBA / BCA / B.Com / M.Com / B.A.* / M.A.*
Phone - 9168274116
www.jadhavarcollegeedu.com

## PARAMEDICAL
D.M.L.T. / C.M.L.T.
Phone - 8459727432
www.sjcp.in/

## EDUCATION
B.Ed / D.EL.ED / T.T.C.
Phone - 8975054114
www.jgefs.org / www.jaiganeshded.in

## JR. COLLEGE
11th & 12th
Arts Commerce Science
Phone - 8459790540
www.jadhavarjrcollege.com

## SCHOOL
Play Group to 10th SSC Board Eng. Med./Semi Eng.
Phone - 7888274117
www.paradiseems.co.in / www.jadhavarems.in / www.jadhavarsemienglish.in

## INTERNATIONAL SCHOOL
Play Group to 12th C.B.S.E. Board
Phone - 8459781648
www.jadhavarcbse.co.in



Prin.Dr. Sudhakarrao Jadhavar Educational Campus (1), Narhe, Pune-41



Adv. Shardul Sudhakarrao Jadhavar Educational Campus (2), Narhe, Pune - 41

Surekhatai Sudhakarrao Jadhavar Educational Campus (3), Vadgaon Bk, Pune-41.

Surekha Institute of Nursing Educational Campus (4), Terkheda, Tal. Washi, Dist. Osmanabad-25.

Apply Online on jadhavargroupofinstitute.in

Have a chance to WIN the Scholarship

Founder President



## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट

च्या वतीने भारतीय सैन्य दल, पोलीस दल, अग्निशमन दल, आणि पत्रकार यांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्कात 50 टक्के सवलत देण्यात येणार आहे. केजी ते पदव्यूत्तर शिक्षणात सर्वच इयत्तांमध्ये ही सवलत देण्यात येणार आहे. इन्स्टिट्यूटला 08 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सर्व शाखांमध्ये ही सवलत राबविण्यात येत आहे.

या सवलतीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी **9075344276** या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करीत आहोत.

press

Connect with us on Social Media
#JadhavarGroupOfInstitutes

Vice President



**Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar**
M.Com., M.A., L.L.M., M.P.M., D.T.L., D.L.L. & L.W., G.D.C. & A., Ph.D.
President : All India Principal Federation
Ex. Member : Management Council, Savitribai Phule Pune University, Pune.
Secretary General : Maharashtra State Principal Federation
General Secretary : Principal Forum (Savitribai Phule Pune University), Pune.

**Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar**
M.B.A., P.G.D.H.R.M., B.Com., D.H.R. & L., D.C.L., D.CPL., APCL., CMED., D.L.L. & L.W., L.L.M.
VICE PRESIDENT : Jadhavar Group of Institutes
• Jadhavar Hotel and Developer Pvt. Ltd. • Jadhavar Films
• Jadhavar Real Estates • Shardulrao Sudhakarrao Jadhavar Associates
• Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar Sevakanchi Patsanstha

# सुधाकर

**सु**विचार सदा ही जो हमें हैं बताते
ज़िंदगी के कटु सत्य से जो हमें हैं अवगत कराते
**धा**रण किया हैं जिन्होंने सादगीभरा मानव शरीर
लेकिन वे मुझे लगते हैं 'स्वामी विवेकानंद' के समान
**क**रके जिन्होंने अपार परिश्रम अपने ज़िंदगी की ज़ंग है जीती।
वे सदा शिलवंत रहे - यशवंत रहें यही सदिच्छा
**र**त्नों की चमक और जड़ - जवाहिरों की चमक भी
फ़िकी पड़ती हैं
**ह**मारे सर के विचारों का प्रकाश सूर्य के समान प्रकाशमान है।
सदा ही लगता है ज्ञान निछावर कर दूँ उनपर और
**ल**गता हैं एकलव्य के समान अपना अंगूठा
चरणों में अर्पण कर दूँ उनके
**ध**रा भी नम होगी, आकाश भी झूकेगा
सर के सामने हर संकट नतमस्तक होगा
**व**र ईश्वर ने ही उन्हें ऐसा दिया हैं।
कोई ईच्छा मन में जागे और तुरंत रास्ता निकल आए
**र**चें हैं उन्होंने न जाने कितनी गजले और काव्य
तुम्हारे - हमारे जीवन व्यथा के
**स**र आप देतें हो हमेशा यह कठोर जीवन जीने के
लिए आपके उपदेशों का सहारा -
**र**चकर यह काव्य सुमन किया है अर्पण आपके चरणों में
रहेगी आपकी छत्रछाया सदा ही, यहीं इच्छा है मन में

**वैशाली शिणगारे**
एस.वाय.बी.कॉम.